असाल तर खुशाल छापा, पण असें केल्यानें हें काम सारें २४ मासच चालून तुह्मांशीं जाहलेल्या दृढतम वर्गणीदारांचा एकदम वियोग योग नसतांही व्हावा हें कांहीं इष्ट नाहीं!! शिवाय २४ चोवीस मास पावेतों 'कादंबरी' रूप एकच गुऱ्हाळ लागून राहिल्यानें जशी साखर गोड असतांही अक्षय तिचेंच (इतर सर्व पदार्थांचा त्याग करून) सेवन केल्यानें ती विरस व कदाचित् कंटाळवाणीही होते, तशी तुमची वि० म० ही कादंबरी दरमहां तीच तीच वाचनांत आल्यानें होईल!!! आणि तेणें करून हे मा० पु० मनोरंजन करण्याचें कामीं योग्य व तत्पर असतांही अयोग्य होण्याचा संभव आहे!! सारांश, असेंच कदाचित् झाल्यास तुह्मांस हवे तितके वर्गणीदार काईम न राहतां केल्या श्रमांचें फल मिळणें तर लांबच! परंतु उलट जनोपहासास मात्र एक साधन होऊन राहील!!! करितां निभवेल तोंवर आपण हें एक अनेक विषयांचें ज्ञान करून देणारें मा० पु० चालवावें, व या पुस्तकाचे नांवास शोभतील असे एकापेक्षां जास्त विषय ( वर सांगितलेली कादंबरी व पुढें दाखविलेलीं नाटकें प्रहसनें वगैरे. ) घालावे, मात्र गहन विषय यांतून येऊं नयेत. कारण, त्यांचा सर्वांस सारखा उपयोग असत नाहीं, आणि ज्यास केवळ अशाच विषयाचे मा० पु० पाहिजे असेल त्यांनीं दुसऱ्या पुस्तकाकडे वळावें. बहुतेक सामान्य लोकांचा मा० पु० सुरू करण्याचे कामीं मनोरंजनाचाच मुख्य उद्देश असतो व त्यांतून नाटकें, कादंबऱ्या, प्रहसनें

वगैरेवर तर फारच भर असतो " शिवलीलामृताच्या पोथीस आठ आणे खर्चण्याची ज्यांना इच्छा नाहीं अर्थात द्रव्य सामर्थ्य कमी, त्या लोकांस दोन पासून पांच रुपये किमतीपर्यंतची कादंबरी, नाटकें इत्यादिकांचीं पुस्तकें विकत घेण्याची सवड होते ती कां बरें! तर मनाची ओढच कांहीं चमत्कारिक आहे !!" करितां आणि कादंबरी हा तुमचा त्या वर्गातील प्राधान्य विषयच सांप्रत असल्यमुळें बाकी राहिलेल्या नाटकें वगैरे विषयांची यांत ( मा० पु० ) गोंवणी करा, व याप्रमाणें जर सर्व सुव्यवस्था होईल तर मग तरुण लोकांस हें पुस्तक प्रिय होईलच! आतां वयस्क जनांची मात्र कटकट राहिली ह्मणून मधून मधून * सवडीप्रमाणें आणि २४ पेक्षां अधिक पृष्टें वाढविण्याची संधी आल्यावर अशा प्रकारच्या विषयाकारितां दरमहा कांहीं नियमित पृष्टेंच देत जावीं, ह्मणजे ज्यास जें आवडेल तें त्यांनीं ग्रहण करावें, कीं जेणेंकरून तुमच्या मा० पु० स तरुण व वृद्ध जनांकडून सारखाच आश्रय मिळेल" ) ह्मणून त्यास अनुसरून आजच्या अंकांत २४ पानेंभर एक कादंबरी न देतां (१) श्रीमंताचा वाढदिवस ( २ ) मुकुंदराव नाटक ( ३ ) प्रति विक्रमचरित्र ( ४ ) सुबोधकथामाला ( ५ ) सुगृहिणी स्वकर्तव्य ( ६ ) सुबोधवचनसारसंग्रह ( ७ ) वृषपर्वावध ( कविता ) ह्या विषयास सुरवात केली आहे, आणि हे विषय संभाळून सवडीनुरूप

---

* पुराण कथांचें सार २ सुभाषितें वगैरे

मधून मधून मुख पृष्ट ४ याजवर दिलेल्या विषयांपैकींही कांहीं कांहीं विषय देत जाऊं. तसेच आजला जें पद्य ग्रंथ ( पुराणें ) छापून प्रसिद्ध केलेले सर्वांच वचनांत येत आहेत. त्यांतील निवडक अशा कांहीं गोष्टीचें * व अप्रसिद्ध ग्रंथाचें क्रमशः ( कथानुक्रमानें ) गद्यांत सार येत जाईल, सुभाषितेंही अर्थासह येतील, तसेंच संस्कृत पद्य ग्रंथांतील कांहीं विशेष प्रसंगाचे व मनोरंजक वर्णनाचा मासला ( उतारा ) भावार्थासह येईल वगैरे अनेक उपयुक्त विषय यावयाचे. करितां या अल्पमोली बहुगुणी मा० पु० से सर्व भरतखंडभर भरपूर आश्रय मिळावा अशी माझी. इच्छा आहे स्वदेशसेवा भरपूर ( शक्त्यानुरुप) करावी, अशी जरी कोणी मनांत इच्छा वागविली तरी ती पूर्ण करून देण्याचे कामीं स्वदेश बांधवाचीच पूर्ण साह्यता असावी लागतें. प्रथम अंक पाहिल्यावर ह्या मा० पु० ची किंमत जरी अंमळ जास्त वाटण्याचा संभव आहे. तरी बाहेर गावीं ग्रंथ छापवून घेऊन तो राहण्याचे ठिकाणीं आगगाडी नसल्यामुळें टपालमार्फत आणवून परत ज्याची प्रत त्यास टपाल मार्फत पोंचाविणें वगैरे गोष्टीस लागणारा खर्च भागून आह्मांस

---

* मूरकर मंडळी कडून श्री रामविजय, हरिविजय इ० बऱ्याच पद्यग्रंथांचें गद्यरूपानें सारांश काढलेले ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत ह्मणून तशा ग्रंथांचे क्रमशः ( कथानुक्रमानें ) हल्लीं सारांश देण्याचें प्रयोजन राहिलें नाहीं " पुढील अंकीं--वृद्ध गंगामाहात्म्य नामक ( अपूर्व परमपूज्य आणि सुबोधाचें केवळ मंदिरच ! ) ग्रंथाचें गद्यरूपानें क्रमशः ( कथानुक्रमानें ) सारांश देण्यास सुरवात होईल

कितीसा मोठा नफा पडेल हें विचारांतीं ताडून पाहिल्यानें आजला सालीना ठरविलेली वर्गणी जास्त आहे किंवा कसें हें वाचकांस सहज कळून येईल. तथापि वर्गणीदारांच्या संख्येच्या मानानें आणि खर्चवेच वगैरे सांभाळून आह्मीं ह्या पुस्तकाची वर्गणी कांहीं कमी करण्याचें योजिलें आहे. व पांचशें वर्गणीदार जमतांच ३६ पृष्ठें करणार तें निराळेंच ! परंतु दोन्हीं गोष्टी घडून येण्यास निदान १ हजार वर्गणीदारांनीं तरी या मा० पु० स आश्रय देण्यास आपला हात उदार मनानें पुढें करायाला पाहिजेत !! असो आतां ह्यापेक्षां जास्त लिहिण्यांत आज कांहीं हशील नाहीं अनुभवांतीं सर्व खरें खोटें कळेल. ह्मणून आतां शेवटीं संपूर्ण विश्वाचें सूत्र चालविणारा जो परमेश्वर ज्याच्या कृपेवांचून मनुष्याचे सर्व प्रयत्न व्यर्थ होत, व ज्याच्या इच्छेनें आजच हा आनंदाचा दिवस प्राप्त झाला, त्यास अनन्य भावानें शतशः साष्टांग प्रणिपात करून हें काम या पुढें सुयंत्रपणें चालण्यास्तव आह्मांस व आमच्या प्रिय वर्गणीदारांस स्वकर्तव्यसामर्थ्य प्राप्त होवो, एतदर्थ त्याजवळ प्रसाद मागून हा प्रस्ताव पूर्ण करितों.

दा.क्र.
वाई जि. सातारा

# श्रीमंतांचा वाढदिवस.

अथवा

# श्रीरामजन्म कथासंग्रह.

( गद्यपद्यात्मक )

४८७१३
०५०

## अंक १ ला.

कीर्तनकार—[मंगला चरण आटोपून नंतर] सभास्थित महाजनांकडे आनंदभरित मुद्रेनें पहात—आणि त्यांस स्वकार्यी स्वमन स्थित ठेवण्याविषयीं प्रार्थना करण्याच्या इराद्यानें—अहो सभानायक हो-आपणास माझी थोडी विनंति आहे कृपा करून ऐकावी.—

### पद्य.

॥ सकलापि कला कलावतां
॥ विकला पुण्यकलांविना खलु ॥
॥ सकला नयना वृथा यथा
॥ तनु भाजां हि कनीनिकां विना ॥१॥

**अर्थ**—सकला०-ह्म० ज्या प्रमाणें मनुष्याची सुतनु असतांही नयनांतरीं कनिनिका [ बुबुळें ] नस-

त्यानें ती जशी शोभत नाहींत तद्वत पुरुष गुणसंपन्न असून त्याच्या अंगीं पुण्य कला [ ईशकृपा] नसली तर त्याच्या सर्व कला फुकट जातात. करितां ईशकृपा सर्व प्राधान्यकला आहे व तीच प्रत्येक मनुष्य प्राण्यानें प्रथम आणि अवश्य साधावी. ती कशानें साधेल असें ह्मणाल तर " एकाग्र दृढ मानसकेलींतच तिचें बीजारोपण होऊन पुढें दिनावधीनें अभ्यास करित असतानांच दीर्घ वृक्ष बनून त्यापासून पुष्पफलादिकांचा लाभ प्राप्त व्हावयाचा." ही सेवा अर्थात भक्ति करण्याचें नवप्रकार सांगितले आहेत, त्यांतून ज्याला जोमार्ग आवडेल तो त्यांनीं स्वीकृत करून ईशकृपा साधून घ्यावी, 'साधु' या शद्बाचा अर्थ सुद्धा ( सा×धु ) षड्रिपूंला ज्यानें सोडलें, ह्मणजे त्याग केला, अर्थात् षड्विकार रहित झाला. असाच आहे व हे षड्विकार ज्याचे ठायीं नाहींत त्यानेंच ईशकृपा साधिली असें ह्मटलें असतां शोभतें, आणि ती ईशकृपा साधली कीं मग त्यास काळाचें सुद्धां भय वहाणें नको. ह्मटलें आहेः—

॥ आर्या ॥

" भगवत्कीर्ति सुधेते सेवुनि जे जाहले
सदामत्त ॥ "
" न धरिति भय काळाचें जिंकूं म्हणती
तयासही संत ॥ १ ॥ "

शिवाय हल्लींच्या काळांत जप–तप–यज्ञयागादि महत्कृत्यें सांधणें, हें आपणां प्राकृत जनांस अवांक्या

बाहेरील होईल व होतही आहेच यास्तव, “ ज्यांस ईशकृपा व्हावी अशी ईच्छा असेल, त्यांनीं इतर सतरा पंधरा भानगडींत न पडतां नामामृताचेंच सदैव सेवन करावें. अशी प्रत्यक्ष परमेश्वराचीच वेदवाणीच्या द्वारें आज्ञाही आहे ” ज्याचें त्यांनीं स्वतःच्या मानसिक सामर्थ्यावर साधेल त्या मार्गांनीं नामामृत प्राशन करून ईशकृपा करून घ्यावी हा उत्तम पक्ष! ( गुरूमुखानें तत्संबंधीं सर्व स्पष्टता करून घेतली पाहिजे. ) परंतु तो सर्वांसच साधत नाहीं. कारण, स्वतः नामामृत प्राशन करण्याची सोय, जी ग्रंथावलोकनाची संवय, ती अंगीं ज्ञान तितपतच असल्यामुळें, लावून घेतां येणें कठीण ! ! यास्तव दुसऱ्याच्या तोंडून त्याबद्दल जी सामान्य माहिती मिळेल त्यावरच निर्वाह करावा. ह्यास अन्यगत्यंतरच नाहीं ! ! ! व ह्याचकरितां आपल्या वाडवडिलांनीं कीर्तन करीत असतां मध्यंतरी आबालवृद्धांस समजेल अशा रीतीनें तत्ज्ञानामृतांचा अंशोपांश कां ह्मणाना, प्राकृत भाषेच्या आश्रयानें प्राप्त करून देण्याचा क्रम सुरू ठेवला आहे, तुकारामादिकांनीं आपलें सारें आयुष्य जें हरिकीर्तनांत घालविलें, त्यांत स्वतःच्या कल्याणापेक्षां दीन अज्ञान लोकांचा उद्धार व्हावा ह्याकडेसच त्यांचें विशेष लक्ष्य होतें ! ! कारण म्हटलें आहे ‘ संतांच्या विभुती ज्या असतात त्या बहुतांशी जगाच्या कल्याणाकरितांच असतात. ! व असे पुरुष ह्या जगांत ईशकृपेनें वारंवार उत्पन्न होऊन अज्ञान लोकांस ह्या दुस्तर भवाब्धींतून तारण्यास

अखंड तत्पर असतात ह्मणूनच ठीक आहे ! तथापि असा क्रम सुरू असतां ही स्वतपसामार्थ्यानेंच प्रसाद ज्याहीं मिळविला आहे असें कित्येक महाबली ह्या भूतलावर उत्पन्न होऊन त्यांचे पुढें कोणाचें कांहीं सामर्थ्य न चालतां ते अनावर व दुःष्टचित्त असे होऊन जगतीतलावरील प्रत्येक प्राणिमात्रास पीडाई होतात. म्हणून तद्बीजनाशनार्थ व दीनजन तापशमनार्थ मधून मधून ह्या मृत्युलोकीं प्रभूस अवतार घ्यावे लागतात. आजपर्यंत ईश्वराचे मत्स्य, कूर्म वराहादि झालेले दशावतार सर्वजन श्रुत आहेत, शिवाय भगवद्गीतेंत श्रीकृष्णानीं अर्जुनास म्हटलें आहे कीं, हे पांडवा मी ह्या भूतलावर अवतार कां केव्हां घेतों असें म्हणशील तरः—-

॥ श्लोक ॥

" परित्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृतां "
" धर्म संस्थापनार्थाय संभवामि युगेयुगे ॥ १॥
" यदा यदाहि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ॥
" अभ्युत्स्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहं॥ २॥

**अर्थ**—साधूंचें सर्व प्रकारें रक्षण व दुष्टांचा नाश करून धर्माची स्थापना करणें हीं मुख्य कर्तव्यें परमेश्वरावताराचीं होत. आणि ज्या ज्या वेळीं ह्या पृथ्वीवर धर्माची ( ममाज्ञेची ) ग्लानी होते, अधर्म चोहोंकडे विस्तृत होतो, त्या त्या वेळीं मला अवतार घ्यावा लागतो. ( १ ) दीन तापद जो बळी त्यास मी वामनावतार धारण करून रसातळांत घातलें (२)

# मुकुंदराव आणि चंद्रप्रभा
## अथवा
# दुःशील परिणामदर्शं नाटक.

## अंक १ ला.

## प्रवेश १ ला.

स्थल

दादासाहेबशेकदार यांचा वाडा.

पात्रें.

१ दादासाहेब, २ रामभट, ३ गोपाळराव, ४ मुकुंदराव, ५ लक्ष्मीबाई, ६ यमनी.

( दोन प्रहरची वेळ, दादासाहेब भोजन करून पानसुपारी खावयाकरितां नुकतेच बाहेर येऊन बसले आहेत तों रामभट व गोपाळराव हे येतात. )

**दादासा०**—( नमस्कार चमत्कार वगैरै झाल्यावर ) कां रामभटजी आज दुपारचेंच कोणीकडे येणें केलेंत ! कांहीं आणलें आहे वाटतें एखादें लचांड ! तुमची तर बोवा मोठी शिकस्तच आहे म्हणावयाची !

जेव्हां पहावें तेव्हां कांहीं तरी आपले कामकाज ठेवलेलेंच. " तुह्मी नांवाला मात्र भटजी अहांत; परंतु तुमचा धंदा मोठ्या वकीलाप्रमाणें सतरा प्रकारच्या उठाठेवीचा आहे. " मी पुष्कळ ठिकाणीं फिरलों, पण तुह्मासारखा ' खबढळ्या ' मनुष्य विरळाच पाहिला असेल ! ( राग येऊं देऊं नका बरें ! ) कोण तरी हें सामर्थ्य ! सुमारें चार पांच हजारांची ही वस्ती आहे, मीं सरकारी अम्मलदार सर्व तंट्या बखेड्याचा निकाल करण्यास तयार; ! पण काय बिशाद आहे ' कीं, रामभटाच्या सल्ल्यावांचून कोणीं एक पान हलवील ? ! ! तुह्मांजवळ असें आहे तरी काय मोहनास्त्र ' कीं, ज्यावर तुम्ही नजर फेंकावी तो तत्काळ तुमचा दासानुदासच बनावा ! ! ! मी तुह्माला इतका कां चाहतों हें माझें मला सुद्धां कळलें नाहीं. काय असेल तें असो !

राम०—आज आपण देखील स्तुति करूं लागलां, मग तर आतां बोलण्याची सोयच उरली नाहीं, मी यःकश्चित भट कपर्दिकेचा चाकर. मला ही स्तुति शोभते तरी काय, कुसुमसंगतीनें सूत्राला राजकंठीं वास घडूं लागला तर त्याचें त्यांत कांहीं विशेषत्व कुसुमानें वर्णावयास नको तर सूत्रानें त्या कुसुमाश्रयाची थोरवी उलट गाइली पाहिजे, तद्वत आपल्या आश्रयावर मी मोठा आणि "समर्थाच्या घरचें श्वान त्यासी सर्व देती मान " या ह्मणीप्रमाणें आपल्या आश्रयानें ह्या गांवांत राहून मान पावत आहे असें असतां इतकी माझी थोरवी आपण गातां हें मला फारच चम-

त्कारिक वाटतें. आपण थोर दयाळु अधिकारी आहांत या करितांच मला हाताशीं धरिलें आहे, नाहींतर कित्येक अंमलदारांची नुसती भेट होणें कठीण असतें. आपण दया केली ह्मणून मला दोन पैसे मिळून प्रपंच सुरळीतपणें चालत आहे, नाहींतर येरवी कोण फजीता असे ! ! भाकर आहे तर मीठ नाहीं, मीठ आहे तर भाकर नाहीं असें व्हावें ! ! ! महदाश्र्याची अशीच गोष्ट असते. ज्या मला भिकारड्याला पूर्वी दमडीला सुद्धां कोणी विचारीत नव्हतें त्यास आतां जिकडे तिकडे रामभट रामभट मोठया आर्जवानें पाचारण होत आहें [मनांत] " हो राव आपण ना ! सोद्यातले सोदे महा वस्ताद;" "सब शहरी आणि एक संगमनेरी !!" " चमडी जाय पण दमडी नजाय " परंतु या भटालाच तुह्मी वटणीला आलांत ! उगीच नाहीं आलात महाराज ! मी तसाच बळकट आहे ह्मणून! जेव्हां माझ्या मोहनास्त्रानें सारे गांव हाताशीं करून घेऊन मी आंपणाकडे वाजवी कामापेक्षां एक कुत्राही न येईल आणि सांज पासाव १ एक पैही घशांत न पडेल असा बंदोबस्त केला! व इकडे पूर्वी पासून आज का अमके राव आले! उद्यां तमके गोमाजी यावयाचे आहेत त्याना पंचपक्वानांची मेजवानी करावयाची असा पाठ पडला असल्यामुळें खर्चाची तंगी होऊन फजिती होऊं लागली! तेव्हां स्वारी आली ठिकाणावर आणि एक दिवसांत चारवेळ रामभटा पुढें नाक घासायाला! " बाबा भीक नको घालूं पण कुत्रें आटोंप " याप्रमाणे शिणून शेवटीं कबूल केलें

कीं रामभटजी आतां जें झालें तें गेलें पण आज पासून प्रत्येक मुकदम्यांत तुमचा तिसरा हिस्सा—मग तर झालेना? पण असा माझ्या पोटावर पुन्हा पाय देऊंनका; अशी विनंति केली मग तेंव्हांपासून आज पावेतों रामभट रामभट चाललें आहे उगीच नाहीं बाबा, मीं गोड नव्हे तर माझा पैसा गोड आहे! नेहमीं गांवांत काय आणि बाहेरगांवीं काय? रात्रीचा दिवस करून भटकत राहून नसतें थोतांड उभें करितों आणि त्याच्या रूपानें तुझ्या पायाजवळ थैलीचें तोंड मोकळें होतें. म्हणून बरें वाटतें. तुह्मी सरकारी नौकर इतकें करून तरी कोठें उपकार जाणतां! वेळ आली कीं, सापासारखे फूं फूं करीत अंगावर धांवत जावयाला तयार! एकूण निर्दय तर खरेच! तिळमात्र तुमचे पोटांत दया नसतेच !! मला देखील तूं दोन चार वेळां आपला हात दाखवायाला चुकला नाहींस, पण बरें काय चिंता आहे, तुलाही चांगलाच एकदां पाहीन !!

**दादा**०—बरें तें असो हे (गोपाळरावास अनुलक्षून) गृहस्थ कोण आहेत? अनोळखीचे दिसतात मला तर. कोठेसे असतात?

**रामभट**०—नगरास वांईकर आडनांवाचे मोठे हुषार जे इंग्रजी वकील आले आहेत म्हणून आपण ऐकत होतां.—त्यांचेच हे भाचे आहेत. ह्यांच्या कैलासवाशी विनायकराव नामक वडील बंधूची एक सात वर्षांची कन्या हल्लीं उपवर झाली असून सालमजकुरीं तिचा विवाह करण्याचा त्यांचा (वकिलाचा) मानस आहे. याकरितां त्यांनीं गोपाळरावजीस उत्तम वर योजना

# प्रति विक्रमचरित्र.

## किंवा

# लीलावती आणि माधवचंद्र.

## एक मनोरंजक गोष्ट.

अवंती नगरी मध्यें विक्रमसेन राज्य करीत असे, हें तर बहुजनश्रुत आहेच. तो राजा ह्मणजे कांहीं सामान्य पुरुष होता असें नाहीं तर त्याच्या अंगीं क्षमा दया–शांती–शौर्य–धैर्य–साहस–सद्धर्मप्रतिपालकत्व–दैवतसिद्धसाधनतत्परता इत्याद्यनेक गुणासाव करीत असल्यामुळें त्याची विमल अखंड कीर्ति गंगौघाचे परी सर्वत्र भूमंडलावर सदैव वास करीत आहे व त्या प्रत्येक गुणांची साक्षभूत अशी शेंकडों वर्षांपासून चालत आलेली दंतकथानकें आजवर आपण ऐकत आहों. आतां त्यांत सत्यांश किती आहे हें जरी निश्चयात्मक ठरवितां येत नाहीं तरी तो *अवतारिक पुरुष होता हें निर्विवाद ठरलें गेलें असल्यामुळें त्या त्या गोष्टी व्हाव्यात वा झाल्या असतील असें सहजी सर्वांस वाटत आहे त्याच प्रमाणें विक्रमाचा स्वभाव जात्या मोठा आनंदी, हौशी आणि

---

* ह्याबद्दलची सविस्तर माहिती पुस्तकाचें शेंवटीं येईल. (निबंध रूपानें).

विनोदी असा होता. त्याची राज्यपद्धत प्रजेस जिकडून विपुल सुखप्राप्ति होईल व सर्वत्र शांतता कायम राहील अशा प्रकारचीच होती. आणि विशेष एक गुण त्याच्या अंगीं असा होता कीं राज्यपदप्राप्तीमुळें नेहमीं मदांध होऊन न राहतां आपला देह सदैव परोपकरणी झिजविण्यास तो तत्पर असे; विशेष गुण ह्मणण्याचें कारण इतकेंच कीं राज्यपद ज्याला ज्याला प्राप्त होतें त्याचे ठिकाणीं निर्दयत्व, स्वच्छंदीपणा, विलासप्रियत्व, परोत्कर्षसहिष्णुत्व आणि आपल्या स्वराज्याविषयीं नीट बंदोबस्त नसतांही परराज्य बळकाविण्याची हाव आणि उद्योग इत्यादि दुर्गुण स्वाभाविकपणें वास करूं लागत असतातच ! ! ह्यास जरी शेंकडा दहा पांच अपवाद असले तरी आज पावेतों ( विक्रम राजाच्या कारकीर्दी पावेतों ) जे जे मोठमोठे नामांकीत राजे होऊन गेले ते ते सर्वस्वीच निर्दोष असे ठरले गेलेले नाहींत ! ! अस्तु. 'असें ऐकतों कीं, * * * * * विक्रम हा उज्जनीस राज्य चालवीत असतां दर संवत्सरी षण्मास राज्यकारभार पहावा व शेष काळ देशांतरावर फिरण्यांत घालवावा असा त्यानें क्रम ठेविला होता. उद्देश हा असे कीं पृथ्वीच्या पाठीवर कोठें काय चाललें आहे हें पाहण्याची त्यास फार हौस होती; त्या कामाकरितां त्याचे शेंकडोशें गुप्त हेर अखंड भूमंडलावर नाना प्रकारचीं रूपें धारण करून फिरत असत व नियमित कालीं भेटी अंतीं जें त्यांस वृत्त कळे त्याचा तो स्वतः तेथें जाऊन सत्यासत्यतेचा

शोध काढी आणि घरीं असे त्या वेळीं दर मासांतीं कृष्ण पक्षांतील शेंवटले पांच दिवस रात्रीच्या ठाईं स्वतः गस्तीचा पोषाख चढवून शहरांत फिरावयास जात असे अशी कांहीं त्याची कारकीर्द चमत्कारिक तऱ्हेची पण न्यायास अनुसरून होती; अस्तु.

वाचकहो ! वर लिहिल्या प्रमाणें तो विक्रमसेन सन्याय वर्तनानें आपला काळ घालवीत असतां एके-दिवशीं त्यास एका विश्वासु गुप्त हेरानें येऊन सांगितलें कीं महाराज आज बहुत दिवस झाले मीं या अवंतींत रात्रीच्या ठायीं गस्त घालीत फिरत असतों. त्यावरून आपल्या नगरांतील प्रत्येक लहान थोर मनुष्य आपल्या सुखावह राज्यपद्धतीची व आपल्या अंगीं वसत असलेल्या नाना गुणाविषयींची प्रसन्नांतःकरणानें स्तुति करीत असतात ह्मणून—आणि त्या स्तुतीस आपण पात्रही आहांत अशी माझी खात्री आहे—असें असतां आज एक महिना झाला असेल आपल्या शहरीं कोणी चंपावती नगरचा एक श्रीमान् व्यापारी येथें रहावयास आला आहे. त्याची लीलावति नांवाची एक अत्यंत सुंदर व तरुण कन्या आहे ती मात्र मी ज्या ज्या वेळीं तेथें जाऊन ऐकतों त्या त्या वेळीं आपली निंदा करीत असल्याचें माझ्या प्रत्ययास येत असतें; त्या मुलीचा बाप तिला पुष्कळ प्रकारें समजुतीच्या गोष्टी सांगतो; पण ती आपला आग्रह सोडीत नाहींच. असें त्या हेराचें भाषण ऐकून राजास परमाश्चर्य वाटलें. "कारण त्या काळीं त्याची निंदा करील त्यास जन्मभर कारागृह-

वासाची शिक्षा मिळे ! " त्या मुळें त्याच्या वर्तन-क्रमाबद्दल कोणी एक ब्र ही काढीत नसत. इतक्यावरून त्याचे वर्तनांत कांहीं वाईट प्रकार होते असें मात्र कोणीं मनांत आणूं नये; कारण ही कथा जरी दंतप्राधान्य आहे तरी विक्रम हा कोणत्या प्रकारचा मनुष्य होता हें सर्वत्र महशूर आहेच! अस्तु.

लीलावतीचें असें धाडसाचें कृत्य पाहून त्यास वाईट तर वाटलेंच परंतु सेवकाच्या वचनावरच केवळ भरंवसा ठेवणें हें योग्य नाहीं तर ' चक्षुर्वैसत्यं ' डोळ्यानीं पाहिलेली किंवा कानानीं ऐकलेली गोष्ट तीच खरी मानावी या करितां आज रात्रौ स्वतः ह्याचा परिचय पाहून नंतर जें करणें तें करावें. असा त्यानें निश्चय केला व तद्वत् त्याची त्यानीं अम्मलबजावणीही केली. त्या रात्रीं भोजनोत्तर तो स्वतः गस्तीचा पोषाख चढवून त्या दूताबरोबर शहरांत फिरावयास निघाला आणि थोडक्याच वेळांत सावकाराच्या वाड्यानजिक येऊन पोंचून एका अडोशास गुप्त रीतीनें छपून बसला व पुढें त्या बाप मुलीचा कांहीं वेळानें भाषणौघ सुरू होऊन त्यांत हेराच्या बातमीचा तथ्यांशही त्यास दिसूं लागला; यास्तव तो त्यांचा संवाद अगदीं लक्ष लावून ऐकूं लागला. त्यांतील सारांश असा मु०-( आश्चर्यभावदर्शक मुद्रा करून ) बाबा तुह्मी क्षत्रिय कुळांत जनन पावलां असून परमशूर आणि सत्यभाषणप्रिय असे आहांत व हा आपला सत्यभाषणप्रिय स्वभाव आपण चंपावतीस वरीं असतां घरांतील थोर लहानांस न आवडला ह-

# सुबोधकथामाला.

## कथा १ ली.

## सुशिलाचरित्र.

### किंवा.

## अनंतमाहात्म्य कथासार.

पांडवांचा दिवसें दिवस होत असलेला उत्कर्ष कौरवांस सहन न झाल्यामुळें दुर्योधनानें धृतराष्ट्राच्या संमतीनें कपटद्युतांत त्यांचें सर्वस्व हरण करण्याचा निश्चय करून त्यांस युक्ति प्रयुक्तीनें हस्तिनापुरास ( दिल्ली ) आणविलें आणि कपटानें पणांत त्यांस राज्य व द्रौपदी यांसह जिंकिलें म्हणून ते क्रोधायमान होऊन अरण्यवासाप्रत निघून गेले. असें अन्य ग्रंथांतरी वर्णिलेलें सर्वजन श्रुत आहेच. त्याप्रमाणें ते पांडव द्वादशवर्षेंपावेतों अरण्यवास करकरून व त्यांचे जिवास शांतीचा लवलेशही प्राप्त न व्हावा अशास्तव कौरव वारंवार त्यास गुप्त रीतीनें त्रास देत म्हणून ते शेवटीं त्रासले असतां कोणे एके दिवशीं दीन असे होऊन श्रीकृष्णास म्हणाले कीं, हें देवाधिदेवा, अजून तूं आमची कितीक कसोटी पाहणार आहेस ! ! ! आह्मीतर अगदींच आणि खरोखर आतां हे अरण्य-

वाससंबंधी कष्ट सोसण्यास असह्य असे बनलों आहों-
त ! ! कारितां हे भक्तजनकामकल्पद्रुमईशावतार
धारकश्रीकृष्णा आम्हांवर तूं दया करून ह्या संक-
टांतून मुक्त होऊं अशी कांहीं तोड दाखवीत ! त्यावर
तुह्मी संकट नाशनार्थ कांहीं व्रतादिक करण्यास तत्पर
असाल तर मी एक अल्पसा असाच तुह्मास उपाय
सांगेन म्हणून श्रीकृष्णानें प्रश्न केला, तेव्हां पांडव
पूर्वीपेक्षांही फार काकुळतीस येऊन त्यास विनविते
झाले कीं, हे देवा, तुझी आज्ञाच आम्हास मान्य आहे;
ह्मणून जेंजें सांगणें असेल तेंतें खुशाल सांग. असें
मोठ्या आनंदानें व लीनतापूर्वक म्हणाले व त्यावेळीं
श्रीकृष्णांनीं त्यांस जो अनंत देवाचा महिमा सांगितला
आहे तो मी येथें गद्यरूपानें सादर करितों:-

**श्रीकृष्ण ह्मणतात**—पूर्वी कृतयुगांत वसिष्ठ गो-
त्रोत्पन्न सुमंतु नामा एक विप्र होता. भृगुची दीक्षा
नामें जी एक कन्या होती ती त्याची धर्मपत्नी असे.
ही पतिव्रता आणि उदार बुद्धि अशी होती, यास्तव
तिजसंगतीनें त्या सुमंतु विप्राचा काळ मोठ्या आनंदांत
जात असे आणि पुढें त्यास योग्यकाळीं जी एक क-
न्या झाली होती, ती फार रूपवती व गुणवती अशी
असून तिनें त्या उदार बुद्धीच्या उभय मातापितरांस
आपल्या मुखचंद्रदर्शनानें आणि अंगभूत सहजलीले-
करून आनंदित करून सोडल्यामुळें तिचे त्यांनीं अ-
त्यंत आवडीचे व योग्य सुशीला असें नांव ठेविलें होतें.
ती दिवस, मास, ऋतु, अयन, वर्षांच्या अनुरोधानें
चंद्रकलेवत् वाढत असतां तर तिनें आपल्या आईबापां-

स आपल्या बाळलीलेकरून (चमत्कृति आचरणाच्या द्वारें) संतुष्ट करून सोडण्याची कमाल केली होती!! ती ज्या वेळीं आपल्या समंजसपणांत आली त्यावेळीं ती नित्यशहा स्वगृहशोभा करणें; देवगृहीं नाना पत्रादिकांचीं तोरणें लावणें, गुडिया उभारणें, कुशलतेचे भावदर्शक चित्रविचित्र रंगवल्लिका आंखणें, स्वस्तिकें, शंख, चक्र, गदा, पद्मादिक आयुधें साद्दश्यते परिरेखणें, विकसित सुपुष्पांच्या माळा, गजरे, तुरे करून देव ब्राह्मणास अर्पण करणें, स्वतः नानापारिमल द्रव्याच्या सिद्धतेनें देवतार्चन करून दृढ मानस भक्तींत रंगली जाणें, इत्यादी सत्कृत्यांत सदैव गुंतलेली असे! सारांश ती बाल्यदशेंतच सदाचरणप्रवृत्त अशी बनली होती, व त्या वरून ती सुकुलजा ह्या नामश्रेष्ठत्वास योग्य अशी होऊन त्या काळचे सर्व लोक ते तिचे सद्गुण पाहून फार थक्क होत!! मग ज्यांच्या पोटीं तिचें जन्म झालें होतें त्या मातापितरांस किती आश्चर्य व समाधान वाटलें असेल हें येथें निराळें सांगणें नको!!!

या संसारांत मनुष्यमात्रांस खरें सुख प्राप्त होण्यास द्रव्य हें एक मोठें साधन आहे; परंतु तें प्राप्त असतां ही घरांत जर पतिव्रता मनोविहारणी स्त्री, कुलावतंसपुत्र अथवा कन्या हीं नसलीं तर त्या द्रव्यापासून व्हावें तसें सुख मिळत नाहीं! राज्यपद कां प्राप्त होईना पण ह्या दोन गोष्टींची उणीव असतां त्या वैभवापासून कांहींच सुख व्हावयाचें नाहीं.!! सारांश श्रीमंती नसली तरी चालेल, पण घरांत सुगृ-

हिणी आणि आनंदजनक संतति ही अगत्य असावी! सुमंतु विप्र हा घरचा दरिद्रीच होता. पण ह्या वरील दोन गोष्टीची पूर्ण साह्यता त्यास होती म्हणून तो आपणास इंद्रापेक्षांही धन्य आणि सुखी मानी!! व सदैव समाधान वृत्तींत राहून ईश्वराचे आभार मानीत असे!! परंतु या मृत्युलोकची वस्ति अचिरायूच!! येथें अखंड सुखसमाधान कोण पावला!!! तो सुमंतु विप्र वर सांगितल्या प्रमाणें मोठ्या आनंदानें नांदत असतां त्यास पुढें ती असलेली सर्व सिद्धता फार दिवस लाभली नाहीं, ह्मणजे त्याला पूर्वपुण्ये करूनच जशी दीक्षा ही सुगृहिणी प्राप्त झाली होती तशी ती पुण्याई सरतांच ती अकस्मात् त्याचा निरोप घेऊन एकाएकीं परलोकास निघून गेली!! गृहकृत्य चालविण्यास घरांत दुसरें कोणीं नसून भार्या फार सुशील, आणि पातिव्रत्यसंरक्षणपटु अशी होती ह्मणून दिक्षेच्या मरणापासून त्या सुमंतु विप्रास फारच शोक ओढवला. परंतु शेवटीं दैवगति बलवत्तर असते या वचनावर समाधान करून घेऊन तो कांहीं दिवस पर्यंत तसाच निवांत राहिला. सुशीला ही अल्पवयस्क असून फार सुलक्षण असल्यामुळें सुमंतु विप्र स्त्री मेल्या पाठीमागें तिचें फारच ममतेनें लालन पालन करी, व हिला कसेंही करून आईचा विशेष आठव न होईल अशास्तव तो सदैव जपत असे. गृहसंबंधी सर्व कृत्य त्यानेंच करून सुशिलेस किंचितही त्याबद्दल तसदी होऊं देऊं नये, पण तशानें त्याच्या नित्य सदाचरणास मात्र आडफांटा बसण्याची पाळी

# सुगृहिणी स्वकर्तव्य

## अथवा

# पातिव्रत्याचे सामान्य नियम.

## प्रकरण १ लें.

## सभर्तृकेचें आचरण.

१ नित्यशाहा स्त्रियांनीं स्वपति जेवलेल्या पात्रीं बसून भोजन करीत असावें. २ पुरूष सन्मुख येतां लाजून आड वळावें व आज्ञेवांचून त्याचे समोर खालीं बसूं नये. ३ पतीच्या आज्ञेवांचून केव्हां आणि कोठेंही बाहेर जाऊं नये. ४ दानधर्म करणें झाल्यास त्यास विचारून करीत असावें. ५ शयनकाळीं भक्तिपुरस्सर पतीची चरणसेवा करावी. ६ एकांतांत जातेसमयीं प्रथम कंचुकी व तानवडे ह्यांचा त्याग करून नंतर पुरुषास स्पर्श करावा; कारण ह्या दोन वस्तु असतां जर पुरूषास स्पर्श झाला तर त्या त्याचे आयुष्यास घातक होतात. ७ पति निद्रिस्त झाल्या नंतर आपण निजावें आणि दुसरे दिवशीं प्रातःकाळीं तो उठण्याचे पूर्वी उठून सडासंमार्जन करावें व स्नान करून त्यास जागृति येतांच त्याची पादपूजा

करावी आणि भक्तियुक्त अंतःकरणेंकरून तें पादतीर्थ प्राशन करावें व मनांत पति हा प्रत्यक्ष शंकरच आहे असा भाव धरावा आणि सदैव त्याचे सेवेविषयीं उल्हासयुक्त असावें. ८ पति ज्या दिवशीं घरीं असेल त्या दिवशीं शृंगारादीक करावे नसल्यास वर्ज. ९ प्रसंगविशेषीं पति जरी क्रोधयुक्त होत्साता मर्मभेदक भाषण करूं लागला तरी त्या वेळीं त्यास उलट उत्तर न देतां आनंदांत असल्या वेळीं प्रार्थनेनें आपला जो योग्य उद्देश असेल तो त्यास कळवावा. १० पति बाहेरून घरीं येताक्षणींच हातचें काम टाकून तो जी आज्ञा करील ती मान्य करावी आणि जेणेंकरून त्याचा आत्मा त्वरित शांत होईल अशी व्यवस्था करावी. ११ ज्या दिवशीं पतिराज घरीं नसेल त्या दिवशीं अतिथिप्रसाद घ्यावा; किंवा गोमातेस अन्न घालून नंतर भोजन करावें; कारण गोमाता ही देवादिकांपेक्षांही श्रेष्ठ आहे.

## श्लोक.

पृष्ठे ब्रह्मा गलेविष्णुर्मुखेरुद्रप्रतिष्ठितः ॥
मध्येदेवगणाःसर्वे रोमकूपे महर्षयः ॥ १ ॥
नागाः पुच्छे खुराग्रेषु येचाष्टौकुलपर्वताः ॥
मूत्रे गंगादयो नद्यः नेत्रयोःशशिभास्करौ ॥२॥

१२ स्वगृह स्वसामर्थ्यानुरूप नेहमीं निर्मळ राखावे. १३ कांहीं नवीन व्रतोपोषण करणें झाल्यास पतीची आज्ञा असल्यावांचून करूं नये. १४ लोक

तीर्थयात्रादिकांस जातात ह्मणून हट्टानें आपणही जाऊं नये. १५ पुरुष घरीं असल्या वेळीं आपण दुःश्चित्त असूं नये व पुरुष जरी दुःश्चित्त असला तरी देखील आपण प्रसन्नांतःकरण राहून त्यास शांतवावें. १६ रजस्वला असतां मौन्य धारण करून ३ दिवस पर्यंत पुरुषमुखावलोकन न करितां चवथ्या दिवशीं स्नानानें शुद्ध झाल्यावर प्रथम पुरुषमुखावलोकन किंवा पुरुष घरीं नसेल तर सूर्यबिंबावलोकन करून गृहप्रवेश करावा; आणि तत्कालींच पुरूषाच्या आयुष्यवर्धनार्थ कुंकुमतिलक लावावा आणि त्या नंतर काजळ शेंदूर कंठसूत्रादिकांचा स्विकार करून सुवासीनींस तांबूल द्यावे. १७ मस्तकाचे केश मोकळे ठेवून किंवा पायीं विरवल्या नसतां पावूलभरही चालूं नये. १८ सूर्योदयानंतर वेणीफणी तसेंच दधिमंथनही करूं नये. १९ सायंकाळीं हातांत केरसुणी धरून दारीं झाडीत उभें राहूं नये व केंव्हांही झाडलेला केर घरांत न ठेवतां दूरवर नेऊन टाकावा; मात्र हातांत किंवा केरसुणीवर घालून केर टाकूं नये, तसेंच केर घराबाहेर आंगणांत घालवूं नये कारण तेणें करून त्या घरीं लक्ष्मी कधींही प्रवेश करून सुख देऊं शकत नाहीं. २० नित्यशः दिव्यांत नवीन वात घालीत असावी व दिवा नीट करणें असल्यास काडीनें त्यास पुढें सारावा; मालविणें असल्यास वस्त्राचा फटकारा किंवा तोंडाचा फुंकर घालून मालवूं नये. २१ शेजारीण, रजक स्त्री, कुंटीण, आणि दरिद्री जैन स्त्री ह्यांच्याशीं स्नेह संपादन करूं नये; केला

असतां हानी होते. २२ जी स्त्री स्वपतीची निंदा करीत असेल तिशीं आपण भाषण सुद्धां करूं नये कारण त्या योगें तिचे दोष तत्काळ आपले माथीं बसतात. २३ सासु, सासरे, नणंद, दीर, इत्यादिकांचा त्याग करून निराळें राहण्याचें कधीं मनीं वागवूं नये. २४ सासरचें गुह्य लोकांत किंवा माहेरीं जाऊन उघड करूं नये. पतीचें मन आकर्षण व्हावयाकारितां सासरच्या माणसांबद्दल नसत्या कागाळ्या कल्पून त्यास सागूं नयेत; ' कारण तो त्रासून निराळा झाल्यास वडील माणसें घरांत जीं असतील त्यांच्या सेवेविषयीं परांगमुख झाल्याचा दोष आपले माथीं बसतो हें नेहमीं लक्ष्यांत वागवावें, २५ अडोशाच्या ठिकाणीं सुद्धा पडदणी आड केल्या विरहित नग्नपणी अंग धुऊं नये. २६ सासु सासरे इत्यादि वडील माणसांची आज्ञा सदैव ग्रहण करीत असावी; मात्र ती ग्रहण केली असतां आपल्या पातिव्रत्यधर्मास जर फांटा बसण्याचा संभव असेल तर कदाचित् ती न केली तरी चालते. परंतु तशी बिकट आज्ञा पतीनें केली असतां मात्र तिचा अव्हेर करतां कामा नये. ! ! २७ उखळ, मुसळ, दाराचा उंबरा ह्यां वर बसूं नये. २८ पति जरी दरिद्री असेल तरी पण त्याची केव्हांही आज्ञा भंग करूं नये. फार तर काय पति लंगडा, पांगळा, आंधळा, बधिर, कुरूप, कृश व्याधिग्रस्त, कुकर्मी, मूर्ख आणि तृतीय प्रकृतींत मोडणारा असा कां असेना पण त्यास पूज्यच मानिलें पाहिजे. २९ त्याच्या इच्छेनुरूप जीं लेणीं लुगडीं देईल त्याचाच

# सुबोधवचन संग्रह.

१ ह्या लोकीं अशाश्वत तर सारेंच; पण स्वकर्तव्याला केव्हांही पराङ्मूख होऊं नये. २ दैवाप्रमाणें सर्व कांहीं मिळेलच, परंतु यत्न करावयास विसरूं नये. ३ कोणत्याही कार्यास हात लावण्यापूर्वी त्याच्या अथेतीचा पूर्ण विचार करावा ; हात लावल्यावर मध्यंतरीं विघ्नें येतील त्यांस न जुमानतां आपला क्रम सुरूं ठेवावा, आणि सोडणेंच भाग आलें तर मागाहून सोडल्याचा पश्चात्ताप केव्हांहीं होणार नाहीं, ह्याची चिकित्सा शांतपणानें करावी. ४ उतावळेपणा कोणत्याही कामांत करूं नये व ' धीरसो गंभीर ' असें लौकिकांत ह्मणतातही. परंतु काळ वेळ तशीच असल्यास हयगय करूं नये. ह्मणजे भलत्याच वेळीं ' धीरसो गंभीर ' ह्या वचनाचा उपयोग करूं नये. ५ ईश्वरदत्त स्थितींतच समाधानींत असावें, पण पशुपक्ष्यांदिकां प्रमाणें पूर्वापार चालत आलेल्या चालीरीतींत बदल करूं नयेच असा हेका धरूं नये; कारण मनुष्य प्राणी पशुपक्ष्यांदिकां प्रमाणें उपजत ज्ञानावरच निर्वाह करणारा असावा असा कांहीं ईश्वरी संकेत नाहीं तर त्यास ज्ञान हे स्वतःच्या आकलन शक्तीवर हवें तितकें वाढवितां येऊन त्यानें आपली स्थिति सुधारण्यास त्या ज्ञानचक्षूंचा उपयोग करावा अशी मुळींच व्यवस्था करून ठेविली आहे!! ६ आपले पूर्वज ( वडील ) ज्या मार्गानें सं-

सार प्रपंच रेटीत होते तोच मार्ग आपण धरावा. परंतु वर्तमानकाळीं आपली स्थिति जर भिन्न असेल तर मात्र त्या वर्तनाचा त्याग करून ह्या काळास उक्त असा मार्ग स्वीकारावा. ७ माझे वडील श्रीमंत होते व त्याना दुसऱ्याच्या घराची पायरी चढण्याचें देखील कारण नव्हतें ह्मणून आपण जरी आतां दरिद्री आहों तरी कायतो बाणा सोडावा हें ह्मणणें किती चांगलें आहे!! ? ! ,, ७ दरिद्र प्राप्त झालें तरी धैर्य व सत्व हीं केव्हांही सोडूं नयेत. कारण या दोहोंचा त्याग केल्यास दरिद्रावस्थेंत आपला निभाव लागणें कठीण. ७ आपणास मित्र असावे असें वाटत असेल तर सत्यवादी व मिष्ट भाषणी असा हो ! आणि मित्र करणें तो त्याचे मानासिक शुचिर्भूततेच्या अधिक उणेपणाचा विचार पाहून कर. कारण सन्मित्र साह्य असतां जितका हितकारी होतो तितका किंबहुना प्रतिकूळ झाला असतां अधिक घातक होतो. असें कां तर आपलें अति गुह्यही त्यास माहीत असल्यानें तो तें प्रतिकूळ झाला असतां लोकांपुढें मांडतो. ९ प्रत्येक कार्यसिद्धीला तूं परसाह्यापेक्षां स्वसाह्यावर ज्यास्त अवलंबून ऐस ह्मणजे तें निश्चयानें सिद्ध होईलच ! ! १० तूं कितीही शहाणा विचारी असलास तरी प्रत्येक गोष्टींत दुसऱ्या श्रेष्ट मनुष्याचें ह्मणा किंवा लहानाचें म्हणा मत घेत जा. परंतु ज्याचें मत घ्यावयाचें त्याचें लोकांत वर्तन कसें काय आहे ह्या गोष्टीकडे चांगलें लक्ष्य पुरवीत जा. निदान तुझ्या विषयीं तरी त्याचें मत नेहमी कसें असतें ह्मणजे नेहमीं तुझ्या बऱ्या विषयीं

श्री.

# वृषपर्वा वधकथन.*

## आर्या.

वृषपर्वा या नावें ।
असुरेंद्र एक जगति माझारी ॥
तद्यश थोरीव किती$ ।
स्पष्टाचि देवेंद्र वदत अस्मंदरी ॥ १ ॥
कष्टविले बहु नष्टचि ।

---

* पूर्वी दैत्यांचा राजा वृषपर्वा नामे एक असुर मोठा बली होता, त्यानें आपल्या बाहुबळानें देवादिकांस फारच त्रस्त करून सोडलें होतें. कारण दैत्य गुरू जो शुक्राचार्य त्या जवळ अमृतसंजीवनी असल्यामुळें त्यानें स्वपक्षीय जनांस रणीं ते मृत होऊन पडतांच पुन्हां सजीवित्व आणावें आणि तेणेंकरून दैत्यभार कायमच राही; देवांस ती विद्या अवगत नव्हती त्या मुळें वारंवार त्यांच्या सैन्याचा विध्वंस होऊन सर्व देव त्रस्त झाले व पुढें बराच काल पावेतों तो असुरेंद्र देवांस अजिंक्य असा शत्रु होऊन राहिला होता; ह्मणून आणि शुक्राचार्यानें मेघांचें आकर्षण केल्यानें १२ वर्षे पावेतों पृथ्वीवर त्या सुमारास अनावृष्टि झाली होती ह्मणून सर्व उध्वस्त झालेली पृथ्वी शांततेप्रत पावावी या दोहो कारणा करितां ब्रह्मदेवाच्या सूचने वरून इंद्रानें दशरथ राजास स्वर्गी आणवून त्या दुष्ट दैत्याचा त्याच्या हस्तानें नाश करविला वगैरे कथा रामायणांत आहे त्या आधारें हें वरील कथानक रचलें आहे.

$ त्याच्या यशाची थोरवी काय सांगावी ? इंद्र देखील हा मला एक अजिंक्य शत्रूच उत्पन्न झाला आहे असें ह्मणत असे.

१ माझा शत्रु.

खळकृतिला देवभार समुळदरें ॥
तत्साह्यार्थ काव्य शिरे ।
गोहनना विपिनि व्याघ्र*काळ-दरे॥ २॥
काव्य स्वकरीं जलदें हत ।
नावर्षे विफलयत्न सुर यांचे ॥
चिंताक्रांत मनीबहु ।
शचिरमणा ब्रह्मदेव सुर यांचे ॥ ३ ॥
नाना यत्नी न करीं ।
ये अंबुद त्रस्त भाग महिवरला ॥
अत्यंत तीव्र तपनें ।
तृणकणकीं समुळ भाग हारवला ॥४॥
गो ब्राह्मण पिडितचि ।
खगकुल की वनप हितसे झालें ॥
उध्वस्तमेदिनीती ।
गतधैर्वा कामिनि जाशि चाले ॥ ५ ॥
व्हावी वृष्टि सुवेळीं ।
सुख तेणे होई धेनु विप्रांसी ॥
यज्ञादिक सत्कर्मे ।
करूनि सुरां मोदें देति वि-प्रांशी ॥६॥

---

* गाईचे प्राणहरण करण्यास उत्सुक अशा सिंव्हानें जसें व्याघ्रास तूं मला मदत कर ह्मणून अर्जवानें प्रार्थिलें असतां तो स्वप्राण रक्षणार्थच भयानें त्यास साह्य करितो तद्वत स्वनाश न व्हावा ह्मणून शुक्राचार्य त्या दुःष्ट राजाच्या आश्रयाला राहिला होता.

१ दुःष्टाची कृति २ भयभीत होई ३ शुक्राचार्य ४ मेघ ५ इंद्र ६ प्रार्थी ७ मेघ ८ पक्षीकुल ९ वृक्ष १० विगतधवा ११आनंद १२ हाविर्भाग ग्रहण करून

# जाहिरात.

त्वरा करा ! **मुद्दाम वाचा ! !** आभार होतील ! !

**खटपट करून ग्रंथ पाठवा ! ! ५० रु० बक्षीस !!!**

## सुबोध आणि मनोहर

### प्राकृत नवीन ग्रंथ.

## कथाकल्पतरू.

हा नवीन ग्रंथ छापून प्रसिद्ध करण्याचें कामीं आजवर पुष्कळांनीं हर प्रयत्न केले परंतु त्यांत पूर्ण असें यश कोणासच आलें नाहीं ! ! तरीही पण प्रस्तुत मुंबईतील प्रसिद्ध " जगदीश्वर " प्रेसचें मालक 'नारायण रामचंद्र सोहनी' यांनीं सदर ग्रंथ बारा स्तबक पर्यंत मिळवून तो स्वतःच्या छापखान्यांत मासिकपुस्तकरूपानें छापून प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली आहे ! सोहनी यांचा स्वतांचा प्रेस असून त्यांची सद्यःस्थिति भरभराटीची आहे, या मुळें त्यांचे हातून तें काम पूर्णपणें सिद्धही होईल ! व *कथाकल्पतरू हा ग्रंथ फारच मनोहर व अपेक्षित कथारूपी रत्नप्राप्तीचें प्रत्यक्ष गृहच ! ! असा आहे. आणि तो जर छापून प्रसिद्ध करण्याचे सोहनी हे

---

* हा ग्रंथ संपूर्ण जरी आमच्या पाहण्यांत आलेला नाहीं, तथापि कांहीं वर्षांमागें आह्मी बागलाण प्रांतीं फिरत असतां सदर ग्रंथाचा ५ पांचवा स्तबक एके ठिकाणीं पाहिला होता, त्यावरून आमची खात्री झाली आहे कीं, या ग्रंथासारखा अमूल्य व संग्रहार्थ प्राकृत ओवीबद्ध अन्य ग्रंथच नाहीं ! !

हल्लीं स्वदेशबांधव हितप्रित्यर्थ करीत आहेत तर या कामीं त्यांचे भारतीय जनांवर मोठें उपकारच होत आहेत असें ह्मटलें पाहिजे ! ! आणि तें खरेंही आहे, परंतु सोहनी यांनीं हा ग्रंथ छापून प्रसिद्ध करण्याचे कामीं हल्लीं जी व्यवस्था केली आहे ती मात्र सर्वत्र देशबांधवाच्या पथ्यास सारखी पडत नाहीं ! असें कां तरी अल्प किंमतींतच विवक्षित गोरगरीब लोकांस त्याचा लाभ होत नाहीं ! [ सद्य कालची स्थिति कशी आहे हें आज येथें उघड करून दाखविलेंच पाहिजे असें नाहीं. कारण, ती सर्वजनश्रुत आहे ! ! आणि तेणेकरून इच्छा असतांही त्या अमूल्यकथारूपी अमृ।ाचा एक घुटकाही मिळत नसल्यामुळें त्यांचे हृदयास चटकलागून राहून ते निराश होत आहेत, असें आमच्या अनुभवास आलें आहे ! व ही जबरदस्त अडचण दूर करण्याविषयीं सोहनी यांजला सुचविण्याचें तूर्त इष्ट दिसत नाहीं ! ( ग्रंथविस्तार आधींच मोठा, त्यांतून तो मासिकपुस्तक—रूपानें निघत आहे, ह्मणून जितका लौकर छापला जाईल तितका बरा ! ! व दरसाल ह्या मासिक पुस्तकाची १२०० बाराशे पृष्ठे देऊन ६ सहा रुपये वर्गणी घेणें कांहीं कंटक पणाचें कृत्य नाहीं ! ! ! ) ह्मणून वर दर्शविल्याप्रमाणें गोरगरीब लोकांची कांहीं अशी तरी सोय होऊन त्यास कथामृतपानाची यत्किंचित् रुचि कळावी ती अशी कीं, त्या ग्रंथांतील *निवडक व

* कित्येक कथा पद्य [ मूळ ओंवीबद्ध ] रूपानेंच स्वतंत्र

( पुढें चालू ).

मनोरंजनादि गुणपूर्ण कांहीं कांहीं कथांचें गद्य रूपानें सार काढून *छापून प्रसिद्ध करावें या उद्देशानें ही जाहिरात प्रसिद्ध केली आहे! तरी उद्योगी मंडळीनें खटपट करून सदर ग्रंथ मिळवून द्यावा! एकदम सर्व ग्रंथ जरी न मिळाला तरी देखील असतील तेच स्तबक द्यावें ह्मणजे हिशोबानें जो आकार होईल तो आह्मीं देऊ. ग्रंथ मात्र उत्तम दशेंत (शुद्ध, स्वच्छ आणि नियमित कथापूर्ण असा असावा) कळावें विशेष माहिती पत्रद्वारें विचारावी. पत्र पेड, उत्तरास तिकीट पाठवावें. विज्ञप्ति—ही जाहिरात प्रत्येक वर्तमानपत्रकर्ते व मासिकपुस्तककर्ते ह्यांनीं सवडीनुसार दोनच वेळ अवश्य छापून प्रसिद्ध करण्याची मेहेरबानगी करावी.

म्या० 'खानदेशमित्र'

---

## विद्वज्जनांस प्रार्थना.

ह्या पुस्तकांत अनेक सुकुशल लेखकांचे लेख प्रसिद्ध होत जावे अशी आमची इच्छा आहे, करितां इकडे थोर थोर विद्वान् सद्गृहस्थ लक्ष्य पुरवून आपल्या अमूल्य वेळेचा कांहीं भाग या कामीं खर्ची घालून या पुस्तकास शोभा आणतील असें इच्छितों!!

---

छापून प्रसिद्ध करूं (वरील जाहिरात २ वेळ घेणारांस अशा ग्रंथाची छापील १ प्रत बक्षीस मिळत जाईल.)

* खानदेशमित्र मासिक पुस्तकांतून.

# सर्द वाचकांस अगत्याची सूचना.

हल्लीं गद्य व पद्य असे जरी पुष्कळ ग्रंथ छापलेले आपण पाहात आहांत तरी न छापलेले असेही अजून कित्येक ग्रंथ असावयाचेच ह्मणून आपलेकडे जे ग्रंथ छापून प्रसिद्ध झालेले नसून ते छापावे अशी इच्छा असेल ते आह्मास दिले असतां सवडीनुसार आह्मी या पुस्तकांतून व कांहीं स्वतंत्र पुस्तकरूपानें छापण्याचे करूं-करितां या गोष्टीकडे प्रत्येक वर्गणीदारानें नेहमीं ठेवून हर प्रयत्नानें एखाद दुसरा ग्रंथ मिळवून आह्मांस पाठविला असतां त्या बद्दल पाठविणारांचे आह्मी फार आभारी होऊं. ज्यांची इच्छा असेल त्यांना सवडीनुसार ग्रंथाचे योग्यतेनरूप द्रव्य द्वारेंही मदत करूं ! ! तूर्त खाली लिहिलेला ग्रंथ आह्मास पाहिजे. ( प्रत्येक ग्रंथाची छापील प्रत तर ग्रंथ पाठविणारास अवश्य मिळेल. )

## प्राकृत ओंवीबद्ध ग्रंथ.

( त्वराकरा ! **कोकिळामाहात्म्य.** बक्षीस द्या ! ! )

हा ग्रंथ आह्मास जे पाठवितील त्यांस १० दहा रुपये आणि ग्रंथाच्या दोन छापील प्रती देऊं ! ! ( ग्रंथ मिळतांच १० रुपये देऊ ! ! ) अगाऊ पत्रव्यवहार करून विशेष माहीती विचारावी. उत्तरास तिकीट असावें.

म्या० खा० मि० कर्ते.

## आभार.

नासिकवृत्त—राघवभूषण—बोधसुधाकर—बकुल —मुत्सद्दी आणि पंढरीमित्र हीं वर्तमानपत्रें भेटीला आलीं, त्याबद्दल खा० मि० त्यांचा परम आभारी आहे. इतर व्यवसायबंधूही अशीच

भेट देवोत. आज बहुतेक वर्तमानपत्रकर्ते व मा० पु० कर्ते त्याजकडे आमचा खा० मि० भेटीस गेला आहे तरी त्याचा सर्वांनीं स्विकार करून पसंत वाटल्यास आपापल्या अंकांनीं परत भेट द्यावी, ह्मणजे नियामित वेळीं आह्मीं त्यांस अंक पाठवीत जाऊं.

## इकडे अवश्य लक्ष्य द्या.

बालबोध वगैरेंतून जाहिरात पाहून ज्यांनीं अगाऊ सह्या पाठविल्या आहेत त्यांकडेस आज आम्ही त्यांचे सूचनेप्रमाणें मा०पु० अवलोकनार्थ पाठविलें आहे, तरी त्यांनीं तें वाचून पाहून घेण्याचें मत ठरण्यास अंक पोंहोचल्या पासून १५ दिवसांचें आंत वर्गणी पाठवून द्यावी, घेणें नसल्यास ८ दिवसांत अंक रवाना करून द्यावा, ज्यांना वर्गणी ह्या मुदतींत देणें असेल त्यांस सालीना अगाऊ ठरलेल्या १।८३ वर्गणींत ।८३ ट० हं० बद्दल माफ केलें आहे, आणि लायब्ऱ्या व शिक्षक ह्यांस तर ।८१४ आणेच पडतील. करितां ग्राहकांनीं वर्गणी भरण्याची फार त्वरा करावी ! ! अगाऊ सह्या देणारांस बक्षीस नेमलेलें ( प्रति विक्रमचरित्र ) पुस्तकही ह्यांत सामील केलें असून पूर्वीं सालीना ट० हां० सुद्धां अगाऊ १।। रु० वर्गणी ठरविली होती ती लोकाग्रहास्तव वरील मुदतींत फक्त १ रुपयाच केली आहे ! !

## सूचना.

जाहिरात प्रसिद्ध होण्यास आज सुमारें दहावर महिने होत आले, ह्यामुळें हें मा० पु० आतां मुळचि निघत नाहीं असा सर्वत्र समज झाला आहे, परंतु आह्मांस इतकी दिनावधी लावण्यास मध्यंतरी एक दोन अपरीहार्य करणें उत्पन्न झाली होती, म्हणून आतां त्याजबद्दल सर्वांनीं आपल्या मनांतलि क्लिष्ट कल्पना घालवून व गतगोष्टीबद्दल मला क्षमा करून या पुस्तकास अवश्य आश्रय द्यावा.

## मोठी अगत्याची सूचना.

ह्या मा० पु० एक सहा माहीच्या आंत जर एक हजार वर्गणीदार मिळतील तर सप्टेंबर १८९२ इ० च्या अंकासोबत ‘ मुकुंदराज आणि शृंगारमंजरी हे मनोरंजक गोष्टीचें नवीन पुस्तक मुद्दाम छापवून वर्गणीदारांस बक्षीस पाठवूं. इकडें सर्वांनीं लक्ष्य देऊन हस्तेपरहस्तें अवश्य या पुस्तकास आश्रय द्यावा.

म्या० खा० मि० कर्ते.

त्वरा करा! **खानदेशमित्र.** अवश्य घ्या!!

**( मासिक पुस्तक. )**

हें मा० पु० मार्च १८९ २इ० पासून सुरूं झालें असून हा आजचा त्याचा प्रथमांक आहे. ह्या पुस्तकांत नाटकें, कादंबऱ्या चातुर्याच्या गोष्टी, अद्भुत कथा, मनोरंजक कविता, शूरपुरुषांची व देवादिकांचीं चरित्रें, स्थलवर्णन, विनोदपर चुटके, लोकोत्तर चमत्कार, कधींही छापून प्रसिद्ध झाले नाहींत अशा पुराण ग्रंथांतील क्रमशः गद्यरूपानें सार, निवडक देशी औषधें, ठिकठिकाणचे नवल विशेष वर्तमान, सुबोधवचनसार संग्रह, ऐतिहासिक माहिती पुस्तकावरील अभिप्राय इ० इ० अनेक विषय येत जातील; त्याचप्रमाणें कोणीं हरएक प्रकारच्या उपयुक्त विषयांवरील लेख, पत्रव्यवहार, ( ह्यांत एक व्यक्तीस अनुलक्षून निंदा किंवा स्तुति केली असतां कामा नये. ) कूटें, सुभाषितें पाठविल्यास त्यांचाही समावेश केला जाईल. ( कूटें व सुभाषितें हीं पूर्वीं कधींही छापून प्रसिद्ध झालेलीं नाहींत. अशींच असावींत ) आजला जरी ह्या मा० पु० २४ पृष्ठें दिलीं आहेत तरी एक तिमाहीच्या आंतच जर ५०० वर वर्गणीदार मिळाले तर तीं लागलींच ३६ पावेतों करूं! सारें होणें जाणें आश्रयदात्यांच्या मर्जीवर अवलंबून आहे. करितां महाराष्ट्र भाषाभिज्ञ प्रत्येक कुटुंब प्रमुख मनुष्यांनीं ह्या गोष्टीकडे अवश्य लक्ष्य पुरवून ह्यास देतां येईल तितका उदार आश्रय द्यावा, व ते तसें करितील अशी मला पूर्ण आशा आहे.

**विशेष सूचना**——हा प्रथमांक आह्मीं नमुन्यादाखल स्वतःच्या खर्चानें पोष्टमार्फत पुष्कळ सूज्ञ व वाचनप्रिय सद्गृहस्थांकडे पाठविला आहे. परंतु पुढील अंक, वर्गणी ट० हा० सह आगाऊ आल्यावांचून कोणासही पाठवितां येण्याची सवड नाहीं. ह्यास्तव ज्यांस हें मा० पु० सुरूं ठेवणें असेल त्यांनीं अंक पावल्या दिवसा पासून १५ दिवसांचे आंत वर्गणी मेहेरबानीनें पाठवून द्यावी. किंवा घेणें नसल्यास अंक ८ दिवसांचे आंत परत करावा. दोन्ही तजविजींतून एकही जे करणार नाहींत त्यांजकडे आमचे ते कायमचे वर्गणीदार असें समजून दुसरा अंक व्ह्या० पे० नें (१८५) पाठविला जाईल.

**डि० व्हो० पुराणीक.**

॥ श्रीः ॥

# खानदेश मित्र.

॥ श्लोक ॥ ( बसंततिलका ).

कस्यापि कोप्यतिशयोऽस्ति स तेन लोके
ख्यातिं प्रयाति नहि सर्वविदस्तु सर्वे ॥
किं केतकी फलति किं पनसः सपुष्पः
किं नागवल्ल्यपिच पुष्पफलैरुपेता ॥ १ ॥

यज्जीव्यते क्षणमपि प्रथितं मनुष्यैर्विज्ञानविक्रमयशोभि-
रभज्यमानं ॥ तन्नामजीवितमिह प्रवदन्ति तज्ज्ञाःका-
कोऽपि जीवति चिराय बलिंच भुंक्ते ॥२॥

पुस्तक १. ३० एप्रिल १८९२. अंक २.


| विषय. | अनुक्रमणिका. | पृष्ठ. |
|---|---|---|
| १ रंजन आणि सुबोध | ... ... ... | १—६ |
| २ विश्रांति मंदीर | ... ... ... | १—१२ |
| ३ माधवनिधन काव्य | ... ... ... | १—६ |


पुणें येथें 'जगद्धितेच्छु' छा० छापून प्रकाशें येथें प्र०केलें.

## वर्गणीचे द

| | | | |
|---|---|---|---|
| गांवांतील वर्गणीदारांस वर्षाची | आगाऊ... | १ | रु० |
| ,, ,, | मागाहून... | १८४ | रु० |
| बाहेर गांवचे ,, ,, | अगाऊ ट. हं. | १८३ | |
| ,, ,, ,, | मागाहून ,, | १८८ | |

फुटकळ अंकास किंमत ३ आणे.

# आश्रयदात्यांस प्रार्थना.

१ प्रथमांक आम्हीं नमुन्याकारितां म्हणून स्वताच्या खर्चानें सुमारें ४०० शें वर लोकांपुढें मांडला होता, पैकीं ३५० वर ग्राहकांनीं आपलें अनुकूल मत असल्याचीं कार्डें आम्हांस पाठविलीं; परंतु अगाऊ टरलेल्या रकमेपैकीं अशी फारच थोड्या जणांकडून वर्गणी मिळाली, यास्तव या महिन्याचा अंक हातीं येतांच सर्व आश्रयदात्यांनीं आपापली वर्गणी पाठविण्याची मेहेरबानगी करावी. कारण, हें काम फार खर्चाचें असल्यामुळें जर वर्गणीदारांनीं वेळेवर वर्गणी न दिली तर तें सुयंत्रपणें कसें चालावें ? सुज्ञांस विशेष तसदी नको.

२ प्रथमांकीं लिहिल्याप्रमाणें हवे तितके वर्गणीदार मिळाले म्हणजे पृष्ठें वाढविण्याची व सप्टेंबर १८९२च्या अंकासोबत बाक्षिस बूक पाठवण्याची आम्ही तजवीज करूं कारितां सर्व आश्रयदात्यांनीं ही आमची दुसरी तसदी आणखी मान्य करावी; ती कोणती तर प्रत्येकानें आपणा[illegible] आणखी एकेक जोडीदार आह्मांस आश्रयदाता शो[illegible] काढावा व हें होणें फारसें कठिण नाहीं व झालें असतां आह्मांस आमची चाकरी बजाविण्यासही उमेद येईल. कराल काय हीं येवढी खटपट ? ! कराच महाराज ! ! पण वर्गणी मात्र आगाऊ पाठवा बरें ! ! !

३ आगाऊ वर्गणीची ( ३ आ० ट० हं० माफ)

# रंजन आणि सुबोध.

## प्रकरण १ लें.

## दरबारी *न्याय.

मनुष्यास हरवक्त आपल्या तंट्याबखेड्याचा निकाल दरबारीं न्यायानुसार करून घ्यावा लागतो आणि सांप्रत तर दरबारीन्यायावांचून कोणत्याही गोष्टीची तडजोड करूं नयेच अशी सर्व लोकांत समज झाली आहे; परंतु दरबारी न्याय मिळविण्यास अनुकूळ असाव्या अशा ज्या कांहीं गोष्टी आहेत त्यांकडे फारसें कोणाचें लक्ष्य जात नाहीं आणि ह्मणून त्या दरबारी न्यायाचे पायीं कित्येक लोक भिकेस लागत चालले आहेत, यास्तव ज्यांस दरबारीन्याय पाहिजे असेल त्यांनीं खालीं लिहिलेल्या मुख्य चार गोष्टींची तरी निदान आपणास अनुकूलता आहे किंवा कसें हें पहावें व नसल्यास दरबारचें तोंड न पाहतां अन्य तऱ्हेनें आपल्या भानगडीचा निकाल करून घ्यावा. असें झाल्यानें हल्लीं या दरबारी न्यायाचे संबंधानें होत असलेले भयंकर परिणाम पुष्कळ अंशीं टळण्याचा संभव आहे ! !

---

* दरबारी न्याय करून घेऊं नयेच असें कांहीं आमचें ह्मणणें नाहीं परंतु तो योग्य प्रसंगाखेरीज हरवक्त मिळविण्याचे भरीस कोणी निदान गरिबांनीं तरी पडूं नये.

दरबारी न्यायाचे संबंधानें मुख्य मुद्याच्या चार गोष्टी प्रथम पहावयाच्या त्या.

१ ( मानसिक धैर्य ) २ (द्रव्यसामर्थ्य) ३ (स्वपक्ष-पुष्ट पुरावा) ४ सत्यावर निष्ठा.

आतां प्रत्येक मुद्याचें स्वरूप सांगतों आणि त्यांत प्रथम मानसिक धैर्य कां असावें आणि तें नसलें तर कोणकोणते तोटे व्हावयाचे ह्याचा विचार करूं.

१ मानसिक धैर्य—तुह्मींच विचार करून पहा कीं, आपणास एखादें कृत्य करावयाचें आहे व आपणास त्या कृत्यास लागणारा सरंजाम सर्व कांहीं अनुकूळ आहे परंतु जर मानसिक धैर्य नाहीं तर तें कृत्य केव्हां तरी आपण सिद्ध करूं शकूं काय ? फार दूर कशाला आपण रानांत फिरत आहों व आपणाजवळ हत्यार आहे, परंतु शत्रूवर धांवून जाण्याची किंवा तो अंगावर धांवून आला असतां त्यास हरविण्याची आपणास हिम्मत नसली तर त्या हत्याराचा कांहीं उपयोग होईल कीं? नाहीं. ह्मणून हरएक गोष्टींत आपणास यश प्राप्त होण्यास प्रथम मानसिक धैर्यच असलें पाहिजे ! व तें दरबारी न्यायांतही जरूर आहे.

२ **द्रव्य सामर्थ्य**—प्रथमचें मानशिक धैर्य असलें ह्मणजे मग ह्या दुसऱ्या द्रव्य सामर्थ्याची अवश्य जरूर आहे, मनुष्यमात्रांस जिवापेक्षांही ह्या लोकीं द्रव्य अधिक प्यारें आहे ! आपणांत एक साधारण ह्मटलें आहे किं" चमडी जाय पण दमडी न जाय,, ह्या ह्मणीचा अंतरगामि अर्थ तरी असाच आहे कीं शरीरास इजा झाली तरी पुरवली पण द्रव्याचा एक

ळष्वांशोपांश न जावा. !! इतकी कांहीं ह्या द्रव्याच्या ठायीं मनुष्य मात्राची आस्था असते व ह्या द्रव्याकारितां मनुष्य हवें तें कर्म करावयास तत्पर असतो, दुसऱ्याचा जीव घेण्यास किंवा स्वतःचा देण्यास देखील वेळेवर कोणी कमी करायचें नाहीं. सारांश गांठीं द्रव्य असलें ह्मणजे हवी ती गोष्ट आपणास साध्य होण्यास कांहीं जड होत नाहीं. दरबारचा न्याय सिद्ध करण्यासवरण्याला वगैरे सरकारच्या कृपेंतील जे वकील लोक वगैरे ह्यांची मर्जीच खूष प्रथम असली पाहिजे व ती द्रव्यावांचून अन्यतऱ्हेन होऊं शकत नाहीं, यास्तव दरबारचा न्याय स्वइष्ट हेतु साधनीं तत्पर होई पावेतों नेहमीं कंबरीं द्रव्याचा कसा बांधलेला असलाच पाहिजे!

**स्वपक्ष पुष्ट पुरावा**—आपली गोष्ट कितीहि खरी असो, आपण मोठ्या सत्याला स्मरून ती सांगत असूं तथापि ती आपल्या पाठिराख्या अर्थात साक्षीदारांच्या तोंडून श्रवण केल्यावांचून असत्यच भासावयाची किंवा भासलीच पाहिजे असा सिद्धांत असल्यामुळें आपणास दरबारी न्याय स्वतःला अनुकूल असा मिळण्यास हा साक्षीदाररूपी पाठिराखा पुरावा अवश्य साह्य असला पाहिजे. त्या वांचून आपलें कार्य केव्हांहीं सिद्ध होणें नाहीं! ! द्रव्य सामर्थ्य असलें ह्मणजे हा पुरावा वगैरे सर्व कांहीं मिळतो,परंतु पुरावा असावाच हें मात्र सिद्ध झालें !!

४ **सत्यावर निष्ठा**—जगन्नियंत्या परमेश्वरास सत्य हें फारच प्रिय आहे, ह्मणून कोणत्याही कृत्यांत

सत्य हें आधीं असावें. कारण जेथें सत्य तेथेंच यशप्राप्ति आणि ह्मणूनच 'सत्यंजय' असें ह्मणतात यास्तव आपणास दरबारी न्याय मिळविण्याचे वेळीं देखील सत्यच सदैव जवळ बाळगिलें पाहिजे.

एकंदरीवरून दरबारी न्याय मिळविण्यास वरील प्रमुख चार गोष्टींची केव्हांही आणि सर्वांस अनुकूलता असलीच पाहिजे अशाविषयीं आमच्या वाचकांची खात्री झालींच असेल. ह्मणून प्रत्येकांनीं ह्या लेखासंबंधानें आपली स्वानुभवाशिद्ध प्रतिति कशी काय आहे हें ताडून पाहून त्यास ह्या नियमाधारें आपलें वर्तन ठेवण्याची इच्छा झाल्यास ती प्रांजळपणानें आपल्या मित्र मंडळीपुढें मांडण्यास तत्पर असावें आणि शेतकरी वगैरे अज्ञानांधकारांत पडलेल्या दीन दुबळ्या लोकांस ह्या गोष्टी संबंधानें नेहमीं उपदेश करावा अशी आमची सर्वांस विनंति आहे. आतां राजनीति प्रसंगोपात सापासारखी कशी उलट पालट होऊं शकते ह्याची साक्ष देण्याकरितां वा० पंडितांनीं रचलेला एक श्लोक येथें सादर करून हा विषय आटोपता घेतों.

**श्लोक**

केव्हां सत्य वदे वदे अनृतही केव्हां वदे गोडही ॥
केव्हां अप्रियही दयाळूहि असे केव्हां करी घात ही॥
जोडी अर्थही जे यथेष्ट समयीं कीं रेचही आदरी ॥
ऐशी हे नृपनीति भासत असे वारांगनेचे परी ॥१॥

# प्रकरण २ रें.

## गृहशोभा ( सुगृहिणीची योग्यता. )

तुह्मी मोठे विद्वान असा, धनाढ्य असा, शेंकडोंशें लोकांवर तुमचा अम्मल चालत असो आणि आई बाप भाऊबंद वगैरे सर्व तुह्मांस अनुकूल असोत, परंतु तुमच्या अंतःकरणास खरें सुख प्राप्त होण्यास, गृहसुधारणेस आणि तुमचे मानसिक हेतु पूर्ण होण्यास तुह्मास स्वभार्याच अनुकूल असली पाहिजे. तुमच्या अंतःकरणाची गोष्ट तुह्मी सांगण्यापूर्वींच जी जाणून तुमचें काज सिद्धीस नेईल तीच भार्या तुह्मास प्रिय होईल हें खरें;! परंतु तुह्मीं भार्या ज्या कुळांतील केली असेल त्या कुळांतील लहान थोर माणसाच्या वर्तनक्रमानुसार तुमच्या भार्येस जन्मतः वळण लागलें असावयाचें? तें तुमच्या वर्तनाशीं साम्य असल्यास ठीकच! जर उलट कांहीं प्रकार असेल तर तो तुह्मीं शांतपणा ठेवून सुधारला पाहिजे. कारण अनुकरण करण्याचा प्रत्येक व्यक्तिमात्रास उपजतच ईश्वरदत्त गुण प्राप्त असतोच! तुमची भार्या वळणशुद्ध नसेल किंवा तुमचे वागणुकीचे नियम अमुकच आहेत हें जर तुह्मीं तिजप्रत प्रथम कळविलें नसलें तर तुमच्या मर्जीनुरूप तिची वागणूक होण्यास तुह्मीं काय केलें पाहिजे बरें; फार कांहीं करावयास नको. तर ती ज्या कांहीं गोष्टी चुकत असेल त्या "तूं अमु-

क जागीं चुकतेस ह्मणून तिला एकवार सोडून दहादां समजून दिल्या पाहिजेत,, आणि आपली तब्बीयत नेहमीं एकाच वळणानें ठेवण्याविषयीं आपण जपावें तरीही पण ह्या दोन गोष्टींत सत्याला सोडूं नये. त्याच प्रमाणें आपण तिला ज्या ज्या म्हणून बऱ्यावाईट गोष्टीविषयीं उपदेश करीत असूं त्या त्या गोष्टींत आपलें वर्तन विशुद्ध आहे कीं काय? हें नेहमीं पहात असावें. ! ! नाहीं तर तूं अमूक असें करूं नकोस ह्मणून स्त्रीयेस उपदेश केला आणि आपणास तर त्या गोष्टी केल्यावांचून राहवत नाहीं! असें केल्यानें त्या उपदेशांपासून कांहींएक हित व्हावयाचें नाहीं ! ह्मणून आपल्या सारखी आपली भार्या व्हावयाला आपला उपदेश ज्या प्रमाणावर असेल त्याच प्रमाणावर आपण स्वतः आपलें वर्तन ठेविलें पाहिजे. कारण सहवासानें मनुष्याचें वर्तनक्रमांत सहज बदल होतो. ह्मटलें आहेः—

***आर्या.**

पति सहवासें स्त्रीचें चित्त पति समान
होतसे दुष्ट ॥
विषवृक्षाश्रित वल्लि मधुरहि मूर्छित
करीतसे स्पष्ट ॥ १ ॥

ह्मणून सहवासानेंच कांहीं दिवसांनीं आपलें वळण स्त्रीस लागेलच यास्तव अधीर न होतां आपले अं-

* हें पद्य दुःसंग प्रदर्शनावह जरी आहे, तरी पण सहवासानें स्त्रियेचें अंतःकरण बदलतें किंवा कसें एवढेंच कायतें घ्यावयाचें.

# विश्रांतिमंदीर.

## कल्पित कादंबरी.

### पुस्तक १ लें.

### भाग १ ला.

**श्लोक.**

ही रम्य बांधिली[1] कथा जनरंजनाला ॥
विश्रांतिच्या समयिं योग्यचि[2] जी मनाला ॥
चंद्रानना[3] सुरुचि[4] ते तरुणी[5] सुवेळा ॥
द्याया जशी प्रियतमा[6] पतिमानसाला ॥ १ ॥
तेवींच ही नवकथा[7] नवयौवना[8] जी ॥
रूपें गुणें पादें तुह्मास सुमान्य[9] हो जी ॥
देवो मनीं सुरस[10] आसच कीं आम्हाला ॥
संप्रार्थितों स्वकरिं द्या निववो[11] मनाला ॥ २

**आर्या.**

पयजल मिश्रिति घेती सुज्ञपणें दूधची जसें हंस ॥
तद्वपरि दोष *समिश्रिति चातुर्यें द्या किंहो सुजनहंस॥२

---

१ रचिली. २ उक्त. ३ चंद्राप्रमाणें. मुख आहे जिचें अशी सुंदर ४ रुचिस. ५ तरुण. ६ प्रियकर स्त्री ७।८ नवीन कथारूपी तरुण स्त्री. ९ मान्यता पावो. १० रुची ११ आनंदीत करा.

*. या हें अध्याहृत.

प्राचीनकाळीं महाराष्ट्र देशांत सुवर्णचंपक ह्मणून एक अति प्रख्यात आणि रमणीय असें नगर होतें, तेथें इंदुशेखर नामक राजा राज्य करीत होता. तो सज्जनवृंदप्रिय, सद्धर्मप्रतिपालक, पापभीरु, परम शूर आणि प्रजाजनहितचिंतक असा होता. त्यास प्रजाजन संतुष्ट राखणें हें मोठ्या आवडीचें व प्रथमचें कर्तव्यकर्म वाटत असे. तो आपले हृदयमंदिरीं अक्षय सत्यासत्यतेचा विचार वागवून कोणतेंही कृत्य करी. ईशाज्ञा पाळण्याविषयीं तो सदां तत्पर असे. प्रजेस वागविण्याचे नियम शास्त्रसंमतच परंतु अत्यंत सुलभ असे त्यानें घातले होते, ते इतके कांहीं योग्य होते कीं, त्या काळच्या कित्येक राजे लोकांनीं त्या नियमाधारें आपल्या राज्यांत सुधारणा करून पाहून अनुभवांतीं त्यांना ते फारच पसंत झाले होते; आणि ह्मणून त्याची त्या गुणांबद्दल सर्वत्र वहावा होत होती.

प्रजेस जिकडून सुख होईल अशा त्यानें आपल्या राज्यांत अनेक सोई केल्या होत्या त्या अशाः—आपल्या राज्याचे मुख्य चार व चाराचे प्रत्येकीं आणखी कित्येक पोटविभाग केले असून त्यावर आपल्या राजघराण्यांतील व कांहीं दुसरे हुशार, न्यायी असे अम्मलदार नेमिले होते. प्रजा सुशिक्षित होण्यासाठीं गावोंगांव सुशील व परहित साधण्याची ज्यांना खरी कळकळ आहे असे विद्वान लोक पाठवून अल्पायासानें विद्याप्राप्तीची सोय केली होती. व्यापारधंद्यास उत्तेजन देऊन तो भरभराटीस आणण्याचा प्रयत्न सु-

रू ठेविला होता. जागजागीं धर्मशाळा, तलाव, विहिरी बांधिल्या होत्या. पाट, कालवे काढून आणवून शेतकी कामास पाण्याचा पुरवठा केला होता. चोहोंकडेस नवीन सडकांचे मार्ग काढून त्याचे दोहों बाजूस समांतरानें सघन वृक्षांची गर्द छाया करविली होती. पुरातन देवळें मशीदी वगैरेंचा जीर्णोद्धार व नवीन मोठमोठ्या हवेल्या, मजेदार आणि हवाशीर मंदिरें, नकशीदार, सुंदर आणि भव्य देवळें, मनोरे व बगीचे हीं तयार करवून त्यांचा नेहमीं व्यवस्थितपणा ठेविला होता. पर्जन्यकाळांत उतार होऊं न देणाऱ्या नद्यादिकांस मोठाले पूल बांधिले होते. सरहद्दीवरील गांवास तट घातले होते. अनाथ लोकप्रतिपाळक गृहें जागजागीं बांधिलीं होतीं. तसेंच पूर्वापार चालत आलेल्या जाहागिरी, इनाम, देवस्थानें, अग्निहोत्री, आणि विद्वान, ह्यांच्या नेमणुका निर्वेधपणें चालू ठेवून त्या नियमीत रकमा ज्यांच्या त्यांस प्रयास न पडतां प्रतिवर्षी मिळविण्याची व्यवस्था राखिली होती. परराज्यांतून आलेल्या विद्वानांची योग्यतेनुरूप संभावना होण्याकरितां आपल्या पदरीं वेदांती, मीमांसक, धर्मशास्त्री, जोतिषी आणि नय्यायिक आदीकरून स्वविद्यानिष्णात असे विद्वान वेतनें देऊन ठेविले होते. आणि तें विद्वन्मंडल दरबारांत नित्यशाहा येत असल्यामुळें प्रेक्षकांस तो भोजराजाप्रमाणें दिसत असे! तसेंच गवई, सुंदर गायनकलाप्रवीण वेश्या आणि हरिदास व नानातऱ्हेचे कारागीर, शिल्पशास्त्रज्ञ लोक त्याचे आश्रयास सदैव असत. क्षेत्रादिकांच्याठायीं

सदावर्तें, अन्नसत्रें, घातलीं होतीं, ब्राह्मणांस इच्छा-
भोजन घालणें, व नित्य विप्रसमुदायांस सवत्स अलं-
कारभूषणमंडित गोप्रदानें, व इतर अनेकप्रकारचीं
दानें वांटण्याची तजवीज केली होती. राज्य संरक्ष-
णार्थ जागोजाग जयत फौज ठेवून तिचा पगार वगैरे
जेव्हांचा तेव्हां देऊन टाकून हूं ह्मणतां कत्तल उडवि-
ण्यास तयार अशी संतुष्ट ठेविली होती. व अधिका-
रि लोक कशा रीतीनें वागतात ह्याचा बारकाईनें शो-
ध काढून आणवून अपराध्यास शिक्षा व योग्य तऱ्ह-
नें अम्मल करणारास बक्षिस देण्याची वहिवाट सुरु
ठेविली होती. व्यापार धंदा वगैरेवर कंबर वाक-
ण्यासारखे कर न बसवितां त्या भांडवलांत आपल्या
खजिन्यांतून बिनव्याजी द्रव्य मिळवून तो वाढवीत असे.
शेतकीचा सारा प्रतिवर्षी उत्पन्नाच्या मानानें धान्य
रूपानें घेऊन त्याची मोठमोठीं कोठारें भरून ठेववी.
अशा अनेक लोकोपयोगी सोयी त्यानें केल्यामुळें त्या
देशची संपूर्ण प्रजा संतुष्ट राहून त्याचें कल्याण चिंतित
असे, आणि त्यायोगें त्या उभयतांमध्यें दिवसें दिवस अ-
धिक अप्रतिम व अकृत्रिम दृढप्रेम बसत चाललें होतें.
इंदुशेखराचे प्रधान वगैरे मुख्य मुख्य हुद्देदारही रा-
ज्यकारणकुशल, स्वामीभक्त, व चार चौघांनीं वाख-
णण्यासारखे असे असल्यामुळें त्याचें स्वकर्तव्य के-
व्हांही चुकत नव्हतें. व तेणेंकरून त्याचा सर्वत्र
दरारा बसून शत्रूंचा काडीमात्र शिरकाव किंवा
स्वराज्यांत फंदफितूर होत नसे. यज्ञयागादीक वारंवार
होत असल्यामुळें पर्जन्यवृष्टि वेळेवर होऊन देशभर

धान्याची संमृद्धि राही आणि त्या योगें गरीबगुरिबा-सही पोटभर भाकरतुकडा खावयास मिळत होतां अ-ग्निप्रलय, अनावृष्टि, अकालिक मृत्यु, महारोगाची साथ वगैरे विघ्नें स्वप्नींही कोणी पहात नव्हते. प्रजा विद्याभिवृद्धीच्या द्वारें समंजस झाली असल्यामुळें अन्याय रावाचें लोकसमाजांतही पाऊल दृष्टीस पडे-नासें झालें होतें. ह्मणजे सर्वत्र शांतता असल्यामुळें ती महाराष्ट्रदेशवासिनी प्रजा खऱ्या खऱ्या स्वातंत्र्य-सौख्याचा अनुभव पावत असे. अशा रीतीनें त्या प्रजा-जन मनसंतापहारक चतुर पुण्यशील आणि भाग्य-वान नृपानें त्या महाराष्ट्रदेशचें राज्य चालवीत अस-तां ह्या भूमंडळावर आपली कीर्तिरूप गंगा तिचा को-ठेंही अवरोध होऊं न देतां पसरविली होती. अस्तु. वाचकहो ! त्या राजास त्याचे अतुल पुण्यप्रतापेंक-रून म्हणा किंवा ईशकृपेनें म्हणा. उत्तर वयांत एक पुत्ररत्न झालें होतें. उत्तरवयांत होण्याचें कारण असें असावें, ह्मणून वाटतें कीं, अशा पवित्र राजाचे पोटीं कोणास जन्म व्हावा याचा विधात्यास पुष्कळ दिवस पावेतों विचार पहावा लागला असेल ! असो. इंदुशेखरानें त्या आपल्या पुत्राचें त्यास योग्यच असें 'मदनविलास' ह्मणून मोठ्या आवडीचें नांव ठेविलें हो-तें पुढें तो पांच वर्षांचा झाल्यावर त्यानें त्यास आ-पल्या पदरीं वेतनें देऊन ठेवून घेतलेल्या विद्वानांच्या हातीं देऊन सुशिक्षण देण्याची सोय केली होती. व त्या सुमारास इंदुशेखर राजाचा प्रधान भद्रसेन ह्याचा पुत्र चंद्रकांत आणि सुवर्णचंपक नगरींतील गर्भश्रीमान

सावकार विजयशेट ह्याचा पुत्र मुकुंदमाधव हे समवयस्क व समानरूप शीलाचे होते ह्मणून त्या दोघांसही इंदुशेखरानें आपल्या पुत्रासंगतीनें एकाच ठिकाणीं विद्याभ्यास करविण्याकरितां ठेविलें होतें. त्या तिघांचें सदैव एकत्र राहणें, खाणें पिणें, वगैरे होऊं लागल्यानें थोडक्याच काळांत त्याचें परस्परावर विशेष प्रेम जडून त्यांना एकमेकांविरहित क्षणभरही राहणें कठिण वाटूं लागलें होतें व तें बालपणाचें परस्पर निष्कपट प्रेम पाहून इंदुशेखर राजास मोठें समाधान व कौतुक वाटत असे.

मदनविलासाचें लक्ष लहानपणापासून स्वभावतः आणि सुशिक्षणामुळें विद्याभ्यासांत गढलें राही, ह्मणून त्यानें अल्प वयांतच उपयुक्त अशा बहुतेक विद्येशीं चिरपरिचय करून घेतला होता. शारीरारोग्यास अत्यंत अवश्य जी मल्लविद्या आणि शत्रु निर्दालनास्तव स्वजाति श्रेष्ठजनमान्य अशी धनुर्विद्या याही संपादन केल्या होत्या, बुद्धीच्याठायीं तिव्रता, चातुर्य आणि विषयांचें ज्ञान संपादण्याची मार्मिकता हे गुण अनुकूल असल्यावर मग फार दिवस आणि अति परिश्रम करणें कशाला हवेत ? नकोच अस्तु. वर सांगितल्याप्रमाणें तो राजपुत्र मदनविलास अल्पावधींतच बहुतेक विद्या शिकून निष्णात होत चालला असल्यामुळें त्याची सर्वतोमुखीं वाहवा होत चालली होती, तेणेंकरून त्या राजकुलावतंस पुत्राच्या जननानें त्याच्या मातापितरांस परमावधीचें समाधान वाटूं लागलें होतें. आणि ते त्या अमूल्य पुत्ररत्न प्राप्ति-

स्तव आपणांस धन्य मानीत! धन्य मानण्याचा हेतु इतकाच असे कीं, आपणास उत्तर वयांत हा पुत्र झाला व ह्याचे नेहमीं सर्व तऱ्हेचे लाड होत आहेत तरी देखील हा आपलें वळण सोडून इतर राजपुत्राप्रमाणें दुसऱ्याचा हेवा करणें, मन मानेल तशा रीतीनें वागणें, परकियास पीडा देणें आईबाप व इतर संभावित लोक ह्यांचा उपमर्द करणें, इत्यादि दुष्कृत्यास शिवत नाहीं !! याप्रमाणें तो आपल्या मित्रांसह विद्याभ्यासंगक्रमांत निमग्न असतां त्याची विलक्षण बुद्धि, सुस्वभाव, इत्यादि गुणांचा कीर्तिध्वनि दूर दूर देशच्या नृपवरांच्या कानीं पडत जाऊन कित्येक राजे त्यास मुद्दाम पहावयास येऊं लागले होते. त्या वेळीं तो नुकताच १४ वर्षांचा झाला होता व त्याच्या शरिराची अनुपम रचना, अलौकिक सौंदर्य, सदैव हास्यमुख, बोलणें सयुक्तिक व गोड, तारुण्यभरानें दिवसेंदिवस वाढत चाललेलें शरीरस्थ दिव्यतेज आणि ती इभ्रत इत्यादि गुणेंकरून त्याच्या प्रत्यक्ष दर्शनानें कसाही दुःखी किंवा क्षुब्ध मनुष्य असला तरी तो तेव्हांच शांत होई आणि तेणेंकरून ह्या राजपुत्राजवळ अशी काय मोहनी आहे कीं जेणेंकरून हा असा आश्चर्यचकित परिणाम घडतो ! ! ह्मणून प्रेक्षक नेहमीं गुंग होऊन जात. यास्तव कित्येक राजे त्यास पाहून आनंदभरांत असतां हा आपला जामात व्हावा अशी इंदुशेखराजवळ मनीषा प्रदर्शित करूं लागले होते. परंतु राजाचें हा विद्याभ्यासंगांतून मोकळा झाल्यावांचून मी ह्याचा विवाह करण्यास इ-

च्छितच नाहीं असें एकच उत्तर सर्वांस मिळत गेल्यामुळें ते निराश होऊन परत जात. ! राजाचा असा जबाब देण्याचा हेतु द्विरर्थी होता. १ एक आपला पुत्र विवाह केल्यावर विद्येकडे दुर्लक्ष करीत आणि दुसरे हा जसा गुणी आहे तशीच ह्याच्या साम्यतेची वधू मिळाली पाहिजे आणि तशी मिळणें हें काम जरा स्थैर्याचें आहे. ! ! ह्याप्रमाणें कित्येक राजे मदनविलासास आपली कन्या देऊन जामात करण्याविषयीं चाहत होते. परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं आणि शेवटीं एक अकाल्पित योग येऊन इंदुशेखराचा पूर्ण निश्चय असतांही तो मोडून मदनाविलासाचें त्याच्या वयाच्या १५ व्या वर्षी लग्न झालें. ( मात्र त्या गोष्टींत इंदुशेखराचा एक हेतु तडीस गेल्यासारखें होतें ) त्याचा प्रकार असाः—

मागें सांगितल्याप्रमाणें मदनविलासाची कीर्ति देशांतरावर जाऊन जो तो राजा त्यास आपली कन्या देऊन जामात करण्याम चाहत होता; तद्वतच आपल्या सौंदर्यादि गुणेंकरून अवंतीनगराच्या काशीराज नृपाची एकुलती एक कन्या 'चंपकमाला, ही प्रसिद्धीस आली होतीही. व काशिराजासही अशी उत्तम गुणवती कन्या कोणास अर्पण करावी ही पूर्वीपासूनच मोठी काळजी असे, ह्मणून त्यांनीं मदनविलासाचे गुणादिक त्याचे कांनीं पडतांच तो त्वरेनें सुवर्णचंपकनगरीस येऊन त्यानें मोठ्या विनयानें आणि चार चौघां थोर मंडळीस मध्यस्थी घालून व चंपकमाला आणि मदनविलास ह्यांचा जोडा समकत्वामुळें

फार चांगला शोभतो असे सर्वसंमत मिळाल्यामुळें इंदुशेखरास पुत्राचा विवाह करून घेण्यास तत्पर बनविलें होतें व त्याकरितां त्यानें अगणित द्रव्य खर्च करून सर्व जनमन संतुष्ट करीत होत्साता आपले पुत्राचा विवाह करून घेतला होता.

बहुतेक असा प्रकार आढळण्यांत येतो कीं मुलाचें लग्न झालें, ह्मणजे तो विद्याभ्यासाविषयीं पराङ्मुखच व्हावयाचा, परंतु ह्याच्या उलट प्रकार मदनविलासाचा विवाह झाल्यावर आईबापांच्या व इतर प्रेक्षकांच्या नजरेस येऊं लागला होता. तो असा कीं त्यानें आपलें लग्न झाल्यावर पुढें आपला बहुतेक अभ्यास सुमारें दोन सवादोन वर्षांतच अगदीं आटोपून टाकिला होता. व तो आपल्या वयाच्या १८ अठराव्या वर्षी लेखन, वाचन, गणीत, भूमिति, व्याकरण, भूगोल, खगोल, नकाशे, अनेक देशांचे इतिहास, पदार्थविज्ञानशास्त्र, छंदशास्त्र, न्यायशास्त्र, अलंकारशास्त्र, संगीत मीमांसाशास्त्र, राजनीति, व्यवहारनीति, आणि श्रेष्ठजनमान्य गीर्वाण भाषा इत्यादि विद्या शिकून निष्णात झाला होता आणि आतां ह्याचा पुढें कांहीं एक अभ्यास राहिला नाहीं असें गुरुमुखानें श्रवण केल्यावर एके दिवशीं राजानें मोठा दरबार भरवून आपल्या पदरच्या पंडितांच्या देखरेखीखालीं त्या त्रिवर्गांची अगदीं कसोटी लावून पाहून परीक्षा घेतली, तों तें खरेंच! ह्मणून मोठा आनंद पावून त्या गुरुवर्यास अगणित द्रव्य व अमोलीक पदार्थ अर्पण करून त्याची मानप्रतिष्ठा केली. त्याच प्रमाणें

भद्रसेन प्रधान व विजयशेट ह्यांनींही आपल्या योग्यतेनुरूप त्या गुरूस द्रव्यादिक देऊन संतुष्ट केलें. व त्या त्रिवर्गांनीं फार उत्तम विद्या संपादन केली ह्मणून सर्वांस मोठा आनंद झाला. आणि शेवटीं त्या गुरुवर्यांनीं त्या त्रिवर्गांस यापुढें कसें वागावें याविषयीं उत्तम प्रकारें सुबोध व राजादिकांनीं स्वतःची केलेली मानप्रतिष्ठा योग्य झाली अशाविषयीं आभार प्रदर्शक भाषण केल्यावर पानसुपारी वगैरे आटोपून त्या त्रिवर्गांचा जयजयकार करीत दरबार बरखास्त झाला. आणि त्या त्रिवर्गांस त्याच्या सुशीलपणाबद्दल व त्यांनीं मागून घेतल्यावरून दोन वर्षें पावेतों स्वतंत्रपणें विश्रांतिस्तव नगरबाह्यप्रदेशीं असलेल्या विलासवननामक उद्यानांतील रमणीय 'विश्रांतमंदिरीं' वास करण्याची परवानगी मिळाली.

वर सांगितल्याप्रमाणें मदनविलास नामक राजपुत्र संपूर्ण विद्या शिकून पारंगत तर झालाच होता, परंतु त्या सर्व विद्येंत त्याची एक विद्या फार वाखाणण्या सारखी अति उत्तम अशी साधली होती ह्मणून त्या विद्येच्या संबंधानें त्याची तारिफ केल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं कारितां त्याबद्दल दोन शब्द आह्मीं या स्थळीं प्रथम आणि मुद्दाम लिहितों.

ह्या जगांत मनुष्य प्राण्यास आनंदांत काळ घालविण्याकरितां पुष्कळ तऱ्हेच्या कला ईश्वरानें उत्पन्न केल्या आहेत, पण त्या सर्वांत गायना सारखी प्रिय व मनुष्याचें अंतःकरण खरें खरें गार करून सोडून क्षणभर संसार प्रंपच्यसंबंधि नानाविध यातनेचा

विसर पाडणारी कलाच नाहीं असें ह्मटलें तरी चालेल ! ! ह्या कलेनें सर्व कांहीं साधतें ? प्रत्यक्ष आपल्या शत्रूसही मित्र करितां येतो ! ! फार तर काय ? ह्या कलेच्या माधुर्यानें वृक्ष पाषाणही द्रवतात ! ! अस्तु. वाचकहो तुह्मास देखील या गोष्टीचा पूर्ण अनुभव आहेच ह्मणून आमचें हें लिहिणें अगदींच बडेजावीचें आहे असें वाटणार नाहीं !! राजपुत्र मदनविलास त्यास ही कला फार लोकोत्तर अशी साधली असल्यामुळें आणि त्याचा कंठ इतका कांहीं मधुर असे कीं तो ज्या वेळीं खऱ्या खऱ्या आनंदांत येऊन गायन करी त्यावेळीं त्याचें तें मधुर गाणें श्रवण करून नेहमींच्या परिचितांस देखील हा कोणी स्वर्गीचा देव अथवा गंधर्वच गायन करीत आहे कीं काय? अशी भूल पडे ! ! ! त्याला ह्या गायनाच्या छंदांत असतां वेळेवर खाण्यापिणाचाहि विसर पडावा इतकी कांहीं ती कला त्यास जीवश्च कंठश्च वाटत असे! आणि त्या विद्येचा जाणता कोणी त्याकडे आला कीं तो त्याची फार चहा करी, यास्तव दूरदूरच्या देशाचे गायनवादनपटु अनेक लोक त्याची कीर्ति श्रवण करून आश्रय मिळण्याच्या इराद्यानें त्याच्या भेटीस येऊं जाऊं लागले होते? व कित्येकांस तर त्यांनीं स्वतःच्या पैशांतून वेतन ठरवून देऊन पदरीं राखूनही घ्यावें. !

मागें सांगितल्याप्रमाणें तो राजपुत्र मदनविलास सर्वसंमतीनें त्या विश्रांतमंदिरीं मित्रासहवर्तमान स्वांतत्र्यसौख्याचा अनुभव घ्यावयास राहिला असतां त्यानें

आपणास हल्लीं स्वतंत्रता आहे व ह्या स्वातंत्र्यांत आपलें मन फाजील कृत्याकडे अवश्य जाईलच, तें न जावें, आणि मन लागेल त्यावेळींच एखादें कृत्य करावयाचें अशी संवय स्वातंत्र्यास्थितींत त्यांस एकदां जर कां लागली, तर ती पुढें आपण राजपदारूढ झालों, तरी मोडणें कठिण. ! आणि राजपदारूढ झालेल्या पुरुषानें स्वच्छंदीपणानें वागणें हें फारच वाईट आहे, यास्तव आपला नित्यचा काळ नियामित कृत्याकडे विभागिला पाहिजे असें ठरवून त्यानें सूर्योदयापासून पुन्हां दुसऱ्या दिवशींचा मूर्योदय होई पावेतों ग्रथित केलेल्या चोवीस कलाकांचे १६ सोळा विभाग करून त्या त्या विभागीं तें तें कृत्य करावयाचें असा क्रम ठेविला. खालीं लिहिल्याप्रमाणें त्यांनीं आपला नित्यचा काळ दरएक कृत्याकडे योजिला असे. ( १ ) अरुणोदयाचे सुमारास निजून उठून नित्य कर्मं आटोपणें ( २ ) सूर्योदय होत नाहीं तोंच मित्रासह तालीमखान्यांत प्रवेश करून दिवसेंदिवस चढत्या प्रकारें स्वशाक्तिमानानें कसरत करणें ( ३ ) सूर्योदयाचे सुमारास मृगयेस निघून जाणें ( ४ ) प्रहर दिवस येतांच परत घरीं येऊन स्नान पूजादिकांत २ दोन घटिका घालाविणें. ( ५ ) भोजनोत्तर तांबूल भक्षण वामकुक्षी करण्याकडे २ दोन घटिका ( ६ ) बारावी घटिका लोटतांच निजूनउठून एखाद्या विषयावर स्वबुद्धिच्या कोटी लढविण्यांत, नवीन शास्त्रादिकांचा अभ्यास करण्यास आरंभ करणें ( ७ ) विसावी घडी लोटतांच आपल्या गुरुवर्गसमतेच्या शिष्टांबरोबर एखाद्या

॥ श्रीः ॥

# माधवनिधन *काव्य.

## अथवा

# परदाराभिलाष दुष्परिणामादर्श.

## ॥ आर्या ॥

होता माधव नामा,
नृप[1]दत्त ध[2]नी त्या सुवर्णगि[3]रि नगरीं ॥
सन्मान्य विप्रलोकीं,
सूज्ञ तसा कुमति परि जया उदरीं ॥ १ ॥
विषयांध मत्त तेणें,
ओळाखिना तरुणि स्व[4]दार–सम नातें ॥
यास्तव पतिव्र[5]तादरें,
वदति ज्या हा मरो; म्हणुनि स्वोक्ती[6]ते ॥२॥

---

* ह्या कावता आम्हीं एका दंतकथेच्या आधारानें रचल्या आहेत. ह्यांत असंभाव्य असें कांहीं दिसण्यांत येत नसून उलट वाचकांस सुबोध प्राप्त व्हावयाचा ! मात्र ह्या कवितेंत व्यक्त केल्याप्रमाणें ही गोष्ट घडली असेलच असें खात्रीपूर्वक सांगवत नाहीं ! कांहीं का असेना, पण मनोरंजन होऊन ह्याविषय विषयासंबंधानें जगांत कसे दुष्ट प्रसंग येतात हें तर कळून येण्यासारखें.

( पुढें चालू ).

१ राजांनीं दिलेली. २ श्रीमंत. ३ सोनगीर. ४ स्वस्त्रीप्रमाणें. ५ पातिव्रत्यधर्मानुचारिणी स्त्रिया. ६ आपल्या भाषणानें

कुजबुजती तडफडती,
स्वबळीं नर कुंजरांस[1] प्रार्थी ती ॥
मोडाया खोडाचि जिती,[2]
परिजितनर[3] स्वार्थ जेथ सांधीती[4] ॥ ३ ॥
यास्तव शक्य न होती,
बहुदिन त्या कुल कलंके[5] धरा पुढती ॥
जाया, जाया दुःखाचि,[6]
परि जाति आठवून त्या वदती ॥ ४ ॥

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू. )

आहे. शिवाय हल्लींच्यापेक्षां प्राचीनकाळीं ' बळी तो कान पिळी ' हा न्याय कसा चालत होता ह्याचेंही स्वल्प दिग्दर्शन होण्यासारखें आहे !

**दंतकथा**—* * * असें ह्मणतात कीं मागें ( हा सोनगीर गांव होळकरांच्या ताब्यांत असतां ) सोनगिरास रामराव ह्या नांवाचे कोणी एक गृहस्थ थेट इदुराहून वंशपरंपरा काम करावें अशी सनद मिळवून घेऊन कोतवालगिरीचें कामावर आले होते. त्यांचा स्वभाव फारच सौम्य असा असल्यामुळें त्यांनीं आपल्या तहाह्यातींत त्या सोनगीरस्थ लोकांशीं अवर्णनीय असें प्रेम संपादन केलें होतें. पुढें त्यांचे पश्चात् त्यांचे कनिष्ठ चिरंजीव विसाजीपंत ह्यांनीं तो कारभार केला तेही बरेच सुशील वजनाप्रिय असे होते.

( पुढें चालू ).

१ बलवान् पुरुष हेंच कुंजर ( गज ) त्याप्रत. २ जिवंतपणची. ३ अधिकार बलानें ज्यानें नगरस्थ लोक आपले ताब्यांत ठेविले होते म्हणून. ४ लोकांचें बरें वाईट करणें हें माधवरावाचे हातीं असल्यामुळें लोक त्यास भीत असत आणि त्याचें मन दुखेल असें तोंडावर वाईट कांहींही आणि केव्हां सुद्धां त्यास बोलत नसत. ५ ज्यानें आपल्या वर्तनेंकरून कुळास बट्टा लाविला आहे अशा पुढें. ६ स्वस्त्रियांचें दुःख.

वरकुल[1] माधवराया,
तववर्ती[2] त्रस्त भाग नगरीचा ॥
यास्तव सोडी मुळिची,
कुमति[3] जी भाग नाशि गोडीचा ॥ ९ ॥
तव पूर्वज ते कसे ? !
काय असे तूं अनर्थ करिशी हे ॥

---

( मागलि पृष्ठावरून पुढें चालू. )

त्यांस माधवराव ह्या नांवाचा एकच मुलगा झाला होता. तो लहानपणापासून स्वभावतः चाणाक्ष असा होता व बापानें तो एकुलता एक असा असतांही त्याचे फाजिल लाड न करितां त्यास सुशिक्षण देऊन आपले पश्चात् हा आपणाप्रमाणेंच खचित सुकीर्ति मिळवील असा झाल्यावर आपलें काम पाहण्यास दिलें होतें. मध्यंतरीं विसाजीपंताचें कुटुंब ( सावित्रीबाई ) ह्या अकालीं मरण पावल्या होत्या व त्यायोगें विसाजीपंताचें अंतःकरण संसारसुखापासून विरक्त होऊन ते काशिक्षेत्राप्रत निघून गेले होते. माधवरावांच्या हातीं कोतवालगिरीचें काम असतां बरेच दिवसपर्यंत तें न्यायनीतीनें केलें होतें; परंतु सुमारें ( विसाजीपंतांस काशीक्षेत्रास जाऊन १० दहावर्षे होण्याचे बेतास ) एक तप होतें न होतें तों त्याचे सुवर्तनांत फरक पडतां पडतां फारच पडून तो दुरावर्तनप्रिय असा झाला. ह्याचें कारण असें सांगतात कीं, त्या गांवांत त्यावेळीं बापूराव ह्या नांवाचा एक कुमति ब्राह्मण रहात असून तो दरिद्री सबब माधवरावाचें आश्रयासच नेहमीं असे व त्याचेच उपदेशानें माधवरावांचे वर्तनांत फरक झाला होता; आणि शेवटीं ते दोघेही त्या कृत्याचे पायींच मारले गेले होते ! ! हें दुःसंगतीचें फळ. ! !

१ श्रेष्ठ कूळ. २ तुझ्या वागण्यानें. ३ वाईट बुद्धि.

परवनिता मानावी, वमनासम,
जाण शास्त्र वदतें हें ! ॥ ६ ॥

नगरस्थ युवतिकन्या,
तववृत्ति जनकशी सदा राहो ॥
अपुनि कोण वदे तो, ?
तनुजा कीं सुकुलज सदारा–हो ॥ ७ ॥
निशिदिनि त्या कळकळती,
त्याभगिनि कन्यकाही स्वदारा–हो ॥
सुखनिद्राती घेई,
कोण असा? करूनि मुक्त स्वदारा–हो ॥८॥
झालें गेली गंगा,
परि आतां तीर्थ शेषं पदरीं घे ॥
होई दोष विमुक्ति,
जरि झाला तापें पश्यति सुरपदें–रिघे ॥ ९ ॥
परिसोन सदुक्ति ते,
नच झाला शांत अधिकची खवळे ॥

---

१ ओके प्रमाणें. २ नगरस्थ स्त्रिया ह्यांस तूं कन्येप्रमाणें मान ( ह्मणजे त्यावर पापदृष्टि घालूं नकोस असा भाव ). ३ तुझी वर्तणूक. ४ बाबासारखी. ५ कन्या. ६ उत्तम कुलांत ज्याचा जन्म झाला आहे असा. ७ कन्येस स्त्री प्रमाणें मानील किंवा मानण्यास तयार होईल. ८ आमच्या स्त्रिया ( जे जन माधवराचाशीं भाषण करीत होते त्यांच्या. ) ९ घराचा दरवाजा ( घराचा दरवाजा उघडा ठेवून सुखें मी निद्रा घेईन असें कोण म्हणेल.) १० अवशेष ( बाकी ). ११ मुक्तता ( मोकळेपणा ). १२ पश्चात्ताप. १३ सुर×पद= ( देवलोकाप्रत ).

हाँ हाँ ज्ञानि असा बहु,
जा सत्वर वदत मत्त धनी स्वबळें ॥ १० ॥
आलाती होय मजला,
स्वज्ञानामृत पाजण्यास थोर दरे[3] ॥
नृपदत्त नगरि हे मज,
मज गमते आचरीन तेही बरें ॥ ११ ॥
कार्य स्वपटु असा तुह्मि,
हा आहे युष्मत्प्रपितामहसा ॥
ऐकेन काय तुमचें;
अस्मत्सुख दवडीन मी कसा सहसा ॥ १२ ॥
आला ही आज पुढती;
परि येतां कुशल ते तुह्मां नचे हो ॥
प्रत्यक्ष केसरीगृह !
मग तेथें गजयुथहीन सुकुशल लाहो[13] ॥ १३ ॥
आलाती काय ? करूनि,
कृष्णमुखां[14] गमत हें मशी स्पष्ट ॥
गेलींच तुमची धी[15] कां ?,
किं विजया[16] खाऊनिवदतसा इष्ट ॥ १४ ॥
परजाया वमनासम;
मानावी कोण ज्ञात तो वदतो ? ॥

---

१ स्वतःच्या सामर्थ्यें करून. २ आपलें ज्ञानरूपी अमृत. ३ भय घालून. ४ वाटतें. ५ आपलें कार्य साधण्याविषयीं चतुर. ६ तुमच्या आजासम. ७ माझें सुख. ८ शुभ. ९ होणार नाहीं. १० सिंहाचें घर. ११ गजांचा ( हत्तींचा ) समुदाय. १२ शुभ. १३ प्राप्त होवो. १४ काळें तोंड करून. १५ बुद्धि. १६ भांग. १७ आवडतें. १८ ज्ञानि.

मग सुर, सुरयुवतिच कां ?
तें रमतात आवीधिनेंच हा तो ? ॥ १५ ॥
गुरुपत्नीशी शशि रमला;
शचि भोगी गौतमाची ती भार्या ॥
स्वसुता उपभोगीन हो,
उक्त कसा ब्रह्मदेव ह्या कार्या ॥ १६ ॥
होहि असो ह्मणती परि,
विश्वाची जीस जननि ती गौरी ॥
पाहुनि हिम शिखरीं तो,
तप्तकसा *ब्रह्मदेव कामज्वरीं ॥ १७ ॥

---

१ देव. २ देवांच्या स्त्रिया ३ अयोग्यपणाचें वर्तन. ४ चंद्र. ५ इंद्र. ६ अहल्या ७ कामीं ( ब्रह्मदेव स्वसुताजी सरस्वती हिजप्रत कामाग्नी योजिता झाला होता. ) ८ जगाची. ९ हिमालयावर. १० पीडित. ११ मदन व्यथेनें. * (आर्या १७) ब्रह्मोत्तरखंडांत अशी कथाआहे कीं, पार्वती ही पहिल्या जन्मीं दक्षाची कन्या होती व तेव्हां तिचें सती असें नांव होतें. दक्षानें सती हिला शिवास दिलें होतें. परंतु शिव दरिद्री व मन मानेल तशा रीतीनें वागतो असें पाहूनतो त्यास फारसा मानीत नसे. शिवाय एकदां दक्षाची स्वारी कैलासीं गेली असतां त्यास शिवानें अभ्युत्थान वगैरे देऊन मान सन्मान केला नव्हतां. ह्मणून तो तेव्हांपासून त्या उभय कन्या, जामातास पाण्यांत पाहूं लागला होता. पुढें एके वेळीं दक्षगृहीं यज्ञ होता ह्मणून त्यानें शिवपार्वती ( सती व शंकर ) ह्या शिवाय करून सर्व सुरवरांदिकांस पाचारण केलें होतें. शिवास दक्षानें आपण पाचारण नाहीं केलें तर नाहीं. ह्मणून फारसें कांहीं वाईट वाटलें नाहीं परंतु सतीस तें न आवडून पितृगृहींचें पाचारण नसतांही व शिवमन प्रसन्न नव्हतें तरी ती स्वछंदानें दक्षाच्या यज्ञमंडपांत गेली होती. आणि तेथें दक्षानें आपलें पाचारण नसतां कन्या आली हें पाहून व मागील द्वेषभावामुळें

मुदत जरी संपली. तरी वरील योजनेस्तव ती आणखी मे० ता० ३१।१८९२ पावेतों वाढविली आहे. वाढविली ह्मणून स्वस्थ बसूं नकाहो ! ! नवीन आश्रयदात्यांकरितांच ही मुदत वाढविली आहे बरें ! जर खचितच जोडीदार मिळवून देण्याची सवड असेल तरच मुदतीची ( ता० ३१ मे ) रहा पहा. वर्गणी फार थोडी आहे व खर्च कसा येत आहे हें प्रथमांकांतील "प्रस्तावना" वाचून पाहिल्यावरून सर्वांस श्रुत झालेंच आहे.

४ ज्या सद्गृहस्थांनीं १ ला अंक परत किंवा वर्गणी पाठविली नाहीं, त्यास दुसरा अंक व्ही० पी० नें पाठवावयाचा; परंतु वरील मुदतीपावेतों आणखी सवड दिली आहे तरी आतां आळस व विलंब न करितां वर्गणी पाठविण्याची तजवीज अवश्य करावी, नाहींपेक्षां तिसरा अंक व्ही० पी० नें ( १८९ ) पाठविणें भाग येईल. दुसरा अंक पाठविला आहेच वर्गणीदारांनीं जर वर्गणी वेळेवर देण्याचें केलें तर अंकही आह्मीं वेळेवर निश्चयानें काढणार आहोंत. छापखान्यांत अगाऊ पैसा भरलाच पाहिजे असा क्रम असल्यामुळें पैशाची फार जरूरी असते, आणि असें झालें नाहीं ह्मणजे मजप्रमाणें स्वतःचा प्रेस नसलेल्यास निरुपायानें अंक बंद करणें भाग येतें. वगैरे सर्व गोष्टींचा विचार पाहून वर्गणी पाठविण्याची सर्व आश्रयदात्यांनीं कृपा करावी. एक रुपया ह्मणजे जड आहे काय ? ! !

नारायण गणेश जग

३. फिरंगी म्या० सा० मि० कर्ते.

## वर्गणीदारांस सूचना.

पहिला अंक ज्यांचेकडून मुदतींत परत आला नाहीं, त्यांस ते आमचे वर्गणीदार असें समजून आज दुसरा अंक पाठविला आहे. तरी त्या सर्वांनीं वर्गणी लवकर पाठविण्याची मेहेरबानगी करावी.

व्या० ' खानदेशमित्र कर्ते. '

---

## वर्गणीची पोंच.

| नांव. | | | प्रत. |
|---|---|---|---|
| श्री. रा. | कृष्णाजी रावजी जहागीरदार | काथरदे. | १ |
| ,, | शिव शिवदास देसाई ,, | नंदुरबार. | १ |
| ,, | शंकरदास हरचरणदास देसाई | ,, | १ |
| ,, | लालाभाई देसाई कांगो. | ,, | १ |
| रा. | नारायणराव कळंबकर | नाशीक. | १ |
| रा. | गंगाधर काशिनाथ जोशी | चिकोडी | २ |
| श्री. रा. | नानाजी महिपत शिंदे | सातारा. | १ |

---

**सूचना**—व्यवसायबंधूंनीं कृपा करून परत भेट द्यावी व अभिप्रायही द्यावा.

---

## आभारपूर्वक स्वीकार.

आर्यावर्त, लोकमित्र, भिषग्विलास त्यांचे अंक पावले. ( मा० पु० ) अभिप्राय पुढील अंकीं येईल.

कृपा करून हा अंक आपल्या मित्रमंडळीस जरूर दाखवा.

॥ श्रीः ॥

# खानदेशमित्र.

**मनोरंजक** आणि **सुबोध मासिकपुस्तक.**

॥ **श्लोक** ॥ ( वसंततिलका ).

कस्यापि कोप्यतिशयोऽस्ति स तेन लोके
ख्यातिं प्रयाति नहि सर्वविदस्तु सर्वे ॥
किं केतकी फलति किं पनसः सपुष्पः
किं नागवल्ल्यपिच पुष्पफलैरुपेता ॥ १ ॥

यज्जीव्यते क्षणमपि प्रथितं मनुष्यैर्विज्ञानविक्रमयशोभि-
रभज्यमानं ॥तन्नामजीवितमिह प्रवदन्ति तज्ज्ञाः का-
कोपि जीवति चिराय बलिंच भुक्ते ॥२॥

**पुस्तक १ लें.** **मे १८९२** **अंक ३ रा.**

**अनुक्रमणिका.**


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| १ जाहीरखबरवगैरे (कूटप्रश्न)... ... ... | १–५ |
| २ पुस्तकपरीक्षण... ... ... ... ... | ६–१० |
| ३ प्रतिविक्रमचरित्र. ... ... ... ... | ५–१४ |
| ४ रंजन आणि सुबोध ... ... ... ... | ७–१० |


पुणें येथें 'जगद्धितेच्छु' छा० छापून प्रकाशें येथें प्र० केलें.

**वर्गणीचे दर.**

गांवांतलि वर्गणीदारांस वर्षाची आगाऊ...१ रु०
बाहेर गांवचे ,, ,, अगाऊ ट. हं १८३
फुटकळ अंकास **किंमत ३ आणे**

सूचना- भारतमित्राची जाहिरात दुसरीकडे आहे ती जरूर पहा.

## व्यवसाय बंधूंस प्रार्थना.

खानदेशमित्र व भारतमित्र मा० पुस्तकाची जाहिरात या पुस्तकाचें कव्हारिंग पेज ७।८ वर आहे ती सर्व व्यवसायबंधूंनीं मेहेरबानीखातर आपापल्या वर्तमानपत्रांतून व मासिकपुस्तकांतून ३ च वेळ अवश्य लौकर छापून प्रसिद्ध करावी. एकवार कृपा कराच!! सदरील अंक आह्मांस पाठवावे ह्मणजे १ वर्षभर प्रत्येक मा. पु. फुकट पाठवूं ! ! ! मग तर झालेंना ! !

## एजंट पाहिजेत.

या मा० पु० चे संबंधानें आह्मास मोठमोठ्या शहरीं एजंट ठेवावयाचे आहेत, करितां ज्यांची इच्छा असेल त्यांनीं ही जाहिरात पाहतांच आह्मास उत्तराचे टिकिटासह पेड पत्र पाठवून माहिती विचारावी ह्मणजे आमचे ठराव वगैरे कळवूं. करितां त्वरा करावी. कारण आह्मांस या संबंधीं फारच लौकर व्यवस्था करणें आहे.

ज्याव्यवसायबंधूस खानदेशमित्राचे अंक मोबदला जातात त्यांनीं लौकरच कृपा करून परत भेटीचे अंक पाठविण्यास सुरुवात करावी.

म्या० ‘ खानदेशमित्रकर्ते. ’

## कोणीही

मोबदला वर्तमानपत्र, मासिकपुस्तक, अभिप्रायार्थ पुस्तकें, व या पुस्तकांत छापण्याकरितां मजकूर, व हरएक तऱ्हेचा पत्रव्यवहार आणि मनिआर्डरी खालील पत्यावर पाठवीत जाणें. पत्र पेड उत्तरास ति-

किट किंवा कार्ड पत्ता बालबोध लिपींत स्पष्ट व स्वताचा पत्ता बदलतांच त्वरीत कळवीत जाणें पत्ता-खानदेश मित्रकर्ते मु० प्रकाशें (खानदेश.)

### जाहिरातीचे दर.

प्रथम खेपेस दर ओळीस ८१॥ आणा प्रमाणें आकार पडतो. दुसऱ्या खेपेस दर ओळीस ८१। आणा प्रमाणें व तिसऱ्या वेळीं द. ओ. ८१ आणि चौथ्या खेपेस द. ओ. ८८९ प्रमाणें चार्ज पडेल. या पेक्षां जास्त वेळ ठेवणारास फार स्वस्त चार्ज पडेल. *

### वर्गणीदारांस सूचना.

खा० मि० चा१ला व२रा अंक ज्याचेकडेस गेला आहे ते आमचे वर्गणीदार असें समजून त्यांचीं नांवें लिस्टांत दाखल केलीं आहेत. करितां आतां सर्वांनीं लौकर वर्गणी पाठवावी. आगष्ट ता.१५ सन १८९२ नंतर मागील दराप्रमाणें आकार पडेल. आतां आश्रयाविषयीं नको ती शंका ! !

### आभारपूर्वक स्वीकार.

दीनबंधु, आर्यभिषक, केसरी, खरा प्रकार, खानदेश चित्रगुप्त, भोसला, बालबोध, तुकाराम, हुन्नरोत्तेजक, जगदादर्श ह्यांचे अंक पावले. आभार पूर्वक स्वीकार करितों.

**सूचना**—पुढील अंकीं वृद्धगंगा ( तापीमाहात्म्य ) कीर्तिध्वज ह्या ग्रंथाचें क्रमशः गद्यात्मक भाषांतर देण्यास खचित सुरुवात होईल.

---

* भारतमित्रांतही याच दरानें जाहिराती घेतल्या जातील, दर ओळींत १९ अक्षरें धरावयाचीं. खानदेशमित्र व भारतमित्र ह्या दोहोंतही जाहिराती १ वर्षभर ठेवल्यास फार स्वस्त चार्ज पडेल.

## वर्गणीची पोंच.

नांव [ ता. ३१९।९२ रोजीं १ रु. मनिआर्डरनें आला परंतु कोणाकडोन आला तें कूपन मध्यें नसल्यानें कळलें नाहीं. ] प्रत.

| | | |
|---|---|---|
| मि. महंमद अबदुल्लाखान | नागपूर. | १ |
| रा. रा. अण्णाजी मल्हार कोरान्ने. | शहादें. | १ |
| ,, ,, केशव रामचंद्र जोशी. | शिरूर. | १ |
| ,, ,, पांडुरंग आत्माराम खुंटे. | धुळें. | १ |
| श्री० रामराव लक्ष्मण हिंगणे | चांदोरी. | १ |
| ,, चिंतामण कृष्ण हर्डीकर. | जावली. | १ |
| रा. रा. पी. वी. लिमये हेडमास्तर. | वाशीम. | १ |
| ,, ,, रामकृष्ण नरहर कारकून. | कडी. | १ |
| ,, ,, विश्वनाथ गोविंद रेकार्डका. | कडी. | १ |
| ,, ,, सेक्रेटरीला० | यावल. | १ |
| श्री० राणा-गयमल जसवंतसिंग. | प्रतापपूर. | १ |

स्थलसंकोच्यास्तव बाकीची पोंच पुढील अंकीं येईल.

---

मासिक **भिषग्विलास** पुस्तक.

ह्यांत शरीररचना, इंद्रियांचे धर्म, निरनिराळे रोग त्यांचें निदान व चिकित्सा, औषधी व त्यांचे गुण व आरोग्यलक्षण इत्यादि उपयुक्त विषयांवर सविस्तर माहिती येत जाईल. आपल्या वैद्यकांत नवीन नवीन शोधांची भर पडावी ह्मणून ह्या पुस्तकांत विशेषतः अर्वाचीन माहिती देण्याचा जरी विचार आहे, तथापि आर्यवैद्यकांतील उपयुक्त माहिती प्रसंगानुसार येणारच. त्यांचा उपयोग केवळ वैद्यकीचा धंदा क-

# अगत्याची सूचनाः

सर्व छापखानदार, वर्तमानपत्रकर्ते, मासिकपुस्तककर्ते आणि ग्रंथप्रकाशक इत्यादिकांस विनयपूर्वक कळविण्यांत येतें कीं, कोणी कोणतेंही नवीन पत्र अथवा पुस्तक वगैरे छापल्यास त्यांत आमची खानदेशमित्राची व भारतमित्राची जाहिरात एक वेळ छापीत जाणें. दर ओळींत अक्षरें २६ व दर ओळीस एक आणाप्रमाणें आह्मीं चार्ज देऊं. जाहिरातीची नक्कल इकडून मागवीत जावी. व त्या पत्रापुस्तकांची एक प्रत पाठविल्यास पसंत होईल तर किमतीबद्दल वगैरे मालकाच्या मर्जीनुरूप तजवीज होईल. ग्रंथ परत करणें झाल्यास ट० ख० आमचा. ग्रंथ पाठविण्यापूर्वी प्रथम रिप्लाय कार्ड पाठवून संमति घेत जाणें.

---

## कूटप्रश्न.

* ( मुदतींत बरोबर उत्तर देणारांचीं नांवें या मा० पु० तुन छापून प्रसिद्ध होतील. )

प्रश्न १–२ ॥ श्लोक ॥ एकातें हंसवी, दुजास रडवी, तीजासही मोहवी ॥ बाळातें सुखवी, तरूण

---

* दरएक श्लोकाचें उत्तर भिन्न आहे. ( उत्तर ता० १० आगष्टचे आंत पाठवावें. )

दुखवी, वृद्धास कीं घालवी ॥ लोकांतेंरमवी, विचित्र करवी, आद्यंतहीं सारवी ॥ ऐसी हे गुणसुंदरी हुडकुनी बक्षीस ते मेळवी ॥ १ ॥ स्वांगीं दुर्गुण ज्या वसे, सुजनता लोकांस जो देतसे ॥ दुष्टांदुष्ट अनिष्ट कारक नसे शिष्टांपरी होतसे ॥ सत्संगा न धरीच जो सुजनता शिष्ट प्रतापा हरी ॥ ऐसी हे करणी विचित्र स्मरणी जाणोन सांगा तरी ॥ २ ॥

---

# जाहीर खबर.

—:o:—

## हें लक्षांत ठेवा.

खानदेशमित्राचे वर्गणीदार, वंर्तमानपत्रकर्ते, व मासिकपुस्तककर्ते व सर्व भरतखंडवासी जन यांस कळविण्यांत येतें कीं, आज तारखेपासून पुढें दुसरी सूचना होईपावेतों, हरएक प्रकारचा पत्रव्यवहार, मनिआर्डरी वगैरे आमचे नांवें न पाठवितां या पुस्तकांच्या नवीन व्यवस्थापकांच्या नांवें पाठवीत जाणें. या पुस्तकाची सर्व प्रकारची व्यवस्था आह्मीं आजपासून रा० रा० नारायण गणेश जगदले माजी स्कुलमास्तर मु० प्रकाशें ह्यांजकडे दिली आहे, तरी त्यांच्याशीं या संबंधानें जो जो ठराव होईल व ते जी जी व्यवस्था या पुस्तकासंबंधानें करितील ती ती आह्मांस मान्य व

कबूल आहे. करितां सर्वांनीं या पुढें या प्रमाणें व्यवस्था करावी.

मुक्काम प्रकाशें ता० ४ मे १८९२ } दत्तात्रय वासुदेव पुराणीक खानदेशमित्रकर्ते.

---

## नंबर कळवीत जावा.

खानदेशमित्रकर्ते ह्यांजशीं आमच्या वर्गणीदारांतून कोणास पत्रव्यवहार करणें झाल्यास त्यांनीं आपले चिठ्ठीवरील नंबर प्रत्येक वेळीं कळवीत जावा व पत्ता पूर्णपणें एकवार कळवून ठेवावा. कारण कित्येकांकडून पत्रें येतात तीं केवळ पोष्टांच्या गांवावरूनच कायतीं अमूक ठिकाणचीं आहेत ह्मणून समजतें.

---

सर्व वर्गणीदारांनीं आपला हुद्दा, पोष्टाचें नांव आणि जिल्हा हीं आजचा तिसरा अंक पोंचतांच कळवावीं ह्मणजे पुढील अंक वेळेवर आणि बिनचूक येतील कारण एकनांवाचीं गांवें अनेक असल्यामुळें पुस्तक विनाकारण गोतें खात रहातें.

---

**फायदा आहे !! अवश्य वाचा ! फायदा आहे!!**

आगाऊ दराप्रमाणें वर्गणी भरण्याची मुदत संपून गेली तरी अजून पुष्कळ वर्गणीदारांकडून वर्गणी येत नाहीं ह्यांचें मोठें सखेदाश्चर्य वाटतें. आह्मीं ह्या मा० पु० च्यासंबंधानें इकडील सर्व व्यवस्थेचें दिग्दर्शन प-

हिल्या व दुसऱ्या अंकीं केलेलें आहे असें असतां स्वस्थ कां ! वेळेवर पोटाला भाकर न मिळाली तर चाकरी व्हावी कशी ! तरी आतां सर्व आश्रयदात्यांनीं कृपा करून हा अंक पावतांच वर्गणी सत्वर पाठवावी. ता० १० चे आंत ज्याचे कडून वर्गणी येणार नाहीं त्यांस ४ था अंक मागील दराप्रमाणें ( सालीना ट० ह० दीड रुपया ) व्ह्या० पे० नें पाठविला जाईल. [ उपाय नाहीं ह्मणून ही तसदी ] किंवा अंकच पाठविणेचें बंद होईल, पण आश्रय देऊन मागाहून असा प्रसंग कोणीही आणणार नाहीं अशी आशा बाळगितों ! ! दिवसेंदिवस जास्त सुधारणा व्हावयाची व पुढील वर्षी १३ आणे वर्गणी करणार ! ! ! ( ट. सह ).

---

# जोडीदार मिळावा.

प्रत्येक वर्गणीदारांनीं खटपट करून आपापणास एक जोडीदार शोधून काढावा कीं ९०० वर्गणीदारांचे शर्तीवर मा० पु० चीं पृष्ठें जरूर वाढवूं. पण वर्गणी आगाऊ पाठवा बरें ! आगष्ट ता० १९ पावेतों २ प्रतींस ट० हं० सह फक्त दोनच रुपये पडतील ! ज्यास्त प्रती घेतल्यास खालील दराप्रमाणें मुदतींत आकार बसेल.

नि० १ )-- ९ प्रतींस ट० हं० आगाऊ एक वर्षास ४ रुपये १३ आणे.

नि० २ )-- १२ प्रतींस ट० हं आगाऊ एक वर्षास ११ रुपये ४ आणे.

---

## असें होईल काय ?

खानदेशमित्राचे अंक आह्मीं हल्लीं बाहेरगांवीं छापवून आणवून प्रसिद्ध करीत असतों यामुळें दरमहा अंक वेळेवर प्रसिद्ध होत नाहींत, व होत नाहींत ह्मणून कित्येक वर्गणीदार रागवतातही, यास आमचा कांहीं उपाय नाहीं ! परंतु सर्व वर्गणीदारच जर मनावर घेतील तर कांहीं दिवसांनीं मात्र वरील कटकट मोडण्याचा संभव आहे. आतां वर्गणीदारांस ह्मणजे आह्मीं कांहीं ज्यास्त ओझें घालतों किंवा पुढील वर्गणी [ दुसऱ्या वर्षाची ] आगाऊ पाठवा ह्मणून तजदी देतों, असें मुळींच नाहीं, तर ह्या आमच्या मा० पु० बद्दल फार काळजी ठेवून आह्मांस होतांहोईल तितके लौकर १५०० वर्गणीदार मिळवून द्यावेत, आणि असें होणें ह्मणजे कांहीं दुरापास्त आहे असें मुळींच नाहीं. १५०० वर्गणीदार मिळाले ह्मणजे आह्मीं आपला स्वतःचा प्रेस घालण्याचा विचार केला आहे. ता० १ अक्टोंबर पावेतों वरील संख्या पुरी झाल्यास सप्तेंबरं महिन्यांत जें मुकुंदराव नांवाचें बक्षिस बुक वांटणार आहोंत. ( १००० वर्ग-

णदारांच्या शर्तीवर ) तें नोवेंबरच्या अंकासोबत स्वतःच्या प्रेसमधून छापून काढून वांटण्याचें करूं. आणि दुसऱ्या वर्षी सालीना आगाऊ ह्या मा० पु० ची ट० हं० सह फक्त तेरा आणेच वर्गणी ठेवूं. व करितां येईल तितकी जास्त सुधारणा करूं ! या सर्व गोष्टींकडेस आमचे तमाम मराठी वाचक लक्ष देतील अशी आशा आहे.

म्या० खा० मि० कर्ते.

---

## पुस्तकपरीक्षण.

१ **अनेक पद्यावली.**—हें छोटेंसे पद्यात्मक पुस्तक रा० रा० मनोहर विठ्ठल तर्खडकर ह्यांनीं केलें आहे. ह्याची डेमी द्वादशपत्री पृष्ठें ३२ आहेत, व किंमत ४ आणे. जरा जास्त आहे. ह्यांत ईशस्तुति, मनास उपदेश, मदनप्रताप, सुरादेवीच्या भक्ताचा पश्चात्ताप व त्याच्या सुशील स्त्रीचा उपदेश, वगैरेवर निरनिराळ्या वृत्तांत कविता आहेत, तरी पण श्लोक आर्या वगैरेपेक्षां संगीताच्या चालीवरील पदें जास्त आहेत. पुस्तक बरेंच मनोरम व सुबोध आहे. कवीता चटकदार असून पुस्तकाची छपाई वगैरे उत्तम आहे. रसिकांनीं अवश्य घ्यावें. मासल्याकरितां १

एक फटका आह्मी देणार होतों; परंतु मालकाच्या परवानगीविरहित दिला नाहीं. लिहून आल्यास पुढील अंकीं घालूं.

२ मोठमोठ्या माणसांच्या लहान लहान गोष्टी. भाग पहिला.—हें पुस्तक रा० रा० तुकाराम जावजी निर्णयसागर छापखान्याचे मालक, यांजकडून आलें आहे त्याचा अभारपूर्वक स्वीकार करितों.—ह्या पुस्तकांत बालबोध मा० पु० त पूर्वीं प्रसिद्ध झालेल्या थोरथोर निवडक ४६ पुरुषांचीं सचित्र चरित्रें छापलीं आहेत. छपाई वगैरे सुंदर आहे. ह्मणून लिहिणेंच नको; आणि त्या मानानें ठेविलेली किंमत ही सहा आणे कांहींच नाहीं. " हें मराठी भाषेंत हल्लीं उत्तम ठरलेल्या पुस्तकमालीकेंत घालण्यासारखें आहे. शाळाखात्यांतून हें पुस्तक बक्षीस वांटण्याकडें योजिल्यास ठीक होईल. लहान मुलांस व तरुणासही हें पुस्तक, उपदेशक आहे. ह्याच्या वाचनापासून वाचकास प्राचीनकाळीं व अर्वाचीनकाळीं थोरथोर ह्मणून जे गृहस्थ नांवालौकिकास आले आहेत ते केवळ स्वतःच्या उद्योगशीलतेच्या बळावरच आले आहेत, हें व प्रत्येक व्यक्तीच्याठाईं कोणकोणते लोकोत्तर गुण होते हें सहज कळून येऊन स्वतः उद्योगी बनण्यास उत्तेजन येईल. शाळांतून शेंशें, दोनदोनशें पृष्ठांचे इतिहास पठन केल्यापासून जो फायदा आहे ह्मणून विद्वानांस वाटत आहे त्यापेक्षां जास्त अशीं सुबोधचरित्रें वाचल्यापासून होईल, तथापि इतिहास पठन करणें वाव-

गें नाहीं. कारण ह्या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत ह्मटल्या-प्रमाणें इतिहास हा जगांतल्या व्यवहारमार्गांत चाल-ण्यास सूर्यच आहे हें खरेंच. परंतु इतिहासरूपी प्रचंड सूर्याचें तेज सहन होण्यास हल्लींच्या क्रमानुसार ( मोठमोठ्या माणसांच्या लहान लहान गोष्टीच्या भागाप्रमाणें ) ते परावर्तनरूपानेंच सेवन करण्याची संवय केली पाहिजे. व तसें ह्या पुस्तकाच्या वाचना-पासून निसंशय होईल असें आह्मांस वाटतें. शिवाय आजपावेतों आपण ज्यांचीं नुसतीं नांवेंच थोरपणाच्या संबंधानें ऐकत होतों त्यांचा इत्थंभूत जन्मवृत्तांत वगै-रे वाचनास मिळण्याची सोय ह्या पुस्तकप्रकाशकांनीं केली आहे ह्यास्तव त्यांचे फार आभार मानिले पाहि-जेत. व उत्तेजनार्थ ह्या पुस्तकाची एकेक प्रत प्रत्येक सुशिक्षित मनुष्यानें अवश्य संग्रह करावी अशी आ-ह्मी शिफारस करितों. व हा क्रम पुढें कायम ठेवावा ह्मणून निर्णयसागरच्या मालकास विनवितों कीं दुसरा भाग लौकरच भेट देईल असा सुदीन त्वरित यावा अशी आमची इच्छा आहे. बालबोधाचे मागील अंक ज्यांचेकडे नसतील त्यांनीं तर ( १ ला भाग ) हें पुस्तक जरूर घ्यावें.

३ **सुभाषित अथवा सुबोध वचनें.**—हें लोक-हितवादीकृत पुस्तक वरील गृहस्थाकडूनच आलें आ-हे. ह्यांचे आरंभीं सरदार रावबहादूर गोपाळराव ह-री देशमुख ह्यांचें सुंदर चित्र असून १०० शंभर बो-धपर प्रकरणें आहेत. हें पुस्तक वाचलें म्हणजे संस्कृ-

त मोठमोठाल्या सुभाषितांची व नीतिशतक वृद्धचाणाख्यासारखीं सुबोध सार्थ पुस्तकें वाचल्याचें श्रय मिळण्यासारखें आहे. ज्यांना संस्कृत येत नाहीं त्यास व साधारण येत असून निरानिराळ्या विषयांवरील संस्कृत प्रचंड ग्रंथांतील सुभाषितें निवडून त्यांचीं टिपणें करीत बसण्याची सवड नाहीं, त्यांस हें पुस्तक फारच उपयुक्त होईल; आणि त्यांत दर्शविलेल्या वचनाप्रमाणें जो आपलें वर्तन ठेवण्याची खटपट करील त्यास व्यवहार मार्गांत केंव्हांही अपयशाचा वांटा मिळावयाचा नाहीं. शिवाय स्वतःचे दुर्गुण घालविण्यास व सद्गुणाची प्राप्ति करून घेण्यास हें पुस्तक प्रत्यक्ष गुरूच आहे. हें पुस्तक निर्णयसागर छापखान्यांत छापलेलें असल्यामुळें फार सुंदर व स्वस्त किमतीचें आहे. ह्याचीं डेमी द्वादशपत्रीं सुमारें १२० पृष्ठें असून किंमत अवघी सात आणे आहे. विषयवारी बालबोध मा० पु० तून पूर्वीं प्रसिद्ध झालेली आहे ती पहावी; आणि हें पुस्तक आमच्या प्रत्येक आश्रयदात्यांनीं एकवार अवश्य वाचावेंच अशी आमची विनंति आहे.

४ **भिषग्विलास**.—हें मा० पु० सोलापूर येथें एप्रिल १८९२ इ० पासून नवीन निघूं लागलें आहे. ह्यांत प्राचीन व अर्वाचीन [इंग्रजी ग्रंथाधारें] अशी उपयुक्त माहिती यावयाची असून हें मासिक पुस्तक सुलभ व सरळ असें मराठींत निघत आहे. सर्व संपत्तींत शरीरसंपत्ति प्राधान्य आहे व शरीरावर हरहमेष रोगाचें कठिण प्रसंग येत असतातच, यास्तव त्या

रोगापासून आपलें संरक्षण व्हावें ह्मणून औषधादिकांची माहिती असणें जितकें जरूर आहे तितक्यापेक्षां अधिक शरीरप्रकृति दुरुस्त ठेवण्याच्या नियमाची माहिती असणें जरूर आहे. रोग अमूक आहे हें समजून नंतर त्यावर औषधाची योजना कारितां येणें त्यापेक्षां रोगच न होऊं देण्याचीं साधारण साधनें माहित असणें हें अधिक अवश्य आहे व तीं साधनें प्राप्त होण्याला शारीरशास्त्राचे ग्रंथच अवलोकन केलें पाहिजेत. प्रकृत पुस्तकांत ह्यासंबंधीं योग्य विवरण केलेलें असून औषधादिकांची योग्य योजना होण्याची आशा दिसते. ह्या पुस्तकांचा वैद्यकी धंदा करणारांसच उपयोग होईल असें नाहीं तर प्रत्येक सुशिक्षित मनुष्यानें लक्ष्यपूर्वक ह्या पुस्तकांतील लेख वाचून पाहिल्यावर कृति करून पाहिल्यास खचित होईल. ह्याची सालीना अगाऊ वर्गणी ३ रुपये आहे व तूर्त दर अंकास १६ पृष्ठें असतात. हें पुस्तक गोरगरीबास तर घेतां येणें कठिण, परंतु श्रीमंत लोकांनीं ह्यास अवश्य आश्रय द्यावा अशी आमची त्यांस सूचना आहे.

णून आपण त्या घोरांत आह्मासमवेत देशांवर पडून व आपलें ब्रीद सांभाळून आयुष्यक्रमण करीत आहां. सत्य हें जयाचें सिद्धस्थान असल्यामुळें घरीं निघाल्यावेळीं आपणाजवळ जरी विशेष द्रव्य नव्हतें तरी रोजगार धंदा करून चार पैसे जमवून आपण सुखांत नांदत आहों व तेणेंकरून आपण निष्काळजीपणांत स्वातंत्र्य सौख्याचा अनुभव पावत आहों. सारांश तुह्मांस सत्य हें विशेष प्रिय आहे व तदनुसार तुमचा वर्तनक्रमही म्यां आज पुष्कळ दिवसांपासून अनुभविला आहे. असें असतां या उज्जनीस आपण आल्यापासून तें सत्यप्रियत्व गुंडाळून ठेवून चार लोकांप्रमाणें अनुभव नसतांही त्या विक्रम राजाची मिथ्या स्तुति गातां हें काय ह्मणून ? ! ! मी तर असें मिथ्या भाषण कधींही करण्याचें पतकरलें नसतें. विक्रम-विक्रम तरी काय मोठा ह्मणतां ? मी तर त्याला हातांतील चेंडूप्रमाणें मानतें !

बाप०—मुली आतां तर कमाल झाली, मला वाटतें तूं अगदीं वेडी आहेस आजवर मी तुझें बोलणें केवळ थट्टेवरच ठेवीत होतों. पण आज तुझा हेतु पूर्ण जाणला. मला कांहीं आतां घडगत दिसत नाहीं. तुला लहानपणीं मीं जें सुशिक्षण दिलें, विद्याभ्यास करविला, आणि तूं नेहमीं अनेक तऱ्हेचे ग्रंथ वाचून त्यांतील भल्या खोट्या जनांचीं चरित्रें तोंडपाठ ह्मणून तदाधारें ऐकणारास व्यवहार ज्ञानाचा उपदेश क-

रीत असतेस त्या गाढ ज्ञानाचा हा असा उपयोग करणार काय ? !! वा मग तर लौकरच माझ्या भाग्याचा उदय होईल, कारण ह्या तुझ्या स्वयं वदतोन्याय अशा वर्तनानें तो विक्रमराव संतप्त होऊन तुझेंच काय पण आह्मा उभयतांवर देखील नाहींतो चार्ज ठरवून काय नुकसान करील तें सांगवत नाहीं. जरी तो विक्रमराव मोठा सज्जन मनुष्य आहे तरी त्यास आपली विनाकारण निंदा करणारा किंवा अंगीं योग्यता नसतां बळेंच एखाद्या गुणाविषयीं खोटा आव घालून त्या विषयीं अभिमान बाळगणारा मनुष्य सहनच होत नाहीं ह्मणून त्यानें आजवर तुजसारख्या दुराग्रही स्त्रिया पुरुषांस जन्मभर अटकेंत ठेविलें आहे, असे या नगरचे प्रत्येक मनुष्य सांगत असतें. तूं पडलीस आमची एकुलती एक आवडती कन्या. अजून तुझा विवाह सुद्धां झाला नाहीं. काल परवांच तुला बारावें वर्ष लोटलें आहे, आणि मध्येंच तूं जर असा कांहीं जिवावरचा प्रसंग आणशील तर मग बरें आमची दशा काय होईल ?! आहे हा परदेश, व त्यांतून आपण येथें नुकतेंच रहावयास आलों आहोंत, मग आपणाविषयीं कोणास बरें कींव येणार आहे ! तुला जर राजधरणें आलें तर आमचा जीव ठिकाणावर तरी राहील काय ?! तुजविरहित आह्मांस दुसरें कांहीं अपत्य आहे काय ?! फरितां तुझ्या विरहानें आह्मांस किती दुःसह दुःख होईल ह्या-

चा विचार कर !

लीला०—बाबा, इतकी काळजी करूं नका. मला तुह्मीं लहानपणापासून आजवर जें जें शिक्षण दिलें आहे व वारंवार नानाप्रकारच्या ज्या उपदेशपर गोष्टी सांगितल्या आहेत, त्यांपासून मला बरेंच चातुर्य प्राप्त झालें आहे. त्या योगानें खचित खचित मी बुद्धिवादांत विक्रमास जिंकीन व तो ज्या वेळीं " तुला धन्य आहे " असे उद्गार स्वमुखाबाहेर काढील, त्या वेळींच लीलावती हा नाद सोडील. समजलात बाबा ! तुमचा व मातोश्रीचा मात्र मला पूर्ण आशीर्वाद असो आणि त्याप्रमाणें त्या जगदंबेचीही कृपा होवो. कीं मग मजविषयीं तुह्मी बेफिकीर रहा. मी स्वतःवर किंवा तुह्मां उभयतांवर कोणतेंही संकट येऊं देणार नाहीं आणि आलेंच तर त्याचें धैर्यानें व चातुर्यानें निवारण करीन.

बाप ह्मणतोः—[ तिची समजूत घालण्याकरितां ] बरें आहे बेटा, तूं स्वतःचें रक्षण करण्यास जर इतकी समर्थ आहेस तर मग खुशाल तूं आपला क्रम सुरू ठेव. व आह्मांविषयीं तूं बिलकुल काळजी वाहूं नको. मीं जर क्षत्रिय कुलांत जन्म घेतला आहे तर माझ्या ठायीं असा भित्रेपणा कसा शोभेल ?! आमचें स्वकर्तव्यच असें आहे कीं जन्मतांच ज्याचा तो निराळा समजतात ह्मणजे आपल्या जिवाचें संरक्षण करवेल तंववर स्वसामर्थ्यानें करावें. आणि असें जे

कारितो तोच पुढें कुलावतंस या नामश्रेष्ठत्वास पावतो. तुझें जन्मही मज शराचे ठायीं झालें असून तुझ्या ठिकाणीं अद्भुत चातुर्य, शौर्य, धैर्य जरी वास करीत आहे तरी तूं पडलीस स्त्रीजाती. यामुळें नियत काळीं तुझा विवाह होऊन तुला स्वपतितंत्रानेंच वागावें लागेल. व वागलेंच पाहिजे असा नियमही आहे. कारण स्त्रियांनीं अविवाहित राहण्यापेक्षां विवाह करून आपल्या पतीच्या सहवासानें आपला आयुष्यक्रम घालविणें बरें ! ह्यास्तव वर निर्दिष्ट केलेल्या तुझ्या गुणांचा पूर्ण विकास होण्याचा समय व पति आज्ञेंत राहण्याची वेळ ही एकच होऊन त्या गुणांवर पारतंत्रचरूपी अंबराच्छादन पडून ते जागच्या जागींच लुप्तप्राय होतील असें मला वाटतें.

लीला०—स्त्रियांनीं नियतकालीं विवाह करून पतीच्या आज्ञेनुरूप वागावें हें खरें, परंतु माझी अशी इच्छा आहे कीं, जो तरुण, रूपगुणसंपन्न असून मला समरांगणीं धनुर्विद्येंत व मल्लविद्येंत, जिंकील, त्या पुरुषाबरोबरच माझा विवाह व्हावा. मग मी त्याच्या तंत्रानें खुशाल वागेन. मग तो राव असो, किंवा रंक असो; आणि अशा एखाद्या पुरुषाबरोबर माझा एकदांचा विवाह झाला कीं, मग हे माझे चातुर्य—धैर्य— शौर्यादि गुण मी सूर्य, चंद्र, अभ्राच्छादित असतां, किंवा अग्नि विभूतिसंगतीनें असतां आपले स्वाभाविक धर्म सोडल्यासारखे होऊन नियमि-

तकाळ पावेतों हतवीर्य होऊन जसे राहतात तसेच मी आपले स्वाभाविक धर्म आपल्या हृदयमंदिरीं गुप्त राखून स्वपति मनधारणा करीत आनंदानें काळ कळीचा प्रवेश होऊं न देतां घालवीन. आणि ज्या वेळीं मला उत्कटेच्छा प्राप्त होत जाईल त्या वेळीं मी पत्याज्ञेनें त्या अंगभूत गुणांचा परिचय पहात जाईन व तेणेंकरून माझा पति जसा रणशूर तसाच गुण माझेही ठायीं आहे हें पाहून ही खरीच वीरपत्नी आहे असें पाहून तो मजवर अधिकच माया करूं लागेल. मग ह्या विक्रमाची गोष्ट ती काय ! एका क्षणार्धांत मी त्याचे अंगभूत गुणांची झाडणी करीत, मग तर झालेंना ! अहो जंववर पूर्ण ज्ञात पंचाक्षरी भेटला नाहीं. तंववरच भूताची प्रतिष्ठा किंवा " जंववरी न देखिले पंचानना तंववरी जंबुक करी गर्जना "

बाप०—मुली, असें मात्र तूं सहसा ह्मणूं नको. या योगानें तूं विक्रमाची खरोखरच निंदा करितेस असें मलासुद्धां म्हणावें लागतें. कारण मी एकवार सहज त्याच्या दरबारांत गेलों असतां त्याच्या एकंदर क्षणिक वेळेच्या वर्तनावरून तो फार सज्जन मनुष्य आहे अशी माझी खात्री झाली आहे, कारितां तूं विनाकारण त्याची निंदा करूं नको. आणि याउप्पर तूं असें कधीं न बोलावें असें मी इच्छितों. प्रसंग येईल तेव्हां आपले गुण आपापच प्रगट होत असतात. आणि तूं खात्री ठेव. ( दटावल्यासारखें करून )

कीं, जंववर हें वर्तमान त्या राजाचे कानीं जाऊन त्यानें तुला आपलें उग्र स्वरूप दाखविलें नाहीं, तंववरच हे तुझे उमेदीचे शब्द आहेत ! ह्या जगांत प्रत्येक मनुष्यास मी मोठा असें वाटतें परंतु प्रत्येक मनुष्यप्राण्यानें असें पक्कें नेहमीं लक्षांत ठेवावें कीं, मजपेक्षांही कोणी वरचढ असेलच व त्याशीं गांठ मात्र जोंपर्यंत पडली नाहीं तोंपर्यंतच आपली प्रतिष्ठा आहे ! ! आणि सर्वांची प्रतिष्ठा उणी भासविणारा असाही एक कोणी आहे. तो कोण तर ईश्वर होय. यास्तव तूं आपल्या गुणाविषयीं गर्व किमपिही धरूं नयेच ! ! आपणास येथें यावयाला आज महिना सवा महिना झाला असून इतक्या अवसरांत तुझा संवाद ऐकून कोणीही विक्रमाजवळ सांगितलें नाहीं हें तूं धन्यच समज ! कारण त्या राजाचे रात्रंदिवस अनेक गुप्त हेर ह्या नगरांत फिरत असतात.

लीला०—असें आहे तर मग मला त्याविषयीं मोठा आनंदच मानिला पाहिजे वाटतें ! कारण आपला हा संवाद ऐकून कोणी तरी राजास सांगेल आणि मला त्याच्या भेटीचा लाभ घडेल अशी मोठी उत्कंठा आहे. कळवो बिचारा खुशाल कोणी त्यांत माझें हितच आहे ! विक्रमाची भेट कशी होते ह्याविषयीं मला मोठी काळजी होती ती आतां मोडली, आणि थोडक्याच दिवसांनीं मी विक्रमास भेटून त्यास आपलें बुद्धिकौशल्य दाखवून थक करून सोडीन

अशी माझी मनदेवता मला साक्ष पुरवीत आहे. आतां ह्यांत मी अभिमानानें कांहीं बोलतें असें मुळींच नाहीं तर ते गुणच उद्गार मजकरवीं काढवितात.

बाप--( मुलीचा विशेष हट्ट पाहून व वेळ मारून नेण्यास्तव ) बरें आहे मुली. तुझी अशी इच्छा आहे तर ती परमेश्वर केव्हाना केव्हां तरी पूर्ण करील. कारण तो ' भक्तकामकल्पद्रुम ' आहे. तो कोणाचीही निराशा करीत नाहीं. इच्छा बरी अगर वाईट बाळगणें हें मात्र मनुष्याच्या हातीं आहे.

प्रियवाचकहो ! अशा प्रकारचा त्या बापमुलीचा झालेला संवाद ऐकून विक्रमास त्या दिवशीं सांगितलेल्या हेरवचनाची सत्यता दिसली व त्यास तेणेंकरून मोठा क्रोध येऊन उदयिकच मी त्याचा चांगला बंदोबस्त करीन. कारण आतांच ह्याचा बंदोबस्त न केला तर दिवसेंदिवस ही माझी जास्तच निंदा करीत राहील ! [ पुन्हां आठवलेंसें करून ] बरें काय चिंता आहे ? ! ज्याप्रमाणें मी सुमनकेली, आनंदलहरी, पुष्पमाला, चित्रकला व मनमोहिनी आदीकरून सगर्व स्त्रियांस त्यांच्या हट्टीस्वभावास्तव नृपनिंदकपणाचा त्यांवर चार्ज ठरवून अखंड बंदींत ठेविले आहे. तद्वत तुलाही ठेविलें पाहिजे. व त्यांचे जसे आतां खाडकन डोळे उघडले आहेत व त्या ताळ्यावर आल्या आहेत. तसे तुझेही कालांतरानें उघडतील तेव्हांच तूंही आपेआपच आपला दुराग्रह सो-

डशील ! बिचारा बाप हितगोष्टी सांतग असतां तूं जुमानीत नाहींस तर त्याचें फळ तुला परमेश्वर देवविलच ! मनमोहिनी आदिकरून स्त्रियांस त्या बंदींत असून त्यांना तेथें खाणें, पिणें, जलक्रीडा करणें, बागेंत फिरणें वगैरे सौख्य प्राप्तीची सोय जरी मीं केली आहे तरी पण एक किल्लयाचे बाहेर पडण्याची व आपले आप्तस्वकीयाबरोबर बोलण्यासवरण्याची मनाई असल्यामुळें रात्रंदिवस त्या दुःखाग्नींत होरपळत आहेत व जेव्हां जेव्हां मी तेथें जाऊन पाहतों तेव्हां तेव्हां त्या अगदीं निराश झालेल्या अशा मी पाहतों. व त्यांना आतां त्या आपल्या कृतकर्माबद्दल खेद वाटत असल्यामुळें मजजवळ त्या नेहमीं काकळूत करून आह्मांस येथें आणखी कितीक दिवस कुजत ठेवणार आहेस ? सोड बापा आतां ! नसलें सोडावयाचें तर आमचीं एकदांचीं शिरें कां तुझ्या हातांनीं उडवीसना ! पण अशा तापांत वांचणें नको ! व तशा प्रसंगीं मजकडून निराशेचें त्यांना उत्तर मिळत असल्यामुळें तें त्यांना दुःसहसें होऊन त्या तत्काळ 'देमायधरणीठाय' अशा बनतात ! ! व असे प्रसंग वारंवार येत असल्यामुळें त्या दिवसेंदिवस अनिवार शोकाग्नीनें भाजून तरुण वयाच्या असतांही अगदीं शुष्क बनत चालल्या आहेत. सारांश त्यांची चांगली खोड जिरून त्या आतां पूर्ण शुद्धीवर आल्या आहेत. व नृपनिंदा करण्याचें असें फळ असतें, ह्मणून

अनुभवसिद्ध ज्ञान प्राप्त झाल्यामुळें पुढीलांस शहाणपणाच्या गोष्टी सांगून उत्तम प्रकारें ताळ्यावर आणण्यास समर्थ झाल्या आहेत. त्याप्रमाणें लीलावती तुझी दशा होईल तेव्हांच तूं हा नाद आपोआप सोडशील असें आपणाशीं पुटपुटत तो हेरासहवर्तमान लागलींच राजवाड्याकडे निघून आला. व तेथें येतांच त्या हेरास त्याचे इमानीपणाबद्दल आपला आनंद प्रदर्शित करून आपल्या हातांतील एक सुवर्णाचें कडें दिलें व पुढेंही असाच वागलास तर तुझें मोठें कल्याण करीन असें अभय देऊन त्यास वाटेस लाविलें. व आपण रत्नावलीनामक पट्टराणीच्या महालीं प्रवेश करितां झाला.

ती वेळ रात्रींचे बारा साडेबारा वाजण्याची असल्यामुळें राजवाड्यांत व रत्नावलीच्या महालांत सुद्धां जिकडे तिकडे निवांत झालें होतें. मंत्री लोक मात्र मधून मधून डुलक्या देत व हातांतील पडत झडत असलेलीं शस्त्रें पुन्हा घेऊन हुशारी राखण्याविषयीं परस्परांस सुचवीत होते. व तेजोमय दीपक प्रकाशांत जिकडे तिकडे चित्रवत् सर्व पसारा स्पष्ट दिसत होता. रत्नावली ही आपल्या दिव्य मंचकीं मृदु पुष्पशय्येवर वामकरीं आपला मस्तकभार ठेवून देवांगनेचे परी गाढ निद्रेंत निमग्न झाली होती. अशा समयास विक्रमराव निर्धास्तपणें एकदम तिचे पर्यंकापर्यंत जाऊन उभा राहिला. त्या वेळीं राणीही गाढ निद्रेंत

असून जी दिव्य रूपवती, तरुण व संपूर्ण वस्त्रभूषणांहीं आलंकृत व जिचें मुखकमलावर त्या वेळीं विश्रांतावस्थेंत शांततेचें आलेलें विलक्षण सौंदर्य दीपक प्रकाशांत नभस्थ चंद्राप्रमाणें नेत्रद्वयास भासत आहे अशीस पाहून त्याचें अंतःकरण अगदीं तल्लीन झालें व हिच्या भाषणामृताचा मला केव्हां लाभ होईल ह्मणून तो वाट पाहूं लागला. क्षणभर गेल्यावर पुन्हां त्यास वाटलें कीं हिला अशा आनंदनिद्रेंतून जागृत करून व्यर्थ कां शिणवावें. प्रातःकाळीं कळवूंच तर लीलावतीचा वृत्तांत. असें बोलून तो जिन्याचे दारापर्यंत मागें आला आणि तेथें थांबून विचार करीत उभा असतां पुन्हा ह्मणतो कीं, अरे चल हो मागें चाललास काय ? ही वेळ कोण ? पुन्हां अशी वेळ येण्यास १ दिवसाचा अवकाश पाहिजे. कारण दिवसां माझ्या मागें राजकारभाराच्या अनेक कटकटी असतात व हिजकडे शेंकडोशें स्त्रियांचें येणें जाणें सुरूं असतें, मग माझी डाळ कोठली शिजायला? करितां कांहींही होवो व प्रिया रागवली तर कांहीं चिंता नाहीं, मी तिजजवळ क्षमा मागेन. मी तिचा दास मजवर ती माया केल्यावांचून कधींही रहाणार नाहीं. आणि लीलावतीचा वृत्तांत हिला आतांच कळविला ह्मणजे ही तेव्हांच काय तो निर्णय करील आणि त्या प्रमाणें मला पुढील व्यवस्था करण्यास ठीक पडेल. लीलावतीला मी समक्ष केव्हां पाहीन आणि तिनें नच ऐकलें

तःकरणाची शांतता करण्याकरितां विनाकारण आपण स्वस्त्रियेस जाच करूं नये. कारण, स्त्रियेचें चित्त दुःखित झाल्यास अपेशाचा वांटा आपणास मिळेल. स्त्रियेची योग्यता केवढी मानिली आहे हें पुढील पद्यावरून जाणा.

॥ श्लोक ॥

॥ * * * * ॥ * * * * ॥

॥ यत्र नास्ति गुणगौरवरामा ॥ तानितानिबतगृहाणिवनानि ॥ १ ॥

किंवा ॥ ओंवी ॥

॥ भार्या सकळ श्रमातें हर्ती ॥ भार्या सकळ सुखातें कर्ती ॥ भार्या पवित्र वंश धर्ती ॥ यश कीर्ति स्त्रीसंगें ॥ १ ॥ ॥ ॥ ॥

अथवा

" यत्र नार्यस्तु पूज्यन्ते तत्र तिष्ठंति देवताः "

ह्मणून नेहमीं तुह्मी आपलें अंतःकरणांत स्वस्त्रियेविषयीं प्रेम बाळगून तिचें मन आनंदीत राखण्याचा प्रयत्न करा; मात्र तिचें फाजिल लाड करूं नका; आणि विशेष स्वातंत्र्यही तीस असूं देऊं नका. ह्मणजे तुमचे परस्परांविषयीं अंतःकरण सानंदित असल्यानें तुमचा संसार सुखाचा होईल. ह्मटलें आहेः—

संतुष्टो भार्यया भर्ता भर्त्रा भार्या तथैवच ।
यस्मिन्नेवकुले नित्यं कल्याणं तत्रवै ध्रुवं ॥१॥

# प्रकरण तिसरें.

## दारिद्र्य.

जोपावेतों मनुष्यमात्रांस दारिद्र्य आहेतोंपावेतों तो गुणी असून निर्गुणी, चतुर असून वेडगळ, विनोदी, कुशल असून पांचट, शास्त्रज्ञ असून मूढ, कवी असून टोणपा इत्यादि दुर्गुणजन्य भासतो व त्याचें श्रीमंतांपुढें यत्किंचित्‌ही तेज पडूं शकत नाहीं. तो धैर्य धरून कोणत्याही कार्यांत आपलें बुद्धिचातुर्य दाखवूं लागल्यास प्रेक्षकांस तें विपरीत भासूं लागतें; त्याचें प्रमाणशीर भाषण अप्रमाण वाटूं लागतें व हरएक गोष्टींत त्याचा चोहोंकडेस उपमर्द होऊं लागून त्याची कोणतीही गोष्ट सिद्धीस जाऊं शकत नाहीं. फार तर काय त्याचे हरएक मनोरथ फुकट जातात. ह्मटलें आहे:—

॥ उत्थाय हृदि लीयंते दरिद्राणां मनोरथाः।
॥ बालवैधव्यदग्धानां कुलस्त्रीणां कुचाविव ॥१॥

यास्तव दारिद्र्यानें जोंपावेतों मनुष्यास ग्रासिलें आहे तोंपावेतों कोणीही जनसमूहास उक्त वाटत असलेला मार्ग बदलण्याची किंवा स्वमत प्रशस्त असतांही तें लोकापुढें मांडण्याची खटपट करूं नये ! कारण तसें केलें असतां आपला उपमर्द होऊन आपली स्थिति ज्यास्त बिघडेल.

# प्रकरण चौथें.

## दैवगति.

प्रत्येक मनुष्यमात्रांस असें वाटत असतें कीं, मी उद्योगाच्या बळावर आणि ज्ञानशक्तीच्या साह्यानें आपली स्थिति पाहिजे तितकी सुधरून घेईन; पण जों पावेतों दैवगति विपरीत आहे तोंपावेतों तो विचार सिद्ध होणें कठिण पडतें; आणि दैवगति सुलट झाली किंवा दैव प्रातिकूळ असतें तें अनुकूळ झालें ह्मणजे इ-च्छित मनोरथ अनायासेंकरूनही सिद्ध होतात ! ! दैव प्रतिकूळ असतां आपण आपलें वर्तन देशकालांस अनुसरून ठेविलें, कुमार्गावलबंनपर होण्याचें वर्जिलें, शत्रुत्वाची वाट मोडून टाकिली, स्वइष्टहेतुसाधनीं त-त्पर बनलों तरीही आपली कांहीं दाद लागावयाची नाहीं ! ! जसे वसंतकाळ प्राप्तिवांचून कोकिळेचा मंजु-ळ रव ऐकण्याचा कोणास आठव येत नाहीं. तसें दैव अनुकूळ झाल्यावांचून आपल्या चांगल्याही गु-णांकडे पाहण्यास कोणास आठव येत नाहीं. आणि वसंतकाळ येई पावेतों जशा कोकिळा अन्य प्रदेशीं अर्थात् गुप्तपणानें आपला काळ क्रमितात तशा प्रकारें मनुष्यानें आपणास आपलें दैव अनुकूळ होईपर्यंत मौन्य धारण करून लोकांत असावें त्यावांचून गत्यं-

तरच नाहीं ! ! ! ( म्हटलें आहे:-- ' यावद्भाग्य महोदयो नहिभवेत्तावन्निरर्था गुणाः, विद्यावेदविनोदशास्त्रकविताचातुर्यशूरादयः । भाग्ये तिष्ठति निर्गुणोपि गुणिनामग्रेसरो जायते, मान्याः सर्वगुणा गुणाग्राणि भवेद्भाग्याय तस्मै नमः ॥ १ ॥ आणि दैव अनुकूळ झालें ह्मणजे निर्गुणी मनुष्यही गुणी जनांत श्रेष्ठ होऊन बसतो आणि दैवानुकूलकाळीं स्वांगीचे गुण प्रेक्षकांस आपोआप दिसूं लागतात ! ! म्हटलें आहे:--

काकः कृष्णः पिकः कृष्णः को भेदः पिककाकयोः ॥ वसंतकाले संप्राप्ते काकः काकः पिकः पिकः ॥ १ ॥

दैवगति विपरीत असली ह्मणजे हरएक गोष्टींत आपणास सुयश मिळवयाचें नाहीं आणि नसतीं हजारों विघ्नें उत्पन्न व्हावयाचीं; परंतु ह्याच वेळीं मनुष्यांनीं मोठें धैर्य धरून आपलें स्वकर्तव्य बजाविण्यास तत्पर असावें. कारण दैवगति विपरीत असल्यावेळीं जीं आपणास संकटें प्राप्त होत असतात तींच दैवाकुलनुकालीं सुकीर्ति किंवा यशप्राप्तीस कारणीभूत होतात. दैवगति विपरीत असतांना एखादें कृत्य ज्या दिशेनें करायला हवें असतें त्या दिशेची भूल पडून आपण भिन्न दिशेप्रत गेल्यानें विपरीत किंवा उलट स्थळीं जाऊन पोंचतों आणि तें आपणास संकटा प्रमाणें भासतें व ह्या संकटास जो जुमानीत नाहीं,

-रणारासच न होतां सर्व सुशिक्षित लोकांस व्हावा ह्मणून ती होईल तितक्या सुलभ भाषेंत देण्याचा विचार आहे. वर्षाची आगाऊ वर्गणी ट० हं० सह ३ रुपये आहे. पत्ता--भिषग्विलास कर्ते-सोलापुर -मंगळवार पेठ- १--३

---

त्वरा करून वर्गणी भराच !! फार स्वस्त उपयुक्त !!!

मासिक **भारतमित्र** पुस्तक.

हें सप्टेंबर सन १८९२ पासून निघेल. ह्यांत वर्तमानसार भरपूर, पत्रव्यवहार, पुस्तकपरीक्षण निबंध, कविता, चमत्कारिक चुटके, गोष्टी, सुभाषितें वगैरे ठोकळ ठोकळ विषय येतील. साचा बालबोध वर्गणी ट० हं० सह मुदतींत आगाऊ ( ता. १५ सप्टेंबर सन १८९२ ) ९ आणे पुढें १, आणे खामि. चे वर्गणीदारांस ह्या मुदतींत ७ आणे पडतील. शिवाय त्यांना ( फक्त भारतमित्र घेणारास सत्यव्रत हेंही ३ आणे ट० ख० त फुकट मिळेल. जाहिरात २१ अक्षरांच्या दरओळीस १॥ आणा प्रमाणें घेऊं. वर्षभर ठेवल्यास दर ओळीस दर खेपेस ९ पै प्रमाणें चार्ज बसून भारतमित्र ३ आणे टपालखर्चे दिल्यास फुकट ! !

पहिल्या अंकांत फुटकळ विषय शिवाय करून लकालूट अर्थात वानरी राज्याची तऱ्हा ही एक कादंबरी देण्यास सुरवात होऊन तिचा पूर्वार्ध १ वर्षांत पुरा केला जाईल. अवश्य वाचाच. उमज पडेल.

---

फुकट ! फुकट ! ! फुकट ! ! !

मासिक सत्यव्रत पत्रक.

हें मासिकपत्रक तरुणांच्या मनोरंजनार्थच अवतार घेणार. परंतु वर्तमानपत्रांतल्याप्रमाणें सतरा प्रकारच्या उठाठेवी करण्यास कधींही विसरणार नाहीं. प्रथम अंकीं मोठा कोण ? ही गोष्ट वक्रुणानुबंध प्रहसन आणि घटकाभर करमणूक अर्थात् पांचालपंचविसी ही प्रासंगीक भाषणावली सुरू होणार. ता० १५ सप्टेंबर पावेतों ३ आणे टपाल खर्च भरणारास हें फुकट ! ! पुढें ६ आणे पडतील ता० १५ आगष्टपर्यंत खानदेशमित्राची वर्गणी दिल्यास हें फुकट ! ! ( हांशील नको )

पत्ता—खानदेशमित्रकर्ते मु० प्रकाशें (खानदेश).

---

भारी अजब दवा.

सर्व नेत्ररोगांवर रामबाण.

आज सतत ५ वर्षें खपत आहे.

हिंदुस्थानांतील अनेक ठिकाणच्या लोकांस गुण आल्याचीं पुष्कळ सरटीफिकीटें आहेत. तुम्हांस अनुभव न आल्यास पैसे परत. एकवार घ्या, आणि आपली अमोल दृष्टि तरुणाप्रमाणें तीव्र करून घ्या. एका बाटलीची किंमत १० आणे व्ही० पी० नें १ रुपया.

पत्ता—गणपत सखाराम पाटील नवी पेठ अहंमदनगर.

---

मासिक मुलांचा खाऊ पुस्तक.

हें मा० पु० १८९२ च्या आगष्ट महिन्यापासून

सुरू होणार. हा खाऊ मुलांस मानसिक आरोग्य देऊन त्यांची मानसिक शक्ति वाढविणारा आहे, अर्थात् प्रत्येक मुलाच्या पालकानें हा मधुर खाऊ आपल्या मुलास प्रेमानें द्यावा. हा खाऊ मुलांस पचेल अशा सोप्या शब्दांनीं काळजीपूर्वक बनविला जाईल. ह्यांत दुर्वासनेचा यत्किचित् अणुरेणूही न जाऊं देण्याची खबरदारी ठेविली आहे. वर्षास वर्गणी ट० सह ७ आणे. मुदतींत वर्गणी देणारास ६ आणे किंमतीचें बूक इनाम देऊं. १ आणा टपालखर्च पाठवा.

पत्ता—छ० रा० साळुंके मु० अहंमदनगर.

---

## पुन्हां सुरू झाला.

दुसऱ्या वर्षापासून किंमत कमी केली आहे.

खोट्याचा द्वेष्टा असून नेहमीं चाबूक चमकाविणारा ! व प्रतिमासास न चुकतां भेट देणारा ! !

थोडक्यांत नांवाजलेलें) **खरा प्रकार** (सचित्र मासिक पुस्तक.

याचें नांव बहुतेक लोकांस ठाऊक झालेंच आहे. आपल्या नांवाप्रमाणें कृति करण्यास केव्हांही मागें सरणार नाहीं. विषय सर्व प्रकारचे; पण नांवाला अनुसरून असतात. असा याचा महिमा आहे, अनेक सज्जनांचे अनुकूळ अभिप्राय आहेत. आश्रय देण्याची इच्छा असल्यास मागवून एक वेळ वाचून तर पहा ! नच पसंत पडल्यास बंद करा ! ! पहिल्या वर्षाचे सर्व अंक मिळतील. नमुन्याला अंक मात्र मिळणार नाहीं. वर्गणी आगाऊच आली पाहिजे. प-

हिल्या वर्षाचे १२ अंकास ट०सह १ रु. १० आ-
दुसऱ्या वर्षाची वर्गणी ट० सह १ रु० ८२ लायब्र-
रीस पहिल्या वर्षाचे सर्व अंक ट० सह १ रु० २
आ० व दुसऱ्या वर्षाची वर्गणी १ रु० ३ आ० प-
डल. प्रत्यंकीं एक प्रेक्षणीय चित्र असतें. वर्गणी
आगाऊ भरणारास सालअखेरीला 'वार्षिक भेट' म्ह-
णून मिळते.

पत्ता--व्ही० एन्० भाव्ये म्यानेजर. खरा प्र-
कार कावसजी पटेल ट्याकरोड—मुंबई

---

## खानदेशमित्र.

हें मा० पु० मार्च १८९२ पासून सुरू केलें आहे.
ह्यांत नाटकें, कादंबऱ्या, चातुर्याच्या गोष्टी, अद्भुत
कथा, शूर पुरुषांचीं व देवादिकांचीं चरित्रें, स्थलवर्ण-
नें, लोकोत्तर चमत्कार, विनोदपर चुटके, कूटप्रश्नोत्तरें,
सार्थसुभाषितें, नूतन कविता, सुबोधकथा, सुबोध व-
चनसंग्रह, संस्कृत सुंदर सार्थ उतारे, ऐतिहासिक
माहिती, देशी औषधी, पुस्तकपरीक्षणें, पत्रव्यवहार,
वर्तमानसार इ० इ० इ० अनेक विषय येतात. सा-
लीना वर्गणी ट० हं० सह १८२ विशेष सूचना—
३ ऱ्या अंकापासून कूटप्रश्न घालण्यास सुरुवात केली
आहे.व त्यांची बरोबर उत्तरें देणारांचीं नांवें या पुस्तकांत
छापून प्रसिद्ध होतील आणि पहिल्या नंबरच्या मनु-
ष्यास सवा रुपयाचें १ बुक बक्षीस मिळत जाईल !!
पहा बोवा वर्गणीदार व्हाल तर सर्वच फायदा आहे !

पत्ता--खानदेशमित्रकर्ते मु० प्रकाशें. (खानदेश)

# खानदेशमित्र.

॥ श्लोक ॥ (वसंततिलका.)

कस्यापि कोप्यतिशयोऽस्ति स तेन लोके
ख्यातिं प्रयाति नहि सर्व विदस्तु सर्वे ॥
किं केतकी फलति किं पनसः सपुष्पः
किं नागवल्ल्यपिच पुष्पफलैरुपेता ॥ १ ॥

यज्जीव्यते क्षणमपि प्रथितं मनुष्यैर्विज्ञानविक्रमयशोभिरभज्यमानं ॥ तन्नामजीवितमिह प्रवदन्ति तज्ज्ञाः काकोपि जीवति चिराय बलिंच भुंक्ते ॥२॥

पुस्तक १ लें. फेब्रुवारी. १८९३ अंक ४ था.

अनुक्रमणिका.


| विषय. | | पृष्ठ. |
|---|---|---|
| १ | आश्रयदात्यांस प्रार्थना.... .... .... | १–४ |
| २ | रंजन आणि सुबोध ............ | ११–१४ |
| ३ | विश्रांतिमंदीर.... ............ | १३–२० |
| ४ | सुगृहिणीस्वकर्तव्य... ............ | ५–१२ |


बेळगांव येथें 'बेळगांवसमाचार' छा० छापिलें.

वर्गणीचे दर.

वर्षाचे अगाऊ ट. ह. सह..... ....१८३

फुटकळ अंकास किंमत ८३

प्रकाशक–ह० स० खानोलकर आणि मंडळी.
पोष्ट खानापूर. (जि. बेळगांव.)

## उत्तम सोय.

या आमच्या जिल्ह्यांत ( चोळ ) खण उत्तम तयार होतात. नागपुरी मालपेक्षां हे सुबक व टिकाऊ असून स्वस्त आहेत, हें सर्वत्र सुप्रसिद्ध आहेच. एका खणाची लांबी १९ इंच असते. प्रत्येक रेशमी खणाची किं० ८३ आण्या पासून १॥।' रुपयां पर्यंत असते. आह्मीं व्यापाऱ्यांस व गिऱ्हाईकांस लागेल तेवढा माल पाठविण्याची सोय केली आहे. ज्या गांवास रेलवे स्टेशनची सोय आहे तेथील व्यापाऱ्यांनीं अथवा गिऱ्हाईकांनीं थोडथोडा माल मागवून अनुभव घ्यावा. एकदां येथून माल मागविल्यास हाच माल सोईवार व चांगला आहे असें वाटून पुनः येथूनच मागवावा, असें वाटल्या वांचून रहाणार नाहीं, अशी आमची खात्री आहे आगाऊ मनिआर्डर पाठवून किंवा रेलवे व्ही. पी. नें माल मागवावा.

**पत्ता**—खानोलकर आणि मंडळी. पोष्ट **खानापूर.**

( जि. बेळगांव. )

## खानदेश मित्राचे आश्रय दात्यांस बक्षीस

जे आश्रय दाते मित्राची वर्गणी ता १ मार्च १८९३ चे आंत पाठवितील, अगर मार्च महिन्याचा ९ वा अंक व्ही. पी. नें पाठविण्या विषयीं लिहीतील त्यांस '**व्यवहार मंजरी** अथवा **उपयुक्त ज्ञानसंग्रह**' हें २९३ विषयांनीं भरलेलें २९६ पृष्टांचें **बाराआणे** किमतीचें पुस्तक बक्षिस पाठविलें जाईल. बुकाबद्दल १ आणा टपाल खर्च निराळा पडेल. ही संधी मित्राचे आश्रयदाते दवडणार नाहींत अशी उमेद आहे.

**पत्ता**—हरी सखाराम खानोलकर पोष्ट **खानापूर.**

( जि. बेळगांव. )

# मित्र खानापूरांत निघूं लागला.

## आश्रयदात्यांस प्रार्थना.

मार्च १८९२ पासून खानदेशमित्र या जगती तलावर अवतीर्ण होऊन रसिकजन सेवा करूं लागला. त्यानें गेल्या तीन अंकद्वारें देशसेवा कोणकोणत्या प्रकारें करणार वगैरे भरपूर अश्वासनें वाचकांस दिलीं. परंतु त्या प्रमाणें त्याजकडून पुरते सहा महिनेही स्वकर्तव्य बजाविलें गेलें नाहीं. आणि जून ते जानेवारी अखेर आठ महिन्यांत तर तो अगदींच गुप्त झाला हें पाहून आश्रयदात्यांच्या मनांत नानातर्क उत्पन्न होऊन त्यांनीं त्याच्या बेइमानपणाचा हलकल्लोळ केला. त्यांत आश्रयदात्यांचा कांहीं दोष नाहीं. परंतु मित्रास आपल्या वचना प्रमाणें कां वागतां आलें नाहीं ह्याची खरीं खरीं कारणें जर त्यांस कळविलीं तर ते या मित्रासही विशेष दोष देणार नाहींत असें मला वाटतें. ह्मणून प्रथम तीं कारणें येथें सादर करितों.

सांप्रत वर्तमानपत्र किंवा मासिकपुस्तक चालविणें हें फार कठीण झालें आहे. कारण या पत्रापुस्तकांचा नियमितपणा राखणें हें त्यांच्या चालकाचें आद्य कर्तव्य होय. आणि तो नियमितपणा स्वतःचा छापखाना असला किंवा थैलीचें सदैव तोंड मोकळें असलें तरच राहतो. नसल्यास मग कांहीं जुळत नाहीं. यास्तव या दोन्हीं गोष्टीं पैकीं एकीची तरी ज्यास अनुकूलता असेल त्यानेंच या कामास हात घालावा, हें उघड झालें. परंतु ह्या दोहों पैकीं एकाही गोष्टीची

साह्यता नसली आणि एखाद्यास देशसेवा घडावीच अशी इच्छा असेल तर मग कसें ? असा सहजींच प्रश्न येतो व त्याचें मुळमुळीतसें उत्तर असें कीं त्यानें–प्रकाशनचें काम दुसऱ्याचे हवालीं करून–आपली इच्छा पूर्णकरून घ्यावी, असें देणें भाग पडतें. आह्मांस वरील दोनीही गोष्टींचा अभावच होता व आह्मी तिसऱ्या उपायांनीं आपली इच्छा पूर्णकरून घ्यावयाची होती ही गोष्ट खरी; परंतु विचारपूर्वक पाहिलें असतां कोणतीही गोष्ट सिद्ध होण्यास मध्यंतरी अनेक संकटें येतातच आणि अनेक प्रकारच्या खस्ता खाव्या लागतात.

मित्राचे १।२ अंक अंमळ वेळेवर वाचकांचे हातीं गेले असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं व त्यामुळें आह्मांस आमच्या उद्देशानुरूप अर्धसहस्रा जवळ जवळ आश्रयही मिळाला पण तिसरा अंक प्रसिद्ध होण्यास अतिशय फाजील वेळ लागला. असें होण्याचीं कारणें दोन झालीं. एक वर्गणीदारांकडून वेळेवर वर्गणी पाठविण्याची कृपा व्हावी ती झाली नाहीं, आणि दुसरें छापखान्यांत दुसरीं मोठीं कामें (जास्त उत्पन्नाचीं) चालू असल्या मुळें त्यांनीं वेळेवर अंक तयार करून दिले नाहींत.

तिसरा अंक निघण्यास फाजील वेळ लागला तेव्हां अर्थातच पुस्तक अनियमित आहे असा ग्राहकांस संशय आला व तेणेंकरून त्या अंकाच्या भेटी नंतर एकही आश्रयदात्यास वर्गणी भरण्यास धीर झाला नाहीं. आणि इकडील व्यवसाय परावलंबनाह असल्यामुळें चौथा अंक काढण्याचा उपाय खुंटला. ग्राहकांस त्रास न व्हावा, आपली पत कमी होऊं नये, ही खरोखर

इच्छा असतांही कांहीं उपाय चालला नाहीं. तिसरा अंक पोंचल्याला दोन महिन्यावर दिवस झाले तरी ४ था अंक येत नाहीं हें पाहून पुस्तकाच्या अचिरायुत्वा बद्दलची ग्राहकांची पूर्वीची कल्पना जास्त दृढ झाली आणि चोहोंकडे मित्राचा उपहास होऊं लागला. ज्यांनीं वर्गणी पाठविली होती त्यांचे कडून हवी तशा प्रकारची वाक्पुष्पांनली मिळण्यास आरंभ झाला. कित्येकांनीं तरी आमची बरीच शोभा केली ! अस्तु त्यास उपाय नाहीं. पुढें प्रकाशनचें काम कोणीं घेतल्यास द्यावें असा अमचा ठाम बेत होऊन आह्मीं जिकडेतिकडे त्या गोष्टीचा शोध करूं लागलों परंतु बरेच दिवस पर्यंत तसा योग आला नाहीं. आणि शेवटीं प्रभुसत्ता विचित्र आहेत या ह्मणीचा निजध्यास लागून आमचे हातपाय गळाले. व तशा स्थितींत मेघराजाची करुणा भाकणाऱ्या तृषार्त चातकास जसे आकंठ जलपान; किंवा मरणोन्मुख जाहलेल्या रोग्यास अकस्मित संजीवनि प्राप्त झाल्यानें जसा आनंद व धन्यता वाटावयाचा संभव असतो तसें आह्मास संकटकळीं रा. रा. हरी सखाराम खानोलकर आणि मंडळी ह्यानीं साह्य दिल्यामुळें आनंद व धन्यता वाटली. व ह्या कृत्याबद्दल आम्ही त्यांचे फार आभारी आहों.

जून महिन्यापासून फेब्रुवारी पर्यंत एकंदर आठ अंक मागसले आहेत ते पूर्ण करून देऊन पुढें पुस्तक नियमित चालवावें हें खरें परंतु तसें करणें बरेंच गैर सोईचें होऊं लागल्या मुळें व कित्येक हितचिंतक सूज्ञ गृहस्थांच्या सूचने वरून आज फक्त ४ था अंकच

काढिला आहे व तो फेब्रुवारीचा होय फेब्रुवारीचा चौथा अंक निघाला यास्तव पूर्वी प्रसिद्ध झालेले मार्च एप्रिल आणि मेचे अंक—नवंबर डिसेंबर व ज्यानेवारीचे समजण्या करितां त्या पूर्वीच्या अंकावर आश्रय दात्यांनीं दुरस्ती करून ध्यावी व पुस्तकाचा वर्षारंभ नवंबर सन १८९२ समजून अकटोबर १८९३ अखेर वर्ष पुरें करून हिशेब ठेवावा अशी विनय प्रार्थना आहे.

वरील अपरिहार्य कारणांमुळें आमच्या आश्रयदात्यांस फार तसदी झाली आहे करितां त्याबद्दल एकवार सदयांतःकरणानें आम्हास माफी करून पूर्ववत् प्रेमानें वागवितील अशी आशा करितों. गत गोष्टीबद्दल शोक करण्यांत कांहींच अर्थ नाहीं. रा. रा. खानोलकर आणि मंडळी व लेखक हे उभयतां स्वकर्तव्यदक्ष असल्यामुळें आतां पुस्तकाच्या अचिरायुत्वाबद्दल आमच्या आश्रयदात्यांस काळजी वाहणे नको. ह्यांत किति सत्यांश आहे हें आज पासून पुढें निघणाऱ्या अंकाच्या नियमितपणा वरून सहजच ध्यानीं येईल. यास्तव आमचे जुने व नवे आश्रयदाते या गोष्टीचा शांतपणें विचार करून यास हस्तें परहस्तें उदार आश्रय देतील अशी पूर्ण आशा आहे. ती जगदीश पूर्ण करो अशी त्यांस प्रार्थना आहे.

**विशेष सूचना**— ज्या कोणाचे पत्ते बदलले असतील त्यांनीं मेहेरबानगी करून तसें अवश्य कळवावें ह्मणजे पुढचे अंक बिनधोक पोंचतील.

मुक्काम—प्रकाशें.<br>
ता. १९।१।९३ } एडिटर खानदेशमित्र.

तोंच पुढें तें संकट उपदेशस्थानीं असल्याचें अनुभवितों शिवाय कोणतेंही कृत्य अचूक साधण्यास त्या कृत्यासंबंधीं पूर्ण माहिती असावी लागते व ती माहिती अनुभवजन्य ज्ञानावांचून पूर्णपणें जाणली जात नाहीं. ह्मणून आपण एखादें कृत्य करीत असतांना चुकलों व तेणेंकरून लोकांत आपला उपहास होऊं लागला तर आपण स्वकार्यीं पराङ्मुखता न धरतां स्वकर्तव्य चुकी सुधारून घेण्यास झटावें. दुसऱ्याचें न्यून पाहून त्याला हंसावें हा स्वभाव बहुधा हलक्या मनाच्या लोकांचा असतो. जे पूर्णज्ञानी आहेत ते स्वानुभव सिद्ध ज्ञानावरून त्या चुकीचें कारण व प्रमाण आपल्या मनांत वागवून शांतपणानें ती दुरुस्त करण्यास अक्षय तत्पर असतात. कारण त्यांस त्या मार्गांत येणाऱ्या संकटांची जाण असते. गर्भवतीचे डोहळे व प्रसूतीकाळचें सुखदुःख तीस माहित असावयाचेंच! वांझेस त्याचें काय ज्ञान?

---

# प्रकरण ५ वें.

## चिंता.

मनुष्यास, चिंता ही मोठी जबरदस्त शरीराकर्षक जळूच अक्षय चिकटलेली असते. जळू रोगग्रस्ताच्या

शरिरांतील नासकें व निरुपयोगी रक्तादि पदार्थ शोषून तो भाग जसा शुष्क करते तद्वत मनुष्याचे शरिरांतील उपयुक्त रक्तादिक भाग चिंता ही शोषते. जळूचें शोषण त्या मनुष्यास जसें फारशें कळत नाहीं तसें चितेचें शोषणही कळत नाहीं. पण जळूनें शोषून घेतलेल्या भागीं जेव्हां शुष्कपणा दृष्टीस पडतो तेव्हां तिनें आंतील निरुपयोगी सर्व रक्तादिक शोषून घेतल्याची जाण होते त्याच प्रमाणें मनुष्याच्या शरिरांतील उपयुक्त रक्तादि भाग शोषला जाऊन त्याच्या शरिरावर शुष्कता व मुखावर म्लानता आली ह्मणजे चितेचें स्वरूप व तिचें कर्तव्य तिनें बजाविल्याचें व्यक्त होतें. राव असो कीं रंक असो पण चिंता ही ह्मणून सर्वांचे पाठीमागें आहेच. गरिबास आपल्या पोटास भाकर कशी मिळेल, आपल्या मुलाबाळांस हौसेचे जिन्नस घेऊन देण्या पुरतें आपणाला सामर्थ्य केव्हां येईल, ही चिंता अक्षय असते. श्रीमंतास आपली स्थिती आहे त्यापेक्षां जास्त सुधारण्याची हांव सुटून तो दुसऱ्याचा घात पात करण्याचे आपले कपटजाल दुसऱ्यास न उमगावें या चिंतेंत असतो. रजास प्रथम आपलें जीवित्वाबद्दल शाश्वति वाटत नसल्यामुळें त्यास मोठी चिंता असते. कारण कोणत्यावेळीं कोण शूर उत्पन्न होऊन आपलें तनधन हरण करील हें माहित नसतें; दुसरी स्त्रीवर्गांत काहीं काळें बेरें आहे कीं काय ह्मणून नेहमीं विचारपूस व चौकशी करीत रहावें लागतें. तिसरी नवीन राज्य मिळविण्याची चौथी पोटीं संतान नसल्यास त्याबद्दल सारांश, ज्याचे

त्याचे योग्यतेनुरूप ज्यास त्यास काळजी असतेच. आणि त्या काळजीमुळे मनुष्यास आपले मानसिक विचार कांहीं दाबून राखितां येतात; कांहीं प्रसिद्ध करितां येतात; परधन किंवा परस्त्री अभिलाष करणारास प्रसंगीं जिवाचीही आहुती द्यावी लागते. हें पाहून त्यामार्गांत मन इतस्ततः संचार करण्यास मोकळें ठेवण्यास सांपडतनाहा; किंवा समुद्राच्या तळीं, भयकर अरण्यांत व अशाच अनेक बिकटस्थलीं एखादी वस्तु असून ती प्राप्त करून घेणें पाप नाहीं, अशा वेळीं हु रुपानें काम करण्यास चिंता ही परिचारिका होते. मनुष्यास चिंताही प्रमाणशिर असल्यानें हितकारक व अतिशय असल्यानें हानिकारक आहे. जसें अफू वगैरे मादक पदार्थ मूळचे वाईट असतांही रोगादिक असतां प्रमाणशीर सेवन केल्यानें हितावह होतात, आणि प्रमाणा बाहेर सेवन केल्यानें घातक होतात. मूळींच चिंता नसणें हेंही ठीक नाहीं. कारण कोणतेंही कृत्य तडीस नेण्याची काळजी उपली तर तें केव्हांही सिद्ध व्हावयाचें नाहीं. आणि तें करवून घेण्यास चिंते प्रमाण दुसरें कोणीही समर्थ नाहीं. चिंता अथवा काळजी असली तरच हरएक कृत्य करण्यास उमेद अथवा उत्साह प्राप्त होईल. पण ती आपल्या, शक्ति बाहेरच्या कृत्या विषयीं असतां उपयोगी नाहीं. गरिबास पोटभर भाकर व अंगाला जाडें भरडें वस्त्र मिळविण्याची चिंता असली तर तो तें मिळवूं शकेल परंतु श्रीमंतीचे बेत मनांत आणून जर तो चिंता करील तर तो खास फसेल. याच प्रमाणें श्रीमंत व राजे ह्यांची

गोष्ट आहे. परमेश्वरानें मनुष्यास सर्वसंपन्न केलें असतें तर तो निरुत्साह अजगर बनून त्यास देखील विसरला असता. एवढ्या करितांच मदोन्मत्त झालेल्या हत्तीस ताळ्यावर आणण्यास जसा अंकूश तसा मनुष्यमात्राच्या मागें; चिंतारूप अंकूश धरिला आहे. व तो खरोखरच वेळेवर ( मोठ्या प्रसंगीं ) त्यांस मदांधपणांतून सावध करितो. हत्तीला ताळ्यावर आणण्याचा अंकूश परक्याचे स्वाधीन असतो व मनुष्याचा त्याच्या जवळ उपजतच योजिला असतो. यावरून चिंता ही आपले बरें व प्रसंगीं वाईट करण्यास समर्थ अशी अजब वस्तु परमेश्वरानें उत्पन्नकेली आहे असें ह्मणावें लागतें.

वरील प्रमाणावरून मनुष्यास चिंताही प्रमाणशीर ( बेताची ) असावी, फाजील असूंनये, असें कोणासही वाटेल. फाजील चिंताअसल्यानें मूळचें कार्य सिद्ध होणें तर दुरच. पण तिच्या योगानें शरिरांतील उत्साह कमी होऊन सुस्ततेंत सर्वस्वी लय होतो. यास्तव मनुष्यानें आपणास परमेश्वर सत्तेनें जेवढी शारिरिक व मानासिक शक्ति प्राप्त असेल तेवढीच एखाद्या कार्या विषयीं चिंता बाळगावी. अर्थात शक्तिनुरूपच कोणतेंही कार्य हातीं घ्यावें, व तिच्याच धोरणानें आपली स्थिति सुधारण्याचा प्रयत्न करावा. हें प्रमाण चुकलें असतां " चिंता समंनास्ति शरीर शोषणं " हें वाक्य सत्य असल्याचा अनुभव पहावा लागेल आणि ही चिंतारूप जळू एकवार चिकटली कीं, मग शरिराचादेखील दिवसेंदिवस ऱ्हास होत

शास्त्रांवर संभाषणास आरंभ करणें (८) बाविसावी घडी बदलतांच गायन वादनादिकांस आरंभ करणें (९) पंचविसावी घटिका संपतांच बुद्धिबळ, सोंगट्यादि खेळांस प्रारंभ करणें (१०) अठ्ठाविसावी घटिका संपलीकीं, पोषाक वगैरे चढवून वाटेल त्या दिवशीं बाह्यप्रदेशीं आणि कधीं कधीं आपल्या विस्तीर्ण उद्यानांत हवा खाण्यास जाणें (११) एकतिसावी घटिका लागतांच परत येऊन उद्यान मध्यस्थित असलेल्या श्री बालमुकुंदाचें दर्शन घेऊन मंदिरीं प्रवेश करणें (१२) आणि मध्यंतरीं एक घडी विसावा घेऊन सूचना येतांच भोजनास उठणें (१३) रात्रीच्या चार घटिका लोटतांच परत बैठकीच्या जागीं येऊन तांबुलादि भक्षण करणें (१४) पांचव्या घटिकेच्या आरंभापासून आठवी घडी संपे पावेतों मनोरंजक ग्रंथाचें वाचन, नवीन गायन वादनविद्येचा अभ्यास करणें (१५) नववी घटिका लागतांच शय्यामंदिरीं प्रवेश करणें व दहाव्या घडीचा प्रवेश होई पर्यंत ईशस्तवन करून उदईक कोणकोणतीं नवीन कृत्यें करावयाचीं याचा विचार करणें आणि नंतर निद्रिस्त होणें (१६) दुसरे दिवशीं अरुणोदय होण्या पूर्वीं अर्ध घटिका जागृत होऊन प्रातःस्मरण, नवीन उद्योगाविषयीं कृत निश्चय करणें, येणे प्रमाणें त्यानें आपल्या दर एक दिवसाचा नियम बांधून त्या प्रमाणें वागण्याचा क्रम ठेविला होता. शिवाय दर आठवड्यास सवड करून तो सायंकाळच्या सुमारास हवा वगैरे खाण्यास निघाला असतां शेवटीं शहरांत प्रवेश करून नगरस्थितदेवांचें दर्शन घेत घेत

व शहरची नानाविध चमत्कृति पहात पहात गोरगरि-बांस धर्म करून त्यानीं दिलेले आशिर्वाद ग्रहण करीत करीत राजवाड्यांत येई व प्रथम श्री विघ्नहराचें व त्यामागून कुलगुरू, मातापितरांचें दर्शन व कामगार लोकाचे मुजरे घेऊन आपल्या स्वतःच्या दिवाणखा-न्यांत येई. नंतर भोजन वगैरे आटपून मातापितरां च्या मंदिरीं प्रवेश करून त्यांजशीं चार घटिका आ नंदांत गोष्टी बोलत बसे. व शेवटीं नियामित वेळीं ( विशेष प्रसंग नसतां ) निद्रा करावयाला जाई आणि त्या दिवशीं मुकुंदमाधव व चंद्रकांत हेही आपआपल्या घरीं जात असत.

अशा रीतीनें तो राजपुत्र मोठ्या आनंदांत आपला काल क्रमीत असतां त्याची ठरीव मुदत संपली आणि त्यावरही कांहीं महिने लोटून गेले होते त्या सुमारास त्यास एक विसावें वर्ष लागलें होतें **इंदु शेखराचा** वृद्धापकाळ झाला होता व पुत्र राज्यकार-भार वाहण्यासरखा आहे ह्मणून त्यास राज्यपदारूढ करून आपण विश्रांति घ्यावी असें त्यास वाटूं लाग-ल्यामुळें प्रसंगोपात त्या गोष्टीही निघत होत्या. अश सुमारास एके दिवशीं तिसरे प्रहरीं तो राजपुत्र आप-ल्या **विश्रांतिमंदिरीं** मित्र **चंद्रकांत व मुकुंदमाधव** यांसह बसला असतां त्या मित्रवर्गाचा खालीं लिहि ल्या प्रमाणें संवाद झाला.

**मदन०**— [ मुकुंदमाधव आदले दिवशीं शहरां त गेला असल्यामुळें ते दिवशीं त्यास नेहमी पेक्षां जास्त वेळ लागला होता. ] कां मुकुंदमाधवा,

आज आपली स्वारी फारच लौकर आली? नित्याच्या कर्तव्या पेक्षां आज कांहीं जास्त एखादें कर्तव्य व्हाव याचें होतें काय? मला येऊन सुमारें एक प्रहर हो त आला तरी देखील तूं येऊं नयेस काय? घरची कांहीं××× आडकाठी झाली होती कीं काय? पण कोण लोभ हा तिकडचा! शिमाच झाली बोवा!!

**मुकुं०**—रावसाहेब, नेहमींच थट्टा काय करावयाची? आपल्या बोलण्याचा मतलब मी सारा समजलों, तत्राप आपण कांहीं धावगें ह्मटलें नाहीं; कारण ती गोष्ट स्वा नुभव सिद्धच असावयाची!! मात्र माझा तसा प्रकार बिलकूल नाहींहो! व सांप्रत तर तिकडची आडकाठी होण्याचें कारण नाहीं! उशीर लागण्याचें खरें का रण काय ह्मणाल तर आमच्या पेढीवरील मुनीम **गोकुळदास** हे आपल्या कांहीं खासगी कामा निमित्य आनच बाहेर गांवीं गेले आहेत त्यांच्या शिल्लक बाकीचा मेळ **बाबा** (विजयशेटास अनुलक्षून) घेत होतें तों त्यांनां राजाड्यांतलें निमंत्रण आलें ह्मणून मला सांगितल्या वरून मी गोकुळदास ह्याजकडील सर्व कागद पत्रांसह हिशोब समजून घेतला व त्यांनां वाटे स लावून इकडे निघून आलों.

**चंद्र०**—[ मुकुंदमाधवास ] शेटजीला राजवा ड्यांतील पाचारण कशा करितां होतें तें आहे का माहीत?

**मुकुं०**—तें नाहीं मला कांहीं माहीत. फक्त आ ज रावसाहेबांनीं कांहीं खासगी कामा करितां आपल्या खासगत दिवाणखान्यांत सभा भरवण्याचें ठरविलें आहे

व त्या करितां तुह्मांसही पाचारण आहे, असें मीं ऐकिलें आहे.

**चंद्र**—झालें तर मग काय? तें मारें मला तर कळलें आहे. रावसाहेबांनीं आजला जी सभा केली आहे ती स्वतःचा कांहीं इष्ट हेतू सिद्धीस जावा ह्मणून केली.

**मुकुंद०**—ह्यांत तूं अधिक तें काय सांगीतलेंस? मला कळलें आहे तें काय?

**मदन०**— [ मध्येंच ] असूंद्या तें हो. पण कां रे, **मुकुंदमाधवा**, आतां वहिनी जर तिकडेस गेल्या आहेत तर आपणही केव्हां जाणार?

**मुकुंद०**— [ लाजत—हंसून ] हें काय रावसाहेब आपलें चमत्कारिक विचारणें? दुसऱ्या मनुष्यास संकोचीत करावें हें आपणांस लहानपणा पासूनच प्रिय आहे. बायको माहेरास गेली ह्मणजे लागलेंच आपणही जावें कीं काय?

**मदन०**—एकूण खाशी सोय आहे! माझ्या बोलण्याचा अर्थ असा केलास काय? **मुकुंदमाधवा** भले शाबास! आपल्याच मनांत तें मग दुसऱ्यावर कां झोंकावें? ह्याला ह्मणावें तरी काय? मीं तर आपल्या पूर्व संकेता वरून सहज बोललों. तूंच नेहमीं ह्मणत असतोसना कीं, ह्या साऱ्या भूतलावर त्या **रमणीय व अलौकिक** नगरी प्रमाणें दुसरी नगरीच नाहीं ह्मणून? व तिचें कोणी कुशल लेखकानें केलेलें (**गुलजार रत्नप्रकाश**) बूक एकवार मी वांचलें आहे त्या वरून ती मृत्युलोकचीं प्रत्यक्ष **अमरपुरीच** असावी असा माझा तर्क झालेला आहे. आणि ती एकवार मात्र पहावयाचीच

असा माझा असलेला उद्देश तुला अवगत नाहीं काय?

**मुकुंद०**—बरें तसें कां होईना. पण आतां तरी तिकडे मनापासून चलावयाचें आहे काय? नाहीं तर असे विचार अनेक वेळां झाले आहेत.

**चंद्र०**—[ मध्येंच ] राव, आतां हा विचार आप ला आपणाजवळच ठेवा. 'आज जावयाचें' 'उद्यां तर खचीत जांऊच' अशा विचारांत दोन अडीच वर्षं निघू न गेलीं पण घर सोडून बाहेर पडणें आवडतें कोणा ला? मग उगीच आह्मांला देशांतरावर जाययाचें आहे असा आव तरी घालावा कां? आणि सांप्रत तर **रावसाहेबां नीं** चिरंजिवास **राजपदारूढ** करून तिर्थयात्रादिकांस जावें असा विचार काढला आहे. आज **सभा** या च कामाकरितां केली आहे. यावरून आपले मनांतले विचार मनांतच नाहीं कां राहणार?

**मद०**—तुला हें सारें माहीत आहे तर, मग इत कावेळ बोललास कां नाहीसरे? मोठा आंतल्या गांठी-चा आहेस गड्या.

**चंद्र०**—मी तर तेव्हांच बोलणार होतों पण **मुकुंदमाधवाचें** बोलणें संपत नाहीं तोंच आपण त्याशीं बोलूं लागला. यामुळें मला गप्प रहावें लागलें. आतां सांगतों आज मी नित्या प्रमाणें इकडे यावयाचें ह्मणून पोषाख वगैरे करीत आहें तोंच **बाबा** घरीं आले आणि मजकडे हांसत असें पाहून मला ह्मणालें कीं, "**चंद्रकांता**, अशा स्वेच्छाचार वृत्तींत काळ घाल विण्याची हौस अजून किति तरी दिवस राहणार? ति-

कडे **रावसाहेबांनीं** तर आपल्या दिवशीं तिथीया त्रेस आपण येथून निघावयाचें असें आज ठरविलें आहे. आणि **मदनविलास** राजपदारूढ होतांच तुलाही **प्रधानकिचीं** वस्त्रें मिळतील. मग कसें होईल? **रावसाहेबांचा** झालेला विचार जर कालांतरीं देखील फिरणें कठीण असें आहे तर मग आपणास पुढें जें कर्तव्य त्याचा आतां पासूनच नकोका विचार करायाला? राज्यभार वाहण्याचें काम फार कठीण आहे अनून त्या विषयीं जर **साधुवृत्ति** धारण केली तर पुढें आह्मीं घरीं नसतां तें कसें निभावून घ्याल हीमोठी फिकीरच आहे. **राजा** होणें बरें पण प्रधानकी खोटी. वेळेवर **पालखींत** बसावयाचें, नाहीं तर **सुळावर** जाण्याची तयारीही. यास्तव आतां हें स्वच्छंदी वर्तन टाकून जर **राज्यभार कारण कौशल्य** संपादन कराल तरच आमचे पश्चात् तुह्मीं मोठ्या दक्षतेनें वागून आजवर **रावसाहेबांनीं** मिळविलेली कीर्ति कायम राखाल नाहीं तर तुमचें मन असें चैनींतच गुंग होऊन राहिलें आहे असें पाहून क्षण न लागतां एकादा **धूर्त** तुमचें **राज्य** आणि **जीवित** हरण करण्यास प्रवृत्त होईल. मग मात्र फजितींत पडाल. राज्यकारणपटुत्व ग्रंथावलोकन व अध्ययन यां पेक्षां सहवासानें अधिक चांगलें येतें व तें असलें ह्मणजे प्रसंगीं मनुष्य आलेल्या विघ्नां पासून आपलें संरक्षण नानाप्रकारें करूं शकतो. राजांनीं या गोष्टीचा विचार केलाच पाहिजे पण निदान **प्रधानाला** तरी केल्या वांचून गति नाहीं! कारण प्रधानानें आपलें काम हुषारीनें चालवून राज्य संरक्षण व प्रजादिकांचें

१४८०९



जीवित कायम राखणें ह्यांतच त्याचें चातुर्य, स्वामीभक्ति इत्यादिगुण दिसून येतात. आणि तें त्याचें कर्तव्य असून असा असेल तरच सर्वत्र प्रिय होतो." वगैरे बऱ्याच गोष्टींचा उपदेश केला. त्यावरून मदनविलासाचे वचनास आतां ते मान देतील असें मला वाटत नाहीं.

मद०—असें जरीआहे तरी कांहीं चिंता करावयास नको. मी पुष्कळ आग्रह केला आणि कदाचित् आईनीं ह्मटलें कीं, ह्याला पाठवाच ह्मणजे आपलें काम होईल. अशी मला खात्री आहे.

चंद्र०—हो असें ही होईल. कारण तुझ्या लग्नाआधीं रावसाहेबाचें काईम असलेले विचार चारचौघांनीं मध्यास्थिकरितांच बदलले आणि तुझा विवाह झाला व त्या मागून आमचेंही नशिबाचा उदय झाला.

मद०—भलेशाबास! कोठलें प्रमाण कोठें!!लग्नाच्या संबधाचे विचार बदलण्याला त्या कामीं सर्वांची सारखी एकी कारण झाली; आणि आतां आपल्या उद्देशानुरूप कोण बोलतो?

मुकुंद—झालें तर आतां, मजकडेस या गोष्टीचा कांहीं जाब राहिला नाहीं बरें? मी या घटकेला तिकडे निघावयास तयार आहे तुह्मीं मात्र परवानगी मिळवा कीं झालें.

मद—हँ, लागलीच लहर आली कीं काय? माझी काळजी तुला करणें नलगे पण ह्या तुझ्या बोलण्यांत तरी या पुढें धरबंद असूंदे. नाहीं तर मी परवानगी

मिळविली आणि तुझा नकार झाला तर एकूण एक च होणार.

**मुकुंद**—हें दोघांचें झालें पण **चंद्रकांतांचा** कसा काय विचार?

**चंद्र०**—मी ही ह्या गोष्टीचा खुलासा करीन मग पुढें पहावें काय होतें तें.

**मद०**—ठीक आज सर्वांनीच याबद्दल आपापल्या घरीं गोष्ट काढून संमति मिळविण्याचा यत्न करावा; मग पाहतां येईल निघण्यासवरण्याचें.

**मुकुंद०**—( मनांत, आतां यांचा पिच्छाच पुरविला पाहिजे ) तें सर्व खरें, परंतु **रावसाहेबांनीं** जावयास परवानगी नच दिली तर पुढें कोणता उपाय?

**मद०**—हात्तेच्या? तसाच **प्रसंग** येईल तेंव्हां ना? वेळेवर सर्व कांहीं **कल्पना** सुचते पण आज पूर्णपणें सांगून ठेवितों कीं जेव्हां **बाबा** नको जाऊं ह्मणून ह्म णतील, **आईचा** सर्व उपाय खुंटेल आणि मग उचित असा कोणताच मार्ग राहणार नाहीं तेव्हां **सुमुहूर्त** दिसला कीं केलेंच तत्काळ प्रयाण. मग त्यांच्या **नकार** त्यांचे जवळ व आपण बाहेर.

**मुकुंद०**—खचित असें होईल काय? दिसेल आतां.

**चंद्र**—भलेराव! **मुकुंदमाधवा**, तुला हें बरें वाटतें काय? अरे, आपण अशा **गुप्तरीतीनें** बाहेर पडलों, तर आपल्या **आईबापांस इष्टमित्रांस** फार वाईट वाटेल, व **आपण** नेहमीं त्यांच्याशीं निष्कपटपणानें वागत असतों तें अशा प्रसंगानें फसविल्या सारखें नाहीं

स्वीकार करून स्वास्थितींत संतोष ठेवावा. ३० गृहसंबंधीं सौख्यांत कांहीं कमी असलें तरी कांहींही कळ काढून कधींही पतीशीं भांडण करूनये. ३१ दुसऱ्याचें सुखाधिक्य पाहून आपण खेद करूनये कारण "दैवानुरूप फलं" दैवानरूपच सर्व फळ मिळत असतें. ३२ पातिव्रत्य हें सर्व मनोनिग्रहावर अवलंबून आहे ह्मणून आपल्या दैवगतीनें स्वतःला जी स्थिति प्राप्त असेल, आणि ज्या पुरुषाशीं आपला जन्मसंबंध जोडला असेल त्याचा वीट मानून किंवा वंचकपणा करून द्रव्यादिकांच्या द्वारें परपुरुषाचा कधींही आश्रय करूनये. ३३ पुरूष क्रोधवश असतां जरी मारूं लागला तरी त्यास जी स्त्री 'हा मरो' असें ह्मणते ती सदैव दुःखांत पडते. ३४ देवब्राह्मणांदिकांची सेवा करणें असल्यास आधीं पतिसेवा करून नंतर पुरसतीच्या वेळीं ती करित असावी; पण तुळस, गोमाता ह्यांची सेवा करण्यास हरकत नाहीं; आणि नित्यशः स्नान केल्यावर ह्या दोहोंची सेवा करून नंतर गृहकृत्यास लागावें. ३५ पति जावत्काळ पावेतों बाहेरगावीं असेल तावत्काळपावेतों ह्या दोहों दैवतांचें भजन आणि पुजन करण्यांतच आसक्त असावें. ३६ पुरूष बाहेरून घरीं येतांच प्रथम त्यांचे पाय धुवावे, व उन्हाळ असल्यास विंझण्यानें वारा घालीत उभें असावें; मध्यंतरीं आनंदजनक भाषणाच्या द्वारें त्याचें मन शांत करण्याचा प्रयत्न करावा. व तो श्रम रहित होऊन संतुष्ट झाला असतां त्रैमूर्तींस आनंद होतो व ते तिचें अभिष्ट चिंतन करतात; आणि सदैव परमेश्वर

तिचें पातिव्रत्य रक्षणार्थ तीस साह्य करितो ! ३७ देवब्राह्मण, महादेव नंदी, उभय विप्र किंवा दोन सुवाशिनी ह्यांमधून जाऊं नये किंवा अग्नी आणूं नये. ३८ वडीलमाणसें बालक भांडीं ह्यांस पाय लावूं नये लागल्यास पश्चात्तापपूर्वक नमन करावें. ३९ नवीन वस्त्र, अलंकार ह्यांचा स्वीकार केला असतां देव व वडील माणसें ह्यांस नमस्कार करावा. ४० भोजनास मंडळी बसली असतां घरच्यांस अमूक व परक्यांस अमूक असे भिन्न पदार्थ वाढूं नयेत. ४१ पतीशीं वंचकपणाकरून आपण चांगलें अन्न भक्षण करूं नये. ४२ लेकी, सुना व शेजारणी स्त्रिया ह्यांस आपलें कुमार्गावलंबनपर वळण न लागेल असें हरएक गोष्टींत आपलें वर्तन ठेवावें. ४३ पतीनें दुसरी स्त्री केली असून त्याचें तिचेठायीं जरी विशेष लक्ष्य असलें तरी आपण तिचा मत्सर न करितां सदैव तीस बहिणी प्रमाणें मान द्यावा; तसेंच सवतीचीं मुलें ह्यांशीं भिन्नभाव ठेवूं नये. ४४ पतीचें दुष्कर्म आपण होऊन जगा पुढें आणूं नये व तें प्रसिद्धीस आल्यास त्यावर आपण पांघरूण घालावें. अर्थात तशा प्रसंगीं असत्य बोलावें लागल्यास कांहीं हरकत नाहीं. ४५ या नियमां प्रमाणें जी स्त्री आपलें वर्तन यावज्जीव ठेवील ती उभय लोकांच्या सुखानुभवास योग्य होऊन तिची अखंड कीर्ति ह्या त्रिभुवनांत राहील आणि तीच पतिव्रता ह्या नामाभिधानास योग्य होईल. ४६ याकरितां प्रत्येक कल्याणेच्छु स्त्रीनें या नियमान्वयें आपलें वर्तन राहील अशा विषयीं सदैव सवध आणि दक्ष असावें.

---

## एतद्विरुद्धाचरणाचीं फळें.

१ पति क्रोधवश असतां जी स्त्री त्यास अभद्र भाषण करिते तिला पुढें आपल्या कर्मवशतेस्तव श्वान योनींत जन्म होतो. २ सासुमासऱ्यांचा त्याग करून स्वपतीसह काल घालविणाऱ्या स्त्रीस रुक्ष योनींत जन्म मिळतो. ३ पतीनें ताडण केलें असतां जी स्त्री 'हा मेला मरो' असें ह्मणते तीस व्याघ्रयोनींत जन्म होतो. ४ जी स्त्री परपुरुपाची वांच्छा करील ती उपजत 'निर्लज्ज' होईल. ५ पतीला चोरून कांहीं खाणाऱ्या स्त्रीस ग्राम सूकरीचा जन्म घ्यावा लागतो. ६ पतीला निष्टुर वचनानें ताडण कराणऱ्या स्त्रीस मूकत्व प्राप्त होऊन अति दारिद्र्याचा अनुभव येतो. ७ सवतीमत्सरास प्रवृत्त झालेल्या स्त्रीस सप्तजन्म दुर्धर व्याधीनें पीडित रहावें लागतें. ८ परपुरुषास मोहांत घालणाऱ्या स्त्रीस (स्वस्त्री पासून पराङ्मुख करविणारीस) महान पातक्याचे घरीं जन्म प्राप्त होऊन संसार सुखा विषयीं पराङ्मुख रहावें लागतें; व नानातऱ्हेचे कष्ट आजन्म भोगावे लागतात. ९ स्वपतीचा सौंदर्य शून्यतेस्तव त्याग करणाऱ्या स्त्रीस, पुढें बालवैधव्य प्राप्त होऊन ती दुराचरणप्रिय होत्साती त्या पुढील जन्मीं वारांगना होते, आणि शेवटीं नरक प्राप्त होतो. १० जी स्त्री रजस्वला असतां घरांत वागते तिचे पूर्वजांसह तीस नरक प्राप्ती होते आणि त्या गृहीं देव व पितृगण कधींही येत नाहींत. ११ स्वयंपाक करित असतां चोरून खाणाऱ्या स्त्रीस, मार्जार योनींत

जन्म प्राप्त होतो. १२ ब्राह्मणास कदान्न घालून स्वतः मिष्टान्न भक्षण करणाऱ्या किंवा, पंक्तिभेद करणाऱ्या स्त्रीस, अपूर्ण मासांत जन्म प्राप्त होऊन लगेच मृत्युही येतो. १३ सासुसासऱ्यांस गांजणाऱ्या स्त्रीस, मकर योनींत जन्म होतो. १४ दासी असून स्वामीची सेवा न करणाऱ्या स्त्रीला, नष्ट संतती व्हावें लागतें. १५ गर्भपात करणाऱ्या स्त्रीस, वंध्यत्व येतें. १६ वृतादिक, पतीच्या आज्ञे विरहित करणारी स्त्री स्वभर्त्यासह अखंड नरक प्राप्तिला योग्य होते, असें वेदवचन आहे.

## पातिव्रत्याचरणाचीं फळें व दृष्टांत.

पति दुराचारी असतांही, स्वतःच्या सोज्वल आचरणानें स्त्रीस, पति सह वर्तमान अखंड स्वर्गसुखाची प्राप्ती होते. त्याचीमिती—तिचे शरिरावर जे रोम आहेत त्या प्रत्येक रोमास एक कोटीवर्षे या प्रमाणे स्वर्गवास घडावयाचा. २ सहगमन झालें असतां वरील गति प्राप्त होऊन तिच्या प्रतापानें बेचाळीस कुळांचा उद्धार होतो. ३ पति सह चतुर्विध पुरुषार्थ साधून भूमि, चंद्र, सूर्य, वायु वरुण हे सुद्धा पतिव्रतेच्या चरण दर्शनाची वांच्छा करितात; तिच्या घर्शनानें दुसरे महान पातकी उद्धरले जातात. ४ज्याचे घरीं पतिव्रता स्त्री असेल त्यास स्वर्गसुखही उणेंच वाटेल व तें घर त्रैलोक्या समान दृष्टांत १—सिमंतिनीचा यमुनाडोहीं बुडालेला पति तिला पुन्हा प्राप्त झाला; पाण्यांत बुडालेला मनुष्य कालांतरानें केव्हांही जिवंत होऊन येईल काय?

दृष्टांत २— सितादेवी रावणगृहीं असतां त्यानें नानाप्रकारें जरी तिचें अंतःकरण शोधलें तरी ती त्यावर प्रसन्न न झाल्यामुळें पश्चात् रामपदास प्राप्त झाली. परगृहीं असतां परपुरुषास वश न होणारी स्त्री विरळा नव्हे काय ? दृष्टांत ३— अनुसुयेच्या अतुल पातिव्रत्याचरण प्रभावास्तव प्रत्यक्ष ब्रह्मदेव, विष्णु, शंकर तिचे पोटीं अवतार घेते झाले. (दत्तात्रय) हें पातिव्रत्याचेच सामर्थ्य नव्हे काय ? दृष्टांत ४— सावित्रीनें यमाजवळून आपल्या प्रिय भर्त्याचा प्राण परत आणिला. हें कशाचें फळ ? मेलेला मनुष्य कोणीं जिवंत केला आहे काय ? श्रीकृष्ण प्रत्यक्ष परमेश्वर असतां त्यास अत्यंत प्रिय असा जो अर्जुनपुत्र अभिमन्यु त्यास कां जिवंत केलें नाहीं ? दृष्टांत ५—दाशार्हराजा स्वस्त्री बोधानें, गुरुमुखांतून पंचाक्षरी मंत्र ग्रहण करून सर्व पातकांपासून मुक्त होत्साता तिजसह परलोकवासाचा अधिकारी झाला. दृष्टांत ६— कल्माषपाद राजास पतिव्रतेच्या शापामुळेंच नाना उपायांनीं न सुटणारी ब्रह्महत्या जाच करीत होती. दृष्टांत ७ पति आज्ञा ग्रहण केल्यामुळें कीर्तिमालिनीच्या वचनास मान देऊन तिचे आईबापास कैलासप्राप्ति देणें शंकरास भाग पडलें. दृष्टांत ८— महानंदेच्या सोज्वलाचरणामुळें तिची संपूर्ण नगरी शंकरास कैलाशीं उद्धरून न्यावी लागली. दृष्टांत ९— आनर्त देशस्थ देवरथ विप्रकन्या जी शारदा हीस प्रत्यक्ष शारदादर्शन होऊन अन्य जन्मास गेलेल्या पतिसह कैलासवास प्राप्ति पातिव्रत्याचरणामुळेंच झाली. दृष्टांत

१०— कांतिनगरच्या श्रियाळ राजाचे सत्वपरिक्षण त्यास पतिव्रता स्त्री असल्यामुळेंच झालें होतें. दृष्टांत ११— माहूर क्षेत्रस्थ गोपीनाथ विप्रसुत दत्तात्रय हा मृत झाला असतां त्याच्या पतिव्रता स्त्रियेच्या प्रतापानें पुन्हा जिवंत झाला. असे पुराणांतरीं अनेक दाखले आहेत. त्याविषयीं वारंवार विचार करून व त्या कथा ऐकत राहून मनास उपदेश करावा. ह्मणजे आपलें पाऊल आडमार्गांत ( वरील नियमाविरुद्ध ) न पडतां मनुष्य जन्मास आल्याचें सार्थक्य होईल.

## प्रकरण २ रें.

### गतभर्तृकेचा आचार.

पहिल्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें पतिच्या आयुष्यमर्यादेंत स्त्रियेनें आचरण केल्यास तिनें आपलें अर्धें काम बजाविलें असें होईल. आतां दुर्दैवामुळें जिचा पति मृत झाला असेल तिनें कसें वागावें याचा विचार ह्या प्रकर्णांत करितों.

१ पति मृत झाल्यावर स्त्रियेनें त्यासहगमन करावें हा उत्तम मार्ग, परंतु सांप्रत काळीं सहगमन सांप्रदाय बंद आहे करितां तसें न करितां शास्त्राज्ञनुरूप आपलें आयुष्याचे दिवस काढावेत. २ सहगमन केल्यानें जें पुण्य हातीं यावयाचें तें, सहगमन न करितां शास्त्ररित्या वागल्यानेंही स्त्रियेला प्राप्त होईल. ३ पति गतझालेल्या

स्त्रियेनें केशवपन करवावें व नित्य प्रातःकाळीं स्नान करावें ५ मंचकीं शयन वर्ज करावें. ६ मंगलस्नान, देहमर्दन करूंनये. ७ सौगंधिकवस्तू, तांबूल, सुवासिकपुष्पें ह्यांचा कधीं ही स्वीकार करूंनये. ८ नित्यशहा विष्णु पूजन करावें, त्यांस पुरुष ( पति ) स्थानीं मानून तदाज्ञा ग्रहणानें किंवा गुरु आज्ञेनें वर्तत जावें. ९ पोटीं पुत्र संतान नसल्यास स्वतः पतितर्पण करावें. १० सुवासिनि असतां जी जी वस्तू स्वतःस प्रिय वाटत होती ती ब्राह्मण, सुवाशिनि ह्यांस अर्पण करावी. ११ ज्या ज्या वस्तुंचा त्याग करणें असेल त्या त्या पतिच्या नामोच्चारणानें त्यागाव्यांत. १२ दधि, क्षीर ह्यांस सोडून, शक्ति असल्यास सालंकृत गाय विप्रवरांस द्यावी. १३ सदैव शुचिर्भुत असावें. १४ जें जें व्रत आरंभणें असेल तें तें त्वरीत उजवून टाकीत जावें. १५ नित्यशहा एक वेळ भोजन करावें व एकान्न ग्रहणाचा नेम ठेवावा. १६ वैशाखमासीं जलकुंभ दान करावें; अरण्यांत पोई घालावी; शिवालयांत शिवलिंगावर निर्मलोदकाची अक्षय गळति ठेवावी; प्राप्त उपचारादिकांनीं स्वतः पूजा करावी; शक्त्यनुरूप ब्राह्मणांच्या घरीं उदक घालावें; कोणी तिर्थ यात्रेस जाणारा असल्यास त्यांस छत्री, जोडा द्यावा; आपल्या घरीं आलेल्या विप्रांचें पादप्रक्षालन करावें, विझणवारा वस्त्र, गंध, तांबूल, सुवासिक पुष्पें व इतर सुगंध वस्तु त्यास अर्पण कराव्यात, जलपात्र द्यावें, इक्षुरस, आम्ररस पान करवावा, द्राक्ष, केळीं इत्यादि फळें खाण्यास द्यावीं. १७ कार्तिकमासीं जवान्न किंवा एकान्न भक्षण करावें,

वांगे, तेल, मध, गूळ,साखर व इतर मिष्टपदार्थ सेवन करूंनये, मंचक ब्राह्मणास अर्पण करावा,परद्रव्य घेणें वर्ज करावें, ब्राह्मणास दीपदान द्यावें. दिपदान देणें व कार्तीकमासांतील इतर दान क्रियाही समान फलकारक आहेत ह्मणून जिला शक्ति नसेल तिणें दिप दानच द्यावें. १८ माघमासांत तिळांचे लाडु, खारका, अनारशे, घारगे, ह्या वस्तू ब्राह्मणांस अर्पण कराव्यांत. तापशाला भोजन घालावें. १९ हेमंतऋतूंत सीत निवारणार्थ उबदार वस्त्र, काष्ट, धाबळ्या, कांबळी, वेलाकर्पूरमिश्र तांबूल, गृह, पादरक्षा अर्पण कराव्यांत, सुगंधपुष्पें, तुळशी, गंध, पंचामृत इत्यादिकांनीं रुद्राभीषेक करवावा, आपण नित्य शोडशोपचारांनीं पूजा करावी, व नियमानुसार वर्तन करित असतां बैलाच्या गाडींत बसूनयें. २० रक्तवस्त्र, कृष्णवस्त्र, चोळी, कंकण, ह्याचा त्याग करावा. २१ श्वेतवस्त्र परिधानकरावें. २२ तीर्थयात्रादि कांम गुरु आज्ञेनें जावें. २३ जें जें दानादीक करणें तें तें पतिनामोच्चारणानें करावें. २४ सदैव गुरूच्या आज्ञेनें वर्तन करावें. २५ याप्रमाणे वर्तन करणाऱ्या स्त्रिस सहगमनाचें फल निश्चयें करुन प्राप्त होईल.

समाप्त.

## पुस्तकें विक्रीस तयार.

**गुप्तविद्या आणि अद्भुत चमत्कार संग्रह**– यांत दृष्टीचा मंत्र, विंचू उतरण्याचा मंत्र, विझलेला दिवा अग्नि वांचून लावणें, भूत दिसणें, गुरांचे किडे जाण्यास उपाय, हरवलेली वस्तू सांपडण्यास उपाय, पिशाच पळविण्याचे साधन, सर्पाचे विषाचा मंत्र, धान्यास कीड न लागण्यास उपाय, सालंमिश्री तयार करण्याची कृती इ० इ० उपयुक्त व चमत्कारिक असे १७१ विषय आहेत. किंमत ८ आणे. ट. ख. १ आणा.

**उपयुक्त संग्रह**–यांत भूपाळ्या, स्तोत्रें, अष्टकें, अभंग, श्लोक, आरत्या, पदें, निति, चरित्रें, आख्यानें आर्या इत्यादी ७३ विषय आहेत पुस्तकाचीं पृष्ठें ४३२ असून छपाई व बांधणी नीर्णयसागरची उत्तम. किंमत १ रु. टपाल खर्च माफ.

**पुराणांतील मौजेच्यागोष्टी**– ह्या श्रीराम, श्रीशंकर, श्रीकृष्ण, पांडव व नारद यांचे संबंधीं घडलेल्या अत्यंत हास्य कारक आणि पुण्यकरक अशा पुराण ग्रंथाच्या आधारानें लिहील्या आहेत. अनायसेंच मनाची कर्मणूक होऊन पुण्यही घडतें. असा या पुस्तकांचा दुहेरी फायदा आहे. या गोष्टी वाचतांना पोट धरधरून हासें आल्यावांचून रहात नाहीं. हरदासलोक कथेंतून कधीं कधीं ह्या मोठ्या प्रेमानें सांगतात. व त्या ऐकतां ऐकतां पुरूष स्त्रिया व मुलें यांची हंसून हंसून मुरकुंडी वळते. किंमत ६ आणे ट. ख. १ आणा.

पत्ता–हरी सखाराम खानोळकर. पोष्ट खानापूर.
(जि. बेळगांव.)

## विनंती.

**आश्रय दात्यांस**–या महिन्याच्या ४ थ्या अंकावर आश्रय दात्यांचे पत्ते लिहीले आहेत, त्यांत कांहीं दुरुस्ती करावयाची असल्यास जरूर कार्ड पाठवून कळविणें. कारण पत्ते छापवून काढण्याचा विचार आहे. मुंबई, बडोदा, पुणें, इंदूर इत्यादी शहरांतील वर्गणीदारांनीं घरनंबर, आळी, पेठ वगैरे खुलासेवार पत्ता लिहून पाठवावा.

**व्यवयास बंधूंस**– खानदेशमित्र पुनःपूर्ववत् आपले भेटीस जाऊं लागला आहे तरी ह्याला उलट भेट न विसरतां मिळत जाईल अशी सप्रेम विनंती आहे.

### कोणीही

नवीन वर्गणीदार होणें, वर्गणी पाठविणें जाहिराती पाठविणें, व इतर सर्व प्रकारचा पत्र व्यवहार सुवाच्य इंग्रजींत अगर बालबोध लिपींत

खानोलकर आणि मंडळी
पोष्ट खानापूर.
( जि० बेळगांव. )

मोबदला वर्तमानपत्रें मासिक पुस्तकें, अभिप्रायार्थ पुस्तकें, छापण्याकरितां मजकूर व इतर वस्तु वगैरे पाठविणें त्या

एडिटर ‘ खानदेश मित्र ’
पोष्ट प्रकाशें.
( जि. खानदेश. )

ह्या पत्त्यांवर करावा.

**सूचना**– या पुस्तकांत छापत असलेल्या विश्रांती मंदीर व प्रतिविक्रमचरित्र या दोहोंचे हक्क एडिटरनीं आपणाकडे ठेविले आहेत.

# खानदेशमित्र.

॥ श्लोक ॥ (वसंततिलका.)

कस्यापि कोप्यतिशयोऽस्ति स तेन लोके
ख्यातिं प्रयाति नहि सर्व विदस्तु सर्वे ॥
किं केतकी फलति किं पनसः सपुष्पः
किं नागवल्ल्यपिच पुष्पफलैरुपेता ॥ १ ॥

पुस्तक १ लें. मार्च. १८९३ अंक ५ वा.

विषय. अनुक्रमणिका. पृष्ठ.


१ शिमग्याचा सण.... .... .... .... ९७
२ कूटप्रश्न.... .... .... .... .... ९९
३ रंजन आणि सुबोध........ .... ....१००
४ सार्थसुभाषितें.... .... .... ....१०८
५ श्रीमंतांचा वाढदिवस. .... .... ....११०
६ सुबोध कथामाला.... .... .... ....११३
७ आश्रयदात्यांस प्रार्थना.... .... ....११५
८ निवडक वर्तमानसार. .... .... ....११७


बेळगांव येथें 'बेळगांवसमाचार' छा० छापिलें.

**वर्गणीचे दर.**

वर्षाचे अगाऊ ट. ह. सह..... ....१८३

फुटकळ अंकास किंमत ८३

प्रकाशक—ह० स० खानोलकर आणि मंडळी.
पोष्ट खानापूर. (जि. बेळगांव.)

**अनंतरंग**— हें पूर्ण शृंगारिक माहितीचें पुस्तक प्रत्येक कामी पुरुषानें ता० ३०—४—९३ पर्यंत मागविल्यास व्ही. पी. खर्चासह ११ आण्यास मिळेल. मुदती नंतर १५ आणे.

पत्ता— प्रकाशक खानदेशमित्र.
पोष्ट खानापूर ( जि० बेळगांव. )

**अति स्वस्त! सर्वांत मोठें!! फारच उपयुक्त!!!**

**त्वरा करा! अपूर्व लाभ! त्वरा करा!**

## आर्यरंजन आणि विविधवृत्तमाला.

| | | |
|---|---|---|
| डेमी अष्टपत्री | **मासिक पुस्तक.** | ट. सह आगाऊ |
| पृष्टें प्रत्यंकीं ३२ | तूर्त सह्याच पाठवा!! | वर्गणी १॥ |

हें मा. पु. ५०० वर्गणीदार मिळतांच काढणार आहों. ( छपाई वगैरे सुरेख ) व नियमितपणें वाचकांस भेटेल. यांतः—निबंध, चरित्रें, स्थल वर्णन, आख्याईका, लोकोत्तर चमत्कार, कविता, मनोरंजक गोष्टी, कादंबऱ्या, नाटकें, प्रहसनें, सुधारकांशीं हितगुज, चमत्कारिक चुटके, व्यवसाय बंधूंस सूचना, कूट प्रश्न, पुस्तक परिक्षण, होतकरु लोकांनीं पाठविलेला हरएक प्रकारचा पत्र व्यवहार, अबला हितोपदेश, शिशूबोध आणि भरपूर वर्तमानसार इ० इ० आबाल वृद्धांसही उपयुक्त विषय सवडी प्रमाणें येतील. विशेष माहितीस्तव तिकिट पाठविलें असतां हस्तपत्र पाठवूं. खालील पत्त्यावर सह्या पाठविण्याची त्वरा करा.

| | |
|---|---|
| पोष्ट खानापूर जि. बेळगांव, आर्यरंजन आणि विविधवृत्तमाला कर्ते | **जी. जे. डी. इनामदार** व्यवस्थापक. |

# खानदेशमित्र.

## शिमग्याचा सण.

आपल्यामध्यें जो शिमग्याचा सण आहे, त्याची उत्पत्ती कशी झाली, हल्लींचें ओंगळ स्वरूप त्यास कसें प्राप्त झालें व त्यांतील वाईट गोष्टी पासून होणारें नुकसान कसें टाळतां येईल, इत्यादी गोष्टींचा प्रत्येक सूज्ञ आर्यानें विचार करण्याची ही वेळ आहे.

यमुना डोहीं बुडालेली कृष्णमूर्ती पुनः गोकुळांत आली ह्मणून सर्व नगरीस आनंद होऊन गुड्या तोरणें उभारलीं व यशोदा मातेनें बाळास विष बाधा होऊं नये ह्मणून लिंब खावयास दिला. याचें स्मारक आह्मीं वर्षा प्रतिपदेस गुड्या, तोरणें उभारतों व लिंबाचें सेवन करतों. प्रभु रामचंद्रजी नवमीस जन्मले ह्मणून आह्मी त्या दिवशीं जन्मोत्सव करतों. कार्तीक शुद्ध द्वादशीस श्रीकृष्णानें तुळशीचें पाणिग्रहण केलें ह्मणून आह्मीं त्या दिवशीं लग्न समारंभ करतों. त्या प्रमाणेंच फाल्गुन शुद्ध पौर्णिमेस श्री शंकरानें मदनाचें जाळून भस्म केलें या गोष्टीचें अनंत कालपर्यंत स्मरण रहावें ह्मणून ह्या दिवशीं दहनविधी व शंखध्वनी करण्याचा पाठ पडला आहे.

आतां वरच्या पैकीं पहिल्या तीन गोष्टी शुभ

आहेत व चवथी अशुभ आहे. ह्मणून शुभकारक गोष्टींचें स्मरण मंगल आचरणानें व अशुभ गोष्टींची आठवण ओंगळ वर्तनानें प्रतिवर्षी करीत असतों.

चांगल्यापेक्षां वाईट गोष्टी लहान मुलें व अडदांड लोक लवकर उचलतात. बोधपर काव्या पेक्षां विचकट लावण्या त्यांस लवकर मुखोद्गत होतात; ह्मणून अभद्र वर्तनानें त्यानीं या सणाचें बरेंच मंडण केलें आहे.

या दिवसांत अनेक तऱ्हेच्या अमंगळ शब्दांची लाखोली चाललेली असते; स्त्रियांची विटंबना होते; रंग व घाणेरडे पदार्थ यांनीं कपड्यांची व शरीराची खराबी होते; बीभत्स सोंगें येतात; एकमेकांच्या आंगावर अपशब्दांचे छाप बसतात; नारळ, केळीं, गवऱ्या, सरपण व केव्हां केव्हां इतर वस्तु यांची चोरी होते; दुफळी मुळें मारामारी होते; गरीब लोकांस यथेच्छ मार खाऊन मुकाट्यानें बसावें लागतें.

वरील सर्व प्रकार मुलगे व असमंजस लोक यांचे हातून घडतात. कुलीन स्त्री पुरुषांचीं नांवें घेऊन अपशब्द उच्चारल्या मुळें त्यांस मरणप्राय दुःख होतें. लहान लहान अर्भकांची नीति व सदाचरण बिघडण्यास वरील प्रलापच कारणीभूत होतात.

हल्लीं जे सनातन वैदीक धर्माभिमानी व सुशिक्षित लोक आहेत त्यांस वरील प्रकारांची किळस येऊं लागली आहे; व ते बंद व्हावे ह्मणून खटपट चालू आहे. पुणे, सातारा, नगर, अशा मोठमोठ्या ठिकाणीं आट्या पाट्या वगैरे शरीरास व्यायाम होणाऱ्या खेळांच्या चढाओढी कडे तरूण लोकाचीं मनें आकर्षिल्यामुळें ति

कडे हे अश्लील प्रकार दिवसें दिवस कमी होत जाती-
लच. जिल्हा बेळगांव पैकीं **खानापूर** येथें एक नीति
प्रसारक मंडळी स्थापन झाली असून तिनें एक हस्त
पत्रक छापवून गावांत वाटलें. त्या पत्रकाचा हेतु वरी
ल अश्लाघ्य प्रकार बंद व्हावे हाच आहे. हा हेतु या
पत्रकांत मोठ्या खुबीनें आणला आहे. ज्यांजे कडून
दुर्वर्तन घडतें त्यांचेच पदरीं सज्जनता व थोरपणाचें माप
घातलें आहे. व अशा समंजस लोकांच्या हांतून अशा
प्रकारचे दोष घडणें किती निंद्य आहे, हें दाखविलें
आहे. या हस्तपत्रकाचा येथील लोकांवर बराच परि-
णाम झाला ह्मणण्यास हरकत नाहीं. असेच प्रयत्न इत
र ठिकाणीं चालू झाल्यास या सणांतील अप्रयोजक ति
तके प्रकार लवकरच बंद होतील यांत संशय नाहीं.
या नीति प्रसारक मंडळींत येथील सरकारी शाळेचे हे-
ड् मास्तर रा. रा. बावडेकर हे प्रमुख असल्यामुळें शा
ळेंतील मुलांचें शिमग्यांतील वर्तन पुष्कळ अंशानें सुधा
रलें ह्मणण्यास हरकत नाहीं ठिकठिकाणच्या शिक्षक
समुदायानें रा. रा. बावडेकर यांचें अनुकरण केल्यास
आज पासून पांच पंचवीस वर्षांत हे बीभत्स प्रलाप बंद
होऊन इतर बाबतींतही सुधारणा होणार नाहीं काय ?

---

## कूटप्रश्न.

( बरोबर उत्तर देणारांचीं नांवें सोडतीस घालून
ज्याचें नांव येईल त्यास १ रुपया किंमतीचें उपयुक्त
पुस्तक बक्षीस. )

मिरजेंत अशी कोण आहे कीं, जी एका मिनिटांत दोनदां दिसते; एका दिवसांत एकदांच दिसते, पण अवघ्या वर्षांत मुळींच दृष्टीस पडत नाहीं. तर ती कोण?

---

# रंजन आणि सुबोध.

## रंजन

१ शिव्या देणारा मामलेदार—एका मामलेदारास लोकांनां सहज शिव्या देण्याची फार संवय होती. एकदां त्याचे तालूक्यांत कलेक्टर साहेबांची स्वारी आली. तेव्हां एका कुलकर्ण्यानें साहेबाकडे फिर्याद केली कीं ‘ रावसाहेब मामसेदार आह्मांस विनाकारण नाहीं नाहीं त्या शिव्या देतात ’ इतक्यांत साहेबाचे भेटीस मामलेदार तेथें आले. त्यांस साहेब ह्मणतात, मामलेहार साहेब, ही तुमच्यावर कसली फिर्याद आहे पहा. मामलेदार त्याचा अर्ज वाचून याजकडे वळून ह्मणाले, “ कायरे गाढवीच्या, मीं तुला कधीं शिव्या दिल्या होत्या ? ” नंतर साहेबाकडे वळून ह्मणतात, “ साहेब हे गाढवीचे लुच्चे लोक आहेत उगीच फिर्याद आणतात. ” तेव्हां कलेक्टरसाहेब पोट धर धरून हसूं लागले.

२ तीन क्रम—सोन्याची परीक्षा अग्नीनें होते; स्त्रीयांची परिक्षा सोन्यानें होते; आणि पुरुषांची परीक्षा स्त्रियांनीं होते.

**३ योग्य उत्तर—** एक वृद्ध पाद्री, लोकांस ख्रिस्ती धर्माचा उपदेश करीत असतां ह्मणाला " ब्राह्मण मोठे लबाड आहेत. ते अज्ञानी लोकांस फसवून त्यांचे कडून आईबापांचीं श्राद्धें करवून आपलीं पोटपूजा करितात व यथेच्छ दक्षिणा उपटतात. श्राद्धांतील पिंड मेलेल्या पितरांस स्वर्गांत कसे हो पोंचतात ? " त्या श्रोते मंडळींत एक निर्भीड मनुष्य होता. त्यानें हें पाऱ्याचें भाषण ऐकून त्यास आईबापांवरून पुष्कळ शिव्या दिल्या. पाऱ्यानें त्या मनुष्यास माजिस्त्रेटापुढें नेलें तेव्हां तो मनुष्य ह्मणतो " साहेब, मी ह्या पाऱ्यास शिव्या दिल्या नाहींत, त्याच्या प्रश्नाचें उत्तर दिलें. कारण माझ्या शिव्या ह्या पाऱ्याचे आईबापास स्वर्गांत पोंचतात तर आमचीं श्राद्धें आमच्या आईबापांस पोंचतात, यांत नवल काय? " हें उत्तर ऐकून माजिस्त्रेटास हसूं आलें व त्यानें तो खटला सोडून दिला.

**४ चतुर वैद्य**—एक मनुष्य वैद्याकडे गेला आणि ह्मणतो " वैद्यबाबा माझ्या पोटांत दुखतें मला कांहीं औषध द्या " वैद्यानें परीक्षा करून पाहिलें तों तो मनुष्य चांगला धट्टा कट्टा निरोगी दिसला. मग वैद्य विचारतो, " तूं आज काय खाल्लें होतेंस ? " तो उत्तर करितो, " मीं थोडीशी जळकी भाकर खाल्ली होती. " तेव्हां वैद्य औषध आणून उगाळून त्याचे डोळ्यांत घालूं लागला तेव्हां तो मनुष्य ह्मणतो माझ्या पोटांत दुखतें आणि डोळ्यांत औषध कशाला? डोळ्यांचा आणि पोटाचा काय संबंध? वैद्य उत्तर करतो, " अरे बाबा" तुझ्या डोळ्यांना विकार झाला आहे, कारण त्यांनीं ज

र तुला चांगलें दिसतें तर तूं जळकी भाकर खाल्ली नसतीस. ”

५ **मार्मिक उत्तर**—एका महाज्ञानी व चतुर पुरुषाच्या एका मित्रानें त्यास एकदां विचारलें, “ अहो, तुह्मांस दुसऱ्यांस शिकविण्याची जशी हौस आहे तशीच दुसऱ्या पासून शिकण्याचीही पण आहे ! तर तुह्मीं अजूनही शिकणार तरी कोठ पर्यंत ? त्यानें उत्तर केलें “ अधिक ज्ञान मिळविण्याची जेव्हां मला लाज वांटूं लागेल तोंपर्यंत मी शिकणार. ”

६ **खरी सहनशीलता**— साधु तुकाराम बावांस कोणी एक उसांची मोळी दिली होती. ती घेऊन घरीं येत असतां वाटेनें ऊंस द्या ह्मणून गांवांतील मुलें त्यांच्या मागें लागलीं तुकाराम बावा पडले साधु; मग काय! प्रत्येकास एक एक ऊंस देतां देतां घरीं येईपर्यंत हातांत एक ऊंस शिल्लक राहिला. बावांची बायको मोठी कजाळ होती, हें सर्वांस माहित आहेच. नवऱ्यानें सगळे ऊंस वाटून टांकले, हें कळतांच तिच्या आंगाचा मोठा संताप होऊन तिनें त्याच्या हातचा ऊंस हिसकाऊन घेऊन जोरानें त्याच्या पाठींत मारिला; तों त्याचे तीन तुकडे झाले. हें पाहून तुकाराम बावा आनंदानें ह्मणतात, “ हो हो, बरोबर वांटणी केलीस एक तुकडा तुझा, एक मुलांचा आणि एक माझा ” याचें नांव सहन शीलता.

**गुणी जन दरिद्री कां ?**—या विषयीं कांहीं मंडळींत चर्चा चालली असतां एक चतुर मनुष्य ह्मणतो.-

**परीक्ष्या सत्कुलं विद्यां शीलं शौर्यं स्वरूपताम् ॥**
**विधिर्ददाति निपुणः कन्यामिव दरिद्रताम् ॥**

"अहो जसा एखादा शहाणा बाप मुलगी देतानां मुलाचें कूल, शील, विद्या, शौर्य, रूप इत्यादि गुणांची परीक्षा पाहून मग त्यास मुलगी देतो, तद्वतच शहाणा ब्रह्मदेव आपली मुलगी जी दारिद्रता ती देतांना ज्याचे अंगीं हे सर्वगूण असतील त्यासच तिला देतो."

**७ कृष्णाची खोडी**—एकदां एक गवळण दह्यांचा डेरा घेऊन मथुरेच्या बाजाराला जात होती. तिची सासू अंमळ कडक असे; ह्मणून ती गवळण कृष्णाशीं फार बेतानें वागे. ती डेरा घेऊन चालली असतां थोडा विसांवा घेण्यासाठीं एके जागीं डेरा उतरून बसली. पुढें जावयाचें परंतु डेरा फार जड असल्यामुळें तो उचलण्यास कोणाची तरी मदत मिळेल ह्मणून ती वाट पहात होती. इतक्यांत कृष्ण एकटाच तेथें बागडत असलेला तिच्या दृष्टीं पडला. मग त्याला हांक मारून 'एवढा डेरा उचलूं लाग पाहूं?' असें ती भीत भीतच ह्मणाली. तेव्हां मोठ्या साधुपणानें स्वारी ह्मणाली. 'एवढेंच ना? चिंता नाहीं देतों उचलून.' ती ह्मणाली 'कांहीं खोडी करूं नकोस हो.' तो ह्मणतो-' वाः! भलतेंच, मी तुझी कां ह्मणून थट्टा करूं? तूं कांहीं आमच्या खेळ गड्यांतली नाहींस; मी कांहीं इतका वेडा नाहीं; मस्करी तरी करायची त्याचीच करीन भलत्याचीच थट्टा प्राण गेल्यानेंही करावयाचा नाहीं.' ह्या सरळ बोलण्या वरून तिला विश्वास वाटून ती उटून

उभी राहिली व डेऱ्यास हात लाविला; इतक्यांत कृ-ष्णानें डेरा तिच्या छाती पर्यंत उचलून पाय निसरल्या-चें निमित्त करून सगळें दहीं तिच्या अंगावर सांडून डेराही आदळला व त्याचे तुकडे तुकडे केले! आणि मग धूम मारून स्वारी खो खो हांसत सुटली. त्या बि चारीला सासूच्या धाकामुळें रडेंच कोसळलें. व आतां मला सासू काय ह्मणेल ह्मणून ती त्याला बोलूं लागली. तो दुरूनच ह्मणाला ' बरें मी जातों बरें ? तुझ्या सा-सूला मी विचारलें ह्मणून सांग हो, इतकें बोलून स्वारी तेथून सूं पळाली.

---

# सुबोध.

## दुर्व्यसन.

१. परतंत्रते सारखें दुःख नाहीं. आपणाहून बल-वान् मनुष्यानें आपल्यास जिंकून परतंत्र केलें, तर त्यांत मोठें नवल नाहीं. पण मनुष्य नव्हे अन्य प्राणी नव्हे तर केवळ जड पदार्थ याणीं मनुष्यास आपल्या स्वाधीन करून घ्यावें हें केवढें आश्चर्य ?

२. पण हल्लीं दुर्व्यसनी लोकांस अनेक जड पदार्थां नींच जिंकून आपले दास करून ठेविले आहेत कोणी तंबाकूच्या, कोणी भांगेच्या, कोणी अफूच्या, कोणी महा पराक्रमी सुराताईच्या आधीन होऊन लक्षावधी लोक दास स्थितींत आयुष्य घालवीत आहेत.

३. ह्या व्यसनां पासून हित असें काडीचें नसून

अनहित ह्मटलें तर सगळ्या जन्माचा नाश होतो. द्रव्या-परी द्रव्य जातें; उद्योग धंदा नीट सुचत नाहीं; शरीर प्रकृती बिघडते; कधीं कधीं प्राणावर गुजरतें; बायका-मुलें अन्नास महाग होतात; अफिम्या, गांजेकस, दारू-बाज असले किताब प्राप्त होऊन दुर्लौकिक होतो.

४. करितां कोणत्याही व्यसनाच्या वाऱ्यासही उभें राहूनये. तंबाकू खाणें किंवा ओढणें हें अगदी सामान्य होऊन गेलें आहे, पण त्यांतही लाभ कांहीं नाहीं. त्या पासून प्रकृतीस अपाय होतो, असें वैद्य ह्मणतात. नि-दान अमोलिक कालाचा तरी व्यर्थ व्यय होतो. कित्येक तंबाकू खाणारांच्या कामाच्या वेळा पैकीं दररोज तास दोनतास तरी ह्या तंबाकूच्या चर्वणांत चूर होतात!

---

## षड्रिपु.

१. काम क्रोधादि मनोविकार अमर्याद होऊन ज-गांत अनर्थ करीत आहेत. त्यांचें ग्राह्य व त्याज्य स्वरूप ओळखून त्या प्रमाणें त्यांचें ग्रहण किंवा त्याग करणें अवश्य होय.

२. हल्लीं विषयसुखा विषयीं अमर्याद काम; को-णीं उणें भाषण केलेंकीं त्यावर क्रोध; द्रव्याविषयीं अ-मर्याद लोभ; विषयांच्या बाह्य स्वरूपासच भुलवून टाक-णारा मोह; द्रव्याचा, अधिकाराचा, अल्प विद्येचा, वगैरे मद ह्मणजे गर्व; दुसऱ्याचें बरें न पाहूं देणारा मत्सर; ह्यांचाच सध्या जबर अंमल चालला आहे.

३ तर सत्कार्याच्या ठिकाणीं किंवा स्वस्त्रीच्या ठि-काणीं काम; परपीडका विषयीं क्रोध; पुण्य प्राप्ती वि-

षयीं लोभ; परमेश्वर स्वरूपाविषयीं मोह, सत्या विषयीं मद; ह्मणजे अभिमान, व परोपकाराच्या कृत्यांत दुसरा पुढें गेलेला न साहून आपण त्या पुढें जाणें, अशा रीतीनें दुसऱ्याचा मत्सर ह्मणजे हेवा, केल्यानें परिणाम वाईट न होतां चांगलाच होईल.

---

## सत्यव्यवहार.

१ असत्य भाषण करूं नये, असें जरी सर्वांस ठाऊक आहे, तरी व्यवहारांत खोटें बोलल्या शिवाय चालत नाहीं, अशी सामान्य लोकांची समजूत आहे. ह्या असत्य भाषणा पासून लाभ न होतां नुकसान मात्र होते. दुकानदाराच्या दुकानाशीं गिऱ्हाइकें २९ येतात पण त्यां पैकीं ९ च जण माल घेतात. बाकीचीं भाव पाहण्याकरितां दुसरीकडे जातात. तीं का ? तर दुकानदाराच्या शब्दावर विश्वास नाहीं ह्मणून.

२ विश्वास नाहीं, याचें कारण काय? तर दुकानदार एक किंमत बोलत नाहीत हें. ज्या वस्तूस चार आणे सांगतो तीच वस्तु चार पैशासही कधीं कधीं तो च दुकानदार देतो; गिऱ्हाइकास खरी किंमत काय हें समजत नाहीं. या मुळें गिऱ्हाइक फारच कमी किंमतीस मागतें ह्मणून दुकानदार अधिक अधिक सांगतात या मुळें दोघांसही त्रास होतो.

३ ह्याचा दोष दुकानदार गिऱ्हाइकावर टाकितो व गिऱ्हाइक दुकानदारावर लोटितें. पण खरोखर दोषी सध्यां कोणीच नाहीं. कारण ही व्यवहाराची रीत फार दिवसां पासून पडलेली असल्यामुळें आपण करितों

तें यथा योग्यच करितों, असें त्यांस वाटतें. पण ह्या पद्धतीपासून दोघांसही त्रास आहे, तर ही रीत दोघांनीं मिळून बदलणें जरूर आहे.

४ ही रीत बदलण्याचें दुकानदाराच्या हातीं विशेष आहे. त्यानें जिनसाची जी बाजार भावाप्रमाणें किंमत असते ती कायम करून एकदांच सांगितली, किंवा जिनसावर चिठी लावून टाकिली व तींत कमी करावयाचेंच नाहीं, असा निश्चय करून टाकिला ह्मणजे झालें. पाहिजे तर गिऱ्हाईक घेईल नाहीं तर घेणार नाहीं. अशा रीतीनें अन्य देशांत व्यापार चांगला चालत आहे.

५ गिऱ्हाइकांनींही पैशा अधेल्याच्या फरका करितां बाजार धुंडीत बसूं नये. तोच वेळ दुसऱ्या चांगल्या कामाकरितां लाविल्यास विशेष फायदा होईल.

६ या प्रमाणेंच इतर सर्व व्यवहारांची गोष्ट आहे. प्रमाणिक पणानें, पतिनें, जसे व्यवहार सुरळीत चालतात, तसे लबाडिनें चालत नाहींत. लबाडिच्या व्यवहारानें कांहीं वेळ लाभ होतोसाही वाटेल, पण परिणामीं त्यांत घात आहे. प्रमाणिक पणानें मिळविलेल्या ओल्या कोरड्या भाकरीस जी चव लागते, ती लबाडीनें मिळविलेल्या पंच पक्वान्नासही. लागत नाहीं कारण लबाड मनुष्याचें मनच त्यास खात असतें.

# सार्थ सुभाषितें. (उतारे)

नागो भाति मदेन कं जलरुहैः पूर्णेंदुना शर्वरी । शीलेन प्रमदा जवेन तुरगो नित्योत्सवैर्मंदिरं ॥ वाणी व्याकरणेन हंस मिथुनैर्नद्यः सभा पंडितैः । सत्पुत्रेण कुलं नृपेण वसुधा लोकत्रयं विष्णुना ॥

अर्थ—मदस्रावानें हात्ती शोभा पावतो. कमलांनीं उदक, पूर्ण चंद्रानें रात्र, सुशीलतेनें स्त्री, शीघ्रगति अंगीं असल्यानें घोडा, सदैव उत्सवाचे योगानें घर, व्याकरणाच्या योगानें वाणी, हंसाच्या विहारानें नदी, पंडितांच्या योगानें सभा, सत्पुत्राचे योगानें कूल, राजानें पृथ्वी, आणि परमेश्वराच्या योगानें त्रैलोक्य हीं शोभा पावतात.

खल सख्यं प्राङ्मधुरं वयोऽतराले निदाघ दिनमंत । एकाऽऽदि मध्य परिणति रमणीया साधुजन मैत्री ॥ २ ॥

अर्थ—दुष्टाची मैत्री प्रथमारंभीं गोड वाटते; मनुष्याचें आयुष्य मध्य काळीं, ह्मणजे तारुण्यांत; आणि उन्हाळ्याचा दिवस शेवटीं ह्मणजे संध्याकाळीं; पण आरंभीं मध्यें आणि शेवटीं अशा तिन्हीं काळीं रमणीय अशी एक सज्जनांची मैत्रि मात्र!

भद्रं कृतं कृतं मौनं कोकिलैर्जलदागमे । दर्दुरा यत्र वक्तारस्तत्र मौनं हि शोभनम् ॥ ३ ॥

अर्थ—पावसाच्या दिवसांत कोकिला मौन धरतात, तें फार चांगलें करतात; कारण, जेथें बेडूक वक्ते झाले तेथें कोकिलांची काय शोभा राहिली? सारांश मूर्ख लोकांच्या समाजांत पंडितास मौनच उचित होय.

**विद्या विवादाय धनं मदाय शक्तिःपरेषां परिपीडनाय। खलस्य साधोर्विपरीत मेतत् ज्ञानाय दानायच रक्षणाय ॥ ४ ॥**

अर्थ—मूर्खाला विद्या प्राप्त झाली कीं तो ज्याशीं त्याशीं वादाला उभा राहातो; धन मिळालें कीं गर्वानें ताठून जातो; अंगीं सामर्थ्य असलें, कीं, दुसऱ्यास पीडा करूं लागतो; हा मूर्खाचा प्रकार झाला. आतां शहाण्याचा ऐका; तो वरच्याच्या अगदीं उलट. ह्मणजे विद्येचा उपयोग तो ज्ञान समजतो; धनाचा उपयोग दान; व शक्तीचा दुर्बळांचें रक्षण.

**परिचरितव्याः संतो यद्यपि कथयन्ति नो सदुपदेशं । यास्तेषां स्वैरकथा स्ताएव भवन्ति शास्त्राणि ॥ ५ ॥**

अर्थ—सत्पुरुषांनीं साक्षात् उपदेश जरी केला नाहीं तरी त्यांच्या सहवासानें नेहमीं असावें; कां कीं, त्यांचें जें सहज बोलणें तें सुद्धां मोठें अर्थयुक्त असतें.

# श्रीमंतांचा वाढदिवस.

( अंक १ वरून पुढें चालू. )

असुरेंद्र नामें जो हिरण्यकश्यपु त्यास नृसिंहावतार धरून ह्या मृत्यु लोकांतून नाहींसा केला. याप्रमाणें मी प्रत्येक अवतारीं कित्येक दुष्टांचा वध करितो. ह्या कृष्णावतारीं मी कोणकोणते पराक्रम केले ते सर्व तुला विदित आहेतच. याप्रमाणें श्रीकृष्णानें अर्जुनाशीं केलेलें भाषण वरील गोष्टीस साक्षिभूत प्रमाण आहे. अस्तु;

पूर्वीं सांगितल्या प्रमाणें ईश्वराचे प्रसंगोपात झालेले दशावतार व त्या त्या अवतारीं त्यानें स्वेच्छेनुरूप केलेल्या लीला व्यास वाल्मिकादि श्रेष्ठ कविजनानीं आपल्या रसाळ वाणीनें फारच उत्तम प्रकारें वर्णिल्या आहेत. त्यामुळें त्या लीला अनेकवार श्रवण केल्या किंवा पठण केल्या तरी नित्य नूतनशा गोडच वाटतात. आणि तेणेंकरून त्या अवतार चरित्रां विषयीं आह्मा प्रत्येक मनुष्य प्राण्याचें प्रेम दिवसेंदिवस अधीक जागृत होतें; ते अवतार प्रत्यक्ष दिसण्याची जर आपणांस सवड असती तर फार उत्तम झालें असतें, असें वाटूं लागतें; ईशावतार चरित्रां विषयीं आपले मनांत जी प्रीति असते ती अधिकाधिक वाढत जाते. मन बद्ध होऊन प्रत्यक्ष ईश दर्शनाविषयीं जी अत्युत्कंठा लागून रहाते तीस कांहीं अंशीं तरी समाधान प्राप्त व्हावें, अशा उद्देशानें तदावतार चरित्रें कथा किंवा नाटक यांच्या रूपानें आपल्या कर्णरंध्रीं सांठवून किंवा नेत्र द्वयांस भासवून

आयुष्यांतील काळाचा सद्व्यय करण्याचा आपल्या सूज्ञ पूर्वजांनीं धडा घालून दिला असावा. पुढें त्या प्रमाणें वागतां येण्यास सर्वांस सोईवार पडलें नसेल ह्मणून प्रसंग विशेषींच हा प्रयोग करण्याचा पाठ प्रचारांत आला असावा, असें अनुमान होतें. हल्लीं कथा व नाटकें हीं पोट भरण्याचीं साधनें बनलीं आहेत, ही गोष्ट निराळी. पूर्वीं ते प्रकार केवळ ईशावतार दर्शनेच्छा पूर्ण होण्यासाठीं व काळाचा सद्व्यय होऊन करमणूकही व्हावी ह्या करितांच होत असत असें ठरतें. कालिदासादि कवी जीं उत्तम नाटकें रचित तीं जनरंजना करितांच असत. ते गांवागांव आपलें सोंगाडें घेऊन पैसे उकळीत कधींच फिरत नसत. तुकाराम, रामदास इत्यादि भगवद्भक्त नेहमीं कीर्तन करित असत; परंतु " बुवा अमुक एक प्रकारचें आह्मास साह्य करा " असें श्रोत्यांस ते कधींच ह्मणत नसत. तेव्हांचे ते स्तुत्य प्रकार हल्लीं उदर पूर्तीचीं साधनें होऊन राहिल्यानें त्यांचें महत्वही कमी झालें आहे नाटका पेक्षां कथा अद्याप लोकांस पूज्यशी वाटते. हें तिचें मोठेंच भाग्य समजावयाचें! नाटकाच्या म्यानेजरास जो मान मिळतो त्या पेक्षां हरिदासास तो कांहींतरी जास्त मिळतो. अस्तु.

मानव तनु ही परमेश कृतीनें उत्पन्न होणाऱ्या चौऱ्यांशी लक्ष योनींत श्रेष्ठ मानिली आहे व मनुष्याचे आदि आणि अंत हे दोनच दिवस मोठ्या महत्वाचे होत. एखाद्या थोर पुरुषाचें चरित्र जें आपण ऐकतों त्याचा समावेश ह्या दोन दिवसां मध्येंच होतो. जन्म

दिवशींच मनुष्याच्या सत् किंवा दुष्कृतीला आरंभ होतोच असें जरी ह्मणतां येणार नाहीं तरी त्या मनुष्याच्या बऱ्या वाईट कृतींचें उगम प्रथम दिवस होय; व चरित्र समाप्ति किंवा कृतीचें सामाप्य शेवटला दिवस होय. शेवटचा दिवस अथवा त्या दिवशींचा प्रकार ज्याचा त्यास स्वतः पाहण्यास सांपडत नसल्या मुळें हयातींत दरवर्षी प्रथम दिवसाचें 'मंडण' होणें योग्य आहे. ह्या मंडण कृतीला **वाढदिवस** अशी संज्ञा आहे.

ह्या वाढदिवशीं सर्व काळ आनंदांत घालविणें हें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य कर्म आहे. आईबाप हयात आहेत तोंपर्यंत त्यांचे हांतून वाढदिवस होईलच; परंतु त्यांच्या मागें तो स्वतः करणें गैर नाहीं. गरीब गुरीबानां वाढदिवस करणें कदाचित् कठीण पडेल; पण श्रीमंतांना ह्या मार्गाचें अवलंबन करणें शक्य आहे. श्रीरामचंद्र प्रभुनीं मानवी अवतार धारण केल्यामुळें तेही वाढदिवसाचे कर्तव्यास अनुसरले. श्रेष्ठ लोकांस स्वतः पेक्षां इतर जनसमूहा कडून जास्त सुख प्राप्त होतें. श्रीरामप्रभु हे ईश्वरी अवतार असून सार्वभौम छत्रपती होते, व त्यांनीं प्रजाजनांचें पुत्रवत्पालन केलें ह्या मुळें तत्कालिन प्रजाजनांची त्यावर पूर्ण भक्ति जडली. त्या प्रजेचे वंशजही आपल्या पूर्वजांच्या वंद्य मार्गाचें अवलंबन करीत आले आहेत. आज रामावतार संपून बराच काल झाला आहे तरी प्रति संवत्सरास नवमीच्या दिवशीं ज्यानें चार घटका आनंदानें घालविल्या नाहींत असा आर्य वंशज सांपडणें कठीण.

प्रतिवर्षीं श्रीराम नव्यानें जन्म घेतात, असें जरी नाहीं तरी त्यांच्या श्रेष्ठ कृतींची आठवण राहण्या करितां हा जन्मोत्सव होत असतो. सारांश वाढदिवस कशाकरितां करण्याचा सांप्रदाय पडला आहे हें उघड झालें.

आतां श्रीराम जन्म कथेचें पद्य गद्य रूपानें यथाशक्ती निरूपण केलें आहे, तें सावधान चित्तानें वाचून त्यांतील गुणांचें गृहण करावें अशी सविनय प्रार्थना आहे.

---

## सुबोध कथामाला.

( अंक १ वरून पुढें चालू. )

येऊं लागली. व तसें होणें त्याच्या भाविक स्वभावास रुचलें नाहीं. यास्तव दीक्षेच्या मरणास कांहीं महिने लोटल्यावर त्यास द्वितिय विवाह करण्याची इच्छा उत्पन्न झाली. पहिल्या पत्नीशीं त्याचें प्रेमाचें वर्तन होतें याबद्दल लोकांत प्रसिद्धी असल्यामुळें प्रत्येकास आपली मुलगी त्या ठिकाणीं द्यावी असें वाटत असे. लवकरच त्याचा द्वितिय विवाह एका उपवर लावण्य लतिकेशीं झाला. तिचें नांव कर्कशा होतें.

तिला तेरा संपून चौदावें वर्ष लागलें असल्या मुळें ती घरचें सर्व काम काज झपाटून नेत असे. त्यामुळें पहिल्या स्त्री पेक्षांही हिजपासून हरएक संसार कृत्यांत विशेष सुख मिळेल अशी सुमंतु ब्राह्मणास आशा

उत्पन्न झाली; परंतु अल्प कालांतच तिचें उर्मठ आचरण पाहून त्याचें मन उद्विग्न झालें. कांहीं कालानें तर हा विवाह केला नसता तर बरें झालें असतें असें त्यास वरचेवर वाटूं लागलें. चांगली उपवर व रूपवती दिसली ह्मणून तिच्या वर्तनाकडे विशेष लक्ष न देतां त्यानें तिचा स्वीकार केला. पण तिनें आपल्या नांवा प्रमाणें कृती करण्यास आरंभ केला.

लग्न झाल्यावर ती घरांत येऊन पुरता एक महिना देखील झाला नाहीं तोंच तिचा सर्व प्रकारें घरांत पगडा बसला. ती आपल्याच ओंजळीनें नवऱ्यास व सुशीलेस पाणी पाजूं लागली. ती सुशील व सद्वर्तनी असती तर चिंता नव्हती. घरांत एकच शहाणें माणूस असावें व त्यानें सर्वांच्या सुखा समाधानाकडे सारखी नजर पुरविली पाहिजे. कर्कशा ही स्वभावानें निर्लज्ज, निर्दय, क्रोधिष्ट व फारच चंचल मनाची होती. क्षणो क्षणीं तिच्या प्रकृतींत विकृती होत असे. सुमंतु ब्राह्मणाची घरची गरीबी असल्या मुळें घरांतील एखाद दुसरा पदार्थ संपला असून तिच्या हुकुमा प्रमाणें लाग लाच तो न आल्यास तिनें त्याच्यावर पाहिजे तसें तोंड सोडावें. तें ऐकून त्यास अति दुःख होई; आणि त्या त्रासास्तव तो दोन दोन दिवसांचीं उपोषणेंही काढी. तो घरीं नसतां सुशीलेस कांहीं तरी निमित्तान मार बसावयाचाच. रड्या वांचून तिचा एकही दिवस सुना जात नसे. सुशीला मोठी रूपवती व कोमल अंतःकरणाची होती; व सुमंतु विप्रही स्नान संध्यादि आचरणा मुळें मोठा तेजस्वी असे; तरी त्या अवदशेच्या

तडाक्यांत सांपडल्या मुळें तीं दोघेंहीं निस्तेज होत चाललीं. सुशीला उपवर होत चाललेली पाहून हिच्या ऋणांतून मी केव्हां व कसा मुक्त होईन ही दुसरी बलवत्तर काळजी लागून तो ब्राह्मण अगदीं वेडावून गेला.

एके दिवशीं सुशीलेच्या पूर्व भाग्योदयानें अकस्मात् कौंडिण्य नामें ऋषी त्याचे घरीं आला. सुशीलेशीं विवाह करण्याचा आपला हेतु आहे, असें त्यानें दर्शविलें कौंडिण्य ऋषीची सत्कीर्ति सुमंतु विप्रास पूर्वीपासूनच श्रुत असल्या मुळें त्यानें त्या ऋषीचें ह्मणणें मान्य केलें. पुढें सुमुहूर्तावर त्यांचा विवाह होऊन जावईबुवा कांहीं दिवस सासुरवाडीस राहिले.

---

# आश्रयदात्यांस प्रार्थना.

खानदेश मित्राचें प्रकाशनचें काम आह्मीं गेल्या महिन्यापासून हातीं घेतलें आहे. या महिन्याचा ९ वा अंक निघण्यास बराच उशीर झाला याची माफी असावी. यापुढें नियमित वेळीं अंक रवाना करण्याची दक्षतेनें तजवीज ठेवूं. गेल्या अंकांत जाहिरात दिल्या वरून बऱ्याच आश्रय दात्यांनीं व्यवहार मंजरी व्ही. पी. नें मागवून वर्गणी पाठविली. त्या बद्दल मित्र त्यांचा फार आभारी आहे. ज्या थोड्या आश्रय दात्यां कडून मित्राची वर्गणी अद्याप यावयाची आहे त्यांनीं ह्या महिन्यांत ती पाठवावी ह्मणजे **रामविजय**

कथासार हें ४० अध्यायाचें चिमकुलें पुस्तक बक्षीस पाठवूं. अथवा १८६ आकारून चिमुकलें रामायण बक्षीस पाठविणे बद्दल लिहावें. आह्मीं बक्षीस देण्यासाठीं आणविलेल्या व्यवहार मंजरी पैकीं हल्लीं १२ प्रती शिल्लक आहेत. या महिन्यांत पहिल्यानें जे लिहितील त्यांस त्या पाठवून पुढें येतील त्या मागण्यास रामविजय कथासार बक्षीस पाठवूं.

बऱ्याच सूज्ञ वाचकांच्या सुचनां वरून हा पांचवा अंक गेल्या चार अंका पेक्षां अगदींच निराळ्या तऱ्हेवर काढला आहे. सातव्या महिन्या पासून याचीं ३६ पानें करून हल्लीं पेक्षां जास्त उपयुक्त व मनोरंजक करण्याच्या विचारांत आहों; परंतु ह्या आमच्या विचारास उत्तेजन देऊन आह्मां कडून तसें करून घेणें आश्रयदात्यांवर अवलंबून आहे. आह्मीं बरीच झीज सोसून मागच्या महिन्यांत जें बक्षीस दिलें व या महिन्यांत देत आहों या वरून आमच्या हेतू प्रमाणें सर्व आश्रयदात्यां कडून या पहिल्या सहामाहिचे आंत वर्गणी येऊन सातवा अंक ३६ पानाचा त्यांचे भेटीस पाठविण्याची आह्मास उमेद येईल असें वाटतें.

# निवडक वर्तमानसार.

नगरचे मुत्सद्दी कर्ते लिहीतात—शिमग्यांतील अश्लीलते बद्दल तेथील कांहीं तरूण विद्वान लोकांस किळस येऊन त्यानीं तो प्रकार मोडून टाकण्याचे प्रयत्न सुरू केले. १८९० सालीं तेथील युनियन् क्लबाच्या सभासदानीं पुढार घेऊन पहिल्यानें गावांतील प्रसिद्ध ठिकाणीं व पुढें म्युनिसिपालटीच्या शाळांतून या सणा बद्दल व्याख्यानें देण्याची सुरुवात केली. दुसरे वर्षीं तेथील म्युनिसीपालटीचे चेयरमन्नीं आपले ताब्यांतील मराठी शाळांची शिमग्याची सुटी अजी बंद करून दिपवाळीची सुटी दहा दिवसांची केलीं. पुढें शिमग्याचे दिवसांत शाळा सुटल्यावर मास्तर लोकांचे देखरेखी खालीं मैदानांत मुलांस हवे ते खेळ खेळण्याची सवड देण्यांत आली. चार दिवस असा क्रम चालून पांचवे दिवशीं मुलांस उपदेश करून खाऊ वाटण्यांत आला. मुलाची संख्या दीड हजारावर असून असा हा क्रम आज तीन वर्षें सतत चालला आहे. त्या योगानें गेलीं तीन वर्षें शाळेंत जाणारें मूल रस्त्यांत शंखध्वनी करतांना किंवा अपशब्द उच्चारतांना दृष्टीस पडत नाहीं. ह्या सत्कृती बद्दल शाळाखात्याच्या अधिकाऱ्याकडून ह्या म्युनिसीपालिटीस शाबासकी मिळाली आहे. शिवाय इतर म्युनिशीपालिट्यानीं हीचें अनुकरण करावें अशा आशयाचें सरक्यूलरही काढलें आहे.

---

**संशयी लोक पकडण्याची अजब युक्ती**—प्या-

रिस शहरांत फ्रान्सच्या ब्यांकेच्या ऑफिसांत जेथें खजीनदार बसतो त्याचे पाठीमागें एक अदृश्य स्थल आहे. त्या स्थलांत गुप्त रीतीनें फोटोग्राफ घेण्याची व्यवस्था केलेली आहे. खजीनदाराला ज्या मनुष्या विषयीं कांहीं संशय येईल त्या मनुष्याचा तेथल्यातेथें ताबड तोब फोटो घेण्यांत येतो. खजीनदारानें संशय आल्या बरोबर शेजारच्या एका खुंटीला स्पर्श केलाकीं, तिकडे त्या मनुष्याचा झटदिशीं फोटो निघतो. अशा व्यवस्थेनें अनेक प्रसंगीं फसव्या व लुच्चेगिरी करणाऱ्या लोकांस पकडण्यांत आलें आहे.

---

**पुनर्विवाह**—ता. ९।३।९३ रोजीं पुण्यांत एक पुनर्विवाह झाला. वर, साताऱच्या कलेक्टरचे आफि-सांत ४० रुपये दरमहा असलेले एक क्लार्क रा. रा. वामन शीताराम साखवळकर या नांवाचे ४६ वर्षा-च्या वयाचे सारस्वत असून वधू, मिरज येथील यमुनाबाई कुलकर्णी नांवाची ३९ वर्षा च्या वयाची देशस्थाची आहे.

---

**तेजःपुंज रत्न**—बुखाऱ्याचे खानानें रशियाचे झारास थोड्या दिवसां पूर्वी जो नजराणा अर्पण केला, त्यांत एक अमोल्य हिरा आहे. काळोख्या रात्रीं ह्या हिऱ्याचा प्रकाश दिव्यासारखा लख्ख पडतो. त्या प्रकाशांत लिहिणें वाचणें व दुसरींही कामें करतां येतात. इतका तो दैदिप्य मान आहे ह्मणतात.

---

**यज्ञ**—नुक्ताच नरसोबाचे वाडीस **सौत्रामणी** नांवाचा यज्ञ झाला. पुढील वर्षी बहुधा आणखी एक यज्ञ होईल, व तो ४७ दिवस चालेल. त्यास निदान एक लक्ष रुपये पर्यंत खर्च येईल अशी वदंता आहे.

---

**तोतया इन्स्पेक्टर**—सुधाकर पत्रावरून असें समजतें कीं, मौजे सिलेदा येथील शाळा मास्तर रा. रंगोबा यानें मोठी मौज केली. कांहीं. खाजगी कामाकरितां एका महिन्याची रजा घेऊन आपण शाळा इन्स्पेक्टर आहोंत असें ह्मणून दोन तीन गांवच्या शाळांची परीक्षा घेत फिरत होते. इतक्यांत खरे इन्स्पेक्टर यांस ही बातमी कळतांच त्यानीं त्याला धरून पोलीसाचे ताब्यांत दिलें. खटला चालून या तोतया इन्स्पेक्टर साहेबानां १० रुपये दंड झाला. योग्यते वाचून सत्ताधीश होण्याचा हा एक नवीनच मार्ग आहे!

---

**कन्या विक्रय**--कैक लोक आपल्या मुली बऱ्याच वाढवून पुष्कळसा पैसा आला ह्मणजे एकाद्या वृद्धाला किंवा अमंगलाल विकून चार पैसे गांठीला बांधतात, हें वाचकांना माहीत आहेच. परंतु या लोकांवरही कडी केल्याचें एक उदाहरण वाचकांसाठीं येथें देतों.

बरद्वान् येथील एका ब्राह्मणाच्या दोन मुली ल[illegible]च्या होत्या. त्यानें त्या विक्रीला काढल्या. ही विक्र[illegible] तरी सरळ मार्गानें जो जास्त पैसा देणार होता त्याला न विकतां दोघी मुलीबद्दल पांचांना नादी [illegible]वून त्या सर्वांकडूनही पैसे उपटले; आणि दोघांना [illegible]ुली देऊन

बाकीच्यांना तोंडघशीं पाडलें. पुढें ही हकीगत बाहेर पडली तेव्हां यजमान आणि गिऱ्हाईक यांमध्यें खेटराखेटरी होऊन फिर्यादीचा प्रसंग आला. फिर्यादही झाली. तेव्हां माजिस्त्रेटनें मुलीच्या बापाला नऊ महिन्यांची सक्त मजूरीची कैद आणि पांचशें रुपये दंड या प्रमाणे शिक्षा देऊन त्याची बोळवण केली! योग्य केलें.
धा. वृ.

---

**व्ही. पी. बुक प्याकेट**—खानापूरचे लोकमित्राचे म्यानेजर यांस बळ्ळारीहून एका गृहस्थानें व्ही. पी. नें अनंतरंग नांवाचें पुस्तक पाठविण्याविषयीं लिहीलें. रीतीप्रमाणें त्या पुस्तकाची बंगी लागलीच रवाना झाली. पुढें सहा सात दिवसांनीं मागविणारा गृहस्थ ' स्वीकारीत नाहीं ' ह्मणून ती बंगी परत आली. पोष्टांत सही देऊन ती बंगी वापस घेतल्यावर ती फुटल्या सारखी दिसली ह्मणून ती पोष्टाजवळच कांहीं गृहस्थां समक्ष फोडून पाहिली तों त्यांतील अनंतरंग हें पुस्तक जाऊन त्याच्या मोबदला एक जुनें तेलगू लिपीचें छापी पुस्तक आढळलें!

---

बंगी रजिष्टर्ड असून शिवाय विमा उतरलेली असल्या[?] शिवाय तिची पूर्ण जबाबदारी पोष्टाकडे नाहीं हें तर [?]घडच आहे. गेलेल्या मालाची किंमत मालकास जरी [?]रून मिळाली नाहीं तरी ही लबाडी कशी व कोठें झाली या बद्दल चौकशी होणे अवश्य आहे. लोकमित्रा[?] म्यानेजरनीं वरिष्ठाकडे अर्ज केल्याचें समजतें.

# पुस्तकें विक्रीस तयार.

**गुप्तविद्या आणि अद्भूत चमत्कर संग्रह**– यांत दृष्टीचा मंत्र, विंचू उतरण्याचा मंत्र, विझलेला दिवा अग्नि वांचून लावणें, भूत दिसणें, गुरांचे किडे जाण्यास उपाय, हरवलेली वस्तू सांपडण्यास उपाय, पिशाच पळविण्याचे साधन, सर्पाचे विषाचा मत्र, धान्यास कीड न लागण्यास उपाय, सालंमिश्री तयार करण्याची कृती इ० इ० उपयुक्त व चमत्कारिक असे १७१ विषय आहेत. किंमत ८ आणे. ट. ख. १ आणा.

**उपयुक्त संग्रह**–यांत भूपाळ्या, स्तोत्रें, अष्टकें, अभंग, श्लोक, आरत्या, पदें, नीति, चरित्रें, आख्यानें आर्या इत्यादी ७३ विषय आहेत पुस्तकाचीं पृष्ठें ४३२ असून छपाई व बांधणी नीर्णयसागरची उत्तम. किंमत १ रु. टपाल खर्च माफ.

**पुराणांतील मौजेच्यागोष्टी**– ह्या श्रीराम, श्रीशंकर, श्रीकृष्ण, पांडव व नारद यांचे संबंधीं घडलेल्या अत्यंत हास्य कारक आणि पुण्यकरक अशा पुराण ग्रंथाच्या आधारानें लिहील्या आहेत. अनायसेंच मनाची कर्मणूक होऊन पुण्यही घडतें. असा या पुस्तकांचा दुहेरी फायदा आहे. या गोष्टी वाचतांना पोट धरधरून हासें आल्यावांचून रहात नाहीं. हरदासलोक कथेंतून कधीं कधीं ह्या मोठ्या प्रेमानें सांगतात. व त्या ऐकतां ऐकतां पुरूष स्त्रिया व मुलें यांची हंसून हंसून मुरकुंडी वळते. किंमत ६ आणे ट. ख. १ आणा.

**पत्ता**–हरी सखाराम खानोलकर. पोष्ट खानापूर.

जि. बेळगांव. )

# जी. बी. नाईक कंपनीच्या विजेच्या

# आंगठ्या, पुतळ्या, कडीं, लेखण्या, व पट्टे

७५,००० वर विकल्या, रोज पुष्कळ खपत आहेत.



गुण आल्याचे हजारो दाखले मिळाले व नित्य मिळतात.

रक्त हें मनुष्याचें जीवित आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे. रक्त खराब असल्यामुळें होणारे **सर्व रोग** ह्या लहानशा अतिस्वस्त ब्याटरी वापरल्या पासून **बरे होतात**, हें **जगत्प्रसिद्ध** आहे. करितां अशी ही उत्तम, गुणकारी सर्व रोग शमविणारी, अंगावर सुशोभित दिसणारी, औषधी खटपट चुकविणारी, चमत्कारिक **भूषणावह** व **आरोग्यदायक** वस्तूचा संग्रह करून अनुभव पहा व मित्रमंडळींत फैलाव करा, ही विनंती.

## विजेच्या वस्तूची किंमत.

| | | |
|---|---|---|
| पितळी आंगठीस कि. रु. १॥ | पुतळीस कि रु. १। | धा. कड्यास कि. १॥ |
| चांदीचे आंगठीस कि रु. ३ | पुतळीस कि. रु २ | धा. लेखणीस कि. १॥ |
| सोन्याचे आंगठीस कि. रु. २० | पुतळीस कि. रु. २२ | रेश्मीगळपट्टा कि. १॥ |

खोटा माल घेऊन फसूं नका. आमचे प्रत्येक वस्तूवर G.B.N मार्क पाहून घेत जा. एकदम बारा नग घेणारांस एक जास्त मिळेल. बंगी करणावळ माफ. १ पासून ६ पर्यंत ट. ह. ६ आणे रोख दाम आल्यास किंवा व्ही. पी. नें मागविल्यास पाठवूं. अनेक रोगांवर गुण आल्याचे शेकडो सर्टिफिकिटांचें पुस्तक मालाबरोबर पाठवूं, किंवा अर्धा आणा पाठवून मागवा, ह्मणजे पाठवूं. बाहेर गांवीं एजंट पाहिजेत.

जी. बी. नाईक आणि कंपनी, जुन्या दावणी समोर, भायखळा, मुंबई. व बुधवारपेठ पुणें.

# खानदेशमित्र.

॥ श्लोक ॥ (वसंततिलका.)

कस्यापि कोप्यतिशयोऽस्ति स तेन लोके
ख्याति प्रयाति नहि सर्व विदस्तु सर्वे ॥
किं केतकी फलति किं पनसः सपुष्पः
किं नागवल्ल्यपिच पुष्पफलैरुपेता ॥ १ ॥

पुस्तक १ लें. एप्रिल. १८९३. अंक ६ वा.

विषय. अनुक्रमणिका. पृष्ठ.


१ पिरली ब्राह्मण.... .... ........१२०
२ रंजन आणि सुबोध. .... ........१२९
३ सार्थ सुभाषितें.... .... ........१३७
४ स्फुट.... .... .... ........१३९
५ कूट प्रश्नोत्तर..... .... ........१४२
६ कूट प्रश्न.... .... .... ........१४२
७ निवडक वर्तमान सार..... ........१४३


बेळगांव येथें 'बेळगांवसमाचार' छा० छापिलें.

वर्गणीचे दर.

वर्षाचे अगाऊ ट. ह. सह..... ....१८३
फुटकळ अंकास किंमत ८२

प्रकाशक–ह० स० खानोलकर आणि मंडळी.
पोष्ट खानापूर. (जि. बेळगांव.)

## पुस्तकें विक्रीस तयार.

**गुप्तविद्या आणि अद्भूत चमत्कार संग्रह**– यांत द्दष्टीचा मंत्र, विंचू उतरण्याचा मंत्र, विझलेला दिवा अग्नि वांचून लावणें, भूत दिसणें, गुरांचे किडे जाण्यास उपाय, हरवलेली वस्तू सांपडण्यास उपाय, पिशाच पळविण्याचें साधन, सर्पाचे विषाचा मंत्र, धान्यास कीड न लागण्यास उपाय, सालंमिश्री तयार करण्याची कृती इ० इ० उपयुक्त व चमत्कारिक असे १७१ विषय आहेत. किंमत ८ आणे. ट. ख. १ आणा.

**उपयुक्त संग्रह**–यांत भूपाळ्या, स्तोत्रें, अष्टकें, अभंग, श्लोक, आरत्या, पदें, निती, चरित्रें, आख्यानें आर्या इत्यादी ७३ विषय आहेत पुस्तकाचीं पृष्ठें ४३२ असून छपाई व बांधणी नीर्णयसागरची उत्तम. किंमत १ रु. टपाल खर्च माफ.

**पुराणांतील मौजेच्यागोष्टी**– ह्या श्रीराम, श्रीशंकर, श्रीकृष्ण, पांडव व नारद यांचे संबंधीं घडलेल्या अत्यंत हास्य कारक आणि पुण्यकरक अशा पुराण ग्रंथाच्या आधारानें लिहील्या आहेत. अनायसेंच मनाची करमणूक होऊन पुण्यही वडतें. असा या पुस्तकांचा दुहेरी फायदा आहे. या गोष्टी वाचतांना पोट धर रून हासें आल्यावांचून रहात नाहीं. हरदासलोक कथेंतून कधीं कधीं ह्या मोठ्या प्रेमानें सांगतात. व त्या ऐकतां ऐकतां पुरूष स्त्रिया व मुलें यांची हंसून हंसून मुरकुंडी वळते. किंमत ६ आणे ट. ख. १ आणा.

पत्ता–रामचंद्र गोविंद सामंत. पोष्ट–खानापूर.

जि. बेळगांव. )

मासिक पुस्तक.

# खानदेशमित्र.

## पिरली ब्राह्मण.

सांप्रतकाळीं ग्रह नक्षत्रांवरून शुभाशुभ फल वर्तविणें हा विषय ह्मणजे केवळ थट्टाच झाली आहे. कित्येक लोकांचें ह्मणणें असें असतें कीं, आकाशांतील ग्रहनक्षत्रांच्या गतीवर मनुष्य प्राण्याचें सुखदुःख अवलंबून असण्याचा मुळींच संभव नाहीं. जन्म नक्षत्र, शुभाशुभ ग्रह पहाणें ह्मणजे केवळ भटजी बुवांच्या प्राप्तीची एक बाब आहे, अशी लोकांची समजूत होणें सहाजिकच आहे. कारण हल्लींचे ज्यातीषी प्रश्न पहाण्या साठीं रुपया, दोन रुपये अशी फी घेऊन ‘ तुह्मास या खेपेस मुलगा होईल ’ ‘ तुमची हरवलेली वस्तू अमके दिवसांत अमक्या ठिकाणीं खास सांपडेल’ असें सांगतात. पुढें मुलगा होईल ह्मणून सांगितलेले ठिकाणीं मुलगी होते, व हरवलेल्या वस्तूचा मुळींच पत्ता लागतनाहीं. अशी गोष्ट अनुभवास येऊन ज्योतीष ह्मणजे सर्व लबाडी आहे, अशी असमंजस लोकांची समजूत होते. हल्लींच्या बऱ्याच ज्योतीषांचीं सांगणीं अनेक वेळां खोटीं ठरतात, हा दोष ज्योतीष शास्त्राचा नव्हे तर ज्योतीषी बुवांचें तत्संबंधीं ग्रंथाव-

लोकन व ज्ञान हींच कोतीं असतात असें ह्मणावें ला-गतें. प्राचीनकाळीं या शास्त्रांत निष्णात अशा ज्योती-षांनीं वर्तविलेलीं फळें, ब्रह्मलिखिता प्रमाणें, पुढें खा-त्रीनें अनुभवास आलेल्या अनेक गोष्टी ग्रंथांतरीं अढळ तात. त्यांपैकीं पिरली नामक एका तामिळ ब्राह्मणाचें मनोरंजक चरित्र आह्मीं आपल्या वाचकांकरितां या अंकीं दिलें आहे. यावरून प्राचीन काळीं ज्योतीष शास्त्राधारें भविष्य सांगण्याची विद्या किती पूर्णतेस आली होती हें सहज लक्षांत येईल.

**पिरली**, हा वेदमैळी नामक ब्राह्मणाचा मुलगा. वेदमौळी हा मोठा सदाचार संपन्न व भविष्यवादी होता. त्या मुळें लोक त्यास सिद्ध पुरूष असें समजत. हा सुमारें दोन अडीच हजार वर्षांमागें कर्नाटक प्रां-तांत होता, अशी जनवार्ता आहे.

एकदां रात्रींस वेदमौळी अपल्या अंगणांत उभा असतानां आकाशांतून एक दैदिप्यमान् तारा तुटून त्याच गांवांतील एका अंत्यजाचे घरावर पडतानां त्यानें पाहिला. ती वेळ ध्यानांत ठेऊन तो निजावयास गेला. सकाळीं उठतांच महार वाड्यांत कालरात्रीं कोणी नवें मूलजन्मास आलें आहे कीं काय,. याचा शोध केला. त्यावरून शोध घेणारानें एका अंत्यजास त्याच वेळीं एक मुलगी झाल्याचें, त्यास येऊन कळविलें. कांहीं वेळ गणीत करून पुढें एकदम तो मोठ्या विवंचनेंत पडला. कारण त्या मुलीचा विवाह आपल्या मुलाशीं होणार, असें त्याच्या गणीतांत आलें.

नंतर तो विचार करूं लागला कीं, हा योग टा-

ळण्यास उपाय काय करावा? ती मुलगी जन्मली त्यावेळेस पिरली बारा वर्षांचा होता. व त्यास त्या योगाची गुणगुणही कळली. वेदमौळीनें पुढें असें केलें कीं, गांवांतील सर्व ब्राह्मणांस आपले घरीं बोलावून आणून सभा केली. आणि मोघम सर्वांस असें कळविलें कीं, काल रात्रीं एका अंत्यजाचे घरीं जी एक मुलगी जन्मली आहे. तिच्या योगानें ब्राह्मणांवर मोठें संकट येऊन गुजरणार आहे. तेव्हां पुढें काय करावें? हें भाषण ब्राह्मणांनीं ऐकून व हा प्रामाणिक असल्यामुळें याचें बोलणें प्रमाण समजून सर्वांनीं त्या अंत्यजास बोलावून आणलें; व सांगितलें कीं, तुला काल जी मुलगी झाली आहे तिची हानी तूं सोसतोस कीं ब्राह्मणांवर संकट यावें असें तूं इच्छितोस? तो हात जोडून ह्मणाला महाराज, ब्राह्मणांच्या हितासाठीं तिची हानी सोसण्यास मी राजी आहें; मात्र इतकेंच कीं तिचा घात करण्यास आपण मला आज्ञा करूंनये; मी तिला आणून आपले स्वाधिन करतों. नंतर आपणांस वाटेल तसें तिचें करावे. इतकें बोलून तो घरीं गेला व कन्या आणून ब्राह्मणांच्या स्वाधील केली व आपण निघून गेला.

अंत्यजानें आणून दिलेल्या कन्येस ब्राह्मणांनीं पाहून विचार केला कीं तिचा घात करणें अयोग्य आहे; यास्तव तिला पेटींत घालून नदींत सोडून द्यावें. मग तिच्या दैवानें होणें असेल तें होवो. या विचारास वेदमौळीचेंही अनुमत पडून ब्राह्मणांनीं एक पेटी आणिली. तींत त्या मुलीस मोठ्या बंदोबस्तानें घालून

ती पेटी कावेरी नदींत सोडून दिली. ती मुलगी पेटींत घालतांना सर्वा बरोबर पिरलीनेंही पाहिली होती. त्या वेळीं तिच्या मांडीवर असलेला आकृती विशेषाचा सतेज तीळ यानें पाहिला असून तो याच्या लक्षांत होता.

ती कन्या घातलेली पेटी कावेरी नदींतून वहात चालली असतां, दूरदेशीं एका गांवा जवळच्या किनाऱ्यास लागली. तो किनारा ब्राह्मण मंडळीचा स्नान संध्या करण्याचा घाट होता, त्या वेळेस कोणी एक विद्वान् ब्राह्मण तेथें संध्या करीत बसला होता, त्यानें ती पेटी पाहून बाहेर काढली व मोठ्या आस्थेनें उघडली आणि पहातो तों नुक्तीच जन्मलेली एक मुलगी तींत आहे. तिला पाहून त्यास मोठा आल्हाद झाला कारण त्यास संतती नसून मूलाबाळा विषयीं तो अतिशय उत्कंठित होता. ह्मणून ती मुलगी मोठ्या प्रेमानें त्यानें घरीं आणिली व तीला चांगल्या रीतीनें वाढवून सुशिक्षित केलें. ती नीतिशास्त्रांत बरीच प्रवीण झाली.

इकडे पिरलीचा पिता वेदमोळी कांहीं काळानें परलोक वासी झाला. पित्यापाशीं झालेलें थोडें अध्यायन पुरें करावें, अशी पिरलीस इच्छा उत्पन्न झाली. त्या गांवीं त्याचें नीटसें जुळेना ह्मणून त्यानें गांवोगांवीं फिरून पढविण्या जोग्या विद्वानाचा शोध आरंभिला. फिरतां फिरतां दैव योगानें अशी गोष्ट घडली कीं, ज्या घरीं ती मुलगी वाढत होती त्याच घरीं तो येऊन उतरला. त्या ब्राह्मणानें पिरलीचा मोठा आदरसत्कार केला. नंतर दुसरे दिवशीं त्याची विचार पूस करतां त्यास अध्यायनाची मोठी उत्कंठा आहे, असें

कळून आलें. पिरलीसही कळलें कीं तो ब्राह्मण चांगला विद्वान असून त्याला शिकविण्याची आवड आहे. अशा प्रकारें पिरली त्या ब्राह्मणाचे घरीं राहून विद्याभ्यास करूं लागला.

पिरलीची बुद्धी व सदाचार संपन्नता त्या ब्राह्मणानें पाहून मनांत आणलें कीं, आपणास पुत्र नाहीं; कायती एवढी सांपडलेली कन्या मात्र आहे. यास्तव ही यास देऊन याला घरजांवई करावा, हा विचार त्यानें पिरलीस कळविला. तो ह्मणाला आपण आज्ञा कराल ती मला मान्य आहे. या त्याच्या अनुमतावरून त्या ब्राह्मणानें ती मुलगी मोठ्या समारंभानें विवाहविधिपूर्वक पिरलीस दिली.

पुढें पिरलीची आणि त्याच्या बायकोची परस्परांवर मोठी प्रीती जडली. कारण विद्या, वय आणि सदाचार या गुणांनीं तीं उभयतां एकमेकांस साजण्या सारखीं होतीं. एकदां असें झालें कीं पिरलीची बायको न्हाऊन कोरडें वस्त्र नेसत असतां त्यानें लहानपणीं पाहिलेला तिचे मांडीवरील तीळ एका एकीं त्याचे दृष्टीस पडला. त्या बरोबर त्यास मागील गोष्टीची आठवण होऊन त्याच्या पोटांत धस्स झालें. परंतु खुणे सारख्या खुणा दुसऱ्या जागीं नसतातच असा नेम नाहीं. तशांत ज्याचे आपण जांवई आहों तो ब्राह्मणही सामान्य नाहीं. इत्यादी विचार मनांत आणून ती गोष्ट त्यानें त्या वेळेस मनांतून घालविली. पुढें कांहीं महिन्यांनीं यास असा पत्ता लागला कीं, कावेरी नदींतून वहात आलेल्या पेटींत सांपडलेल्या मुलीचें त्या

ब्राह्मणानें पालन केलें व तिच्याशींच आपला विवाह झाला. या वरून आपल्या बापानें केलेल्या भविष्याची त्यास स्मृति होऊन आपल्या बायकोस किंवा सासऱ्यास त्यानें त्या गोष्टीची कांहीं एक ओळख न देतां आपण सर्वथैव भ्रष्ट झालों, असें समजून कोणास कळूं न देतां त्याच दिवशीं त्यानें देशांतरीं गमन केलें.

पिरली बाहेर गेला तो आतां येईल, घटकेनें येईल; अशी वाट पहातां पहातां तो दिवस निघून गेला. या प्रमाणें आठवडा गेला, महिना गेला तरी त्याचा ठिकाण नाहीं. हें पाहून त्याची बायको फार शोक करूं लागली. तिच्या बापासही अतिशय दुःख झालें. परंतु त्याचा वृद्धापकाल असल्यामुळें त्याच्यानें जामाताचे शोधास जाववेना; व कन्येचाही शोक उणा होईना; मग त्यानें मुलीसच सांगितलें कीं, आतां तुझ्या नवऱ्याचा तूंच शोध लाव; मी तर मजकडून होईल तितकें तुझें बरें केलें; परंतु तुझ्या प्रारब्धास मी काय करावें? असें बापाचें बोलणें ऐकून ती त्याच्या आज्ञेनें नवऱ्याच्या शोधास निघाली.

एका गांवांत शोध कर, दुसऱ्या गांवांत शोध कर, असें फिरतां फिरतां त्याची व तिची एक्या गांवीं अकस्मात् गांठ पडली. तेव्हां तिनें त्याची पाठ न सोडतां त्यास बहुत प्रकारें विनवून ह्मटलें कीं, आपण घरीं चलावें; परंतु तो तिचें ह्मणणें ऐकत नाहीं असें पाहून निरुपायानें तो जिकडे जाईल तिकडे त्याच्या मागें ती हिंडूं लागली. अशा रीतीनें जरी तिनें त्याचा पिच्छा घेतला व कित्येक वेळां त्यागाचें कारण वि-

चारलें; तरी त्यानें तिला तूं ह्मणजे अशी अशी आहेस या बद्दल चकार शब्द बोलून सुद्धां कधींही तिला दुखविलें नाहीं. याप्रमाणें हिंडतां हिंडतां एके दिवशीं तीं दोघें एका गांवीं मुक्कामास उतरलीं. तेथें निजल्यावर मध्यरात्रीचे सुमारास तिला झोंप लागली, असें पाहून तिथुन तो मुकाट्यानेंच निसटला. नंतर पहांटेस ती जागी होऊन पहाते तों नवरा तेथें नाहीं, ह्मणून ती रडूं लागली. व सूर्योदय झाल्यावर तेथून दुसऱ्या गांवास जाण्यास निघाली. त्या गांवीं गेल्यावर तेथील एका वृद्ध श्रीमान् गृहस्थानें तिला विचारलें 'मुली, तूं कोठून आलीस? तूं कोणाची कोण व अशी दीन कशानें झालीस?' त्या वरून तिनें आपली इत्थंभूत हकीगत सांगितली. तें ऐकून त्या सज्जन गृहस्थास तिची दया येऊन त्यानें तिला आपली धर्म कन्या ह्मणून आपल्या घरीं ठेऊन घेतली.

पुढें सुमारें एका वर्षानें तो गृहस्थ मरण पावला. परंतु मरणापूर्वी त्यानें आपली सर्व जिंदगी मुलांस वांटून देतानां एक भाग हिचा काढून तो लागलीच तिला देवविला. तो घेऊन तिनें त्यावर एक अन्नसत्र घातलें. त्यामुळें शेंकडों लोक तेथें उतरण्यास येऊन जेऊन जाऊं लागले. या प्रमाणें अन्न संतर्पण करीत व आपलें आयुष्य नीतीनें व सदाचरणानें घालवीत तिनें बरेच दिवस लोटले. असा क्रम चालला असतां इकडे फिरली, फिरत फिरत एकेदिवशीं अकस्मात् त्याच अन्नसत्रांत जेवावयास उतरला. तेव्हा तिनें इतर पांतस्थां प्रमाणें याचाही सत्कार करून यास भोजन दिलें. भोजन

झाल्यावर पिरलीनें सहजगत्या आपण कोण वगैरे हकीगत पुसली. कारण यानें तिला मुळींच ओळखलें नव्हतें. तिनेंही यास न ओळखून आपली हकीगत सारांशानें त्यास कळविली. ती वरून तिची ओळख पटून व तिचा उत्तम आचार व पातिव्रत्य पाहून यास गहिंवर आला. परंतु तो दाबून तिला ओळख न देतां तो तसाच निजावयास गेला.

नंतर पहाटेस उठून गांठोडें खांद्यावर घेऊन तो निघाला असतां, हा चांगला विद्वान ब्राह्मण आहे, असें जाणून ती त्यास अपल्या दारापर्यंत पोंहोंचविण्यास आली. त्या वेळेस जें तिनें सत्काराचें भाषण केलें, तें ऐकून यास जो हुंदका आला त्या बरोबर हा खालीं बसला. व गांठोडें जमिनीवर ठेवून त्यानें तिला ओळख दिली. व इतःपर तुला सोडून जाणार नाहीं, असें वचन दिलें. नंतर तीं उभयतां सुखानें नांदूं लागून त्यानीं तेथें बराच काळ काढला.

पुढें हीं दोघेंही पुनः गांवोगांव हिंडूं लागलीं या प्रवासांत यानां सात मुलें झालीं. जें जें मूल जेथें जेथें उपजे तें तें त्या त्या गांवाजवळच्या अरण्यांत सोडून त्यांनीं पुढें चालतें व्हावें. याचें कारण पिरलीनें बायकोस कधींही सांगितलें नाहीं. व तिनेंही यास तुह्मीं असें कां करतां ? ह्मणून कधींही विचारलें नाहीं. मात्र ज्या रानांत मुलास नवरा सोडी तेथें वस्ती घडल्यास ती त्याकडे वारंवार जाऊन त्याचा समाचार घेई. असें सांगतात कीं ज्या ज्या मुलाजवळ ती ज्या ज्या वेळेस शोक करीत बसे त्या त्या वेळेस त्यास वाचा फुटून

तें तिचें असें समाधान करी कीं, ज्या समर्थ ईश्वरानें मला उत्पन्न केलें, तो माझें संरक्षण करण्यास शक्तिमान् आहे; यास्तव तूं शोक करूं नको.

सारांश तीं सात मुलें वेगवेगळ्या जातीच्या घरीं मोठ्या चमत्कारानें वाढून त्यांचा तेथें सांभाळ झाला, ही हकीगत तामीळ भाषेंत 'कांडप्र' नांवाच्या ग्रंथांत सविस्तर लिहिलेली आहे, असें कविचरित्र कारानीं लिहिलेलें आहे.

---

# रंजन आणि सुबोध.

## रंजन.

**चित्त ठिकाणीं आणणें**— एक जण गांवास जाण्यास निघाला असतां त्याचा मित्र त्याजपाशीं आपल्या इष्ट मित्रांस सांगण्याचे निरोप सांगूं लागला. हा मुशाफर आपले वाटेचा जमानिमा करण्यांत व गांठोडीं बांधण्यांत वगैरे अगदीं गढून गेला असल्या मुळें त्या मित्राच्या बोलण्याला नुस्तें तोंडानें हुकार मात्र देत होता, पण त्याकडे त्याचें लक्ष बिलकूल नव्हतें. हें त्याच्या मित्राच्या लक्षांत आलें. कारण, जें जें सांगावें त्याला त्याला हा आपला होहोच करीत गेला! तेव्हा त्यानें मनांत आणलेंकीं आतां असें उपयोगीं नाहीं या बोवांचा तर आपले ठिकाणीं अगदीं लय लागून गेला आहे तर याच्याच तोंडून याची फजीती करावी! असा विचार करून हा पुनः कांहीं आठवल्या

सारखें करून त्यास ह्मणतो 'अरे, हो, पण एक सांगावयाचें राहिलें.' मुशाफरानें आपल्या नादांतच परत विचारलें, 'काय?' हा सांगतो, 'दुसरें कांही नाहीं अमच्या पुढल्या दारीं पाण्याचा आड आहे कीं नाहीं, तो येणारा जाणाराला उगीच अडचण करतो तर तेवढा उचलून मागल्यादारीं ठेवा, ह्मणून आमच्या घरच्या माणसांस सांग ह्मणजे झालें!

हे गृहस्थ उत्तर करतात 'बरें आहे.' तें ऐकतांच त्याचा मित्र खो खो हंसायाला लागला तेव्हां ते बोवा सावध होऊन त्यानीं आपली चूक कबूल केली!

**भिकारी**—एक भिकारी एका मोठ्या वाड्यांत गेला, आणि कांहीं मागूं लागला. कोणीं आंतून उत्तर केलें 'बाईसाहेब घरीं नाहींत जा.' भिकारी उत्तर करतो, 'मला बाईसाहेब नकोत; मला कांहीं घाला ह्मणजे मी चाललों.'

**अप्रासंगिक उक्ती**—कोणते वेळेस काय बोलावें याचें तारतम्य ज्ञान नसलें तर मोठा अनर्थ होतो. कोणा एका गृहस्थाचे घरीं लग्नाचें मोठें प्रयोजन चाललें असतां श्लोक, आर्या इत्यादी ह्मणून शेवटीं सीताकांतस्मरणांची मोठी गर्दी उडाली होती. इतक्यांत एका बाळ्यानें आर्या ह्मणण्यास आरंभ केला:–

**प्रभुनें यापरी तुमचा,**
**जांवाई आणि खपविला व्याही .**

हें आर्येचें अर्ध संपलें नाहीं तोंच त्या मुलावर सर्वांनीं शिव्यांचा भडिमार केला, व कित्येक तर त्याला

हांकून द्यावयासही तयार झाले. कोणत्या प्रसंगाची आर्या कोणत्या प्रसंगीं ह्मणावयाची याचें विचाऱ्यास ज्ञान नसल्या मुळें त्याची फट फजीती होऊन त्यास तोंड दाखवायास जागा राहिली नाहीं.

**सुभद्रा गर्वहरण**—एकदां नारद व कृष्ण उभयतां सुभद्रेच्या मंदिरीं सहज गेले. बसावयास आसनें देऊन कांहीं इकडचें तिकडचें भाषण झाल्यावर सुभद्रा ह्मणते, ‘ कृष्णा खरेंच ह्मटले तर मी तुझी सख्खी बहीण. असें असून मजपेक्षां द्रौपदीवरच तुझें विशेष प्रेम कां बरें? द्वारकेहून आला न आलास तों आधीं तिच्या मंदिरीं जाऊन तिचा समाचार घ्यावयाचा; भूक लागली तर तिच्या जवळ मागावयाचें; साता समुद्रापलीकडची जरी एखादी वस्तू तिनें मागितली तरी हर प्रयत्नानें ती आणून द्रौपदीला द्यावयाची. तिनें हांक मारली कीं सगळीं कामें टाकून आधीं धावत जावयाचें असें कां ह्मणून ?

**कृष्ण**—ताई, रागावू नकोस खरें सांगू? द्रौपदीचा अंतःकरणाचा प्रकार कांहीं निराळा; तोंडानें सांगतां येण्याजोगा नाहीं. ऐखादे प्रसंगीं मी ह्मणतों हें तुझ्या प्रत्ययास आणून देईन.

या गोष्टीस बरेच दिवस लोटून गेले पुढें एक मोठा उत्साहाचा दिवस आला त्या दिवशीं चोहोंकडे रोषणाई केली असून घरांतील लहान मोठ्यांच्या अंगावर सर्व अलंकार व उत्तम वस्त्रें वापरावयास दिलीं होतीं त्या दिवशीं नारदाचीही स्वारी अकस्मात् आली तेव्हां सहज नवीन शस्त्राशीं खेळतां खेळतां कृ-

ष्णानें आपला हात कापून घेतला. घाव मोठा पडून रक्त एकसारखें वाहूं लागलें! कृष्णानें दुसऱ्या हातानें तो धरून चिंधी आणण्या साठीं नारदास सुभद्रेकडे पाठविलें. धावत जाऊन नारद ह्मणतो ‘ सुभद्रे, एखादी चिंधी भिजवून लवकर दे. कृष्णाचा हात कापून रक्ताचा प्रवाह चालला आहे’ हें ऐकून सुभद्रा लगबगीनें चिंधी शोधूं लागली. जें जें गांठोडें सोडावें त्यांतील लुगडीं, चोळ्या, धोतरें सर्व धडधकट असल्या मुळें तिच्यानें तीं फाडवेनात. व दुसरी चिंधीतर मिळेना. तेव्हां नारद ह्मणाला ‘ इतका वेळ शोधतेस, काय एक चिंधी तुला सांपडत नाहीं? शाबास! असें बोलून तो कृष्णाकडे परत आला व चिंधी सांपडत नाहीं ह्मणून सांगूं लागला. कृष्ण ह्मणाला बरें द्रौपदीकडे तरी जाऊन एखादी मिळते का पहा. नारद तिच्या मंदिरीं जाऊन पहातो तों सर्व अलंकार अंगावर घालून अर्जुनानें नुक्ताच आणलेला अमूल्य शालू नेसून बसलेली त्याच्या दृष्टीस पडली. तिलाही त्याच प्रमाणें सांगितलें. हें ऐकतांच तिनें अंगावरील शालूचा पदर फाडून, तत्काळ पाण्यांत बुडवून, धांवत येऊन कृष्णाच्या हातास गुंडाळूं लागली. इतक्यांत सुभद्राही तेथें आली. कृष्ण तिजकडे पाहून ह्मणतो, ‘ ताई पाहिलेंस का हें अंतःकरण? तुझ्या जवळ नव्हतें का एखादें जुनें पुरानें लुगडें? एवढ्या करितांच द्रौपदी वर माझी जास्त माया आहे बरें! हें ऐकून सुभद्रेस मागे बोलल्याची आठवण होऊन ती अगदी खजील झाली.

# सुबोध.

## नीति.

१. सत्य भाषण करावें, विश्वासघात करूं नये, वगैरे नीतीच्या गोष्टी सर्व जाणतात. पण त्याप्रमाणें वागणारे थोडे, यामुळें सर्वांचेंच अनहित होत आहे.

२. परस्परां विषयीं अविश्वास झाल्यामुळें सर्व व्यवहार बिघडले आहेत. दुसऱ्यास फसविण्याच्या हेतूनें प्रत्येकजण आपल्यासच फसवून घेतो आहे.

३. याकरितां प्रत्येकानें आपली जीभ आटपून धरून असत्य भाषण करावयाचेंच नाहीं, असा निश्चय करून चालावें. ह्मणजे परिणामीं त्याचें हित झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

---

## सभ्यता आणि नम्रता.

१ मनुष्य कितिही विद्वान् असला, तरी त्याच्यामध्यें सभ्यता आणि नम्रता हे दोन गुण नसतील तर त्याच्या विद्येचा उपयोग फारच कमी होतो. आणि हे दोन गूण असतील तर ते त्याच्या विद्येस मोलवान् अलंकाराप्रमाणेंच शोभा देतात.

२. हल्लीं ह्या दोन गुणांच्या संपादनाकडे नवीन तरूण मंडळीचें असावें तितकें लक्ष्य नाहीं, असें दिसतें. थोडीशी विद्या आलीकीं अहंपणा, बेपर्वाई, दुसऱ्यांचा उपमर्द करण्याची संवय, यांचा अम्मल तेव्हांच बसलेला आढळतो.

३. ही स्थिति फारच खेदकारक आहे. हिच्यापासून फार मोठा अपाय घडत आहे. अनेक व्यक्तींचें ऐक्य होण्यास, ऐक्यानें देश हिताचीं कामें होण्यास, फार अडचणी येतात. दहा मंडळी एकत्र झाली असतां एखादें काम सुयंत्र होण्याऐवजीं उलट परस्परांमध्यें द्वेष उत्पन्न होतो. असे प्रकार वारंवार घडतात.

४. हा अनिष्ट प्रकार टाळण्याचा यत्न फार लवकर केला पाहिजे. नाहींतर याचा परिणाम पुढें फार भयंकर होईल. गर्व, तुसडेपणा, उतावीळपणा, दुसऱ्याविषयीं क्षुद्रबुद्धी, तापटपणा हीं टाकून त्या ऐवजीं लीनता, सरळपणा, प्रेमसन्मानबुद्धी व शांति ह्यांचा संग्रह करण्याकडे मुलांचें लक्ष्य वळविलें पाहिजे.

५. हें काम शाळांतील सर्व लहान मोठ्या शिक्षकांचें आहे. ते विद्यार्थ्यांच्या वाईट संवयीबद्दल जबाबदार आहेत व विद्यार्थ्यांस उत्तम चाली रीती शिकविल्याबद्दल भूषणही त्यांसच आहे.

६. विद्यार्थी नम्र होण्यास शिक्षकही तसेच पाहिजेत. पण ते सर्वत्र तसेच आहेत असें दिसत नाहीं. याकरितां शाळांच्या मुख्य अधिकाऱ्यांनीं शिक्षकामध्यें हे गुण आहेत किंवा नाहींत हें पाहून मग त्याची शिक्षकाचे कामावर योजना करीत जावी. नुसती विद्याच पाहून उपयोग नाहीं.

---

## स्वच्छता.

स्वच्छते पासून सुख व मलिनते पासून दुःख प्राप्त होतें, याचा अनुभव थोडा फार सर्वत्रांस आहे. अं-

गावर चिखल, माती उडाली तर ती कोणासही त शीच राहूं द्यावीशी वाटत नाहीं. पण स्वच्छतेच्या ज्या गोष्टी इतक्या उघड नसतात त्याविषयीं लोक हेळसांड करितात.

२. घर आंतून स्वच्छ ठेविलें व त्याच्या भोंवतालीं घाण ठेविली तर घराच्या स्वच्छतेचा तितका उपयोग होत नाहीं. करितां घरें, दारें, रस्ते, गल्ल्या सर्व स्वच्छ ठेवावीं. मोऱ्यांचें पाणी घरा शेजारीं जिरूं देऊं नये. केराचे उकरडे घराशेजारीं जमवूं नयेत. घराच्या कोंपऱ्यांतून केर सांचवूं नये. घाणेरड्या वाड्या पेक्षां स्वच्छ झोंपडी चांगली समजावी.

३. हवा ही अदृश्य वस्तु आहे, पण तिजवर आपला सर्व प्राण अवलंबून आहे. ह्मणून घाणेरडी हवा व स्वच्छ हवा ह्यांतील भेद नेहमीं लक्ष्यांत ठेवावा. घरांत स्वच्छ हवा येईल अशी तजवीज ठेवावी. हवेस प्रतिबंध करूं नये.

४. खाण्याचें अन्न, पिण्याचें पाणी, ल्यावयाचीं वस्त्रें वगैरे सर्व पदार्थ स्वच्छ ठेवावे. मलीन पक्वान्नापेक्षां निर्मळ भाकर गोड, अशुद्ध सरबता पेक्षां स्वच्छ पाणी अधिक हितावह; मळकट पितांबरापेक्षां पांढरा शुभ्र पंचा अधिक शोभायमान समजावा.

५. शरीर, वस्त्रें, घरदार, भांडींकुडीं, अन्नपाणी, इत्यादी सर्व स्वच्छ ठेवण्याविषयीं जपावें, पण त्याहून ही अंतःकरण शुद्ध ठेवण्याविषयीं अधिक जपावें. सर्व वस्त्र भूषणांच्या शोभेपेक्षां सद्गुणाची व सदाचरणाची शोभा अधिक आहे.

## ज्ञान आणि क्रिया.

१. कोणत्याही गोष्टीचें नुसतें ज्ञान होऊन उपयोग नाहीं. ज्ञानाप्रमाणें क्रिया झाली पाहिजे. अन्न कसें तयार करावें, किंवा एकादी औषधी कशी बनवावी, हें कळलें पण त्याप्रमाणें अन्न किंवा औषधी बनविली नाही तर क्षुधेचें किंवा रोगाचें निवारण कसें होईल?

२. हल्लीं आपल्या देशांत ज्ञानाचा प्रसार ज्या मानानें होत आहे त्या मानानें क्रिया घडत नाहीं. यामुळें आमची फार फजीती होत आहे. लेखांत, भाषणांत आमची जितकी तरतरी दिसते तिच्या शतांशही कृतींत अजून दिसत नाहीं.

३. पुरुषां प्रमाणें स्त्रियाही ज्ञानास पात्र आहेत, ज्ञानावांचून मनुष्य पशुप्रमाणें होय, वगैरे गोष्टी पोरां बाळांच्याही तोंडीं झाल्या आहेत. पण स्त्रियांस विद्या शिकवून ज्ञान प्राप्ती करून देण्याचे कामीं किती हय गय होत आहे? कला कौशल्याच्या कामांत सुधारणा झाली पाहिजे. ह्मणून किती ओरड चालली आहे, पण त्या कामांत कोण पडत आहेत? स्वदेशी माल वापरावा, ह्मणणारे पुष्कळ आहेत, पण वापरणारे किती थोडे आहेत? असाच प्रकार सर्व गोष्टींत आढळतो.

४. ज्ञानाचा व क्रियेचा जोंपर्यंत असा विरोध राहील, तोंपर्यंत आमचा देश कधींही सुधारणेच्या खऱ्या मार्गास लागणार नाहीं. आतां कोरडी बडबड नको. आचरण पाहिजे आहे.

# सार्थ सुभाषितें.

कार्येषु मंत्री करणेषु दासी ।
भोज्येषु माता शयनेषु रंभा ॥
धर्मानुकूला क्षमया धरित्री ।
भार्याच षड्गुण्यवतीह दुर्लभा ॥१॥

अर्थ— कार्याविषयीं प्रधानासारखी दक्ष, गृहकृत्य करण्यास दासी सारखी तत्पर, भोज्य पदार्थाविषयीं मातेसमान, शयनस्थानीं रंभेसारखी रूपादिगुणांनीं उत्कृष्ट, धर्माविषयीं अनुकूल, व क्षमारूपगुणानें केवळ धरीत्री सारखी सहनशील, अशा सहा गुणांनीं युक्त अशी भार्या या लोकांत दुर्लभ असते !

वीणेव श्रोत्र हीनस्य लोलाक्षीव विचक्षुषः ॥
व्यसोः कुसुम मालेव विद्या स्तब्धस्य निष्फला २

अर्थ— कर्णहीनास जसा वीणानाद निष्फल, मृगनयना स्त्री जशी अंधापुढें व्यर्थ, व पुष्पमाला जशी गतप्राण देहास व्यर्थ, तशी नम्रता रहित पुरुषास विद्या निष्फल आहे.

आस्ते विधुः परमनिर्वृत एव मौलौ ।
शंभोरिति त्रिजगती जन चित्तवृत्तिः ॥
अंतर्निगूढ नयनानलदाहदुःखं ।
जानाति कः परमृते बत शीतरश्मेः ॥३॥

अर्थ— चंद्र शिवाच्या मस्तकावर परम सुखीच आहे, असें त्रैलोक्यांतील जनाच्या चित्तवृत्तीला भासतें; परंतु शंकराच्या कपाळावरील झांकलेल्या तृतीय नेत्रां-

तील अग्नीच्या दहाचें परम दुःख त्या चंद्रावांचून इतर कोण जाणतो? तात्पर्य— थोर लोक बाहेरून जरी सुखी भासतात तरी त्यांचें अंतर्दुःख इतरांह समजत नाहीं.

किंचिदाश्रय सौंदर्याद्धत्ते शोभामसाध्यपि ॥
कांता विलोचने न्यस्तं मलीमसमिवांजनम् ॥

अर्थ— वाईट पदार्थही सौंदर्याच्या किंचित् आआश्रयानें शोभा पावतो. याचें उदाहरण असें कीं, सुंदर स्त्रीच्या नेत्रांत काजळ घातलें असतां तें मलिन असूनही शोभतें !

उद्यमः साहसं धैर्यं बुद्धिः शक्तिः पराक्रमः ॥
पडेते यत्र वर्तंते तत्र देवः सहायकृत् ॥ ५ ॥

अर्थ— उद्योग, साहस, धैर्य, बुद्धी, शक्ती, व पराक्रम हे सहा गूण जेथें असतात, तेथें देवच सहाय्य करणारा आहे असें जाणावें.

त्यजन्ति मित्राणि धनैर्विहीन पुत्राश्च दारा ।
श्च सुहृज्जनाश्च ॥ तमर्थवंतं पुनराश्रयान्ति ।
ह्यर्थोहि लोके पुरुषस्य बंधुः ॥ ६ ॥

अर्थ— मित्र, पुत्र, स्त्रिया व संबंधी जन हे धन विरहित पुरुपाचा त्याग करतात; आणि तोच पुरुष द्रव्यवान् झाला कीं, ते मित्रादिक पुनः त्याचा आश्रय करतात. यावरून लोकांत धनच पुरुषास बंधूरूप आहे असें सिद्ध होतें.

परोपदेशे पांडित्यं सर्वेषां सुकरं नृणां ॥
धर्मे स्वयमनुष्ठानं कस्यचित् सुमहात्मनः ॥७॥

अर्थ— परोपदेशा विषयीं पांडित्य करणें, सर्व मनुष्यांस सुलभ आहे; परंतु स्वतःचें धर्मानें आचरण घडणें, हें एखाद्या अतिशयित महात्म्यासच घडतें व तें घडणें फार दुर्घट आहे.

सद्विद्या यदि का चिंता वराकोदर पूरणे ।
शुकोप्यशन प्राप्नोति हरे राम इति ब्रुवन् ॥८॥

अर्थ— जर उत्तम विद्या असली तर क्षुद्र उदर भरण्याची चिंता कशास पाहिजे ? कारण ' हरे राम ' असें बोलणाऱ्या राघूसही भोजन मिळतें. मग विद्वानास मिळेल यांत नवल काय ?

---

## स्फुट.

### निरनिराळ्या स्थळीं सूर्याच्या उदयास्तांत पडणारा फरक.

पृथ्वी गोलाकार असून ती सूर्या सभोंवतीं फिरत असतां रोज ह्मणजे २४ तासांत एक वेळ आपल्या आंसावर फिरते, या प्रदक्षिणेला दैनंदिन प्रदक्षिणा असें ह्मणतात. ती पश्चिमेकडून पूर्वेकडे फिरते त्यामुळें पूर्वेकडील स्थळीं सूर्योदयास्त अगोदर होतात आणि पश्चिमेकडे मागाहून होतात. पृथ्वीच्या पूर्वपश्चिम परीघाचे ३६० अंश मानिले आहेत. हे ३६० अंश २४ तासांत क्रमाक्रमानें सूर्यासमोर येतात. तेव्हां प्रत्येक अंशास चार मिनिटें लागतात. ह्मणजे पूर्वेकडच्या कोणत्याही स्थळीं सूर्योदयास्त, झाल्यापासून तेथून पश्चिमेकडच्या एक अंशावर असणाऱ्या स्थळीं चार

मिनीटें मागाहून सूर्योदयास्त होतो. १५ अंशावर पश्चिमेकडे असणाऱ्या स्थळीं पूर्वेकडील स्थळाच्या मागाहून १ तासानें होतो. हें उघडच झालें. यावरून दोन स्थळांमधील सूर्योदयास्ताचें अंतर काळाच्या रूपानें दिल्यास त्या काळाचीं मिनीटें करून त्यांस चोहोंनीं भागावें ह्मणजे त्या दोन स्थळांमधील अंशात्मक अंतर निघेल; त्या अंशास ६९१/२ यांनीं गुणिलें असतां त्या दोन स्थळांमधील पूर्व पश्चिम अंतर मैलांत निघेल. तसेंच दोन स्थळांमधील अंतर मैलांत दिल्यास त्या मैलांस ६९१/२ यांनीं भागून त्यांचे अंश करावे व त्या अंशांस चोहोंनीं गुणून त्याचीं मिनिटें काढावीं; ह्मणजे त्या दोन स्थळांमधील काळात्मक अंतर निघेल. तसेंच स्थळ आपल्या पूर्वेकडे असल्यास आपल्या घड्याळापेक्षां तिकडे वरील प्रमाणानें जास्त वेळ झाला असेल. व स्थळ आपल्या पश्चिमेस असल्यास आपल्या घड्याळापेक्षां तिकडे कमी वेळ झाला असेल. उन्हाळें, सूर्य मध्यान्हीं येतो तेव्हां,लावण्याची चाल आहे, हें मुंबई, पुणें, बेळगांव वगैरे ठिकाणीं १२ वाजतां तोफा सुटतात यावरून सर्वांस माहीतच आहे. मुंबईच्या घड्याळांत दोन प्रहरचे बरोबर १२ वाजतात तेव्हां पृथ्वीवरील मुख्य मुख्य ठिकाणच्या घड्याळांत किती वाजले असतात याची माहिती वाचकांच्या उपयोगासाठीं या खालीं दिली आहे.

मुंबईच्या घड्याळांत दोन प्रहरचे १२ वाजतात तेव्हां

| | | | |
|---|---|---|---|
| बोस्तन | ( अमेरिका ) येथें | पहाटेचे | २-२६. |
| न्यूयार्क | ( ,, ) | ,, | २-५२. |

| | | | |
|---|---|---|---|
| फिलादेल्फिया | (अमेरिका) | पहांटचे | २- ७. |
| क्विबेक | ( ,, ) | ,, | २-२३. |
| दब्लिन | ( ऐर्लंड ) | सकाळीं | ६-४३. |
| एदिन्बरो | ( स्काटलंद ) | ,, | ६-५९. |
| ग्लासगो | ( ,, ) | ,, | ६-५१. |
| लिस्बोन | ( पोर्तुगाल ) | ,, | ६-३१. |
| माद्रिड | ( स्पेन ) | ,, | ६-४३. |
| आमस्तर्दाम | ( हालंड ) | ,, | ७-२७. |
| अथेन्स | ( ग्रीस ) | ,, | ८-४३. |
| बर्लिन | ( प्रुश्या ) | ,, | ८- २. |
| ब्रुसेल्स | (बेल्ज्यम्) | ,, | ७-२३. |
| केपटौन | (द.आफ्रिका) | ,, | ८-२२. |
| कान्स्तांतिनोपल | ( तुर्कस्थान ) | ,, | ९- ४. |
| कोपनहेगन | ( देन्मार्क ) | ,, | ७-५८. |
| फ्लारेन्स | ( इताली ) | ,, | ७-५३. |
| येरूशालेम | ( तुर्कस्थान ) | ,, | ९-२९. |
| माल्टा | ( भूमध्यसमुद्र ) | ,, | ८- ६. |
| मास्को | ( रशीया ) | ,, | ९-३८. |
| म्यूनिक | ( जर्मनी ) | ,, | ७-५४. |
| पारीस | ( फ्रान्स ) | ,, | ७-१७. |
| प्राग | ( आस्त्रीया ) | ,, | ८-६. |
| रोम | ( इताली ) | ,, | ७-५८. |
| रातर्दाम | ( हालंड ) | ,, | ७-२६. |
| सेंत पीतर्सबर्ग | ( राशीया ) | ,, | ९-९. |
| सुवेझ | ( इजिप्त ) | ,, | ९-१८. |
| स्टाकहोम | ( स्वीदन ) | ,, | ८-२०. |

| | | | |
|---|---|---|---|
| स्ततगार्त | ( जर्मनी ) | सकाळीं | ७-४९. |
| व्हियेना | ( आस्त्रीया ) | ,, | ८-१४. |
| लंडन | ( इंग्लंड ) | ,, | ७-८. |
| ओदेलद | ( आस्त्रालीया ) | संध्याकाळीं | ४-१९. |
| मेलबोर्न | ( ,, ) | ,, | ४-४८. |
| सिदनी | ( ,, ) | ,, | ५.१३- |
| कलकत्ता | ( हिंदुस्थान ) | दोनप्रहरीं | १-२. |
| मद्रास | ( ,, ) | ,, | १२-२९. |
| पेकीन | ( चीन ) | ,, | २-५४. |

## पांचव्या अंकांतील कूट प्रश्नोत्तर.

ि ( ऱ्हस्व वेलांटी. ) **मिरज** शब्दांत ऱ्हस्व वेलांटी आहे, ती **मिनिट** यांत दोनदां दिसते; **दिवस** यांत एकदांच दिसते; पण वर्ष याशब्दांत मुळींच दृष्टी पडत नाहीं !

( बरोबर उत्तर देणारांचीं नांवें. )

१. **विनायक दत्तात्रय फाटक**, वाई (बक्षीस मि०)
२. महादेव राघोजी आंबेरेकर, मिठबाव, देवगड.
३. केशवराव शिवराम परांजपे, मिरज.

## कूट प्रश्न.

( विविध वजाबाकी. )

फक्त मराठी तिसऱ्या, चवथ्या व पांचव्या इयत्तें-तील मुलां करितां.

१ एकर यांतून ३ रूढ, ३९ पोल, ३० चौ.यार्ड, २ चौ.फूट ३९ चौ.इंच वजा करा. ( विविध वजाबाकीच्या रीतीनें करा. )

उत्तरें ता. १९-९-९३ चे आंत पाठवा. बरोबर उत्तर देणारांत ज्याचें नांव सोडतींत येईल त्यास छत्रे कृत अंकगणीत भाग १।२ बक्षीस मिळतील. उत्तरें पाठविण्याचा पत्ता:-

'प्रकाशक खानदेशमित्र'
पोष्ट- खानापूर
( जि. बेळगांव. )

---

# निवडक वर्तमानसार.

आगगाडीच्या डब्यांत तेलाच्या दिव्यां ऐवजीं धुराचे दिवे सुरूकरावे; असें सदर्न मराठा रेल्वे कंपनीनें ठरविलें आहे.

---

लंडन शहरावर नेहमीं धुकें पडतें, तेव्हां त्या शहरावर कांचेचें आच्छादन करण्याचें घाटत आहे. युरोपियनांची कल्पनाच अचाट!

---

लंडन येथें एक मोठी कंपनी आहे त्या कंपनीचे आफीसांत पाकीटावर पत्ते लिहीण्याचे व तीं रवाना करण्याचे कामावर अडीचशें नोकर आहेत!

---

पारीस शहरांत जागजागीं कांहीं खांब बसविले

आहेत. त्यांत अशी युक्ती आहेकीं, त्याला ठेविलेल्या एका छिद्रांत एक पै टाकून दुसरी एक कळ असते ती दाबली, ह्मणजे, खालच्या बाजूस तोटी असते तींतून धार लागून एक कळशीभर आधणाचें पाणी बाहेर येतें. पै टाकली नाहीतर पाणी येत नाहीं.

---

भामटे लोकांनीं नवीन असे कांहीं कागद तयार केले आहेत कीं, ते हातांत घेऊन वाचूं लागलें ह्मणजे वाचणारा बेशुद्ध होतो! भामटे लुबाडून घेऊन फरारी होतात. लोकांनीं सावध असावें.

---

काठेवाड प्रांतांत धनगरांची एक जात आहे. त्या जातींत वीस वर्षांनीं एक लग्नाचें साल येत असतें तें गेलें साल होतें ह्मणून तिकडे अतोनात लग्नें झालीं. एक तासाचें उपजलेल्या मुलाचें सुद्धां लग्न झाल्याचीं उदाहरणें आहेत!

---

एका युरोपियनानें आपले कल्पनेनें एक नवीन विमान बनविलें आहे. तें आकाशांतून दरतासास दोनशें मैल जाईल इतका त्याचा वेग राहील असें सदर कल्पक खात्रीनें सांगतो!

---

इंग्लंडांत अत्यंत त्वरेनें आगगाडी चालू लागली असतां एक तासांत ९१ मैल जाते.

---

सदर्न मराटा रेल्वेला सर्वत्र कुंपण नसल्या मुळें बरींच जनावरें प्राणास मुकतात!

# अनंतरंग.

हें पूर्ण शृंगारिक माहितीचें पुस्तक प्रत्येक तरुण पुरुषानें ता० ३१-५-९३ पर्यंत मागविल्यास व्ही. पी. खर्चासह १२ आण्यांस मिळेल मुदती नंतर १५ आणे.

पत्ता—ह० स० खानोलकर आणि मंडळी.

पोष्ट—खानापूर

( जि०—बेळगांव. )

---

# पुस्तकें विक्रीस तयार.

**निबंध लेखन**— मराठींत शुद्ध, सरळ व मार्मिक कसें लिहावें, याबद्दल बारीक माहिती पाहिजे असल्यास याची एक प्रत अवश्य संग्रहीं ठेवावी. किंमत १० आणे ट. ख. १ आणा.

| पुस्तकाचें नांव | किंमत | ट. खर्च. |
|---|---|---|
| रिपोर्ट लेखनपद्धती. | -॥= | 6- |
| सर्वसंग्रह. ( विषय १८७ ) | १ | 6= |
| हरिविजय. (मोठा टाईप, सचित्र.) | १\|- | -॥= |
| रामविजय. ( वेष्टणासह, मो. टा. ) | २ | -॥= |
| पांडवप्रताप (मो.टा. जाड कागद.) | २\|- | -\|\|\|- |
| शिवलीलामृत. ( रेशमी बांधीव. ) | ·\|≡ | 6-॥ |
| संतलीलामृत. ( अध्याय ३९. ) | -॥= | 6≡ |
| शनिमहात्म्य. ( मोठी पोथी. ) | 6=॥ | 6- |
| ज्योतीष सार. | १ | 6≡ |

पत्ता—'प्रकाशक खानदेशमित्र'

पोष्ट—खानापूर.

( जि. बेळगांव. )

## जी. बी. नाईक कंपनीच्या विजेच्या

# आंगठ्या, पुतळ्या, कडीं, लेखण्या, व पट्टे.

७५,००० वर विकल्या, रोज पुष्कळ खपत आहेत.



गुण आल्याचे हजारो दाखले मिळाले व नित्य मिळतात.

रक्त हें मनुष्याचें जीवित आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे. रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग ह्या लहानशा अतिस्वस्त ब्याटरी वापरल्या पासून बरे होतात, हें जगत्प्रसिद्ध आहे. करितां अशी ही उत्तम, गुणकारी सर्व रोग शमविणारी, अंगावर सुशोभित दिसणारी, औषधी खटपट चुकविणारी, चमत्कारिक भूषणावह व आरोग्यदायक वस्तूचा संग्रह करून अनुभव पहा व मित्रमंडळींत फैलाव करा, ही विनंती.

### विजेच्या वस्तूची किंमत.

| | | |
|---|---|---|
| पितळी आंगठीस किं. रु. १॥ | पुतळीस किं रु. १। | धा. कड्यास किं. १॥ |
| चांदीचे आंगठीस किं रु. ३ | पुतळीस किं रु २ | धा लेखणीस किं. १॥ |
| सोन्याचे आंगठीस किं. रु. २० | पुतळीस किं. रु. २२ | रेशमीगळपट्टा किं. १॥ |

खोटा माल घेऊन फसूं नका. आमचे प्रत्येक वस्तूवर G.B.N मार्क पाहून घेत जा. एकदम बारा नग घेणारांस एक जास्त मिळेल. बंगी करणावळ माफ. १ पासून ६ पर्यंत ट ह. ६ आणे रोख दाम आल्यास किंवा व्ही. पी. नें मागविल्यास पाठवूं. अनेक रोगांवर गुण आल्याचें शेंकडों सर्टिफिकिटांचें पुस्तक मालाबरोबर पाठवूं, किंवा अर्धा आणा पाठवून मागवा, ह्मणजे पाठवूं. बाहेर गांवीं एजंट पाहिजेत.

**जी. बी. नाईक आणि कंपनी, जुन्या दावणी समोर, भायखळा, मुंबई. व बुधवारपेठ पुणें.**

# खानदेशमित्र.

॥ श्लोक ॥ (वसंततिलका.)

कस्यापि कोप्यतिशयोऽस्ति स तेन लोके
ख्यातिं प्रयाति नहि सर्व विदस्तु सर्वे ॥
किं केतकी फलति किं पनसः सपुष्पः
किं नागवल्ल्यपिच पुष्पफलैरुपेता ॥ १ ॥

पुस्तक १ लें. मे. १८९३. अंक ७ वा.

विषय. अनुक्रमणिका. पृष्ठ.


१ बसव चरित्र. .... .... ....१४५
२ रंजन आणि सुबोध. .... ........१५३
३ सार्थ सुभाषितें.... .... ........१६३
४ स्फुट.... .... .... ........१६५
५ कूट प्रश्नोत्तर..... .... ........१६७
६ कूट प्रश्न.... .... .... ........१६७


बेळगांव येथें 'बेळगांवसमाचार' छा० छापिलें.

## वर्गणीचे दर.

वर्षाचे अगाऊ ट. ह. सह..... ....१८२

फुटकळ अंकास किमत ८२

प्रकाशक—ह० स० खानोलकर आणि मंडळी.
पोष्ट खानापूर. (जि. बेळगांव.)

## पुस्तकें विक्रीस तयार.

**गुप्तविद्या आणि अद्भूत चमत्कार संग्रह**–यांत दृष्टीचा मंत्र, विंचू उतरण्याचा मंत्र, विझलेला दिवा अग्नि वांचून लावणें, भूत दिसणें, गुरांचे किडे जाण्यास उपाय, हरवलेली वस्तू सांपडण्यास उपाय, पिशाच पळविण्याचें साधन, सर्पांचे विषाचा मंत्र, धान्यास कीड न लागण्यास उपाय, सालंमिश्री तयार करण्याची कृती इ० इ० उपयुक्त व चमत्कारिक असे १७१ विषय आहेत. किंमत ८ आणे. ट. ख. १ आणा.

**उपयुक्त संग्रह**–यांत भूपाळ्या, स्तोत्रें, अष्टकें, अभंग, श्लोक, आरत्या, पदें, नीती, चरित्रें, आख्यानें आर्या इत्यादी ७३ विषय आहेत पुस्तकाचीं पृष्ठें ४३२ असून छपाई व बांधणी नीर्णयसागरची उत्तम. किंमत १ रु. टपाल खर्च माफ.

**पुराणांतील मौजेच्यागोष्टी**– ह्या श्रीराम, श्रीशंकर, श्रीकृष्ण, पांडव व नारद यांचे संबंधीं घडलेल्या अत्यंत हास्य कारक आणि पुण्यकारक अशा पुराण ग्रंथाच्या आधारानें लिहील्या आहेत. अनायसेंच मनाची करमणूक होऊन पुण्यही घडतें. असा या पुस्तकांचा दुहेरी फायदा आहे. या गोष्टी वाचतांना पोट धरधरून हासें आल्यावांचून रहात नाहीं. हरदासलोक कथेंतून कधीं कधीं ह्या मोठ्या प्रेमानें सांगतात. व त्या ऐकतां ऐकतां पुरूष स्त्रिया व मुलें यांची हंसून हंसून मुरकुंडी वळते. किंमत ६ आणे ट. ख. १ आणा.

पत्ता–रामचंद्र गोविंद सामंत. पोष्ट–खानापूर.
जि. बेळगांव. )

मासिक पुस्तक.

# खानदेशमित्र.

## बसव चरित्र.

बसव हा महादेव भट्ट नांवाच्या आराध्य ज्ञातीय तैलंगी ब्राह्मणाचा मुलगा. याच्या आईचें नांव मदलंबिका. विजापूरच्या पूर्वेस मुद्देबिहाळ तालुक्यांत बागेवाडी ह्मणून एक गांव आहे, तेथें हा शालिवाहनाचे अकरावे शतकांत जन्मला. लिंगाईत धर्म यानें नवा काढून तो चालू केला. यास पद्मावती आणि नागलंबिका अशा दोन बहिणी होत्या. त्यांपैकीं पद्मावती विजल राजास दिली होती व नागलंबिका एका ब्राह्मणानें वरिली होती.

विजल राजा हा जैन धर्मी होता. असें असतां बसवाची बहीण पद्मावती ब्राह्मणाची मुलगी असून तिचा विवाह त्याशीं कसा झाला यांतील बीज काय तें कांहींच कळत नाहीं. महादेव भट्टास पुष्कळ दिवस संतती नव्हती. ह्मणून त्यानें आपला कुलस्वामी नंदीनाथ याची बहुत सेवा केली. तेव्हां त्याच्या प्रसादानें त्यास बसव हा एक पुत्र व दोन कन्या मिळून तीन मुलें झालीं.

बसव हा लवकरच लिहिण्या वांचण्यांत हुशार होऊन स्वजातीय आराध्य ब्राह्मणांच्या धर्म शास्त्रांतही

चांगला प्रवीण झाला. पुढें महादेव भट्टाचा निर्वाह बागेवाडींत होईना ह्मणून तो आपलें सर्व कुटुंब घेऊन कलबुर्ग्या जवळच्या कल्याण गांवास आला. तेथें त्याचा जांवई राज्य करीत होता. तो जैन धर्मी होता. त्यानें बसव हा चांगला शहाणा आहे असें पाहून त्यास एक मोठ्या हुद्याची जागा दिली. ती देण्याचीं दोन कारणें होतीं. एक तर तो त्याचा मेहुणा. व दुसरें त्याचा प्रधान जो बलदेव याचाही तो जांवई होता.

बसवाचें जन्म, मुंज आणि लग्न या तिहीं विषयीं बसव पुराणांत असें वर्णन केलें आहे:—

नंदीनाथाच्या प्रसादानें मदलंबिका गरोदर झाल्यावर बसव हा तीन वर्षें पर्यंत गर्भांत होता. त्यामुळें तिला अतिशय वेदना होऊं लागल्या ह्मणून तिनें आपली सुटका होण्यासाठीं नंदीनाथाची प्रार्थना केली. तेव्हां तिला दृष्टांत झाला कीं, 'या भूलोकावर वीर शैव धर्माची स्थापना करण्या करितां मीच स्वतः तुझ्या उदरीं अवतार घेतला आहे. तर तूं माझें नांव बसव असें ठेवावेंस.' ( नंदीस कानडींत व तैलंगींत 'बसव' असें ह्मणतात. ) हा दृष्टांत झाल्यावर गळ्यांत लिंग बांधलेला असाच बसव गर्भांतून बाहेर आला; व दृष्टांत झाल्याप्रमाणें तिनें त्याचें नांव नवऱ्यास सांगून बसव असेंच ठेविलें.

पुढें बसवास आठवें वर्ष लागलें असें पाहून महादेव भट्टानें त्याची मुंज करण्याची सिद्धता केली. परंतु बसवानें बापास सांगितलें कीं 'मला मुंज कर्तव्य नाहीं. कारण मला ब्राह्मणादि वर्णत्व मुळींच नसन मी शिव-

भक्त आहें. आणि ज्ञातिवृक्ष उपटून टाकण्याकरितांच मी जन्म घेतलें आहे.' ऐन मुंजीच्या समारंभांत त्यानें केलेलें हें भाषण तेथें जमा झालेल्या सर्व लोकांनीं ऐकिलें. त्या समारंभास विजलाचा प्रधान बलदेव आलेला होता, त्यानें हें भाषण ऐकून बसव हा कोणी अलौकिक पुरुष आहे. असें जाणून आश्चर्ययुक्त होत्साता त्यानें आपली कन्या गंगादेवी त्यास देऊं केली.

पुढें लवकरच बसवाचें लग्न झालें. व विजल राजाचे दरबारीं त्यास मोठ्या हुद्याची जागाही मिळाली. तें काम तो मोठ्या दक्षतेनें करीत असे. इतक्यांत बलदेव मरण पावल्यामुळें प्रधानकी, सेनापत्य व जामदारपणा हीं तीन्ही कामें बसवानें करावीं, असा राजानें हुकूम केला व त्यास त्या त्या अधिकारांचीं वस्त्रेंही दिलीं. विजल राजा आपल्या पद्मावती नामक नव्या राणीशीं क्रीडा करण्यांत रात्रंदिवस निमग्न होऊन सर्व राज्यभार त्यानें बसवावर निर्धास्त सोंपविला. यावेळीं बसवास ज्या ज्या गोष्टी कर्तव्य होत्या त्या त्या त्यानें करण्यास आरंभ केला.

जे जुने कामदार त्याच्या हेतूस प्रतिकूल होते त्यांस युक्तीयुक्तीनें कामावरून दूर करून त्या जागीं त्यानें आपल्या पक्षाचे लोक नेमिले. मोठ मोठ्या जमींदार लोकांस त्यांच्या जमिनी जप्त करण्याची भीती घालून त्यांस आपल्या पक्षास मिळवून घेतलें. या प्रमाणें राज्यांत सर्वत्र त्याचे पक्षाचे लोक झाल्यावर

मग त्यानें आपला नवीन धर्म स्थापण्याचा प्रयत्न सुरू केला.

बसवानें जो नवा धर्म काढला त्यांत जाती भेद मुळींच नव्हता. ‘ शिव ’ आणि ‘ नंदी ’ यांस मात्र भजावें इतर देवांस भजूंनये. असा त्यानें नेम ठरविला. आराध्य ब्राह्मणांत शिवलिंग दंडास बांधण्याची जी चाल होती ती मोडून तें गळ्यांत बांधण्याची चाल त्यानें घातली. या शिवाय मांस न खाणें व ईश्वरास अर्पण केल्या शिवाय कोणताही पदार्थ न भक्षणें ही ब्राह्मणांतील रीत तशीच कायम राखिली.

बसव हा आपणास ‘ नंदीचा अवतार ’ असें ह्मण वी. व त्यानें स्वतः ठरविलेला संस्कारविशेष जो कोणी करून घेई त्याशीं तो मोकळ्या मनानें सर्व व्यवहार करी. हा संस्कार अमक्यानेंच करावा, इतरांनीं करूंनये, असा प्रतिबंध नव्हता. तर ब्राह्मणा पासून धेडा पर्यंत तो करण्यास सर्वांस सारखी मोकळीक होती. व तो केला कीं ब्राह्मण व धेड लागलीच समान योग्यतेचे मानिले जात.

हा बसवाचा नवा धर्म कर्नाटकांत लवकरच पसरला व तो पसरण्याचीं कारणें येणें प्रमाणें होतीं:—पहिलें कारण असें कीं, हा धर्म आराध्य ब्राह्मणांच्या धर्मांत थोडा फेरफार करून काढला होता; दुसरें कारण, बसवाच्या हातीं जबरदस्त राज्याधिकार होता; तिसरें, त्यांत जातिभेद नसल्यामुळें धेडासही ब्राह्मणाचे पंक्तीस बसून खुशाल जेवण्यास मोकळीक झाल्यानें, नीच जात त्यांत पुष्कळ शिरली; चौथें, राजाचा खजीना बसवाचे

हातीं असल्यामुळें त्यास हवा तो खर्च करून लोकांस आश्रय देण्यास सांपडे; तेणेंकरून चोर, जार, दुर्व्यसनी व छांदिष्ट अशा लोकांनींही जरी हा धर्म स्वीकारिला तरी त्यांस बसव भोजन देई; आणि पांचवें, ब्राह्मण व जैन या लोकांत धर्म संबंधानें वाद चालू होता ह्मणून ब्राह्मणांस बसवाच्या मताकडे लक्ष पुरविण्यास अवकाश सांपडला नाहीं.

विजलाचे पदरचे मंचन्न वगैरे दुसरे अधिकारी बसवाच्या कागाळ्या त्या पुढें वारंवार नेत. परंतु राजा तिकडे बिलकुल लक्ष देईना. त्यामुळें बसवाची सत्ता व वजन दिवसें दिवस अधिकाधिक वाढत जाऊन त्याच्या अनुयायांची संख्या मोठी झाली. ती अशी कीं, बस वाच्या जीवावर नित्यशः जेऊन व खुशाल मन मानेल त्या रीतीनें वागून प्रसंगीं त्याचा पक्ष धरणारे त्या शहरांतच बारा हजार लिंगाईत होते.

या प्रमाणें होतां होतां बसवाचें एकंदर कृत्य विजल राजाच्या मनांत कांहीं दिवांसनीं भरून त्यास पराकाष्ठेची भीति उत्पन्न झाली. व तीमुळें त्यानें युक्तीनेंच बसवास कैद करावें असा विचार केला; परंतु ती गोष्ट फुटून बसव कल्याण शहरांतून निसटला. त्या बरोबर राजानें त्याचा पाठलाग केला. तों इकडे सर्व लिंगाईत बसवास मिळून राजाची व त्याची गांठ पडतांच उभयतांची लढाई झाली. त्यांत राजाचा मोड होऊन तो बसवास शरण आला.

नंतर राजा व बसव दोघे एकत्र होऊन कल्याणास परत आले. आणि बसव पूर्वी प्रमाणें राज्यकारभार

पाहूं लागला. परंतु बसवाचें मन राजा विषयीं साशंक झाल्यानें त्यानें त्याच्या घाताचा विचार आरंभिला. असें करण्यांत त्याचा हेतु एवढाचकीं राजा मेला असतां त्याचा पुत्र जो वीरविजल हा अज्ञान आहे तों पर्यंत आपणांस पाहिजे तें करण्यास अडचण पडणार नाहीं. हा उद्देश त्यानें कसा साधला या विषयीं विजल काव्याच्या अकराव्या व बाराव्या सर्गांत येणें-प्रमाणें लिहिलें आहे:—

कोलापुरच्या महामंडलेश्वरानें केलेलें बंड मोडून विजल राजा कल्याणास परत येत असतां भीमा-नदीचे तीरीं तो येऊन पोंचतांच तेथें बसवानें अन्नांत विष घालून त्यास ठार मारलें. हीच मारल्याची गोष्ट चन्नबसव पुराणाच्या ९२ व ९३ व्या अध्यायांत अशी आहे कीं, जगदेव, बोम्मदेव व मालेय या तिघीं मशालजीनीं मशालींत हत्यारें लपवून राजाचा भर दर-बारांत वध केला. ही गोष्ट शके सुमारें १०७६ किंवा १०७७ मध्यें घडली. यास शिलालेखाचेंही प्रमाण पडतें.

विजल राजास अशा अपघातानें बसवानें मारवि-ल्यावर पुढें त्याचें त्यासच भय पडलें कीं, न जाणों राजपुत्र या गोष्टीचा सूड उगवील. यास्तव आतां येथें रहाणें बरोबर नाहीं. असा विचार करून तो तेथून निघून मलबार किनाऱ्यास विरीषपुर ह्मणून लहानसें शहर होतें तेथें जाऊन राहिला. इतक्यांत राजपुत्र पाठलाग करीत येऊन त्यानें यास गांठलें; व शहरास वेढा दिला. तेव्हा बसवानें पाहिलें कीं

आतां आपला बचाव होणें कठीण आहे ह्मणून त्यानें तेथें एक विहीर होती तींत ' उळिवेनु ' असा शब्द उच्चारून उडी टाकून जीव दिला. ' उळिवेनु ' या कानडी शब्दाचा अर्थ ' मी मुक्त होईन ' असा आहे. या वरून विरीषपुरीस उळिवी हें नांव पडलें आहे. या गांवास लिंगाईत लोक फार मानतात. व तेथें यात्रेसही जातात.

बसवाच्या मरणाची ही हकीगत जैन लोकांच्या ग्रंथांतून घेतली आहे. हीच हकीगत लिंगाईत लोक या प्रमाणें सांगतात कीं मलप्रभा आणि कृष्णा या नद्यांच्या संगमावरील संगमेश्वर नामक लिंगांत बसव शिरून अदृश्य झाला. यास प्रमाण लिंगाच्या मस्तकावर असलेला खोलगा ते दाखवितात. परंतु उळिवी या नांवावरून जैन लोकांनीं लिहिलेली हकीगत खरी असावी असेंच पुष्कळ अंशीं वाटतें.

लिंगाईत धर्म बसवाचे वेळे पासून कर्नाटकांत चालू झाला. तो अजून तेथें चालू आहे. हल्लीं कर्नाटकच्या दक्षिण भागीं जेथें लोक कानडी भाषा बोलतात तेथें या धर्माचे लोक बरेच आहेत तसेंच कानडा जिल्हा, निजामाच्या राज्याचा पुष्कळ भाग, सुंडा, ह्मैसूर आणि बल्लारी वगैरे प्रांतांत लिंगाईत लोकांची संख्या पुष्कळ आहे.

कांहीं वर्षां पूर्वीं बंगाल्यांत जो नवा ब्राह्म धर्म निघाला आहे त्याच तोडीचा हा लिंगाईत धर्म आहे. असें ह्मणण्यास हरकत नाहीं. कारण जाती भेद न पाळणें, हें तत्त्व तर दोहोंतही सारखेंच आहे. विटाळशीचा

विटाळ, तसेंच सूतक व सुयेर हे न धरणें लिंगाईतां प्रमाणेंच ब्राह्म धर्मांत असल्यामुळें त्याचें व याचें साम्य बरेंच जुळतें. बसवाचे वेळेस सोंवळें ओंवळें, नीच जातीचा अन्नास स्पर्श इत्यादिकांचा प्रत्यवाय अगदींच नव्हता; परंतु आलीकडे ती चाल बरीच बदलली जाऊन ब्राह्मण लोकांचे रीती प्रमाणेंच कांहींसा थाट दिसूं लागला आहे.

आलीकडे लिंगाईतांत संस्कृत शिकण्याची पुष्कळ उत्कंठा वाढली आहे. व ती प्रमाणें त्यांत विद्वानही बरेच आढळतात. परंतु उपासने संबंधानें माध्व जसे वागतात तसेच हेही वागतात. ह्मणजे असें कीं, त्यांनीं यांचा स्पर्श निंद्य मानिल्यास हेही त्यांचा तसाच मानितात.

वर असें लिहिण्यांत आलें कीं, लिंगाईतांच्या बायका विटाळशीचा विटाळ पाळीत नाहींत या विषयीं 'लाविली राख आणि झाली पाक' अशी ह्मणही ऐकण्यांत येते. परंतु शोधा अंतीं असें कळून येतें कीं ही गोष्ट सर्वच बायका करितात असें नाहीं. ज्या बायकांचा नित्यनेम जंगमाचें पादतीर्थ प्राशन केल्या वांचून भोजन करावयाचें नाहीं ती मात्र स्वतः तशी करते इतर करीत नाहींत.

लिंगाईतांत आलीकडे वारकरी पंथानें वागणारे लोक पुष्कळ झाले आहेत; आणि त्या वरून विष्णूचा द्वेषही त्यांच्यांत बराच कमी आहे; तथापि कर्नाटक सोलापूर व बारशी येथें 'एको विष्णुर्महद्भूतं' या

जागीं ‘एको रुद्रो महद्भूतं’ असा नवा संकल्प रचून जंगम समाराधना करणारे लोकही आमच्या पहाण्यांत बरेच आले आहेत. ( आ. कोश. )

---

# रंजन आणि सुबोध,

## रंजन.

**जेवणाची वेळ**—एका पंडितास एकानें विचारलें; ‘महाराज, जेवणास उत्तम वेळ कोणती?’ त्यानें उत्तर केलें ‘श्रीमंताची वेळ त्यास वाटेल तेव्हां, व गरीबाची वेळ त्यास अन्न मिळेल तेव्हां!’

**दोघे चितारी**—दोघां चिताऱ्यांची स्पर्धा लागून वरचढ कोण ह्मणून वाद पडला. तेव्हा प्रत्येकानें आपली करामत अतिशय खर्चून एक एक नवी तजबीर काढावी असें ठरलें. एकानें द्राक्षांचा घड काढून तें चित्र आपल्या दारावर लाविलें. तेव्हां पाखरें येऊन त्यावर टोंच्या मारूं लागलीं. तें पाहून दुसऱ्यानें त्यास आपली तजबीर दाखविण्यास आपल्या घरीं बोलाविलें. तेथें गेल्यावर त्यानें त्या दुसऱ्यास पुसलें ‘कां, कोठें आहे तजबीर?’ त्यानें उत्तर केलें ‘या पडद्याच्या आड!’ असें ह्मणतांच तो पहिला चितारी पडदा एकीकडे करूं लागला; तो एकीकडे होतो कसा? तें पडद्याचेंच चित्र त्यानें भिंतीवर रंगविलें होतें! तेव्हां

तो दुसरा चितारी पहिल्यास ह्मणाला 'तुझ्या चित्रानें पांखरें फसलीं; पण माझ्यालें चितान्यास फसविलें!'

**धन आणि विद्या**—एकानें एका पंडितास पुसलें, 'विद्वान् लोक श्रीमंताच्या घरीं अढळतात, पण श्रीमंत विद्वानांच्या घरीं कां आढळत नाहींत?' पंडितानें उत्तर केलें 'विद्वानांस धनाची उणीव भासते; श्रीमंतांस ज्ञानाची उणीव भासत नाहीं!'

**वकीलाचें मृत्युपत्र**—एक वकील अतिशय अजारी पडून आपण आतां वाचत नाहीं असें त्यास वांटलें. तेव्हां त्यानें मृत्युपत्र करून आपली सर्व जिनगी अडाणी लोकांस व मूर्खांस द्यावी, असें त्यांत लिहीलें. तेव्हां त्यास असें कां लिहीलें ह्मणून कोणीं विचारिलें त्यानें उत्तर केलें, 'कारण इतकेंचकीं अशा लोकांपासूनच मला ही संपत्ती मिळाली. यास्तव त्यांसच ती आतां मी परत करणार.'

**जिवबाची शक्कल**—पेशवाईत नाना फडनिविसाच्या वेळीं महादजी शिंदा हा एकदां पुण्यास आला होता. तो मोठा चतुर असे. सोनपत पानपतच्या लढाईत हा घोड्यावरून पडून लंगडा झाला होता. त्याची अक्कल किती आहे हें ताडण्या करितां नाना फडनवीस वगैरे कारभारी मंडळीनें अशी मसलत केली कीं, कांहींतरी युक्ती काढून त्याची फजीती करावयाची. मग त्यांनीं अशी युक्ती काढली कीं, उदईक श्रीमंतांची स्वारी हत्तीवर बसन पर्वतीस जाण्याकरितां निघाली ह्मणजे सर्व मंडळीनें पायीं जावयाचें. असें केलें ह्मणजे महादजी शिंदा पायानें लुला आहे त्यास त्या स्वारी

बरोबर कधीं चालतां यावयाचें नाहीं. तो मागें माहील, आणि अर्थातच त्याची फजिती उडेल. या प्रमाणें मसलत त्यांनीं योजिली; ती महादजी शिंदा यास कळली. तेव्हां त्यास मोठी चिंता पडली. कांकीं, सर्व पायीं चालत असतां आपण मात्र घोड्यावर बसणें हें सर्वथैव अनुचित होय; व स्वारी सपाट्यानें निघाली तर आपणास इतर मंडळी बरोबर कधींही चालतां येणार नाहीं; व मागें राहिलोंतर आपला अपमानच होईल. अशा चिंतेंत असतां, त्याच्या पदरीं कोणी जिवबा नांवाचा सारस्वत ब्राह्मण होता, त्यानें त्याच्या चिंतेचें कारण ताडून त्यास विनंती केलीकीं, महाराज, आपण येवढी फिकीर कशाची करतां? तेव्हां शिंद्यानें सर्व मजकूर त्यास कळविला. तें ऐकून जिवबा ह्मणाला 'अः ह्यांत काय आहे? मी सांगतों असें करा ह्मणजे झालें. उद्या पर्वतीस जातेसमयीं श्रीमंताची स्वारी अंबारींत चढावयास लागली, ह्मणजे तुह्मी त्यांचे जोडे घेऊन पाठोपाठ वर चढून त्यांच्याच मागें अंबारींत बसा. ह्मणजे झालें. आपण श्रीमंताचे हुजरेच आहां, याज करितां असें केल्यानें त्यांची किंवा लौकिकाची अडचण नाहीं.' ही जिवबाची शक्कल शिंद्याच्या पसंतीस येऊन दुसरे दिवशीं त्यानें तसेंच केलें; आणि अडचणींतून पार पडला. हें पाहून कारभारी मंडळीनें त्याच्या शाहाणपणाची पुष्कळ तारीफ केली.

**यांत काय संशय**—एका मनुष्यानें एका राघूस 'यांत काय संशय' हे तीन शब्द शिकवून ठेविले. पुढें एके दिवशीं त्या राघूस बाजारांत नेऊन त्यानें

तो शंभर रुपयांस विकावयाचा असा ठराव केला. जातां जातां एका गृहस्थाच्या तो राघू पसंतीस पडून त्यानें त्या राघूस पुसलें ‘ तूं शंभर रुपयांचा कारे? ’ राघू बोलला ‘ यांत काय संशय? ’ हें ऐकून तो गृहस्थ फार खुष होऊन त्यानें तो राघू घरीं नेला. पण त्यास लागलेंच कळून आलें कीं, याला या तीन शब्दां शिवाय कांहींच येत नाहीं! तेव्हां त्यांस पश्चात्ताप होऊन तो फार खजील झाला; आणि ह्मणतो ‘ अरेरे! हा मी कशाला विकत घेतला? काय मी मूर्ख? ’ राघूनें उत्तर केलें; ‘ यांत काय संशय? हें ऐकून त्या गृहस्थास हसूं आलें, आणि त्यानें त्यास सोडून दिलें.

---

## सुबोध

### स्वदेशाभिमान.

आपल्या देशाच्या कल्याणासाठीं होईल तितका प्रयत्न करण्याची सुबुद्धी ज्या सद्गुणाच्या योगानें उत्पन्न होते त्यास स्वदेशाभिमान असें ह्मणतात. एखाद्या देशावर राज्य करणारा राजा शहाणा व न्यायी असला तर, त्याच्या प्रजेच्या आंगीं स्वदेशाभिमान व स्वराजनिष्ठा, हे दोन्ही सद्गुण एका काळींच जागृत असतात. तोच राजा मूर्ख व अन्यायी असला ह्मणजे, त्याची प्रजा जीं कामें करते, तीं केवळ स्वदेश भक्तीमुळें करीत असते. तिच्या आंगीं स्वराजनिष्ठा नसते. अशा प्रकारची स्थिती असली ह्मणजे स्वदेशाभिमानी असणें मोठेंच भयंकर होऊन कधीं

कधीं खऱ्या देश भक्तांच्या प्राणांच्या आहुतीही प-डल्याचीं उदाहरणें इतिहासांत आढळून येतात. आपण स्वदेशाभिमानी आहों, हें दाखविण्याचा प्रसंग देशावर संकट ओढवल्याखेरीज येत नाहीं, अशी कित्येकांची समजूत असते; पण ती सर्वथैव खरी नाहीं; आपल्या देशावर परचक्र येणें, लढाई होणें व एकच अंदाधुंदी होऊन गेल्यावर, आपली देशभक्ति दाखवावी ह्मणून जे वाट पहात बसतात, ते खरे देश-भक्त नव्हेत, असें ह्मटलें पाहिजे.

प्राचीन काळीं रोमन लोकांसारखे देशाभिमानी लोक सर्व जगभर नव्हते; व या त्यांच्या अप्रातिम गु-णामुळेंच सर्व जगाचें स्वामित्व त्यांचेकडे आलें होतें. एके प्रसंगीं अशी गोष्ट घडून आली कीं, रोमन व कार्थेजिनीयन या दोन्ही लोकांमध्यें मोठी निकराची लढाई होऊन, कांहीं वेळ पावेतों रोमन लोकांचा पा-डाव झाला, व त्यांचे कडील सरदार 'रेग्युलस' याला पकडून कार्थेजिनीयन लोकांनीं त्याला कैदेंत घातलें. कार्थेजिनीयन लोकांच्या मनांत पुढें लढाई करावयाची नव्हती. ह्मणून त्यांनीं असा बेत केला कीं 'रेग्युलस' याजबरोबर कांहीं वकील देऊन त्यास रो-मन लोकांकडे तह करण्यासाठीं पाठवावा; व हें काम त्यानें उत्तम प्रकारें केलें ह्मणजे त्यास जीवदान द्यावें. त्यांनीं 'रेग्युलस' यास ही गोष्ट कळविली, तेव्हां त्यानें त्यांस साफ सांगितलें कीं, 'तुमची व माझ्या राष्ट्राची लढाई व्हावी, हीच गोष्ट आह्माला हितकर आहे, त्या अर्थीं तुह्मीं माझा प्राण घ्या, कीं काय

पाहिजे तें करा, तुमचा व आमचा सल्ला ह्मणून मी होऊं देणार नाहीं!' हें निकराचें बोलणें ऐकून कार्थेजिनीयन लोक फार चेतून गेले व त्यांनीं 'रेग्युलसा' ला ठार मारून टाकिलें. केवढा देशाभिमान हा!!

आपल्या हिंदुस्थानांत रजपूत लोकांसारखे देशाभिमानी लोक दुसरे नाहींत. एके प्रसंगीं रजपुतांनीं मुसलमानांच्या एका किल्लयास वेढा घातला व किल्लयाचें दार मोडून पाडण्यासाठीं दारावर हत्ती सोडले. कांहीं हत्ती जोरानें पुढें जात, व टक्कर देण्याचा प्रयत्न करीत, पण दाराला अणकुचीदार मोठमोठे खिळे बसविले असल्यामुळें हत्ती परत येत. यामुळें रजपुतांचा अगदीं नाइलाज झाला, व वेढा उठवून परत जाण्याची पाळी आली, यामुळें लढाईंत गेल्यावर 'मारूं किंवा मरूं' असें जें रजपुतांचें ब्रीद, त्याला बट्टा येऊं लागला. तेव्हां एक रजपूत किल्लयाच्या दाराला पाठ देऊन उभा राहिला व आपल्या आंगास हत्तीनें टक्कर द्यावी असें महातास सांगितलें! महातानेंही मागें पुढें न पहातां त्याचे आंगावर हत्ती सोडिला, व त्यानें टक्करा मारून दार उघडलें!! या प्रसंगीं त्या रजपूताची अवस्था काय झाली असेल तिचें वर्णन करण्यापेक्षां, कल्पनाच करावी हें बरें!!!

स्वदेशभक्ति व स्वदेशप्रीति हे दोन्ही गुण प्रदर्शित करण्यास, आपल्या राष्ट्रावर मोठमोठीं संकटें येऊन रक्तस्त्राव झालाच पाहिजे, असें नाहीं. लढाई वगैरे नसतानां देखील, देशाभिमान दाखविण्याचे प्रसंग अनेक येतात. आपल्या देशबांधवांची ज्ञानवृद्धी हो-

ईल, अशा प्रकारचे नवीन नवीन ग्रंथ लिहून, आपल्या देशाचें नांव सर्व जगांत अजरामर करून ठेवितां येतें. कालिदास, भवभूति, बाणभट्ट, मोरोमंत, तुकाराम, रामदास वगैरे महान् विद्वान् पुरुषांनीं स्वदेशभक्तीसाठीं तलवार न उचलतां ती केवळ आपल्या ज्ञानानें व्यक्त केलेली आहे. मिल्टन् ह्मणून जो जग विख्यात कवी होऊन गेला, त्याला ‘ प्याराडाइज लॉस्ट ’ नांवाचें काव्य लिहावयाचें होतें, व तें जर त्यानें परकीय ह्मणजे लाटीन भाषेत लिहिलें असतें, तर त्याला श्रम कमी लागून त्याची कीर्ती फार लवकर सगळ्या जगभर खचीत झाली असती. पण या योगानें स्वभाषेची सेवा त्याचे हातून घडली नसती, ह्मणून त्यानें तें काव्य लाटीन भाषेत न लिहिनां, इंग्रजींतच लिहीलें. हें त्याचें करणें स्वदेश सेवेचें दर्शकच होय. अतिशय गरीब मनुष्य असला, व त्याचा धंदा कितीही क्षुल्लक असला, तरी तो उत्तम प्रकारें त्यानें केला, ह्मणजे त्यानें मोठी देशसेवा केली असें होतें. शेतकऱ्यानें आपली शेतकी उत्तम प्रकारें करणें, सुतारानें आपलें काम उत्तम रीतीनें बजावणें व याचप्रमाणें इतर लोकांनीं आपापलीं कामें उत्तम प्रकारें बजावून देशाची कीर्ति वाढेल असें करणें, हा कमी किमतीचा देशाभिमान आहे, असें नाहीं.

इंग्रज सरकारचें राज्य झाल्यापासून देशांत शांतता झाली आहे व परचक्रापासून भीति बाळगण्याचें कारण नाहीं, ह्मणून समरांगणीं उभें राहून तरवारीच्या जोरानें देशाभिमान व्यक्त करण्याचें कारण उरलें

नाहीं. बुद्धिबळानें, ज्ञानानें, वक्तृत्वानें, लेखणीनें, व स्वतःच्या हिताची परवा न करतां, देशाच्या कल्याणासाठीं जी मंडळी झटत आहे ती देशाभिमानीच होय. दादाभाई नवरोजी, लाल मोहन घोस, पंडित अयोध्यानाथ, आर. रघुनाथराव, विष्णु शास्त्री पंडित, या गृहस्थांनीं स्वहिताची पर्वा न करितां देशहितासाठीं अनेक संकटें सोशिलीं आहेत, व देशाचें पुष्कळ कल्याण केलें आहे. ( नि. ले. )

---

## चांगला विद्यार्थी.

( विद्यार्थ्यां साठीं. )

जो चांगला विद्यार्थी असतो तो शाळेंतील जे नियम असतात त्यांप्रमाणें वागतो व आपल्या शिक्षकाची आज्ञा पाळतो. एकच गोष्ट पुनः पुनः त्यास सांगावी लागत नाहीं. तो नेहमीं वेळेवर शाळेंत जातो. आपणांस कदाचित् उशीर होईल ह्मणून लगबगीनें आपली दऊत दप्तर घेऊन शाळेंत जातो, व घंटा वाजतांच आपल्या जागेवर जाऊन बसतो व हातांत पुस्तक घेऊन धड्याकडे लक्ष देऊं लागतो. त्याला प्रत्येक गोष्ट समजून घेण्याची इच्छा असते, व ती तो लक्ष लावून समजून घेतो. शाळेंत ज्या वेळीं जो धडा चालला आहे तेंच पुस्तक तो बघत असतो; दुसरा कोणताही अभ्यास त्यावेळीं तो करीत नाहीं. वर्गांत अभ्यास चालला असतां तो खिशांतून एखादी खेळण्याची वस्तु काढून तिच्याशीं खेळत बसत नाहीं कि-

वा इतर मुलांनाही खेळावयास लावीत नाहीं. तो आपण शाळेंत कांहीं खात नाहीं व दुसरे खात असतील तिकडे बघत सुद्धां नाहीं. एखादा परका मनुष्य शाळेंतत आलातरी तो आपला धडा सोडून त्याच्या तोंडाकडे पहात नाहीं—जणूं कांहीं कोणी शाळेंत आलें आहे हें त्याच्या लक्षांतच नाहीं;—जर एखाद्यानें आपण होऊन त्याला एखादी गोष्ट विचारली तर तिचें उत्तर तो मोठ्या आदबीनें देतो. वर्गांत जर दुसरीं मुलें व्याकरणाचे नियम पाठ ह्मणत असलीं, किंवा शुद्ध लिहिण्याचा एखादा नियम कोणी सांगत असले तर तो त्याकडे पूर्ण लक्ष देऊन तें ऐकत असतो; असें ऐकून सुद्धां त्याला पुष्कळ येतें.

त्याचा शिक्षक वर्गांत असो अगर नसो, तो त्याच्याकडे बघत असो अगर नसो, तो आपलें काम लक्षपूर्वक करीतच असतो. आपण पूर्वी जें शिकलों आहों त्यास नेहमीं जास्त भर घालावी, अशी त्याची इच्छा असते. त्याला दररोज नवीन कांहीं तरी ज्ञान प्राप्त होतच असतें.

जेव्हां त्याला एखादा कठीण धडा तयार करावयाचा असतो किंवा दुसरें कांहीं कठीण काम करावयाचें असतें तेव्हां तो आपले मनांत ह्मणतो, ‘ मी असा असा कठीण धडा आज तयार केला, किंवा असें कठीण काम चांगलें केलें असें जर माझ्या आईला आणि बापाला कळलें तर त्यांस किती बरें आनंद होईल ? गुरुजींना जर कळलें तर त्यांनाही किती बरें चांगलें वाटेल ? तर हा धडा आपण लवकर मेहनत

घेऊन करूं या ' असें ह्मणून तें तो करावयास लागतो.

जेव्हां तो वाचूं लागतो तेव्हां प्रत्येक शब्द इतका स्पष्ट उच्चारतो कीं, व अशा रीतीनें वाचतो कीं ऐकणाराला त्याच्या वाचण्याचा सर्व अर्थ समजतो. त्याचीं पुस्तकें व वह्या नीटनेटक्या असून त्यांत पुस्त्याही मोठ्या मेहनतीनें व काळजीनें काढलेल्या असतात. त्यांच्यावर डागबीग कांहीं नसतात. अक्षर अगदीं स्पष्ट व वळणदार असतें. एखादें उदाहरण करणें असलें तरी सुद्धां आंकड्याखालीं आंकडे जसे मांडावयाचे तसे चांगले ठळक मांडतो. आणि बहुधा तो उदाहरण चुकत नाहीं.

जो विद्यार्थी चांगला असतो त्याला दुसऱ्याचें चांगलें पाहून आनंद होतो. त्यांची जर कोणीं वाहवा केली किंवा त्यांना बक्षीस मिळालें तर यालाही संतोषच होतो. आणि तो मनांत ह्मणतो ' जर मींही चांगले धडे केले आणि माझी परीक्षा पास झाली ह्मणजे मलाही लोक चहातील, व मलाही इनाम मिळेल; आणि आह्मी जर सगळ्यांनींच अभ्यास चांगला केला व सगळेच परीक्षेंत उतरलों तर मग काय बहार उडून जाईल ! मग आमच्या शाळेसारखी शाळाच दुसरी नाहीं असें होईल.'

तो आपलीं पुस्तकें नेहमीं मोठ्या काळजीनें ठेवितो. पुस्तकाचें काम झाल्यावर तें जेथल्या तेथेंच तो ठेवितो. भलतीकडेच टाकून देत नाहीं. त्याच्या पुस्तकावर शाईचा डाग किंवा वेड्या वांकड्या रेघा मिळावयाच्या सुद्धा नाहींत. पुस्तकांतील आमका शब्द कोठें आहे

ह्मणून त्यास विचाल्यास तो लागलाच काढून दाखविती. तो नेहमीं खरें असेल तेंच बालतो. आपणांत कांहीं सुधारणा व्हावी ह्मणून झटत असतो व तो आपल्या सर्व सोबत्यांवर ममता करतो. ( विद्यार्थी. )

## सार्थ सुभाषितें.

**सुखार्थी च त्यजेद्विद्यां विद्यार्थी च त्यजेत्सुखं ।**
**सुखार्थिनः कुतो विद्या कुतो विद्यार्थिनः सुखं ?**

अर्थ– ' ज्याला सुख ह्मणजे चैन हवी असेल त्यानें विद्या सोडून द्यावी व ज्यास विद्या हवी असेल त्यानें सुख सोडून द्यावें, कारण ज्यास सुख हावें त्यास विद्या कोठची? व ज्यास विद्या पाहिजे त्यास सुख कोठचें ?

( विवाहसमयीं निरनिराळ्या पक्षांचे कसकसे मनोरथ असतात ते खालच्या श्लोकांत दाखविले आहेत. )

**कन्या वरयते रूपं माता वित्तं पिता श्रुतं ।**
**बांधवाः कुलमिच्छन्ति मिष्टान्नमितरे जनाः॥२॥**

अर्थ– ' कन्येस नवरा रूपवान् असावा येवढीच इच्छा असते; तिच्या आईस तो घरचा संपन्न असला ह्मणजे झालें; बापाचें पाहणें त्याच्या केवळ विद्येवर असतें; आप्तांच्या मनांत तो कुलीन असावा इतकेंच असतें; आणि बाकीच्या लोकांस चार दिवस चमचमीत भोजन असलें ह्मणजे झालें ! '

( कवीनें नूतन वधूंचा प्रकार खालच्या श्लोकांत वर्णिला आहे )

**असंमुखा लोकनमाभि मुख्यम् ।**

निषेध एवानुमति प्रकारः ॥
प्रत्युत्तरं मुद्रणमेव वाचो ।
नवांगनानां नव एव पंथाः ॥ ३ ॥

**अर्थ**–' नुकताच ज्यांचा विवाह झाला अशा नूतन वधूंची रीतही नवीनच ह्मणजे मोठी विचित्र असते! ती अशी कीं, त्यांचें दुसरीकडे बघणें ह्मणजेच नवऱ्याकडे बघणें, नको ह्मणणें ह्मणजेच रुकार देणें, आणि मुकस्तंभ राहणें ह्मणजेच प्रत्युत्तर देणें!'

**त्यजन्ति शूर्पवद्दोषान् गुणान् गृण्हन्ति साधवः ॥**
**दोषग्राही गुणत्यागी चालनी रिव दुर्जनाः ॥४॥**

**अर्थ**–'सज्जन रसिक जे असतात ते सुपाप्रमाणें ग्रंथांतील दोष टाकून गुण तेवढे ग्रहण करतात; आणि दुर्जन असतात ते चाळणी प्रमाणें गुण गाळून टाकून दोष तेवढे घेतात.'

( कथेच्या पुराणाच्या वेळीं हटकून झोंप येते यावर कोणी विनोदी कवी कल्पना बांधतोः— )

निद्राप्रियो यःखलु कुंभकर्णो ।
हतः समीके स रघूत्तमेन ॥
वैधव्य मापद्यत तस्य कांता ।
श्रोतुं समायाति कथां पुराणं ॥ ५ ॥

**अर्थ**–' कुंभकर्ण जो निद्राप्रिय होता त्याला रामचंद्रांनीं रणांत खपविला, तेव्हां ती त्याची स्त्री निद्रा विधवा होत्साती कथा पुराणें वगैरे ऐकण्यास येते!'

निर्वाण दीपे किमु तैल दानम् ।
चौरे गते वा किमु सावधानम् ॥

**वयो गते किं वनिता विलासः ।**
**पयो गते किं खलु सेतुबंधः॥ ६ ॥**

**अर्थ**– ‘ दिवा विझाल्यावर आंत तेल घालून काय उपयोग? चोर गेल्यावर ‘ सावध रे सावध! ’ ह्मणून हाकाटी करून काय फळ? वय गेल्यावर विषयोपभोगांत काय मौज? ( नदीचें ) पाणी ओसरून गेल्यावर मग पूल तो कशाला?’

**चत्वारो धनदायादा धर्माग्नि नृप तस्कराः ।**
**तत्र ज्येष्ठावमानेन त्रयः कुप्यन्ति बांधवाः॥७॥**

**अर्थ**–‘ धर्म ( दान करणें ), अग्नि, राजा आणि चोर हे धनाचे चार वांटेकरी आहेत. यास्तव यांच्या वडील भावाचा ( धर्माचा ) जेव्हां अवमान करावा तेव्हां धाकटे तिन्ही बंधु कोपतात!

---

## स्फूट.

कोणे एके काळीं सुंदर तरुण स्त्रीचें रूप धरून साक्षात् सरस्वती ही एका मोठ्या रस्त्यावर चेंडू आपटून झेलणें हा खेळ खेळत प्रगट झाली. तेव्हां दंडी, भवभूती व कालिदास या तिघांनीं तिला पाहिलें त्यावेळीं प्रथम दंडी बोलला:—

**एकोऽपि त्रय इव भाति कंदुकोऽयम् ।**
**कांतायाः करतलराग रक्त रक्तः ॥**
**भूमौ तच्चरण नखांशु गौर गौरः ।**
**स्वस्थः सन्नयन मरीचि नील नीलः ॥१॥**

**अर्थ**– ‘ चेंडू एक असतांही तीन ठिकाणीं तीन

प्रकारचा भासतो. ह्मणजे जेव्हां तिच्या हाता जवळ येतो तेव्हां तळहाताच्या प्रभेनें तांबडा, क्षणमात्र भूमीवर असतां पायांच्या नख प्रभेनें पांढरा, आणि मध्यें असतां डोळ्याच्या नीलप्रभेनें नीळा असा भासमान होतो.'

नंतर भवभूती ह्मणालाः—

**विदितं ननु कंदुक ते हृदयम् ।**
**प्रमदाधर संगम लुब्ध इव ॥**
**वनिता करतामरसाभि हतः ।**
**पतितः पतितः पुनरुत्पतसि ॥ २ ॥**

**अर्थ**— हे कंदुका तुझा अभिप्राय मी जाणला. या तरुणीच्या अधरोष्ठास आपण लागावें ह्मणजे त्याचें चुंबन घ्यावें, हा लोभ मनांत धरून, तुला ती आपल्या करकमलानें वारंवार खालीं आपटीत असतांही तूं पुनः पुनः वर उडतोस!'

शेवटीं कालिदास ह्मणालाः—

**पयोधराकार धरोहि कंदुकः ।**
**करेण रोषादभिहन्यते मुहुः ॥**
**इतीव नेत्राकृति भीति मुत्पलम् ॥**
**स्त्रियः प्रसादाय पपात पादयोः ॥३॥**

**अर्थ**— 'या चेंडूनें हिच्या स्तनाचा आकार धारण केला ह्मणून रागानें ही त्याला खालीं आपटते आहे; त्या मुळें तिच्या मस्तका वरील कमलास असा धाक पडला आहे कीं, आपणही हिच्या डोळ्याची शोभा चोरली आहे, ती हिला समजल्यास न जाणों आपली-

ही हीच दशा होईल. ह्मणून तें तिच्या पायांच पडतें आहे कीं काय? असें वाटतें.'

## सहाव्या अंकांतील कूट प्रश्नोत्तर.

| एकर, | रूढ, | पोल, | चौ.यार्ड, | चौ.फूट, | चौ.इंच, | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ० | ० | ० | ० | ० | यांतून |
| | ३ | ३९ | ३० | २ | ३५ | हे वजाकरा. |
| ० | ० | ० | ० | ० | १ | हें उत्तर. |

या उदाहरणांत १ चौ.फूट, हातचा न घेतां पाव चौ.फूट ह्मणजे ३६ चौ.इंच घ्यावे व त्यांतून ३५ वजा करतां बाकी १ रहातो; नंतर हातचा पाव २ यांत मिळवून सवादोन करावे; व पुनः पाव चौ.यार्ड ह्मणजे २। चौ.फूट हातचे घ्यावे, सवादोहोंतून सवा दोन गेले बाकी ०; नंतर पावयार्ड ३० यार्डांत मिळवून ३०। यार्ड होतात; पुढें नेहमीं प्रमाणें.

## कूट प्रश्न.

एका गांवीं तीन शिवालयें होतीं रोज तीनही शंकरांची पूजा करून प्रत्येकास सारखीं बिल्वदळें अर्पावीं, असा एका शिवभक्ताचा नेम होता. एके दिवशीं त्यास पुरेशीं बिल्वदळें मिळालीं नाहींत, इतके दिवस चालत आलेला नेम आज मोडावा लागणार ह्मणून त्यास फारच वाईट वाटलें. मग होतीं तितकींच बिल्वदळें घेऊन पहिल्या शिवालयांत गेला. नेहमींच्या मानानें पाहतां एका शंकरासही पुरण्या जोगीं बिल्व-

दळें नव्हतीं. ह्मणून त्यानें शंकराची स्तुती आरंभिली. त्याचा शुद्ध भाव पाहून शंकर त्यास प्रसन्न झाले व व पाहिजे तें माग ह्मणतांच 'मी आणलेल्या बिल्व-दळांची तिप्पट व्हावी' ह्मणून त्यानें प्रार्थना केली. शंकरानें 'तथास्तु' ह्मणतांच आणलेल्या बिल्वदळांची **तिप्पट** झाली. मग आपल्या नेमाप्रमाणें बिल्वदळें अर्पून बाकीचीं घेऊन दुसरे देवस्थानीं गेला. तीं पुरण्याजोगीं नसल्यामुळें पुनः या ठिकाणींहि शंकराची स्तुती करून तो प्रसन्न झाल्यावर बाकी राहिलेल्या बिल्व दळांची **पांचपट** व्हावी ह्मणून मागून घेतलें. तसें झाल्यावर पहिल्या शंकरास अर्पण केलीं तितकींच यासही वाहून शेष राहिलेलीं घेऊन तिसरे देवस्थानीं गेला. तेथेंही याचे स्तुतीस शंकर प्रसन्न होऊन त्याचे ह्मणण्या प्रमाणें **सातपट** झालीं. मग पहिल्यास व दुसऱ्यास वाहिली तितकीच यासही वाहून पाहूं लागला तों एकही बिल्वदळ शिल्लक राहिलें नाहीं! तर त्यानें प्रारंभी किती बिल्वदळें आणिलीं होतीं? व प्रत्येक शंकरास किती किती वाहिली? (अंकगणीतांत रीती सह उत्तर पाहिजे.

उत्तरें तारीख २०।६।९३ चे आंत पाठवावीं. रीती सह बरोबर उत्तर देणारांत ज्याचें नांव सोडतींत येईल त्यास एक रुपया किंमतीचें **नवनीत** हें पुस्तक बक्षीस मिळेल. उत्तरें पाठविण्याचा पत्ताः—

प्रकाशक 'खानदेश मित्र'
पोष्ट—**खानापूर**
(जि. बेळगांव)

# अनंतरंग.

हें पूर्ण शृंगारिक माहितीचें पुस्तक प्रत्येक तरुण पुरुषानें ता० ३०-६-९३ पर्यंत मागविल्यास व्ही. पी. खर्चासह १२ आण्यांस मिळेल मुदती नंतर १५ आणे.

पत्ता-ह० स० खानोलकर आणि मंडळी.

पोष्ट-खानापूर

(जि०-बेळगांव.)


---

(वजाबाकीचें बरोबर उत्तर देणारांचीं नांवें.)

रा. बाळकृष्ण नीलकंठ प्रभु, चाफेट (रत्नागिरी.)
रा. सूर्यभान कृष्णाजी, पारस (अकोला.)
रा. यशवंत जनार्दन गाळवणकर, अरनाळा.
रा. विनायक वासुदेव अजगांवकर, रत्नागिरी.
रा. नारायण दत्तात्रय आपटे, कोल्हापूर.
रा. राचू शिवराज अय्या, बार्शी, (सोलापूर.)
रा. माधव विष्णु पिसोळकर, हैद्राबाद.
रा. लक्षुमण बाबू कडुलकर, कलमट (रत्नागिरी.)
रा. विश्वनाथ कचेश्वर जोशी, खडकाळें.
रा. गोविंद हरी प्रभू, तरपळें (रत्नागिरी.)
रा. विठ्ठल अनंत भट, तरपळें (रत्नागिरी.)
रा. विनायक आबाजी सोनार सासवड.

पहिल्याचें नांव सोडतींत आल्या मुळें अंकगणीत भाग १।२ त्यास बक्षीस मिळालें.

## जी. बी. नाईक कंपनीच्या विजेच्या
# आंगठ्या, पुतळ्या, कडीं, लेखण्या, व पट्टे.

७५,००० वर विकल्या, रोज पुष्कळ खपत आहेत.



गुण आल्याचे हजारो दाखले मिळाले व नित्य मिळतात.

रक्त हें मनुष्याचें जीवित आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे. रक्त खराब असल्यामुळें होणारे **सर्व रोग** ह्या लहानशा अतिस्वस्त ब्याटरी वापरल्या पासून **बरे होतात**, हें **जगत्प्रसिद्ध** आहे. करितां अशी ही उत्तम, गुणकारी सर्व रोग शमविणारी, अंगावर सुशोभित दिसणारी, औषधी खटपट चुकविणारी, चमत्कारिक **भूषणावह** व **आरोग्यदायक** वस्तूचा संग्रह करून अनुभव पहा व मित्रमंडळींत फैलाव करा, ही विनंती.

### विजेच्या वस्तूची किंमत.

| | | |
|---|---|---|
| पितळी आंगठीस किं. रु. १॥ | पुतळीस किं रु. १। | धा. कड्यास किं. १॥ |
| चांदीचे आंगठीस किं. रु. ३ | पुतळीस किं रु. २ | धा. लेखणीस किं. १॥ |
| सोन्याचे आंगठीस किं. रु. २० | पुतळीस किं. रु. २२ | रेशमीगळपट्टा किं. १॥ |

खोटा माल घेऊन फसूं नका. आमचे प्रत्येक वस्तूवर G.B.N मार्क पाहून घेत जा. एकदम बारा नग घेणारांस एक जास्त मिळेल. बंगी करणावळ माफ. १ पासून ६ पर्यंत ट ह. ६ आणे रोख दाम आल्यास किंवा व्ही. पी. नें मागविल्यास पाठवूं. अनेक रोगांवर गुण आल्याचें शेकडों सर्टिफिकिटांचें पुस्तक मालाबरोबर पाठवूं, किंवा अर्धा आणा पाठवून मागवा, म्हणजे पाठवूं. बाहेर गांवीं एजंट पाहिजेत.

**जी. बी. नाईक आणि कंपनी**, जुन्या दावणी समोर भायखळा, मुंबई. व बुधवारपेठ पुणें.

गाव्य

# खानदेशमित्र.

॥ श्लोक ॥ (वसंततिलका.)

कस्यापि कोप्यतिशयोऽस्ति स तेन लोके
ख्यातिं प्रयाति नहि सर्व विदस्तु सर्वे ॥
किं केतकी फलति किं पनसः सपुष्पः
किं नागवल्ल्यापिच पुष्पफलैरुपेता ॥ १ ॥

पुस्तक १ लें. जून. १८९३. अंक ८ वा.

विषय. अनुक्रमणिका. पृष्ठ.

१ सुदर्शनचारित्र. .... .... १६९
२ राजा आणि कैदी..... ......... १७५
३ पंडित व त्याचे दोन शिष्ये........ १७७
४ सुबोध आर्या.... .... ........ १७९
५ मितव्यय..... .... .... .... १८०
६ दोघे योद्धे. .... .... .... १८३
७ सार्थ सुभाषितें. .... .... .... १८६
८ सातव्या अंकांतील कूट प्रश्नोत्तर .... १८८
९ बक्षीसाचा निकाल..... .... .... १८९
१० कूट प्रश्न........ .... ........ १९१

बेळगांव येथें 'बेळगांवसमाचार' छा० छापिलें.

वर्गणीचे दर.

वर्षाचे अगाऊ ट. ह. सह..... .... १८३

प्रकाशक—ह० स० खानोलकर आणि मंडळी.
पोष्ट खानापूर. (जि. बेळगांव.)

## लाट १ ली.

स्त्री चरित्र– मनोवेधक गोष्टी– किंमत रु. १८४
गुलबंकावली– सुरस कादंबरी, किंमत ८१२ आणे.

हीं २ रुपये किंमतीचीं पुस्तकें ता. ९–८–९३ पर्यंत व्ही. पी. नें मागविणारांस अवघ्या ८१३ आण्यांस मिळतील ! शिवाय ट. ख. ८३ निराळा पडेल.

---

## विक्रीस तयार.

**गुप्तविद्या आणि अद्भूत चमत्कार संग्रह**—यांत द्दष्टीचा मंत्र, विंचू उतरण्याचा मंत्र, विझलेला दिवा अग्नि वांचून लावणें, भूत दिसणें, गुरांचे किडे जाण्यास उपाय, हरवलेली वस्तू सांपडण्यास उपाय, पिशाच पळविण्याचें साधन, सर्पाचे विषाचा मत्र, धान्यास कीड न लागण्यास उपाय, सालंमिश्री तयार करण्याची कृती इ० इ० उपयुक्त व चमत्कारिक असे १७१ विषय आहेत. किंमत ८ आणे. ट. ख. १ आणा.

---

## लाट २ री.

गुप्तविद्या आणि अद्भुत चमत्कार संग्रह, किं. ८८
नवनारी चरित्र–[ भाग १–२ एकत्र ], किंमत १ रु.
सिंहासनबत्तीशी व निस्पृहतेचीं लक्षणें, किंमत ८४.
लालसेन राजपुत्राच्या मनोरंजक गोष्टी, किंमत ८४.

हीं २ रुपये किंमतीचीं ४ पुस्तकें ता. ९-८-९३. पर्यंत मागविणारांस ८१३ आण्यांस मिळतील शिवाय व्ही. पी. व टपाल खर्च ८३ निराळा पडेल.

जून.–१८९३. अंक ८

मासिक पुस्तक.

# खानदेशमित्र.

## सुदर्शनचरित्र.

अयोध्येंत इक्ष्वाकु वंशाचे जे राजे होऊन गेले त्यांपैकीं ध्रुवसंधी हा एक होता. यानें मनोरमा व लीलावती अशा दोन स्त्रिया वरिल्या होत्या. याला ज्येष्ठ स्त्रीपासून सुदर्शन व दुसरीपासून शत्रुजित् असे दोन पुत्र झाले. एकदां हा मृगयेसाठीं अरण्यांत गेला असतां, सिंहाचे हातून मरण पावला. पुढें वसिष्ठऋषी व मंत्री यांनीं परस्परांशीं यथान्याय विचार करून सुदर्शनास राज्याभिषेक करण्याचा विचार ठरविला, कारण तो ज्येष्ठ स्त्रीचा पुत्र होता. इतक्यांत मनोरमेचा पिता कलिंग देशाधिपति वीरसेव व लीलावतीचा पिता अवंती देशाधिपति युधाजित् हे अयोध्येस येऊन पोहोंचले. त्यांत युधाजित् सुदर्शनास राज्याभिषेक होऊं देईना. कारण, तो ह्मणाला कीं, शत्रुजित् सुदर्शनाहून ज्येष्ठ आहे. वीरसेनाचें ह्मणणें, त्याचें ज्येष्ठत्व काय उपयोग? ज्येष्ठ स्त्रीचा पुत्र तोच वयानें लहान असला तरी ज्येष्ठ होय. यास्तव वसिष्ठादिकांनीं योजिलेला विचार न्याय्य आहे. हें वीरसेनाचें ह्मणणें युधाजित् ऐकेना. या वरून उभयराजांची लढाई होऊन

त्यांत मनोरमेचा पिता वीरसेन मरण पावला. नंतर युधाजितानें आपला नातू शत्रुजित् यास राज्याभिषेक करून मनोरमा व तिचा पुत्र सुदर्शन यांस धरून प्रतिबंधांत ठेवावें किंवा मारावें, अशा विचारानें त्यांस शोधूं लागला. हा त्याचा हेतु विदल्ल नामक प्रधानास आधींच कळला होता; ह्मणून त्यानें मनोरमेला तिच्या पुत्रासहीत रातोरात नेऊन भारद्वाज ऋषीचे आश्रमांत ठेऊन त्यास हें वर्तमान कळविलें.

युधाजितानें सुदर्शन व मनोरमा यांकरितां सगळी अयोध्या शोधिली. परंतु त्यांचा कोठें ठिकाणा लागेना, असें पाहून अवंती नगरीला परत गेला. पुढें लवकरच त्यास समजलें कीं, सुदर्शन हा मातेसह वर्तमान भारद्वाज ऋषीच्या आश्रमीं आहे. त्यावरून तो तेथें गेला. व ऋषीस ह्मणूं लागला कीं, मनोरमा व सुदर्शन या उभयतांस माझ्या स्वाधीन करावें. ऋषीनें सांगितलें, त्यानीं माझा आश्रय केला आहे, यास्तव मला त्यांस देतां येत नाहीं. युधाजित् ह्मणाला, माझ्या शत्रूस आपण आश्रय देणेंच योग्य नव्हे. असें असून दिलात तर असो, परंतु, आतां मी मागत आहें, त्या अर्थी त्यांस आपण माझ्या स्वाधीन करावें, न कराल तर मला बलात्कारानें नेण्याचा प्रसंग येईल. भारद्वाजानें उत्तर केलें, बरें आहे, सामर्थ्य असल्यास घेऊन जावें मजकडून ना नाहीं.

भारद्वाजाचें हें भाषण ऐकून युधाजित् कांहींसा शंकित झाला, व आपल्या प्रधानास पुसूं लागला, कसें करावें ? प्रधान ह्मणाला, महाराज, ऋषीनें ज्या अर्थी

सामर्थ्य असल्यास घेऊन जा ' असें आपणांस ह्मटलें आहे, त्या अर्थी आपल्या शत्रूचें संरक्षण करण्यास तो खचीत समर्थ आहे, असें दिसतें. इतक्यावर आपण आग्रहास पडून बलात्कारास प्रवर्त्तक व्हाल तर विश्वामित्रा प्रमाणें पराभव होईल. ह्या वरून त्यानें विश्वामित्र कोणापासून पराभव पावला, ह्या विषयीं प्रधानास पुसल्या वरून, प्रधानानें वसिष्ठाची कामधेनू विश्वामित्रानें बलात्कारेंकरून हरण केली असतां, तो वसिष्ठापासून पराभव पावल्याचा इतिहास सांगितला. त्या वरून युधाजितानें मनांत आणलेला विचार रहित करून, ऋषींस वंदन केलें, व स्वदेशास जाण्याची आज्ञा मागितली. तेव्हां भारद्वाज त्यास याप्रमाणें बोलला:—

दया सर्वत्र कर्तव्या दैवाधीनमिदं जगत् ।
ईर्षया किं नृपश्रेष्ठ यद्भाव्यं तद्भविष्यति॥ १॥
वज्रं तृणायते राजन् दैवयोगान्न संशयः ।
तृणं वज्रायते क्वापि समये दैव योगतः॥२॥

अर्थ— राजा, सर्वांठाईं दया असावी. हें संपूर्ण जग दैवाधीन आहे. कोणी कोणाचा निरर्थक मत्सर करूं नये, कारण जें होणार तें कधीं चुकावयाचें नाहीं ॥ १ ॥ दैव अनुकूल असेल तर वज्रही तृणासमान होऊं जातें, पण प्रतिकूल झाल्यावर तृणच वज्राप्रमाणें होऊन मनुष्याचा नाश होतो. ॥ २ ॥

हें ऋषीचें भाषण ऐकून पुनः नमस्कार करून युधाजित् परत अवंतीस गेला. या प्रमाणें मनोरमा व तिचा पुत्र यांवर आलेलें अरिष्ठ टळलें.

सुदर्शनास बाळपणा पासूनच आदिशक्तीची पराकाष्ठेची भक्ति असे, असें पाहून भारद्वाजानेंही त्यास तत्संबंधीं सर्व विधी उत्तम प्रकारें करून समजवून दिला होता. त्या प्रमाणें निष्ठापूर्वक उपासना करीत असतां ती आदिशक्ति इतकी सिद्ध झाली कीं, काशीचा राजा सुबाहू नामेंकरून कोणी होता, त्याच्या शशिकला नांवाच्या कन्येस देवीनें तिच्या स्वप्नांत जाऊन यासच वरण्याची आज्ञा केली. स्वप्नांतून जागी झाल्यावर तिनें सर्व वृत्तांत आपले मातेस कळविला. तिनें राजास कळविल्यावर राजा ह्मणाला, तो चांगला आहे खरा, परंतु हल्लीं तो राज्यभ्रष्ट असल्यामुळें त्याला देतां येत नाहीं. इतकें झाल्यावर लवकरच त्यानें तिच्या स्वयंवराची सिद्धता करून अनेक राजांस त्या समारंभास बोलाविलें. शशिकलेच्या मनोदयानुरूप तिचा पिता करीत नाहीं, असें जरी तिला समजलें तरी तिनें आपला निश्चय ढळूं दिला नाहीं. काशीराजानें स्वयंवराची सर्व सिद्धता केली, व अनेक देशींचे राजेही जमत चालले असें पाहून शशिकलेनें गुप्तपणें एक ब्राह्मण सुदर्शनाकडे चित्रकूट पर्वतावर पाठविला. त्या ब्राह्मणानें येऊन शशिकलेचा सर्व वृत्तांत स्वप्नासह सांगून, तुह्मास तिनें स्वयंवरा करितां बोलाविलें आहे ह्मणून सांगितलें. त्यावरून शृंगवेरच्या किराताधिपतीकडून एक रथ मागून आणून सुदर्शन हा गुरूच्या आज्ञेनें त्या ब्राह्मणासहवर्तमान सुबाहूच्या नगरास आला. तेव्हां इतर राजांबरोबर याचाही सत्कार होऊन यास रहाण्यास स्थलादिकाचीही योजना झाली.

नंतर स्वयंवराच्या दिवशीं सर्व राजे मंडपांत जमले त्यांत अवंतीदेशाधिपति युधाजित् राजा आपल्या शत्रुजित् नातवासह आला होता. सुदर्शनही येऊन बसला. इतक्यांत सुबाहुराजा अंतःपुरांत कन्येकडे जाऊन, तिला मंडपांत चल, असें ह्मणूं लागला. परंतु तिनें मी मंडपांत येत नाहीं ह्मणून पित्यास स्पष्ट सांगितलें. राजा ह्मणाला तूं मंडपांत चल व वरावयाचे असेल त्यासच वर. परंतु ती त्याचें ह्मणणें ऐकेना. ह्मणून सुबाहू मोठ्या संकटांत पडला व जमलेल्या राजांस आतां काय सांगावें अशी चिंता करूं लागला. तथापि त्यानें तसेंच धैर्य धरिलें आणि मंडपांत येऊन सर्वांस विनयपूर्वक ह्मणाला कीं, आज मजवर सर्वांनी अनुग्रह करून परत जावें; कारण माझी कन्या आज मंडपांत येत नाहीं, उद्यां येईन असें ह्मणत्ये. हें ऐकून सर्व जमलेले राजे त्या दिवशीं आपापल्या ठिकाणीं परत गेले.

राजे जातांच सुबाहू कन्येकडे पुनः आला व तिला ह्मणूं लागला, तूं असें करशील हें मला ठाउक नव्हतें. मी हे राजे बोलाविले नसते तरी बरें झालें असतें. आंतां उद्यांतरी तूं कसें करणार तें मला वास्तवीक सांग. शशिकला ह्मणाली, मीं पूर्वींच आपणांस कळविलें होतें कीं, मला सुदर्शनास वरण्याबद्दल देवीचा दृष्टांत झाला आहे, असें असून आपण आग्रहानें अन्य राजांस बोलाविलें यास मीं काय करावें? अस्तु उद्यांतरी मी मंडपांत येईन असें आपण समजूंनये. तर माझी आपणांस इतकीच विनंती आहेकीं, आजरात्रीं माझा विवाह

गुप्तरीतीनें सुदर्शनाशीं करावा; पुढील चिंता आपण अगदीं वागवूं नये. कारण जरी सुदर्शन येथें एकटा आला आहे, तरी त्याचे अंगीं अलौकिक सामर्थ्य असल्यामुळें, आलेले राजे लढाईस तयार झाल्यास, त्याचा पराभव करून आपणास यत्किंचितही उपद्रव होऊं देणार नाहीं, असें निश्चयात्मक समजा. त्यावरून सुबाहूनें त्या रात्रीं सुदर्शनाशीं शशिकलेचा विवाह केला.

हें वर्तमान प्रातःकाळीं सर्व राजांस कळलें त्यावरून त्यांस फार वाईट वाटलें. त्यांत युधाजित् तर अतिशयच क्रुद्ध होऊन त्यानें शत्रुजितास प्रमुख करून सर्व राजांसहीत युद्धास सिद्ध झाला; व सुबाहूकडे असा निरोप पाठविला कीं, जर तुला शशिकला सुदर्शनासच द्यावयाची होती तर आह्मां सर्वांस येथें कशाकरितां बोलाविलेंस? असा आमचा प्रसिद्धपणें अपमान करणारा जो तूं त्या तुला शिक्षाच केली पाहिजे, तर आतां युद्धास तयार हो. हें ऐकून सुदर्शनास पुढें करून सुबाहू तात्काळ युद्धासाठीं सर्व राजां समोर आला. सुदर्शनानें आदिशक्तीचें स्मरण करून युद्धास आरंभ केला. इतक्यांत शक्ति अनेक रूपांनीं प्रगट होऊन तिनें एका क्षणांत सर्व राजांचा पराभव केला; युधाजित् व शत्रुजित् यांस तर ठारच मारिलें.

युधाजित् व शत्रुजित् समरांगणीं पडतांच सर्व राजे सुदर्शनास शरण आले. व आदिशक्तीस आवरून तिचें महात्म्य आह्मास कथन कर अशी विनंति केली. ती मान्य करून सुदर्शनानें शक्तीची प्रार्थना करतांच ती गुप्त झाली. नंतर यानें सर्व राजांस श-

क्तीचें महात्म्य कथन केलें. मग सर्व राजे संतुष्ट होऊन त्यांनीं सुदर्शनाचा व शशिकलेचा प्रकट विवाह समारंभ पाहिला. नंतर सुबाहूनें सर्वांचा यथायोग्य सत्कार करून त्यांस मार्गस्थ केलें. सुदर्शनासही अपार द्रव्य, दासदासी, अश्व, गज, रथ, वस्त्रेंभूषणें, अलंकार इत्यादिकें करून गौरवून शशिकलेसहित त्यास मार्गस्थ करितांच तो येऊन भारद्वाजास भेटला, आणि त्याचा आशीर्वाद घेऊन अयोध्येस गेला. तेव्हां सर्व नगरीस आनंद होऊन मंत्र्यांनीं त्यास राज्याभिषेक केला. सुदर्शन राज्य पावल्यावर त्यानें आपल्या माते प्रमाणेंच आपली सापत्न माता लीलावती हिचें संरक्षण केलें. त्यामुळें तिचा संतोष झाला. यानें बरींच वर्षे सुनीतीनें राज्य करून प्रजेस सुखी केलें.

---

## राजा आणि कैदी.

एक राजा आपल्या राज्यांतील मुख्य मुख्य तुरुंग कधीं कधीं पहाण्यास जात असे. एके दिवशीं, तुरुंगांतील पटांगणांत पांच कैदी त्यानें पाहिले. त्यांच्या पायांत बिड्या होत्या, व ते कामाला चालले होते. राजानें त्यांस आपल्या पुढें उभे केले आणि “ तूं कैदेंत कां पडलास ? ” असें एकेकास विचारिलें.

पहिल्या कैद्यानें उत्तर केलें, ‘ महाराज, मी कांहीं एक अपराध केला नाहीं, परंतु माझ्या खटल्यांतील मुख्य साक्षीदारानें खोटें सांगितलें ह्मणून मी तुरुंगांत पडलों. ’

दुसरा ह्मणाला, 'खावंद ज्या न्यायाधिशानें मला तुरुंगांत घातलें, त्याची व माझी अदावत होती ह्मणून ही दशा मला प्राप्त झाली.'

तिसरा ह्मणाला, 'खावंद मी जो अपराधी ह्मणून ठरलों तो केवळ चुकीनें ठरलों वास्तवीक मी अपराध कांहीं एक केला नाहीं.'

चवथा बोलला, 'धनीसाहेब खरा अपराधी मी नसून दुसऱ्या एका कारितांच मला पकडून तुरुंगांत टाकिलें आहे.'

असें बोलून त्या चौघांनीं 'आह्मांस क्षमा करून सोडून द्या' अशी राजा जवळ विनंति केली.

परंतु इतक्यांत राजानें त्या राहिलेल्या पांचव्या मनुष्याकडे पाहिलें आणि तो ह्मणाला, 'आणि तूं रे तूं कसा येथें आलास?

तो ह्मणाला 'सरकार, मी एक रुपयांची थैली चोरून तुरुंगांत पडलों आहें, आणि ह्मणून मला आपली क्षमा मागण्याची छाती होत नाहीं.'

त्यावर राजा ह्मणाला, 'तर मग तूं या प्रामाणिक मनुष्यांच्या संगतीस रहाण्यास अगदीं योग्य नाहींस. हे ह्मणतात कीं, "आह्मीं कांहीं एक अपराध केला नाहीं."

मग तुरुंगावरील अधिकाऱ्याकडे वळून राजा ह्मणाला 'या मनुष्याच्या बिड्या तोडा, आणि याला सोडून द्या. खोटें सांगून यानें आपल्या पहिल्या अपराधांत भर घातली नाहीं. हा एक त्याचा सद्गुणच समजला पाहिजे."

वाचकहो, त्या राजानें तो पांचवा कैदी कां सोडून दिला बरें? तो खरें बोलला ह्मणूनच नव्हे का? तर मग तुह्मी या गोष्टी पासून काय शिकावयाचें? तर सर्वकाळ सर्वांनीं जें खरें असेल तेंच बोलावें.

---

## पंडित व त्याचे दोन शिष्ये.

एका पंडितापाशीं दोन शिष्ये होते. पंडित हे तर्कवाल्यावर विशेष प्रीति करून त्याची चारचौघांत वहावा करीत. हें पाहून वैयाकरणास फार वाईट वाटे. त्यानें एके दिवशीं पंडितास एकांतीं गांठून त्याचें कारण विचारिलें. पंडित ह्मणाले कीं, "त्याजबद्दलचें उत्तर एखाद्या वेळीं देऊन तुझें समाधान करूं." कांहीं दिवस लोटल्यावर पंडितास शेजारच्या एके गांवीं जाणें भाग पडलें. तेथें पोंहोंचल्यावर त्यानीं आपल्या दोघां शिष्यांस पत्रें लिहिलीं कीं, "आह्मीं ह्या गांवीं येऊन सुखरूप पोंहचलों होतों, पण दोनप्रहरीं रामशास्त्री यांच्या घरीं भोजन करीत असतां भाताच्या घांसाबरोबर एक सव्वाहात काडीचा तुकडा घशांत जाऊन आमचें प्राणोत्क्रमण झालें." हें पत्र वाचून तर्कवाल्यानें विचार केला, "जेवणांत सव्वाहात काडीचा तुकडा सांपडून पंडिताचें देहावसान झालें ही असंभवनीय गोष्ट आहे. तशांतून आपल्या मरणाबद्दल आपणच मजकूर लिहीतात तेव्हां हें सर्व थोतांड आहे." असें मनांत पक्कें आणून तो स्वस्थ बसला. इकडे वैयाकरणानें हें आपल्या गुरूजीच्या हातचें पत्र

आहे व ह्यांतील वाक्य रचना शुद्ध आहे, असें पाहून पंडित खचित स्वर्गस्थ झाले असें मानून त्याचें उत्तर-कार्य करण्याकरितां त्या गांवीं गेला. तेथें पंडित खुशाल चार विद्वान गृहस्थांबराबर भवति नभवति करीत बसले होते. पंडितांनीं ह्या वैयाकरणास येण्याचें कारण विचारलें; तेव्हां त्यानें पत्रांतील मजकूर कळवून येण्याचा उद्देश कळविला. तें ऐकून पंडित ह्मणाले कीं, " बाबा ज्या नेहमीच्या भांड्यांत भात शिजत-त्यांत सव्वाहात काडीचा तुकडा मावेल तरी कसा? आणि जो घांस पांच बोटांत मावून तोंडांत जातो त्या बराबर तो तुकडा माझ्या पोटांत जाऊन प्राण तरी कसा जाईल? ह्याचा तूं बिलकूल विचार केला नाहींस आणि आमचें उत्तर कार्य करण्या करितां आलास त्या तुला काय ह्मणावें बरें!! असेंच पत्र त्या दुसऱ्या शिष्यास मी पाठविलें होतें, पण त्यानें तर्क चालविला असेल कीं, हें घडणें अशक्य आहे व ह्मणूनच तो आला नाहीं. तुला अगदीं तर्क नाहीं. ह्मणूनच तुजपेक्षां आह्मीं तर्कवानावर विशेष प्रीती करितों. दुसरें कांहीं कारण नाहीं." हें ऐकून वैयाकरण फार लज्जित झाला.

## तात्पर्य.

केवळ व्याकरणादी शास्त्राध्ययन पुस्तकावरून झालेलें असलें म्हणजे तो मनुष्य व्यवहार चतुर होतो, असें नाहीं. जर तो तर्कहीन आहे तर तो कोणत्याही कामास अगदीं निरुपयोगी आहे, असें समजावें. तर्क-ज्ञानाची योग्यता फार मोठी आहे. अंगीं विद्वत्ता कमी

असूनही जर एकादा मनुष्य चांगला तर्कवान असला तर कोणत्याही प्रसंगीं तो डगमगणार नाहीं. नुस्ती पुस्तकी विद्या कांहीं उपयोगाची नाहीं.

---

## सुबोध ( आर्या. )

दृढ अवलंबुनि राहे,
त्यातें जगदीश देतसे हात ।
धारेवर मत्स्य चढे,
वाहे पाहे गज प्रवाहांत ॥ १ ॥
गुणवंता हीनपणा,
दुष्टाच्या संगतींत राहून ।
का तेजस्वी शशिला,
विकल करी संगतींत राहू न ॥ २ ॥
सत्कर्मानें चालुनि,
जो नर सत्य स्व भाषणा करितो ।
जरि मरतो तरि लोकां,
गमतो अमरावतार नरवर तो ॥ ३ ॥
अगुण गुण पाहिल्या विण,
नुसत्या रूपा कदां न भाळावें ।
कौंडळ फळ कटु त्याच्या,
नुसत्या कांतीस काय जाळावें ॥ ४ ॥
सबला सहाय जन हे,
दीनातें मसुनि छळति रे सत्य ।
करि वात साह्य दावा,
परि तो दीपास मालवी नित्य ॥ ५ ॥

वर्णुनि पूर्वज कीर्तिस,
जो नर सुचवी स्वकीय प्रौढीतें ।
त्या मूर्ख कसा न ह्मणूं,
रत्नाकारिं जनुन काय कौंडीतें ॥ ६ ॥

---

## मितव्यय.

पैशाचा योग्य प्रसंगीं योग्य रीतीनें व बेताबातानें खर्च करणें, यास मितव्यय असें ह्मणतात. आपल्या पैशाची उधळपट्टी न करितां बेताबातानें खर्च करावा ही गोष्ट सर्वांना मान्य असून, तसें करावें, असा-ही प्रत्येकाचा हेतु असतोच; पण खालीं लिहीलेल्या-पैकीं एका किंवा अनेक कारणां मुळें मितव्यय करण्याचे त्यांचे बेत फसतात व त्यांच्या पैशाची नासाडी होते.

बहुतेक लोकांना आपण आहों त्यापेक्षा ज्यास्त श्रीमंत व सुखी दिसावें अशी इच्छा असते, व तिची तृप्ती करण्यासाठीं ते आद्याबाहेर खर्च करितात. कित्येक लोक वाजवीपेक्षां जास्त मिजाशी असतात व त्यांचें खाणेपिणें, वस्त्रप्रावरण व घरदार हीं त्यांच्या मर्जी प्रमाणें असावींत ह्मणून त्यांचा पैसा व्यर्थ खर्च होत असतो. कित्येकांना आपल्या घरीं उत्तम सामान सुंदर तसबिरी व भपकीदार लत्ताकपडा असावा, अशी इच्छा असते व त्याच नादांत ते पैशाची खराबी करून घेतात. कित्येक दुर्व्यसनांत पैशाची राख रांगोळी करतात. कित्येक दातृत्वाच्या मिषानें पैसा खर्चून

टाकितात. कित्येक फाजील पाहुणचारांत पैसा नासून टाकितात. आणि कित्येक तर केवळ आपल्या स्वतःच्या निष्काळजी मुळें भिकेस लागून अन्नाला महाग होतात. अशा अनेक कारणांनीं लोक खराबीस येतात.

मितव्ययाची संवय लावून घेण्यास उत्तम मार्ग ह्मटला ह्मणजे आद्यापेक्षां खर्च कधींही ज्यास्त करावयाचा नाहीं हा निश्चय करून तो दृढपणें पाळणें हा होय. नियमितपणें जमाखर्च ठेवण्यापासून कोणत्या गोष्टीकडे आपण किती पैसे खर्च करतों हें आपणांस सहज कळून येतें व आपल्या आद्यापेक्षां खर्च वाढूं लागला आहे कीं काय, ही गोष्टही चटकर लक्षांत येते आणि आपण खर्चाचे कामीं हात आटोपता घेतों. जगांतील प्रत्येक वस्तु उपयोगी आहे असें सर्वांसच वाटत नाहीं, व पुष्कळ वस्तु फार उपयोगी असूनही त्यांचा ते योग्य उपयोग करीत नाहीत, आपल्यांत, साप वाळवून ठेवणाऱ्या गृहस्थाची गोष्ट सांगत असतात, त्यांतील अतिशयोक्तीचा भाग काढून टाकला तर प्रत्येक वस्तु जपून वापरणें, व सर्व वस्तूंचा संग्रह करून ठेवणें, हा एक सद्गुण आहे, इतका बोध त्या गोष्टीपासून घेण्यास कांहीं हरकत नाहीं. ज्या वस्तुची आपणांस गरज नाहीं, ती कितीही मोहक असली, व तिची किंमत कितीही कमी असली तरी ती विकत घेऊं नये व अशा निर्धारानें सतत वागण्याचा निश्चय केल्यास पैशा संबंधीं आपली तारंबळ कधींही व्हावयाची नाहीं. पैपैनें पैसा

जोडला जातो, हें तत्व कधींही विसरतां कामा नये. पुष्कळ लोकांस अशी संवय असते कीं, क्षुल्लक बाबी विषयीं विशेष काळजी न बाळगतां फक्त ठोकळ गोष्टी कडे मात्र फार बारीक लक्ष पुरवावयाचें. हें त्यांचें करणें बरोबर नाहीं. कारण पुष्कळ क्षुल्लक गोष्टींचीच एक मोठी गोष्ट होत असते, ही गोष्ट ते विसरतात असें दिसतें. कित्येकांची कृती याचे अगदीं उलट असून त्यांची बारीक सारीक गोष्टीं विषयीं इतकी कांहीं घासाघीस असते कीं त्या मुळें त्यांचीं प्रसंगोपात मोठ मोठालीं नुकसानें देखील होतात. थोड्याशा पैशासाठीं जिकीर करून गलबताचा विमा उतरला नाहीं, तर प्रसंगीं कोठ्यावधीची ठोंकर लागून, मनुष्य सफई बुडून जातें. अशा रीतीला मितव्यय म्हणण्यापेक्षां चिक्कुपणा हें नांव जास्त शोभतें.

मितव्यय हा चिक्कुपणा नव्हे. यांपैकीं पहिला सद्गुण आहे व तो जवळ बाळगण्यासाठीं सर्वांनीं झटावें, व चिक्कुपणा हा मनुष्यात मोठा दोष असून, तो त्यांनीं काढून टाकण्यासाठीं प्रयत्न करावा, हें योग्य आहे. एखाद्या कारागिरानें हत्यारें व सामान खरेदी करतांना पैशाकडे पाहून खराब हत्यारें विकत घेतलीं तर त्याचा धंदा नीट न चालून त्यास किफायतही होणार नाहीं, हें उघडच आहे. असल्या प्रकारचा विघातक मितव्यय, चिक्कुपणाच होय यांत शंका नाहीं.

मितव्यय हा इतका सद्गुण आहे कीं, तो ज्याचे जवळ असेल, त्याला जगाचें भय मुळींच वाटत नाहीं. संसार हा दुःखाचा डोंगर नसून सुखाचें आगर आहे,

असें वाटूं लागतें. व मितव्ययी मनुष्य सर्व जन्म सुखांत घालवून मृत्युला देखील न भीतां आनंदांत रहातो.

---

## दोघे योद्धे.

जेव्हां पृथ्वी उत्पन्न झाली तेव्हां तीवर स्वर्गातून सत्य आणि पाताळांतून असत्य या नांवांचे दोघे योद्धे आले. सत्य हा देवपुत्र असून तो भला आणि सत्त्व गुणी होता. असत्य हा दानव पुत्र असून दुराभिमानी व मूर्ख होता. नवीन उत्पन्न झालेल्या पृथ्वीचा अधिकार आपणास मिळावा अशी प्रत्येकास अनावर इच्छा उत्पन्न झाली. सत्य ह्मणे पृथ्वीचें राज्य मीच करीन. असत्य ह्मणे पृथ्वीचा अधिपती मीच शोभेन. याप्रमाणें वाद चालून शेवटीं दोघांमध्यें मोठें हाडवैर पडून उभयतांचा तुंबळ संग्राम होण्याचा प्रसंग आला. दोघेही मोठे पराक्रमी व बलाढ्य होते, ह्मणून त्यांचा युद्धचमत्कार पाहण्याकरितां संपूर्ण देव, गंधर्व विमानांतून अंतरिक्ष प्रदेशांत आले होते.

या राज्यावर खरी सत्ता माझीच चालेल, अशी सत्याची खात्री होती. तो कोणाचें सहाय्य न घेतां व सरदारांची परवा न करितां विवेक या नांवाचा आपला एक हुजऱ्या बरोबर घेऊन मोठ्या डौलानें समर भूमीवर युद्धाकरितां आला. त्याची चाल आरंभीं अगदीं मंद मंद असून पुढें तिचा वेग फारच वाढत जात असे, आणि एकदां त्यानें पुढें पाऊल टाकिलें

ह्मणजे मग तें, मनुष्य तर काय पण प्रत्यक्ष देव जरी आडवे आले तरी, त्याच्यानें मागें घेववत नसे.

असत्यानें सत्याचा हावभाव व डौल अगदीं हुबेहुब उतरला होता; व त्याला तो बराच साधला होता. त्याचें सैन्य अपार असून त्यावर काम क्रोधादि सरदारांची सक्त देखरेख होती. या सर्व सैन्याच्या मध्यभागीं तो रहात असे. शत्रूवर, हल्ला करण्यासाठीं त्याचे सरदार त्यास वारंवार उत्तेजन देत असत तोंडास तोंड देऊन युद्ध करण्याचें त्यास होत नसे, ह्मणून तो अकस्मात् व अनियमित हल्ला करी. त्यानें वारंवार हल्ला करून बराच मुलूख संपादन करावा, पण तो स्वतंत्र रीतीनें आपल्या ताब्यांत राखण्याचें त्यास स्वतः सामर्थ्य नव्हतें, ह्मणून कामक्रोधादि सरदारांच्या जोरावर तो त्या जित प्रदेशावर सत्ता चालवी. व त्यामुळें ते सरदार आपले मोठे विश्वासू आहेत, असें त्यास वाटे.

जेव्हां जेव्हां दोघांची समोरासमोर गांठ पडे, तेव्हां तेव्हां असत्य हा आपल्या सरदारांपैकीं एखाद्याच्या आड राही. त्यानें आपल्या कपट नामक शिल्प्याकडून आपल्यास लपून रहातां यावें ह्मणून एक दुर्गम किल्ला बनविला होता. या असत्यानें आपल्या डाव्या हातांत उद्धटपणाची ढाल व उजव्या हातांत कुतर्काचा भाला धरिला होता. तो करकरां दांत खाऊन ओरडत असे. त्याचे कामक्रोधादि सरदार त्याच्या हुकुमाची अगदीं वाट पहात असत. त्याचे अघाडीचे सैन्यावर अभिमान व पिछाडीवर दुराग्रह हे आणखी दुसरे दोन बलाढ्य सरदार हुकमत चालवीत असत.

पण जिकडे सत्य आपल्या क्रोधयुक्त दृष्टीनें पाही, तिकडील सरदाराची अगदीं गाळण उडत असे. ह्मणून असत्य वारंवार आपल्या सैन्याची जागा बदली व चोहोंकडून आपल्या शत्रूवर बाणांचा वर्षाव करी.

सत्याची गर्जना जरी फार भयंकर नव्हती, तरी त्याचा चेहरा पाहूनच शत्रूंच्या पोटांत धडकी भरत असे. एखादे वेळीं युद्ध होतां होतां जेव्हां ते उभयतां हात घाईवर येत तेव्हां असत्य कुतर्कांचा भाला टाकून औद्धत्याची ढाल दोन्हीं हातानीं सावरून आपल्या सरदारांच्या सहाय्यानें आपला बचाव करी.

सत्याला जरी वारंवार जखमा होत तरी, तो देवपुत्र असून नित्य अमृतपान करीत असल्यामुळें, त्या लवकरच बऱ्या होत. परंतु असत्यास जरी लहान सहान जखम झाली तरी, तो दानवपुत्र असून मांस भक्षण व सुरापान करीत असल्यामुळें, तिची लस शेजारीं लागून ती जखम पसरत असे. व एखादे वेळीं बरी होत आली तरी पुनः फुटून वाहूं लागे.

कांहीं वेळानें असत्याची खात्री झाली कीं, आपण आपलें स्थल पालटीत आहें ह्मणूनच आपली शोभा राहत आहे. पण सत्य आपली जागा अगदीं सोडीत नसे. आणि जेव्हां तो शत्रूच्या आंगाशी भिडण्याचा निश्चय करी तेव्हां असत्य आडवाटेनें केव्हांच निसटून जाई.

वाचक हो, यां पैकीं कोणाचा जय व्हावा अशी तुमची इच्छा आहे?

# सार्थ सुभाषितें.

वार्ताच कौतुकवती विमलाच विद्या ।
लोकोत्तरः परिमलश्च कुरंग नाभेः ॥
तैलस्य बिंदुरिव वारिणि दुर्निवार ।
मेतत्त्रयं प्रसरति स्वयमेव लोके ॥

अर्थ–' अद्भुत वार्ता, उत्कृष्ट विद्वत्ता, आणि मृगनाभीचा ( कस्तूरीचा ) लोकोत्तर परिमळ हीं तीन तेलाचा बिंदु जसा पाण्यांत त्याप्रमाणें आपोआप चोहोंकडे पसरतात ! '

को न याति वशं लोके मुखे पिंडेन पूरितः ।
मृदंगो मुखलेपेन करोति मधुरध्वनिम् ॥

अर्थ–' तोंड भरल्यावर या जगांत कोण वश होत नाहीं ? पहा, मृदंग सुद्धां तसें केल्यानें मधुर ध्वनी करायला लागतो ! '

सदा वक्रः सदा रुष्टः सदा पूजामपेक्षते ।
कन्या राशिस्थितो नित्यं जामाता दशमो ग्रहः ।

अर्थ–' जामात हा दहावा ग्रहच होय. कसा? नेहमीं वक्र ह्मणजे आपल्याच कुर्‍यांत असणारा, नेहमीं रुसलेला, नेहमीं समजाविला पाहिजे ! आतां दोहोंत एक मात्र मोठा भेद आहे:ग्रह नेहमीं राशी वरून चळतो, पण हे बोवा कन्या राशीस जे एकदां धरून बसतात ते मग हालत नाहींत !'

सरलयोः किल सख्य मुदा हृतं ।

कुटिलयोर्घटनैव कदाच न ॥
यदि भवेत्सरलेन खलेन वा ।
न चिरमस्ति धनुः शरयो रिव ॥

अर्थ—'खरें सख्य जें व्हावयाचें तें दोघां सरळ स्वभावाच्या पुरुषांत होऊं शकतें; कधीं कधीं तें कुटिल स्वभावाच्या मनुष्यांतही सांपडतें. पण एक खळ आणि सरळ अशांची संगति घडली असतां ती फार वेळ टिकत नाहीं; यास उदाहरण कुटिल जें धनुष्य व सरळ जो बाण यांचें होय'!

स्वाधीना दयिता सुतावधि सुतोऽसौ षोड
डशाब्दावधि । स्यात्कन्या करपीडनावधि
सुतस्त्रीस्तदशत्वा वधि ॥जामाता बहुलापि
तावधि सखा साधुप्रलापावधि ॥शिष्या गुह्य
निरूपणावधि परेचेत धनित्वा वधि ॥

अर्थ–जों पर्यंत मुलगा झाला नाहीं तों पर्यंत बायको आपल्या स्वाधीन; मुलगा सोळा वर्षां पर्यंत आपले स्वाधीन; मुलगी लग्न होई तों पर्यंत; सून तीस यौवन दशा प्राप्त होई तों पर्यंत; जावई पुष्कळ जों पावेतों पोंचतें आहे तों पर्यंत; मित्र, लोक आपणास बरें ह्मणताहेत तों पर्यंत; शिष्य, गुरु किल्ली सांगून दिली नाहीं तोंवर; आणि सामान्यतः इतर लोक जवळ पैसा आहे तों पर्यंत!'

दरिद्रता धीरतया विराजते ।
कुरूपता शीलतया विराजते ॥
कुभोजने चोष्णतया विराजते ।
कुवस्त्रता शुभ्रतया विराजते ॥

अर्थ– 'दरिद्री पुरूष जर स्वभावानें गंभीर असेल तर त्या गुणानें त्याचें दारिद्य शोभलें जातें; कुरूप मनुष्य जर सुशिल आहे तर तो शोभला जातो; कदन्न उष्ण असल्यानें शोभून जातें आणि जीर्ण वस्त्र स्वच्छतेनें शोभलें जातें !'

---

## सातव्या अंकांतील कूटप्रश्नोत्तर.

शिवभक्तानें धरून नेलेलीं बिल्वदळें ४३; व त्यानें प्रत्येक शंकरास वाहिलेलीं १०५.

(१) सर्व पटींचा परस्पर गुणाकार करावा, ह्मणजे प्रत्येक शंकरास वाहिलेलीं बिल्वदळें निघतील. जसें, तिप्पट, पांचपट, सातपट. ३×५×७=१०५ हीं वाहिलेलीं बिल्वदळें.

(२) नंतर (पहिलीपट सोडून देऊन) दुसऱ्या पटींत १ मिळवावा; ह्या बेरजेस तिसऱ्या पटीनें गुणावें; ह्या गुणाकारांत पुनः १ मिळवावा. येईल तें उत्तर. (जास्त देवस्थानें असल्यास पुढील पटीनें गुणून १ मिळवीत जावा.) जसें, ५+१=६; ६×७=४२; ४२+१=४३. हीं धरून आणलेलीं बिल्वदळें.

*** हवीं तितकीं (चार, सात, दहा, इत्यादि) देवस्थानें कल्पावीं; व प्रत्येक देवस्थानांत वाटतील तशा (आठपट, पांचपट, दुप्पट, इ०) पटी धरून वरील रीतीनें उदाहरण सोडविल्यास बरोबर उत्तर येईल.

---

# बक्षीसाचा निकाल.

गेल्या अंकांतील कूट प्रश्नाचीं उत्तरें एकंदर ११३ जणांकडून आलीं. ज्यांनीं बीज गणीतांत उदाहरण सोडविलें, ज्यांची रीत नसतां फक्त उत्तरें मात्र होतीं, अशांचीं नांवें छापिलीं नाहींत व सोडतींतही घेतलीं नाहींत.

( रीतीसह बरोबर उत्तरें देणारांचीं नांवें. )

रा. रा. **विनायक आबाजी सोनार.** (सासवड)पुणें.
,, लक्ष्मण अय्या भुजंग अय्या. ,,
,, शंकर विठू आमते. ,,
,, धोंडो मोरो डुनाखे. ,,
,, अनंत बाळकोबा तेली. ,,
,, सुभानजी सखाराम रामोसी ! ,,
,, भिवा रामजी वसकर. ,,
,, विश्वनाथ केशव कांबळे. ,,
,, पंढरीनाथ रामचंद्र बोराणे. ,,
,, सोनापा तुकाराम पवार. ,,
,, गजानन नीळकंठ बोकील. ,,
,, काळू फुलाजी एके. ,,
,, दगडू गुणाजी खामकर. ,,
,, सदाशिव गोविंद फलटण, ,,
,, शिवराम गंगाधर काळे. ,,
,, विष्णु रघुनाथ देशमूख. ,,
,, पोहिमल नारायणदास. कराची.
,, गणपतराव वैद्य. ( सांब्राणी. ) कानडा.
,, नरसिंगराव व्यंकटराव पाटील. ,,

रा. रा. विघ्नहर आत्माराम ( गगनबावडा) कोल्हापूर.
,, नारायण देवराव शेट ( भालोद ) खानदेश.
,, काशिनाथ वामन भावे ( शिरपूर ) ,,
,, नारायण विठ्ठल खानोलकर. (आरनाळा) ठाणे.
,, रामचंद्र रामकृष्ण सामंत. ,,
,, भगवान बळवंत गव्हाणकर. ,,
,, महादेव नागेश सामंत. ,,
,, रामचंद्र सदाशीव भागवत. (घोलवड),,
,, पांडुरंग हरिश्चंद्र. ( केळवे )
,, पुरुषोत्तम नारायण भट. ( पंचवटी ) नाशीक.
,, दामोदर वामन सोले. ,,
,, नारायण त्रिविक्रम शास्त्री. ,,
,, नारायण लक्षुमण सुकेणकर. ,,
,, सीताराम बळवंत वेरूळकर. ,,
,, नारायण रामचंद्र चवधरी. ,,
,, गणेश अंबादास जोशी. ,,
,, मोरेश्वर वामन पालेकर बेळगांव.
,, केशव रंगो नटेंद्रकर ( कित्तूर ) ,,
,, पांडुरंग यशवंत साभंत ( सिरगांव ) ,,
,, भाऊ गोविंद कर्णेकर ( हलकर्णी ) ,,
,, महादेव लक्षुमण इनामदार ( देसूर ) ,,
,, लक्षुमण बाबू कडूलकर ( कलमट ) रत्नागिरी.
,, केशव रामचंद्र शेट कुडतलकर ,,
,, रघुनाथ बाळकृष्ण मुंज, ( कणकवली ) ,,
,, गोविंद हरी प्रभू, ( तरदळें ) ,,
,, बाळकृष्ण नीळकंठ प्रभु ( चाफेट ) ,,

रा. रा. विठ्ठल अनंत भट (चाफेट) ,,
,, भालचंद्र हरी (दापोली) ,,
,, तुकाराम बाळकृष्ण शेट (वरवडें) ,,
,, केशव आपाशेट कांदे, (सुकळवाडी) ,,
,, रुद्रपा कृष्णपा सिवनी, छपापा.
,, सावळा ईश्वरशेट भुमकर बार्सी, सोलापूर.
,, माधव विष्णु पिसोळकर हैद्राबाद.
,, नारायण कृष्ण गतवंतीकर ,,
,, गंगाधर विसाजी बाम ,,
,, वामन गोविंद जोशी ,,

---

## कूटप्रश्न.

ज्याचे घरीं रोज १ शेर धान्याचा खर्च आहे त्यानें त्या शेरापैकीं एक मूठ काढून संग्रही ठेवावी; चार शेरास चार मुठी संग्रह करावा या प्रमाणें पांच वर्षें पर्यंत चालल्यास बराच धान्यसंग्रह होऊन अकस्मात् येणाऱ्या दुष्काळाचीही भीति बाळगावयास नको असें एक पत्रकार ह्मणतो. सर्व लोकानीं गेल्या अधिक शुद्ध प्रतिपदे पासून अशा प्रकारें संग्रह करण्याचें व्रत आरंभावें अशी त्याची प्रार्थना होती. त्या प्रमाणें बऱ्याच लोकांनी या व्रतास सुरुवात केली असेल.

वरचा मजकूर वाचून थोडा बहूत गव्हाचा संग्रह करावा, असें अमच्या मनांत आलें आहे. पहिल्या दिवशीं गव्हाचा एक दाणा, दुसरे दिवशीं दोन, तिसरे दिवशीं चार, चवथे दिवशीं आठ या प्रमाणें आदले

दिवसाचे दुप्पट दुसऱ्या दिवशीं संग्रह करावा, आणि हें व्रत चाळीस दिवस पर्यंत चालवावें व या व्रतास येत्या आषाढ शुद्ध १२ दशीस सुरुवात करावी असा आमचा मानस आहे.

आह्मीं आमचा हेतू येथील एक इनामदार व एक दलाल अशा उभयतां मित्रास कळविला. व चाळीस दिवसपर्यंत रोज गहू आणून पुरविण्याचे कामाचा आह्मी मक्ता देणार आहों, असें ह्मणालों. चाळीस दिवस गहू पुरविण्या बद्दल ८ रुपयांस मक्ता कोणीही घेईल असें इनामदार मित्रानें ह्मटले. आमचे दलाल साहेब तर हा मक्ता अवघ्या ४॥ रुपयांस पत्करतों म्हणतात. तर हा मक्ता घेतल्या पासून आमचे दलाल साहेबांस किती फायदा अथवा नुकसानी होईल? व चाळीस दिवसांत किती रुपयांचे गहू आमचे संग्रहास पडतील? ही दोन उत्तरे पाहिजेत (हल्लीं गव्हांचा भाव ९ रुपयांस १२ पायली आहें. ८० तोळ्यांचा शेर; एका तोळ्यांत ३४१ $\frac{1}{3}$ गहू भरतील असे वजनदार चांगले गहू पाहिजेत. )

उत्तरें तारीख ३०-७-९३ चे आंत पाठवावीं रीतीसह बरोबर उत्तर देणारांत ज्याचें नांव सोडतींत येईल त्यास एक रुपया किंमतीचें **सर्वसंग्रह** हें पुस्तक बक्षीस मिळेल. उत्तरें पाठविण्याचा पत्ताः—

प्रकाशक 'खानदेशमित्र'

पोष्ट—खानापूर

(जि. बेळगांव)

## किरकोळ.

श्रीमंत जमखेंडीकर यांनीं आपली प्रकृती दाखविण्या करितां प्रख्यात वैद्य **वासुदेव चिंतामण बापट** नारिंग्रेकर यांस नेलें होतें; आणि त्यांची ओषधा संबंधीं माहिती, परिक्षा व वनस्पतीचे कांहीं चमत्कार पाहून श्रीमंत खुष झाले आणि त्यांजकडील औवधी उपचार सुरू झाल्याचें कळतें.

---

## आश्रयदात्यांस विनंती.

ज्यांची चालू सालाबद्दल अद्यापी वर्गणी आली नाहीं त्यांनीं कृपा करून ता. ९।८।९३ चे आंत ती पाठवावी. ज्याचेकडे वरील मुदती पुढें वर्गणी राहील त्यांस अंक व्ही. पी. नें पाठवूं तो स्वीकारावा लागेल.

प्रकाशक.

---

## अगत्य वाचा.


लगतचे पुरवणींतील औषधी व रबरी शिक्के वगैरे मिळून ३ रुपये किंवा ज्यास्त किंमतीचा माल मागविणारांस ता. १९ अगष्ट १८९३ पावेतों ट.ख. माफ आहे. व ३ रुपयांचे वर घेणारांस $\frac{?}{?}$ कमिशन.व ट. ख. माफ.


---

## अनंतरंग.


हें पूर्ण शृंगारिक माहितीचें पुस्तक प्रत्येक तरुण पुरुषानें ता० ९-८-९३ पर्यंत मागविल्यास व्ही. पी. खर्चासह १२ आण्यांस मिळेल मुदती नंतर १९ आणे.

पत्ता—ह० स० खानोलकर आणि मंडळी.

पोष्ट—खानापूर

(जि०—बेळगांव.)

# जंगी लाट ३ री.

**अनंतरंग**, किं. ऽ१२; **सुशील रंगी-रंगराव** कादंबरी किं. ऽ१४; **नवनारी चरित्र** [ भाग १।२ एकत्र ] किं. १ रु. **संगीत रासक्रीडा**; किं. ऽ८; **मित्रबोध**, किं. ऽ२; **काव्यमाला**, किं. ऽ३; **सुंदराबाई** कादंबरी, किमत ऽ१ आणा.

हीं ३ऽ८ किंमतीचीं ७ पुस्तकें ता. ९-८-९३ पर्यंत मागविणारांस ( १ऽ१२ ) एक रुपया बारा आण्यांस मिळतील. टपाल व व्ही. पी. खर्च ऽ४ निराळा.

लाट मागविण्याचा पत्ता-प्रकाशक ' खानदेशमित्र.

पोष्ट-खानापूर.

[ जि. बेळगांव ]

---

# बापट यांचीं जगप्रसिद्ध औषधें.

क्षयरोग, रक्तपिती, भगेंद्र, गर्मी, परमा, चट्टे, व्रण, धातुविकार, प्रदर विकार, इंद्रिय शिथिलता, पंडुरोग, दम्मा, दमा, आंकडी, आम्लपित्त, पोटशूळ, सर्व प्रकारचे ताप, पटकी, गुल्म, हगवण, लघ्वींतून धातु जाणें, मस्तक भ्रमण, पक्षघात, इ० रोगांवरील जगांत नावाजलेलीं खात्रीचीं औषधें व वनौषधी प्रकाश भाग १।२, गुरांचा वैद्य, बाल वैद्य, सुषेण चिकित्सा, अश्विनीकुमार, गर्मीचें पुस्तक इ० पुस्तकें सहींतील पत्त्यावर व्हा० पेबलनें मागविल्यास मिळतील. पत्रव्यवहार मराठी लिपींत. पत्रें पेड. उत्तरास तिकीट असावें.

वासुदेव चिंतामण बापट वकील,

मौजे नारिंग्रे ता० देवगड जि० रत्नागिरी.

# खानदेशमित्र.

॥ श्लोक ॥ ( वसंततिलका )

कस्यापि कोऽप्यतिशयोऽस्ति स तेन लोके ।
ख्यातिं प्रयाति नहि सर्व विदस्तु सर्वे ॥
किं केतकी फलति किं पनसः सपुष्पः ।
किं नागवल्ल्यपिच पुष्पफलैरुपेता ॥ १ ॥

पुस्तक १ लें. जुलै. १८९३. अंक ९ वा.

## अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ट. | विषय. | पृष्ट. |
|---|---|---|---|
| १ कबीर चरित्र...... | १९३ | ७ अति परिचय खोटा. | २०७ |
| २ सतिचें कंकण...... | १९९ | ८ सुबोध ( आर्या )... | २०९ |
| ३ पुणेरी भामट्या... | १९९ | ९ सार्थ सुभाषितें.... | २१० |
| ४ गौळणीचें गाऱ्हाणें. | २०१ | १० क्षुल्लक गोष्टी ... | २१३ |
| ५ विलक्षण स्मृति... | २०२ | ११ कूट प्रश्न......... | २१६ |
| ६ आळशी मुलगा... | २०४ | | |


बेळगांव येथें 'बेळगांवसमाचार' छा० छापिलें.

**वर्गणीचे दर.**

वर्षाचे अगाऊ ट. ह. सह.... ....१८३
फुटकळ अंकास किंमत.... .... ....८२

प्रकाशक— ह० स० खानोलकर आणि मंडळी.
पोष्ट—खानापूर.
( जि. बेळगांव. )

# आर्यरंजन.

हें चिमकुलें 'खानदेशामित्र' साच्याचें १२ पृष्टांचें मासिक पुस्तक लवकरच निघणार आहे. यांत मनोरंजक, मार्मिक, व उपयुक्त असेच विषय येतील. किमत वर्षाचे चार आणे; शिवाय टपालखर्च ८२ निराळा पडेल.

खानदेशमित्राचे वर्गणीदारांस अवघे चारच आणे पडतील. टपालखर्च पडणार नाहीं.

वर्गणीदार होऊं इच्छिणारांनीं खालच्या पत्त्यावर पत्रें पाठवावीं:—

प्रकाशक 'खानदेशमित्र'
पोष्ट—खानापूर.
( जि. बेळगांव. )

---

# बापट यांचीं जगप्रसिद्ध औषधें.

क्षयरोग, रक्तपिती, भगेंद्र, गर्मी, परमा, चट्टे, व्रण, धातुविकार, प्रदर विकार, इंद्रिय शिथिलता, पंडुरोग, दया, दमा, आंकडी, आम्लपित्त, पोटशूळ, सर्व प्रकारचे ताप, पटकी, गुल्म. हगवण, लघ्वींतून धातु जाणें, मस्तक भ्रमण, पक्षघात, इ० रोगांवरील जगांत नावाजलेलीं खात्रीचीं औषधें व वनौषधी प्रकाश भाग १।२, गुरांचा वैद्य, बाल वैद्य, सुषेण चिकित्सा, अश्विनीकुमार, गर्मीचें पुस्तक इ० पुस्तकें सहींतील पत्त्यावर व्हा० पेबलनें मागविल्यास मिळतील. पत्रव्यवहार मराठी लिपींत. पत्रें पेड. उत्तरास तिकीट असावें.

वासुदेव चिंतामण बापट वकील,
मौजे नारिंग्रे ता० देवगड जि० रत्नागिरी.

मासिक पुस्तक.

# खानदेशमित्र.

## कबीर चरित्र.

कबीर हा एक मोठा साधु पुरुष होऊन गेला. याचा जन्म झाल्यावर हा ज्या मुसलमान जातीच्या स्त्री पुरुषांस सांपडला त्या वरून त्यास मुसलमान जातीचा ह्मणून ग्रंथ कारांनीं वर्णिलें आहे. याचें जन्म तीन चार प्रकारांनीं लिहीलेलें आढळतें. कोणी ह्मणतात, निमा नांवचा एक मोमीन होता, तो एके दिवशीं सूत धुण्यास भागीरथीवर गेला असतां तींतून नुक्तेंच वहात आलेलें एक मूल त्याच्या दृष्टीस पडलें, तें त्यानें घरीं आणून आपल्या नुरी नांवाच्या स्त्रीपाशीं दिलें, तोच हा कबीर. कोणी ह्मणतात, याचें जन्म सिंपल्यांतून झालें. कोणी ह्मणतात खानदेशांत काशी ह्मणून एका गांवांतील लहर नांवाच्या तलावांत हा सांपडला. कोणी ह्मणतात, रामानंद स्वामीच्या मुखावाटे, एका विधवेस, 'पुत्रवती भव' असा चुकून आशीर्वाद निघाला, त्यावरून ती गर्भिणी झाली, व लोक लज्जेस्तव अरण्यांत राहून प्रसूत झाली, व झालेलें मूल तेथेंच सोडून देऊन निघून गेली; तोच हा मोमिनास सांपडला. सारांश या सर्व गोष्टींत खरी कोणती हा निर्णय जरी आज होऊं शकत नाहीं, तरी याचें जन्म अन्य ठिकाणीं झालें असून हा मोमिनास सांपडला येवढी गोष्ट निःसंशय खरी आहे.

याच्या अद्भुत ज्ञानावरून भावीक लोक याला शुकाचा अवतार असें मानितात. याचें जन्म कधीं झालें इत्यादिकां विषयीं कबीर पंथी लोक असें ह्मणतात.—

" संवत् बारहसें पांचमों ज्ञानी कियो बिचार ॥
काशी माही प्रगट भयौ शब्द कहो कटसार॥१॥
संवत् पंधरहसे पांचमों मगर कियो गवन ॥
अगहन सुदी एकादशी मिले पवन सो पवन "॥२॥

या दोहऱ्यांचा अर्थ—संवत् बाराशें पांचामध्यें किंवा शके १०७० त याचें जन्म काशींत झालें व पंधराशें पांचामध्यें अथवा शके १३७० त अश्विन शुद्ध एकादशीस मगर ह्मणून गांव आहे तेथें याचें निर्याण झालें. यावरून हा तीनशें वर्षें वांचला होता असें उघड दिसून येतें.

हा ज्ञानेश्वर वगैरे भावंडें यांच्या वेळेस जरी होता, तरी त्या पूर्वीं असल्याचा दाखला असा आढळतो कीं, याचे गुरु जे प्रसिद्ध रामानंदस्वामी तेच ज्ञानेश्वराच्या बापाचे गुरु होते. ह्मणून हा त्यांचा काका गुरु दिसत असून त्यां पूर्वींचा खास, असें उघड सिद्ध होतें. अस्तु; नानकाची व याची भेट झाली, असें कित्येक ह्मणतात. शिवाय असेंही सांगतात कीं, बहिलोलखान लोदीचा पुत्र जो शिकंदर यानें हा मुसलमान असून हिंदुधर्म पाळितो अशा बद्दल याचा पुष्कळ छळ केला. परंतु या दोन्ही गोष्टी संभवत नाहींत. कारण, याची समाधी शके १३७० मध्यें असून नानकाचें जन्म शके १३९१ मध्यें आहे, आणि शिकंदराचा राज्यारंभ शके १४१० मध्यें आहे, ह्मणून यानें देह ठेविल्यावर नानक

२१ वर्षांनीं जन्मला; व शिकंदराची कारकीर्द ४० वर्षांनीं सुरू झाली.

कबीर हा आपल्या बापाचा जो कोष्ट्याचा धंदा होता तोच चालवून निर्वाह करीत असे. याच्या बापानें याचें लग्न केलें होतें, व यास कमाल नांवाचा एक मुलगाही होता. कबीरास रामाची भक्ती करणें मनापासून आवडत असे, ह्मणून तो ती करण्यांत लहानपणापासून तत्पर असे. तेंच वळण त्याच्या पुत्रास लागून तोही याच्याच प्रमाणें नामांकित भक्त मंडळांत गणनीय झाला.

कबीरानें रामानंद स्वामीचा अनुग्रह संपादिला, याविषयीं अशी गोष्ट सांगतात कीं,–एकदां कबीर स्वामीच्या स्नानास जाण्याच्या वाटेवर त्यांची वाट पहात बसला. नित्यमाप्रमाणें ते स्नानास चालले असें पाहून यानें साष्टांग दंडवत केलें व विनंती केली कीं, 'कृपाकरून मला अनुग्रह द्यावा.' स्वामी ह्मणाले 'तूं कोण? व तुझें नांव काय?' तेव्हां यानें आपली जात सांगून 'मला कबीर ह्मणतात,' असें सांगितलें. त्यावरून स्वामी बोलले,'तूं यवन असल्यामुळें आह्मांपासून अनुग्रह घेण्यास योग्य नाहींस. तर तूं दुसऱ्या कोणाकडून तरी तो संपादन कर.' असें ऐकून यानें ह्मटलें 'महाराज, माझी भावना आपणाशिवाय अन्यत्र बसत नाहीं. यास्तव मजवर कृपा करावी.' त्यावर स्वामींनीं कांहींएक उत्तर न देतां ते तसेच स्नानास गेले. पुढें हा निरुपाय होऊन घराकडे परत आला; परंतु त्या दिवसापासून आपले गुरु रामानंदस्वामी असें यानें भाषणांत वगैरे सांगण्याचा पाठ ठेविला. कबीराचा कीर्तन करण्याचा नेम असे तो एकदां कीर्तन करीत असतां 'ही सर्व कृपा गु-

नंद स्वामीची आहे.' असें सांगून त्याच्या नामघोषानें भजन केलें व कीर्तन आटोपलें. ही गोष्ट स्वामीच्या कानावर गेली. तेव्हां त्यास आश्चर्य वाटलें व मनाशीं ह्मणाले कीं, आपण तर यास अनुग्रह दिला नाहीं. असें असून हा लोकांस आमचें नांव सांगतो त्या अर्थी एकवार ही गोष्ट समक्ष पाहिली पाहिली पाहिजे. पुढें 'कबीर जेव्हां कीर्तनास उभा राहिल तेव्हां आह्मांस कळवावें.' असें शिष्यांस सांगून ते आपला नित्यक्रम करूं लागले. पुढें लवकरच एके दिवशीं शिष्यांनीं, हा कीर्तनास उभा राहिल्याची खबर स्वामींस दिली. त्यावरून स्वामी तेथें मुकाट्यानेंच जाऊन एका बाजूस उभे राहिले. कीर्तन आटोपण्याच्या संधीस यानें आपल्या पाठाप्रमाणें रामानंदाचें नांव उच्चारून भजन आरंभिलें. हें स्वामींनीं पाहून, रागानें पायांतील पादुक यांजवर फेंकलि. ती याच्या मस्तकास लागून जरी यास दुःख झालें, तरी स्वामींनीं आपणावर अनुग्रह केला, या आनंदाचे भरांत तें विसरून हा अधिकच नाचूं लागला. तेणेंकरून स्वामी संतुष्ट होऊन त्यानीं त्याच्यावर पुढें कांहीं दिवसांनीं पूर्ण ब्रह्म विद्येचा अनुग्रह केला.

कबिरानें साधु संतांस भोजन वगैरे देण्यासाठीं एकदां आपली बायको एका वाण्याच्या घरीं गहाण ठेविली; व शिधा आणून सर्वांस यथेच्छ भोजन दिलें. तशीच एकदां राजाची कोठी फोडून तींतून लागेल तितका सरंजाम चोरला, इत्यादी गोष्टी, भक्तिविजयाच्या, पांचव्या व सहाव्या अध्यायांत अनेक आहेत. ह्या गोष्टी वरून वाचकांनीं इतकेंच अनुमान करावें कीं, याच्या अंतःकरणांत भूतदया फार होती.

कबीर चांगला ज्ञाता, उपासक व वैराग्यशील असल्या

मुळें पराकाष्ठेचा निस्पृह होता. शिवाय एकादी गोष्ट एखाद्याच्या मनांत युक्तीनें बिंबवून देण्याचें चातुर्यही याच्या अंगीं चांगलें होतें. एकदां कोणी एकानें यास असें पुसलें कीं, 'प्रपंचांत राहून परमार्थ, होत नाहीं असें कित्येक, ह्मणतात तर हें खरें किंवा कसें?' कबीर ह्मणाला याचें उत्तर मी आपणांस उद्यां देईन; तोंपर्यंत आपण येथेंच रहावें. मी सिधा देतों तो घेऊन भोजन करावें. तो गृहस्थ बरें ह्मणून तेथें राहिला. दुसरे दिवशीं भोजनानंतर तो गृहस्थ कबीराकडे आला. इकडे कबिरानेंही आपलें देवतार्चन आटोपिलें व भोजन करून विणायाच्या वस्त्राचा ताणा बाहेर अंगणांत ताणला. कांहीं वेळानें सुतें वेगवेगळीं करीत असतां त्यानें एकदम आपल्या बायकोस हांक मारून तिला दिवा लावून आणावयास सांगितलें. त्या बरोबर ती दिवा घेऊन बाहेर आली. तिजकडून तो यानें सुता जवळ धरवून गुंतलेलें सूत उकललें व तिला दिवा परत नेण्यास सांगितलें. ही गोष्ट यानें भर दिवसास केलेली पाहून आलेल्या मनुष्यास मोठें आश्चर्य वाटलें, तो मनांत ह्मणूं लागला कीं हा मनुष्य वेडातर नाहींना? बाहेर चांगलें ऊन पडलें असतां यानें दिवा कशास आणविला? तो जवळ धरल्यानें याला अधीक तें काय दिसलें? बरे याची बायको तरी दिवा सुता जवळ धरून उन्हांत इतकावेळ काय ह्मणून उभी राहिली? असा विचार चालला आहे इतक्यांत त्याला आपल्या प्रश्नाची अठवण होऊन तो कबीरास ह्मणाला 'माझ्या शंकेचें उत्तर मला तुह्मी केव्हां देणार?' तो ह्मणाला 'मी तुह्मांस त्याचें उत्तर मघाशींच दिलें. तें तुमच्या लक्षांत आलें नाहींसें वाटतें, करितां उलगडून सांगतों तें ऐकावें. सुतें वेगळीं कर-

ण्यास भर दोनप्रहरच्या उन्हाच्या उजेडाहून दिव्याचा उजेड अधीक नाहीं, असें असतां मीं बायकोस दिवा आणायास सांगितल्या बरोबर तिनें बिलकूल सबब न सांगतां माझी आज्ञा मुकाट्यानें सिरसावंद्य केली. सारांश अशी बायकोची ज्यास अनुकूलता असेल त्यासच प्रपंचांत राहून परमार्थ घडेल. एऱ्हवीं घडणार नाहीं. इतकें ऐकून आलेला गृहस्थ समाधान पावून आपल्या घरीं गेला.

कबीरानें शुकविधान नांवाचा एक ग्रंथ लिहून बाकीचें संप्रदाय प्रवृत्ती विषयीं लिहीले आहेत. शिवाय दोहरे व पदेंही पुष्कळ आहेत. ही याची सर्व कविता हिंदुस्थानी भाषेंत असून 'कहेकबीर' 'कहत कबीर' 'दासकबीर' याप्रमाणें तिच्या शेवटास नांव घालण्याची याची चाल आहे. यानें केलेल्या सर्व कवितेचा संग्रह याच्या जन्मभूमी पासून जवळ असणाऱ्या चौडा नांवाच्या गांवीं आहे, असें याचे संप्रदायी बोलतात.

आपण आपल्या घरांत जशा हंड्या टांगतों त्या प्रमाणें शहामृगाचीं अंडीं जागोजाग टांगणें ही कबीर पंथी लोकांच्या मठाची मुख्य खूण आहे तसेंच प्रायः मैदानाच्या जागेंत कीर्तन करणें झालयास सभोंवतीं पांढऱ्या पताकाचें आवार करून त्यामध्यें कीर्तन करण्यास ते उभे रहातात. यावरून हें कीर्तन कबीर पंथी लोकांचे आहे असें तेव्हांच पहाणारांच्या ध्यानांत येतें.

कबीरानें देह ठेविला त्या वेळेस हिंदू ह्मणूंलागले 'हा आमचा,' मुसलमान ह्मणूं लागले 'हा आमचा, असें ह्मणून वाद करूं लागले, तेव्हां असें सांगतात कीं, त्याच्या अर्ध्या देहाच्या तुळशी व अर्ध्या देहाचा सबजा झाला! मग मुसलमानानीं सबजा नेऊन, तो गोरखपुरा जवळ मगर

गांवीं पुरला. व त्यावर मसीद बांधिली; इकडे वीरसिंह राजानें त्या तुळशी काशीस आणवून त्यांचें दहन केलें व त्या ठिकाणीं एक मोठें वृंदावन बांधलें.

## सीतेच्या हातांतील कंकण.

नवरीच्या हातांतील कंकण नवऱ्यानें सोडावें, अशी चाल असल्यामुळें, जनकाचा उपाध्याय शतानंद ह्यानें सीतेच्या हातांतील कंकण सोडावयास रामास सांगितलें. रामाचें वय लहान असून तो सुकुमार असल्यामुळें त्याला त्या कंकणाची गांठ सुटेना! त्यानें पुष्कळ झटून पाहिलें परंतु त्याचा उपाय चालेना. शेवटीं इकडे तिकडे पाहूं लागला. तेव्हां नवरी कडील एकजण थट्टेखोर गृहस्थ ह्मणाला, 'ठीकच आहे! बायकांच्या समुदायांत लपणारांच्या पोराचें बळ कितीसें असणार?' यांतील मर्म असें होतें कीं, परशरामाशीं लढाईचा प्रसंग आला कीं दशरथराजा आपल्या स्त्रियांच्या समुदायांत लपून बसत होता. यामुळें हें त्यानें मोठें वर्म काढलें. त्यावर वरपक्षाकडील एकजण ह्मणाला, अरे, असें नव्हे. 'ज्यानें एवढें कठोर शिवधनुष्य मोडून टाकिलें त्याला या कंकणाच्या गांठीची प्रतिष्ठा ती काय? पण जर थोडा जोर करावा तर नवरीचा हातबीत दुखूं लागायचा!'

## पुणेरी भामट्या.

पुणें शहर इतर कित्येक गोष्टींविषयीं जसें प्रसिद्ध आहे त्याचप्रमाणें रिकामटवळ्या चैनी लोकांविषयींही प्रसिद्ध आहे.

हे लोक संध्याकाळच्या मजेच्या वेळीं छानछूक करून बुधवार पेठेंत कोठेंतरी गप्पा व तंबाखू यांचें सेवन करीत बसलेले असतात. एकदां असें झालें कीं, वरच्या इप्की लोकां पैकीं एकजण एका गंध्याच्या दुकानीं शिळोप्याच्यावेळीं गप्पा छाटीत बसला होता. तो असा कीं, दुकानाच्या फळीवर एक पाय अडवा टाकून व एक खालीं सोडून तो जोड्यासकट मौजेनें हालवीत होता. हालवतां हालवतां गोष्टीच्या नादांत त्याच्या पायांतिल जोडा खालीं गळून पडला. तें त्यावेळेस त्या गृहस्थाच्या लक्षांत आलें नाहीं. पुढें बरीच रात्र झाली असतां नित्य क्रमाप्रमाणें वरील गृहस्थ जेव्हां जावयास निघाले, तेव्हां जोड्याची शुद्ध येऊन त्यांनीं आसपास बराच शोध केला; पण जोडा कोठें दिसला नाहीं. तेव्हां त्यांनीं विचार केला कीं, आतां हा एकटाच कोठे न्यावा? तर सध्यांच्या वेळीं रात्रीचें अनवाणीच घरीं जावें हें बरें. असें मनांत आणून त्यानीं आपल्या गड्यास ताकीद दिली कीं, “ मी जातों घरीं; तू आतांच तावडतोब पिऱ्या चांभाराकडे जाऊन त्याला सांग कीं, उद्या सकाळाला असला दुसरा जोडा तयार पाहिजे. ही घे चवली, त्याला विसार दे. ” अशी तरतूद करून बोवा घराकडे निघाले. चाकर तसाच चांभाराकडे गेला, आणि तो जोडा व चवली विसार ह्मणून त्यानें त्याच्या हवालीं केली. आतां इकडे काय मौज झाली कीं, मागें सांगितल्या प्रमाणें वरील इप्कीबाज गृहस्थानीं पाय हलवतां हलवतां जोडा जेव्हां खालीं पडला तेव्हां एका भामटयानें त्यावर नजर ठेविली होती; त्यानें काळोखाच्या संधींत हळूंच युक्तीनें तो पडलेला जोडा लांबविला. पुढें बोंभाटा होऊन चाकरास ताकीद मि-

झाली तेव्हां तो भामट्या आसपास होताच; त्यानें त्या धन्याचे सर्व शब्द ऐकले, आणि त्या चाकराच्या मागोमाग गेला. मग चाकरानें त्या दोन जिनजा चांभाराच्या हवालीं करून तो अंमळ दूर गेला नाहीं तोंच भामट्ये बुवा चांभाराकडे धांवत आले, आणि ह्मणूं लागले "अरे, आण आण तो दिलेला जोडा, यजमानांचा जोडा आतांच घावला, हा पहा; तू उगीच कामाला लागशील ह्मणून त्यानीं मला धांवतच तुझ्याकडे धाडलें. टाक ती विसाराची चवली." असा मुद्देमाल दाखविल्यावर चांभार तरी काय ह्मणतो? त्यानें लगेच तो जोडा आणि चवली या नव्या चाकराच्या स्वाधीन केलीं! त्यानें अर्थातच सबंध जोडा व चवली दक्षिणा पटकाऊन आनंदानें घराची वाट धरली. मग दुसरे दिवशीं त्या गृहस्थाची, चाकराची, व चांभाराची जी मजेदार झंगड उडाली असेल त्याची वाचकांनींच कल्पना करावी!!

---

## गौळणीचें गाऱ्हाणें.

पद. ( प्रियासी रमवाया जाऊं, या चालीवर. )

व्यर्थ असा छळिसी । कां रे, हरी ॥ धृ० ॥
दधि-घट घेउनी मथुरे जातां, मार्गीं आडविसी ॥१॥
गोप सख्यांसह मिळुनि सभोंवति, पदर बळें धरिशी॥२
पति सेवेमधीं निमग्न असतां, चोरुनि खुण करिशी।३।
सासु श्वशुर दिर जावा देखत, बाहसि, भी न कशी?४
कोाम न धंदा सुचे बघोनि, तल्लीला ऐशी ॥ ५ ॥
ध्वनुरवें मन गुंग करोनि, कुंजवनीं नेसी ॥ ६ ॥
मृदुकर-कमलें मारुनियां मिठी, चुंबन मधु घेशी ॥७॥

प्राण-प्रियाचें रूप धरोनि, आह्मां फसवीसी ॥ ८ ॥
देखुनियां तो अंक मुखावरि, दूषिति जन मजशीं॥९॥
गावुं किती तव दुर्गुण गीति, सांगे मजपाशीं ॥१०॥

---

## विलक्षण स्मृति.

प्राशियाचें सांप्रत काळीं येवढें जें बलाढ्य राज्य झालें आहे तें प्रथम ज्यानें उजागरीस आणलें तो फ्रेडरिक् धि ग्रेट राजा मोठा शहाणा व पराक्रमी होता. तो गुणाचा चाहता असल्या कारणानें मोठ मोठे विद्वान् त्याच्या आश्रयास होते. त्यांत व्हालटेर नांवाचा एक महा विख्यात कवि व इतिहासकार हा होता. एकदां असें झालें कीं, वरील कवीनें एक उत्कृष्ट काव्य रचून राजाकडे आणिलें, फ्रेडरिक् हा त्या वेळेस राजकीय कामांत गुंतला होता; यास्तव त्यानें कवीस सांगितलें कीं, "या वेळेस तुमचें काव्य पाहण्याचा योग्य प्रसंग नव्हे; तर संध्याकाळीं आमच्या महालांत आपण यावें; ह्मणजे दुसरी कांहीं रसिक मंडळी जमवून तेथें तें वाचतां येईल." व्हालटेरनें हो ह्मटलें. मग संकेताप्रमाणें तो राजवाड्यांत जातो तों तेथें मंडळी अगोदरच जमली होती. कवीनें ती आपली कृति मोठ्या रसिकतेनें व समर्पक रीतीनें वाचली असतां श्रोत्यांस मोठा आनंद वाटला. सर्वांनीं सुप्रसन्न चित्तानें त्या काव्याची मोठी वाहवा केली. फ्रेडरिक् राजा स्वतः मोठा विद्वान् असून व्हां कवि होता, यास्तव त्यासही त्या प्रसंगीं मोठा संतोष झाला. पण त्यास एक हिकमत करणें होती; यास्तव चळेचलेला आक्षेप काढून तो व्हालटेर यास ह्मणाला, "अहो, सगळें

खरें; पण हें काव्य नवीन आहे कशावरून?" कवीनें उत्तर दिलें, "महाराज, काय सांगूं, यांतील शेवटलीं पद्यें मीं आज सकाळीं रचलीं; आणि तीन वारांपूर्वी तर यांतील एक शब्दही मी लिहिलेला नव्हता!" फ्रेडरिक् ह्मणाला, "असें असेल तर मोठ्या चमत्काराची गोष्ट खरी! कांकीं, आमच्या दरबारीं एक इंग्लंडचा गृहस्थ आहे, तो तर या काव्यांतील बहुकेच पद्यें ह्मणतो!" व्हालटेरनें उत्तर केलें कीं, "छे अशी गोष्ट तर कधींही व्हावयाची नाहीं! माझी कविता अद्याप कोणीही पाहिली नाहीं;–ते कागद माझ्या हातून कोणाकडे अजून मुळींच गेले नाहींत!" राजा ह्मणाला, "असें आहे काय? मग हातच्या काकणाला आरसा कशाला?–अरे, जा त्या गृहस्थाला बोलावून आणा." मग काय उशीर? सदरील गृहस्थ लागलीच हजर होतांच राजानें त्यास विचारलें, "अहो, या विषयावरील ही कविता तुह्मीं कधीं ऐकली होती काय?" असें ह्मणून तो विषय व ती कविता फ्रेडरिक्नें सांगून दिली. वरील गृहस्थानें उत्तर केलें, "होय महाराज." "बरें मग त्यांतील काहीं भाग तुह्मास पाठ येतो आहे काय? असल्यास ह्मणा." "महाराज, कांहीं भाग का, मला ही कविता सगळी शेवटपर्यंत येत आहे." असें ह्मणून त्या इंग्रजानें आरंभ करून तें काव्य साद्यंत ह्मटलें. तो चमत्कार पाहून व्हालटेर अगदीं गांगरून गेला; त्यास वाटलें कीं, हा ह्मणणारा, मनुष्य नव्हे, खचीत कोणी पिशाच आहे! फ्रेडरिक् राजा ती सर्व मौज मुकाट्यानें पाहून मनांतल्यामनांत हांसत होता. शेवटीं त्यानें कवीचा सारा भ्रम फेडला. त्यानें सांगीतलें कीं, या गृहस्था-

च्या स्मरणशक्तीची प्रशंसा ऐकून तिचा प्रत्यय घेण्याकरितां ही सर्व युक्ति योजलेली होती. यास पडद्या आड बसवून याजकडून प्रस्तुत कविता ऐकविली; आणि ती विलक्षण स्मरणशक्तीच्या योगानें यानें आतां साद्यंत ह्मणून दाखविली!

---

## आळशी मुलगा.

'अरे बापरे! हे धडे तयार करण्यास मला कितीतरी उरस्फोड करावी लागते ही! हे पहा एक, दोन, आणि हें अर्धें, मिळून सबंध अडीच पानें, व तीं तरी कशीं तर कठीण कठीण शब्द, आणि त्यांचे ते लांबलचक अर्थ यांनीं, अगदीं गच्च भरून गेलेलीं; आणि हें सगळें आतां मला पाठ करायचें ना!! मला वाटतें या शब्दांना मुळीं अर्थच नसते तर फार बरें झालें असतें!!

पण या बडबडीचा काय उपयोग? पाठतर केलेंच पाहिजे. तू-तु-रं-ग-रुंग-तुरुं-ग-तुरंग, अरे तुरंग नव्हे तुरुंग. तुरुंग ह्मणजे काय? तुरुंग ह्मणजे 'ज्या ठिकाणीं कैद्यांना कोंडून ठेवतात ती जागा.' केवढा अर्थ तरी!! या पेक्षां तुरुंग ह्मणजे शाळा, असेंच कां थोडक्यांत ह्मटलें नाहीं? मला तर खास वाटतें कीं, शाळा ह्मणजे तुरुंगच आहे. शीक-शा-षा शिकषा, शिक्षा. अः यांत तर कांहींच नाहीं, या शब्दाचा अर्थ मला चांगला ठाऊक आहे, याला पुस्तकाची मुळींच गरज नाही.

काय कर्म कटकट ही!! मी आपला हा धडा करीतच नाहीं ह्मणजे सर्वच भागलें!! हा काय शब्द हा? क-र-म,

फरम, कर्म नू-नू-णू-णू-क-कर्मणूक अँ-अँ- कर्मणूक 'ज्याच्या योगानें संतोष होतो ती' हो, याही शब्दाचा अर्थ मला चांगला माहीत आहे, कर्मणूक ह्मणजे घरोघर हिंडणें व यथेच्छ खेळणें! दुसरें काय? जर हें माझें बोलणें त्या गणपिटल्यानें ऐकलें तर तो ह्मणेल, कर्मणूक ह्मणजे एखादें नवीन पुस्तक वगैरे मिळाल्यावर, तें वाचून मनाची जी स्थिति होते ती. वाच गाढवा गण्या, तूं असाच वाचीत बैस, वाचतां वाचतांच मर. मला तर, तें वाचण्याचें नांव काढल्या बरोबर माझे पायाची तिडीक मस्तकाला जाते!! मोठा झाल्यावर मी त्या पुस्तकाला शिवेन तर शपत!! मी त्या पुस्तकाचें दर्शनसुद्धां घेणार नाहीं!!! "खरोखर मी आतां मोठा असतों तर काय बहार उडाली असती!!" पुढें, तो मोठा होऊन त्याला खाण्याचीही पंचाईत पडली अशा स्थितींत असतां तो आपल्याशींच ह्मणतो; "पहा आतां मी मोठा झालों. काय करूं? लहानपणीं वाचलें असतें, तर बरें नसतें का झालें? मी मूर्खपणांत वेळ दवडला याचें मला आतां मोठें वाईट वाटतें! मला पुस्तकांचा कंटाळा येत असे, व आपले धडे लक्षांत ठेवण्याला श्रम घ्यायचे ते एकीकडेसच राहून उलटे ते विसरण्याच्या उद्योगास मी लागत असें.

"लहान असतांना, बाबा मला ह्मणत असत 'अरे जनू आपले धडे तयार कर, नाहींतर पुढें मोठा झाल्यावर तूं कुच कामाचा होशील' त्याप्रमाणेंच, आई ह्मणत असे 'बाळा, अरे आपल्या पुस्तकाकडे लक्ष देऊन आपले धडे शीक, असें जर न करशील तर तूं आमच्या तोंडाला काळोखी आणशील, व चार लोकांत तुझ्या करतां मला मान

खालीं घालावी लागेल' पण हें सर्व अळवावरच्या पाण्याप्रमाणें झालें.

"आतां तो पहा माझाच सोबती गणपती त्यालाही खेळ अवडत नव्हता असें नाहीं, पण खेळापेक्षां अभ्यासांत त्याचें मन फार. आणखी असें होतें कीं, तो शाळे खेरीज इतर वेळांत जेवढें शिके तेवढें मला शाळेंत सुद्धां होत नसे. तोही मजसारखाच, परंतु आतां तो फार निराळ्या प्रकारचा मनुष्य झाला आहे. त्याला चार चौघांत मान–मान्यता आहे, तशी मला कोठें आहे? तो जेथें जाईल तेथें त्याला लोक 'या गणपतराव' असें ह्मणून लोडाशीं जागा देतात, व मला फुकटचें 'या' सुद्धां कोणी ह्मणत नाहीं. मी पहा पूर्वी जसा होतों, तसाच आहें'!!! असून नसून सारखाच! खायाला काळ आणि भुईला भार.

"आतांशीं कोठें माझे डोळे उघडले, व माझी चूक मला कळली–पण आतां काय उपयोग? आतां वेळ निघून गेली. वाचावें असें आतां माझ्या मनांत येतें, उपयोग काय? दोन प्रहरची तजवीज करण्याच्या कामांतच सर्व वेळ निघून जातो!! मग कुठलें वाचन!! आणि कुठलें काय?"

मुलानो, जनू आतां रडत बसला आहे, तसा प्रसंग तुह्मांवर येऊं देऊं नका, व तसा प्रसंग न येण्यास एकच उपाय, तो कोणता आहे का ठाऊक? तो हाच कीं 'मन लाऊन अभ्यास करा.'

# अति परिचय खोटा मान राहात नाहीं.

या ह्मणीचा असा अर्थ आहे कीं, कोणत्याही वस्तूची किंवा मनुष्याची आपणांस जोंपर्यंत पूर्ण माहिती नसते तोंपर्यंत त्याविषयीं आश्चर्य, पूज्यबुद्धि व चमत्कार आपणांस वाटत असतो व तो, त्याचा व आपला फार निकट संबंध होऊं लागला, ह्मणजे त्या विषयीं आपणास विशेष कांहीं वाटेनासें होऊन तिरस्कार व कंटाळा वाटूं लागतो.

परस्परांमधील संकोचवृत्ति नाहींशी होऊन दृढ स्नेह जुळून आला, ह्मणजे एकमेकांचीं व्यंगें नजरेस पडून पूज्यबुद्धि नाहींशी होते व पूर्वीं ज्या मित्राची योग्यता आपण फार समजत असतों, त्यासच कमी लेखूं लागतों. कधीं न येणारा मनुष्य आपल्या घरीं आल्यास आपणांस मोठी धन्यता वाटून आपण त्याचा सन्मानही उत्तम प्रकारें ठेवितों. अति परिचय झाला ह्मणजे एका मनुष्याला दुसऱ्याजवळ वारंवार कोणतीही वस्तु मागण्यास कांहीं शंका वाटत नाहीं. व ती दिल्यामुळें देणाराचें नुकसान होतें व न दिल्यामुळें मागणारास वाईट वाटून दोघांचींही मनें बिघडतात व अति परिचय हाच द्वेषास कारण होतो. अति परिचय असला ह्मणजे भाषणांतील नम्रता, व अदबी नाहींशी होऊन हलक्या शब्दाचाही उपयोग होऊं लागतो व त्या योगानें अपमान झाल्यासारखा वाटून प्रेमभावांत बिघाड उत्पन्न होतो. संस्कृतांत 'अति परिचयावज्ञा' ह्मणून एक वाक्य आहे त्याचा मतलब वरील प्रमाणेंच आहे. ज्या नोकराशीं आपण फार सलगीनें वागतों, तो नियमित रीतीनें वागत नाहीं, केलेला हुकूमही मानीत नाहीं.

आपल्या राजे लोकांची जुनी चाल अशी असे कीं, मंडळींत मिसळावयाचें नाहीं, नेहमीं लोकांपासून दूर रहावयाचें, चालरीत, वर्तन व पोषाख यांत इतर लोकांहून फरक ठेवावयाचा व बाहेर पडणें झाल्यास मोठ्या डामडौलानें व थाटानें यावयाचें. या सर्वांतील बीज तरी हेंच होय, कीं राजाचा सहवास हा दुर्मिळ आहे, असें प्रत्येकास वाटून राजाबद्दलची प्रजेची बुद्धि पूज्य व्हावी, त्यांनीं राजास मान द्यावा व तो एखादा साधारण मनुष्य नाहीं, असें समजून त्याची आज्ञा शिरसावंद्य करावी.

'अति परिचयादवज्ञा' हा नियम केवळ मनुष्यमात्रांसच लागू आहे, असें नाहीं. इतर प्राणी, निर्जीव वस्तु, करमणूकीचे पदार्थ वगैरे सर्व पदार्थांविषयीं हाच नियम दृष्टीस पडतो. इसापनीतींतील बेडूक आणि राजा यांची गोष्ट वाचली ह्मणजे हेंच दिसून येईल कीं, लांकडाच्या ठोकळ्याचा आणि बेडकांचा जोंपर्यंत अति परिचय झाला नव्हता, तोंपर्यंत ते त्या ठोकळ्याला वचकत असत, पण पुढें अति परिचयामुळें ते त्याला मुळींच जुमानिनासे झाले. प्रकाश हा मनुष्याचे सुखास किंबहुना जीवितास देखील कारणीभूत असा आहे, पण तो अति उपयोगाचा नाहीं. संगिताविषयीं हाच नियम आहे. चांगलें संगीत कांहीं काळपावेतों मनाला आल्हाद देतें, पण तेंच फार झालें ह्मणजे कंटाळवाणें होतें. सुरेखसा पोषाख, सणावारीं घालण्याची हौस वाटते; पण रोज तोच घालूं ह्मटलें तर कंटाळा येतो.

यावरून अति परिचय खोटा आहे व त्यामुळें मान राहत नाहीं, हें उघड होतें व तो न करावा हें उचित आहे.

## सुबोध ( आर्या. )

संपत्ति वैभवाचा, मूर्ख जनीं योग तो बरा जी न ।
खर[1] अश्वसा[2] न विलसे[3], जरि त्याला तंग तोबरा जीन।१।
कर लौकर कर्तव्या, न तुझारे, काळ सर्व काळाचा ।
वर्तति सुज्ञ कसे हा, अनुभव पाही नरा सुकाळाचा ।२।
तस्करें-भय[4] धनवंता, म्हणुनि असावें स्व-रक्षणीं दक्ष ।
कस्तूरीस्तव वधती[5], पारधि हरणास चुकवुनी लक्ष॥३॥
व्यर्थ नको खर्च करूं, कर तूं समयास खर्च दामाचा[6] ।
पिक सुखल्या उपरांतिक,घन-जल-वर्षाव[7] काय कामाचा
धन असतांचि सुखदतो, जो नांवाचा असे नरा मित्र ।
श्रीद[8] जलाश्रय असतां,नसतां कमळास वाळवी मित्र[9]।५।
चिरकाळ लाभ-काळ न, राहे ह्मणुनीच वित्तं[10] सांभाळी ।
ऐसें ह्मणूं नको तूं, 'होईल लिहिलें असेल तें भाळीं[11]॥६।
मूर्ख न पावे ज्ञाना, नित्य बुधांचा[12] घडूनि सहवास ।
राहुनि कमळा जवळीं, भेक[13] न जाणे जसा मधुर वास।७।
कटु-वचही दात्याचें, याचक[14] पय[15]-तुल्य मानती गरजे ।
शिखि[16] ऐकतांच नाचे, जलद[17] भयंकर जरी बहू गरजे।८।
समय-विशेष गणावा, मनिं धरणें व्यर्थ गर्व विजयाचा ।
व्यर्थ पराक्रम झाला, युद्धीं भिल्ला समोर विजयाचा[18] ॥९॥

---

१ गाढव. २ घोड्या सारखा. ३ शोभे,दिसे. ४ चोराची भीती. ५ ठार मारिती. ६ पैक्याचा. ७ पाऊस. ८ शोभा देणारा. ९ सूर्य. १० द्रव्य ११ नशीबीं. १२ ज्ञात्यांचा. १३ बेडूक. १४ भिक्षुक. १५ दुधासमान गोड. १६ मोर. १७ मेघ. १८ अर्जुनाचा. (श्री कृष्ण निजधामास गे. त्यावर भिल्लानीं गोपींस हिरावून नेलें तें समयीं महान् पराक्रमी जो अर्जुन त्याचा देखील युद्धांत यःकश्चित भिल्लांनीं पराभव केला.

'माण्या काल समनसे', ह्या वचना सादरें करी ग्रहण ।
काल परत्वें करुनी, तम-हंत्या[1] भास्करा[2] हि ये ग्रहण।१०।

## सार्थ सुभाषितें.

सहते शरशतघाता नाजानेयः कशां नैव ॥
सहते विपत्सहस्रं मानी नैवापमानलेशमपि ॥

अर्थ—'जातिवंत घोडा हा रणांगणावर शेंकडों बाणांचे घाव सहन करतो, पण चाबकाचा फटकारा त्यास बिलकूल सहन होत नसतो; तसेंच जो मानी आहे तो हजारों विपत्तींस दाद देत नाहीं, पण कोणाचें फट् ह्मटलेलें त्यास खपत नांहीं!'

अभिलषसि यदिंदो वक्त्र लक्ष्मीं मृगाक्षयाः ॥
पुनरपि सकृदब्धौ मज्ज संक्षालयांकम् ॥
सुविमलमथ बिंबं पारिजातप्रसूनैः ॥
सुरभय यदि नो चेत्त्वं कुतः स्या मुखश्रीः ॥

अर्थ—'हे चंद्रा! तुला जर कमलनयनेच्या मुखाचें साम्य करायाचें असेल तर पुनः एक वेळ समुद्रांत बुडी मार आणि कलंक धुऊन टाकून आपलें बिंब लखलखीत कर; आणि त्यानंतर पारिजातकाच्या पुष्पांनीं तें सुवासित कर. असें न करशील तर मुखाची शोभा तुला कोठून लाभेल?'

( वृद्धापकाळीं दांत कां पडतात या बद्दल कोणी विनोदी कवी ह्मणतोः— )

---

१ अंधकाराचा नाश करणाऱ्या. २ सूर्यास.

मलिनै रलकै रेतैः शुक्लत्वं प्रकटीकृतम् ॥
तद्दोषादेव निर्याता वदनाद्दनावलिः ॥

अर्थ—' केश हे मूळचे काळे असतां त्यांनीं आपलें शुभ्रत्व धारण केलें, या रोषानेंच जाणूं काय दंतपंक्ति निघून गेली !'

मधुरमिव वदंति स्वागतं भृंगनादै ।
नतिमिव फलनम्रैः कुर्वतो ऽमी शिरोभिः ॥
ननु ददत इवार्घ्यं पुष्प वृष्टिं किरंतः ।
कथमतिथि सपर्यां शिक्षिता शाखिनोऽपि ॥

अर्थ—' हे आश्रम वृक्षही अतिथींची पूजा करावयास शिकले आहेत काय ! पहा, हे भृंगांच्या गुंजारवानीं जणूं काय मधुर भाषणयुक्त स्वागतच करतात, फलांनीं नम्र झालेल्या माथ्यांनीं हे जसे काय नमनच करतात आणि पुष्प वृष्टीच्या मिषानें अर्घ्य प्रदानच करिताहेतसे दिसतात !'

यथा देशस्तथा भाषा यथा राजा तथा प्रजा ॥
यथा भूमिस्तथा तोयं यथा बीजं तथांकुरः ॥

अर्थ.—' जसा देश तशा भाषा; जसा राजा तशी प्रजा; जशी भूमि असेल तसें उदक असणार; आणि जसें बीं असेल त्या मानाचें झाड निपजणार !'

पुराणांते स्मशानांते मैथुनांतेच या मतिः ॥
सा मतिः सर्वदा चेत्स्यात्को न मुच्येत बंधनात् ॥

अर्थ.—' पुराणश्रवणा नंतर, स्मशानयानाच्या नंतर आणि मैथुनावसानीं जी मनाची स्थिती होते ती जर सदो-

दित राहील तर संसार बंधना पासून कोण मुक्त हो-णार नाहीं?'

कलहां तानि हर्म्याणि कुवाक्यां तं च सौहृदं ।
कुराजां तानि राष्ट्राणि कुकर्मा तं यशो नृणां ॥

अर्थ—'कलह लागला कीं घर बुडालें, दुर्वचनाचा प्रयोग झाला कीं मैत्री अटपली, वाईट राजा आला कीं, राष्ट्राची इतिश्री समजावी, दुष्कर्म घडलें कीं अब्रू खालीं झाली!'

संतश्चेदमृतेन किं यदि खलस्तत्कालकूटेन किं ।
दातारो यदि कल्पशाखिभिरलं यद्यर्थिनः किं तृणैः॥
किं कर्पूरशलकया यदि दृशः पंथानमेति प्रिया ।
संसारोऽपि सतींद्रजालम परं यद्यस्ति तेनापि किं॥

अर्थ.—'जर सज्जनांचा समागम आहे तर अमृत क-शाला पाहिजे? दुर्जनाशीं संबंध आहे तर कालकूटाचें काय प्रयोजन? दाते आहेत तर कल्प वृक्षांची काय गरज आहे? याचका पुढें तृणाची काय मातब्बरी आहे? प्रिया दृष्टीस पडली असतां कापराच्या काडीनें डोळे कितीसे गार होणार? संसाराच्या विचित्र पसाऱ्यापुढें गारुड्याचा खेळ झकमारतो!'

दारेषु किंचि त्स्वजनेषु किंचित् ।
गोप्यं वयस्येषु सुतेषु किंचित् ॥
युक्तं न वा युक्तमिदं विचिंत्य ।
वदेद्विपश्चिन्महतो ऽनुरोधात् ॥

अर्थ—'कांहीं गोष्टी बायकांपासून गुप्त ठेवाव्या लाग-तात, कांहीं चाकरमाणसांपासून, कांहीं मित्रांपासून व कांहीं पुत्रांपासून; एकंदरींत कोणतीही गोष्ट युक्त आहे कीं

अयुक्त आहे याचा विचार करून शहाण्या मनुष्यानें मोठें धोरण ठेऊन बोलत असावें.'

येनाचलेन सरसीरुह लोचनाया।
स्त्रातः प्रभूत पवना दुदये प्रदीपः॥
तेनैव सोऽस्तसमये ऽस्तमयं विनीतः।
क्रुद्धे विधौ भजति मित्रममित्र भावं॥

अर्थ.—'कमलाक्षीच्या ज्या पदराच्या योगानें वाऱ्या पासून दीपाचें प्रथमतः संरक्षण झालें, तोच पदर पुढें त्यास अस्तास पोंचविण्यास कारणीभूत झाला. तेव्हां दैव प्रतिकूल झालें असतां मित्रही शत्रु बनतो!'

वरं दारिद्र्यमन्यायप्रभवाद्विभवादपि।
शरीरे कृशता रम्या स्थूलता न तु शोधिता॥

अर्थ—'अन्यायानें मिळविलेल्या वैभवा पेक्षां दारिद्र्य बरें; जसें स्थूलत्वा पेक्षां किंवा सुजलेल्या अंगापेक्षां सडपातळपणा बरा!'

---

## क्षुल्लक गोष्टी.

मुलांनीं क्षुल्लक गोष्टींविषयीं देखील कधींही निष्काळजी असूं नये. मोठ्या माणसांस जसें मोठ्या गोष्टींचें महत्व असतें, तसेंच लहान मुलांस लहान गोष्टींचेंही असलें पाहिजे. लहान गोष्टीकडे दुर्लक्ष्य केल्यानें, कधीं कधीं मोठे अनर्थ गुदरतात, व मग त्या गोष्टी पश्चात्तापाला कारण होतात. तर असल्या पश्चात्तापाचें मूळबीज जें क्षुल्लक गोष्टींविषयीं दुर्लक्ष्य, तें सर्वांनीं सोडून द्यावें. या विषयीं तुम्हांला एक गोष्ट सांगतों.

कृष्णा या नांवाचा एक बारा वर्षांचा मुलगा होता. तो

एके दिवशीं आपल्या बापाजवळ बसून गोष्टी बोलत असतां ह्मणाला " बाबा, एखादा दिवस मोठ्या आनंदानें जातो; व एखादे दिवशीं काय होतें कोण जाणें; तो सगळा दिवस कसा वाईटच जातो; तर याचें कारण काय असावें बरें? असें कां होतें? आज सकाळीं मी कोणाचें तोंड पाहिलें होतें कोण जाणें; सगळा दिवस कसा आपला त्रासांत चालला आहे. एखादे दिवशीं असें होतें कीं, सकाळ पासून संध्याकाळ पर्यंत दुःख ह्मणून कसलें तें माहितच होत नाहीं.

आज सकाळीं, मावशीनें मला घरीं ठेऊन घेतलें नसतें तर शाळेंत जायला मला उशीर कां झाला असता? मला वाईट कां वाटलें असतें? व सर्व दिवसभर जो मला त्रास सोसावा लागला, तो कां सोसण्याचा प्रसंग आला असता! किती तरी हा आजचा वाईट दिवस!! काय करावें, जें जें ह्मणून करावें, तें तें आपलें माझ्या दुःखालाच कारण होतें

यावर त्याचा बाप ह्मणाला " अरे, तूं ह्मणतोस तुला मावशीनें ठेऊन घेतलें ह्मणून, पण तिनें तुला कां ठेऊन घेतला? तुला ठेऊन घेऊन तिला काय करावयाचें होतें?" कृष्णा ह्मणाला, "माझ्या कोटाच्या गुंड्या तुटल्या होत्या, त्या लावण्या करितां" "बरें, त्या तुटल्याकशा?" असें त्याच्या बापानें त्याला विचारलें; तेव्हां तो लज्जेनें मान खालीं घालून हळूच ह्मणाला " बाबा, तो मात्र माझा अपराध आहे खरा; कारण त्या गुंड्या मागच्या मंगळवारीं तुटायला झाल्या होत्या; आणि त्या वेळेसच जर मी त्या बळकट शिवून घेतल्या असत्या, तर ही गोष्ट आज या थरास येऊन पोंचली नसती"

बाप ह्मणाला " बरें तूं आपल्याच तोंडानें ही गोष्ट क-

बूल केलीस हें फार चांगलें झालें. आतां यावरून तूंच पहा कीं, आजचा जो दिवस तूं वाईट ह्मणून ह्मणतोस, त्याच्या वाईटपणाला प्रारंभ तूं ह्मणतोस तसा आज सकाळपासून झाला नाहीं, तर मागच्या मंगळवारापासून झाला आहे. ज्या वेळेस गुंड्या तुटायला झाल्या त्या वेळेसच जर तूं त्या शिवून घेतल्या असत्यास, तर तुला मावशीनें आज घरीं कां ठेऊन घेतलें असतें? तुला उशीर कां झाला असतां? तुझा नंबर खालीं कां गेला असता? व तुला वाईट कां वाटलें असतें? तर, हा सर्व तुझा अपराध आहे, व याबद्दल तूं दुसऱ्या कोणालाही दोष लावूं नको. तुला ती एक जुनी ह्मण आहे ती ठाऊक आहे का? कीं "खिळ्यासाठीं नाल गेला नालासाठीं घोडा गेला," या ह्मणीचा अर्थ काय तो तुला माहीत आहे का? कृष्णाला असल्या गोष्टी फारच आवडत असत तेव्हां तो ह्मणाला "बाबा, मला सांगा पाहूं िचा काय अर्थ आहे तो?" मग बापानें खालील गोष्ट त्याला सांगितली.

"खिळ्यासाठीं नाल गेला<br>
नालासाठीं घोडा गेला<br>
घोड्यासाठीं स्वार गेला<br>
स्वारासाठीं पराजय झाला<br>
पराजयामुळें हातचा देश गेला."

आणि हा सगळा अनर्थ एका खिळ्यानें केला!

हीं गोष्ट ऐकून कृष्णा ह्मणाला "बाबा, काय तरी विलक्षण गोष्ट ही!! एका लहानशा खिळ्याकरितां सर्व राज्य गेलें ना? आतां, आजपासून मी अगदीं क्षुल्लक गोष्टीबद्दल देखील नीट काळजी घेत जाईन;" त्यांत काय आहे?

ह्मणून स्वस्थ बसणार नाहीं. क्षुल्लक गोष्टीं विषयीं जेव्हां जेव्हां माझ्या मनांत निष्काळजी उत्पन्न होऊं लागेल, तेव्हां तेव्हां मी, या " खिळ्यानें केलेल्या अनर्थाची " गोष्ट लक्षांत आणून, जें काय करावयाचें तें करीन.

---

## कूटप्रश्न.

सकाळीं चार पायांवर चालणारा, दुपारीं दोन पायांवर चालणारा, व संध्याकाळीं तिहींवर चालणारा असा कोणता प्राणी आहे?

उत्तरें तारीख ३१-८-९३ चे आंत पाठवावीं बरोबर उत्तर देणारांत ज्याचें नांव सोडतींत येईल त्यास 'चार रुपये किंमतीचें दोन वर्षांच्या ग्यारंटीचें खिशांतून वापरतां येईल असें घड्याळ ( टाईमपीस ) बक्षीस मिळेल!

सूचना—या पुढें केव्हांही नांवें सोडतीस घालणें तीं फक्त 'खानदेश मित्राच्या' जुन्या व नवीन होऊं इच्छिणाऱ्या वर्गणी दारांचींच घातलीं जातील करितां इतरांनीं उत्तरें पाठवून विनाकारण टपाल खर्च करूं नये. बक्षीस नाटपेट बंगीनें रवाना होईल.

*** वरील कूट प्रश्न 'मित्रा'च्या एका वर्गणीदाराकडून आलेला असून येवढें मोठें बक्षीसही त्यांनींच पाठविलें आहे. आठव्या अंकांतील कूटप्रश्नाचा निकाल पुढील अंकीं. उत्तरें पाठविण्याचा पत्ता:—प्रकाशक 'खानदेशमित्र'

पोष्ट—खानापूर,

( जि. बेळगांव. )

---

# कोणीही.

मोबदला वर्तमानपत्रें, मासिकपुस्तकें, अभिप्रायार्थ पुस्तकें, व इतर वस्तु पाठविणें त्या व नवीन वर्गणीदार होणें, वर्गणी पाठविणें, जाहिराती पाठविणें, व इतर सर्व प्रकारचा पत्रव्यवहार खालच्या पत्त्यावर करावाः—

'खानदेशमित्र' कर्त्ते.
पोष्ट—खानापूर.
( जि. बेळगांव. )

## लाट १ ली.

स्त्री चरित्र— मनोवेधक गोष्टी— किंमत रु. १८४
गुलबंकावली— सुरस कादंबरी, किंमत ८१२ आणे.

हीं २ रुपये किंमतीचीं पुस्तकें ता. १९-९-९३ पर्यंत व्ही. पी. नें मागविणारांस अवघ्या ८१९ आण्यांस मिळतील! शिवाय ट. ख. ८३ निराळा पडेल.

---

## लाट २ री.

गुप्तविद्या आणि अद्भुत चमत्कार संग्रह, किंमत ८८
नवनारी चरित्र- [ भाग १-२ एकत्र ], किंमत १ रु.
सिंहासनबत्तीशी व निस्पृहतेचीं लक्षणें, किंमत ८४.
लालसेन राजपुत्राच्या मनोरंजक गोष्टी, किंमत ८४.

हीं २ रुपये किंमतीचीं ४ पुस्तकें ता. १९-९-९३. पर्यंत मागविणारांस ८१९ आण्यांस मिळतील शिवाय व्हीं. पी. व टपाल खर्च ८३ निराळा पडेल.

लाटी मागविण्याचा पत्ताः—प्रकाशक खानदेशमित्र.
पोष्ट—खानापूर. ( जि. बेळगांव. )

# जी. बी. नाईक कंपनीच्या विजेच्या
# आंगठ्या, पुतळ्या, कडीं, लेखण्या, व पट्टे.

७५,००० वर विकल्या, रोज पुष्कळ खपत आहेत.



गुण आल्याचे हजारो दाखले मिळाले व नित्य मिळतात.

रक्त हें मनुष्याचें जीवित आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे. रक्त खराब असल्यामुळे होणारे सर्व रोग ह्या लहानशा अतिस्वस्त ब्याटरी वापरल्या पासून बरे होतात, हें जगत्प्रसिद्ध आहे. करितां अशी ही उत्तम, गुणकारी सर्व रोग शमविणारी, अंगावर सुशोभित दिसणारी, औषधी खटपट चुकविणारी, चमत्कारिक भूषणावह व आरोग्यदायक वस्तूचा संग्रह करून अनुभव पहा व मित्रमंडळीं फैलाव करा, ही विनंती.

**विजेच्या वस्तूची किंमत.**

| | | |
|---|---|---|
| पितळी आंगठीस किं. रु. १॥ | पुतळीस किं रु. १। | धा. कड्यास किं. १॥ |
| चांदीचे आंगठीस किं रु ३ | पुतळीस किं रु २ | पा लेखणीस किं. १॥ |
| सोन्याचे आंगठीस किं. रु. २० | पुतळीस किं. रु. २२ | रेशमीगळपट्टा किं. १॥ |

खोटा माल घेऊन फसूं नका. आमचे प्रत्येक वस्तूवर G. B. N. मार्क पाहून घेत जा. एकदम बारा नग घेणारास एक जास्त मिळेल. बंगी करणावळ माफ. १ पासून ६ पर्यंत ट ह. ६ आणे रोख दाम आल्यास किंवा व्ही. पी. नें मागविल्यास पाठवूं. अनेक रोगांवर गुण आल्याचे शेकडो सर्टिफिकिटांचे पुस्तक मालाबरोबर पाठवूं, किंवा अर्धा आणा पाठवून मागवा, ह्मणजे पाठवूं. बाहेर गांवीं एजंट पाहिजेत.

जी. बी. नाईक आणि कंपनी, जुन्या दावणी समोर, भायखळा, मुंबई. व बुधवारपेठ पुणें.

# खानदेशमित्र.

॥ श्लोक ॥ (वसंततिलका)

कस्यापि कोप्यतिशयोऽस्ति स तेन लोके ।
ख्यातिं प्रयाति नहि सर्व विदस्तु सर्वे ॥
किं केतकी फलति किं पनसः सपुष्पः ।
किं नागवल्ल्यपिच पुष्पफलैरुपेता ॥ १ ॥

पुस्तक १ लें. { आगष्ट. सप्तंबर. अक्तोबर. } १८९३. अंक १०.

अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| १ नूरजहांराणी. ... | २२७ | ४ आठव्या व नवव्या अंकांतील कूट प्रश्नोत्तरें व बक्षिसांचा निकाल... | २२८ |
| २ बाल विवाहित स्त्री विलाप (पद.) ... | २२२ | ५ अपशब्दनिषेध. ... | २२९ |
| ३ खरी दया. ... ... | २२५ | | |


बेळगांव येथें 'बेळगांवसमाचार' छा० छापिलें.

वर्गणीचे दर.

वर्षाचे अगाऊ ट. ह. सह.... ....१८३

फुटकळ अंकास किंमत.... .... ....८२

प्रकाशक- ह० स० खानोलकर आणि मंडळी.

पोष्ट-खानापूर.

(जि. बेळगांव.)

# विक्रीस तयार.

**करुणराघव**— हें प्रसिद्ध कवि **भवभूति** यांचें सर्वोत्तम नाटक **उत्तररामचरित** याच्या आधारानें लिहिलेलें असून यांत करुणरस इतका ओतप्रोत भरला आहे कीं, तो पाषाणाला देखील द्रव आणील. कागद, छपाई व बांधणावळ सुरेख असून याचीं डेमी १२ पेजी सांच्याचीं २६० पृष्ठें आहेत. याची किंमत १ रुपया आहे.

**चारुदत्त आणि वसंतसेना**— हें प्रसिद्ध महाकवि **श्रीशूद्रक** राजा याच्या **मृच्छकटिक** प्रकरणाच्या आधारें तयार केलें आहे. यांत पौराणकाळाच्या नंतरची या देशाची स्थिति व्यक्त केली आहे. कागद व छपाई वगैरे सुरेख असून याचीं डेमी द्वादशपत्री पृष्ठें सुमारें ३०० आहेत. किंमत १ रुपया.

**प्रणयिमाधव**—हें प्रसिद्ध महाकवि **श्रीभवभूति** याच्या **मालतीमाधव** नामक प्रकरणाच्या आधारानें तयार केलें आहे. यांत कुलीन कन्यकेचें वर्तन उत्तम प्रकारें दाखविलें आहे. यांत अनेक प्रकारच्या मसलती आहेत. कागद व छपाई उत्तम असून डेमी द्वादशपत्री सांच्याचीं पृष्ठें सुमारें ३०० झालीं आहेत. किंमत १ रुपया.

**शिवदिग्विजय**—- यांत छत्रपति **शिवाजी** महाराज यांच्या तरुणपणच्या ह्मणजे त्यांनीं **तोरणाकिल्ला** घेतल्यापासून तों त्यांना राज्याभिषेक होईपर्यंतच्या कृतींचें फारच सुरस रीतीनें वर्णन केलें आहे. कागद व छपाई सुरेख असून डेमी द्वादशपत्री सांच्याचीं ३०० पृष्ठें आहेत. किं. १ रु.

**पत्ता**— प्रकाशक ‘खानदेशमित्र’

पोष्ट— खानापूर (बेळगांव.)

मासिक पुस्तक.

# खानदेशमित्र.

## नूरजहां राणी.

आशिया खंडांत तार्तरी ह्मणून एक देश आहे. त्याच्या पश्चिम भागांतील एका गांवीं खाजा आयास या नांवाचा एक मनुष्य रहात असे. या मनुष्याचे वाडवडील फार सुखी होते व खाजा आयासच्या उमरीस सुमारें १९-२० वर्षे लोटेपर्यंत त्या कुटुंबाला कोणत्याही गोष्टीची ददात ह्मणून नव्हती. पण कर्मधर्मसंयोगानें खाजाला फार गरीबी आली, ती इतकी कीं, त्याला अन्नाच्छादनाची देखील पंचाईत पडूं लागली. घरांत अठराविस्वे दारिद्र्य आणि बाहेर देखील लोक त्याला चांगलेंसें पाहिनासे झाले होते; कारण त्यानें एका हलक्या कुळांतील स्त्रीशीं लग्न केल्यामुळें, जो तो त्याला हलका मानूं लागला होता. अशा विपत्तींत व संकटांत दिवस काढणें त्याला फार कठीण वाटूं लागलें व शेवटीं त्यानें असा निश्चय केला कीं, देशत्याग करून कोठें तरी जावें, व स्वस्थ रीतीनें कालक्रमणा करावी, हें बरें.

देशत्याग करण्याचा त्यानें आपल्या मनाचा पक्का धडा केल्यावर, त्यानें थोडेसे पैसे वाटखर्चीला ह्मणून घेतले, व आपल्या बायकोला एका ह्मातार्‍या व रोडक्याशा घोड्यावर बसवून त्यानें हिंदुस्थानची वाट धरिली. अशा

रीतीनें मोठ्या हालअपेष्टेंत प्रवास चालला असतां, अर्ध्या वाटेंतच अन्न सामुग्री संपली व वाटखर्चीही सर्व खर्च झाली. खाण्याला अन्न नाहीं, पदरीं पैसा नाहीं, मोठमोठ्या मजला केल्यामुळें अंगांत थकवा भरलेला, मनुष्याचें नुसतें दर्शन पडणें देखील मुष्कील, आणि अशा विपत्तींत बायकोला पूर्ण नऊ महिने भरलेले, तेव्हां खाजा आयासच्या डोक्यावर केवढा दुःखाचा डोंगर येऊन कोसळला होता ह्मणून सांगावें?

तो बापडा त्याच स्थितींत मार्ग क्रमीत चालला. वाटेंत उपासावर उपास पडूं लागले व त्या गरोदर स्त्रीचे प्राण अन्न पाण्यावांचून जाऊं लागले. पण इलाज काय? अन्न आणावें कोठून? व कसें? अखेर एके दिवशीं ती बाई प्रसूत होऊन तिला मुलगी झाली. हीच **नूरजहां** होय.

ही जन्मलेली मुलगी ह्मणजे केवळ लावण्याची खाण होती पण त्या अन्नहीन मातापितरांस ती केवळ कालस्वरूपी भासूं लागली. दुष्काळांत जसा तेरावा महिना यावा, तशी स्थिति त्या कन्येच्या जन्मामुळें त्यांना भासूं लागली. अशाच हालअपेष्टेंत कांहीं वेळ मार्ग क्रमून अन्न मिळेल तर पहावें, ह्मणून तीं निघालीं, पण भयाण अरण्यांत अन्न कोठचें!! शेवटीं निरुपाय होऊन त्यांनीं त्या मुलीला झाडाच्या पानांत गुंडाळून तेथेंच सडकेच्या कडेला अरण्यांत टाकिलें व तीं उभयता पुढें निघून चालतीं झालीं!!

पण नऊ महिने ओझें वाहिलेला पोटचा गोळा अशा यःकश्चित् निमित्तानें सोडून कसा जाववेल? तीं कांहीं पावलें पुढें गेलीं व दोघेंही वाटेंत वेड्यासारखीं स्तब्ध उभीं राहिलीं. आईच्या पोटांत मायेची उकळी फुटली आणि

तिनें आवेशासरसा मोठ्यानें हंबरडा फोडिला. आणि दीन मुद्रेनें नवऱ्याकडे पाहून ह्मणाली "कायहो, नाहीं का कोणीं माझ्या बाळाला येथें आणीत?" हा तिचा आक्रोश ऐकून खाजा आयासच्या देखील नेत्रांतून अश्रुधारा वाहूं लागल्या आणि बायकोचें घोडें तेथेंच उभें करून, तो त्या मुलीला आणण्याला परत गेला.

नंतर मुलीला घेऊन तीं सर्वजण लाहोरास येऊन दाखल झालीं. त्या वेळीं लाहोरास अकबर बादषहा रहात असे. त्याच्या दरबारीं खाजा आयास हा जाणें येणें ठेऊं लागला. व शेवटीं दरबारच्या एका सरदाराच्या वशिल्यानें त्यानें खुद्द बादषहापाशीं जाण्या येण्याचा देखील परिपाठ घातला. खाजा आयास हा मोठा गुणी मनुष्य होता, ह्मणून त्यावर बादषहाची बहाल मर्जी झाली व त्यानें त्याला सर खजिनदाराची जागा दिली. अशा प्रकारें या कुटुंबाची सर्व स्थिति पालटून, जो खाजा कांहीं दिवसांपूर्वी केवळ फकीर होता तो आतां अमिरांत मोडूं लागला!! त्याची रूपवती कन्या इचेंही बादषहाचे जनानखान्यांत जाणें येणें होऊं लागलें, व तिचा गोंडस गोरा बांधा, मनोहर चेहरा व तिनें केलेल्या सहज लीला या पाहून षहाजादा सेलीम तिच्यावर पूर्णपणें फिदा होऊन गेला. या नूरजहांशीं लग्न करून घेण्याची परवानगी मिळावी ह्मणून सेलीमनें अकबरापाशीं पुष्कळ लोकांची भीड खर्चिली; शेवटीं आपण होऊन स्वतःही विचारलें; पण ती गोष्ट अकबरास पसंत न पडून, तिच्या नादामुळें कदाचित् भलता सलता परिणाम होईल, या भीतीनें अकबरानें नूरजहांचें एका सरदाराशीं लग्न लावून दिलें. या सरदाराचें नांव षेर अफकून ( सिंहाचा

वैरी असें होतें. लग्न करून दिलें, तरीही सेलीमच्या मनांतील नूरजहांविषयींचा नाद सुटेना. तेव्हां बादषहानें षेर अफकुनाला बंगाल देशीं बायकोसहवर्तमान पाठवून दिलें. पुढें अकबर बादषहा इ० स० १६०५ या वर्षी मरण पावला व त्याचे गादीवर सेलीम हा बसला.

सेलीम उर्फ जहांगीर हा बादषहा झाल्यावर, तो पूर्वी मनांत घोळत असलेले विचार सिद्धीस नेण्याच्या उद्योगास लागला. नूरजहांची व षेर अफकुनाची ताटातूट पाडून आपल्या वाटेंतील हा कांटा काढून टाकावा ह्मणून नूरजहांचे नवऱ्यास मारण्याचा बादषहानें बेत केला. हा षेर अफकून तरी लहानसान मनुष्य नव्हता. सिंहास त्यानें एकट्यानें मारिलें होतें. ह्मणून त्याचें षेर अफकून असें टोपण नांव पडलें होतें !! साम, दाम, दंड, भेद वगैरे कोणत्याही प्रकारानें तो मारला जावा ह्मणून सेलीमानें नानाप्रकारची खटपट केली. आपणाबरोबर त्यास शिकारीस नेऊन त्याचे एकट्याचे आंगावर वाघ सोडून दिला; या प्रकारानेंही तो बहाद्दर मेला नाहीं. पुढें हत्तीच्या पायांखालीं तुडवून मारण्याची खटपट केली, पण त्या प्रसंगींही त्यानें हत्तीचीच सोंड तोडून टाकिली ! मग तो निजला असतांना त्याचे आंगावर चाळीस मारेकरी पाठविले, पण त्यांचीही त्यानें डाळ शिजूं दिली नाहीं. शेवटीं दगाबाजी करून बादषहानें षेरचा प्राण घेतला. आणि आपला इष्ट हेतू सिद्धीस नेला.

षेर अफकुनला मारल्यावर जहांगिरिनें नूरजहांला दिल्लीस नेलें प्रथमतः तिनें त्याच्या ह्मणण्याकडे लक्ष दिलें नाहीं, पण अखेर तिची बुद्धि पालटून तिनें बादषहाच्या ह्मणण्यास रुकार दिला. त्यानें तिला आपली पट्टराणी करून

ठेविलें त्यानें तिचें नांव नूर महेल ठेविलें. तिजवर त्याची पूर्ण मर्जी असे व ती सांगेल त्याचे बाहेर तो मुळींच वागत नसे. त्यामुळें ती ह्मणेल ती पूर्व दिशा, असें राज्यांत होऊन गेलें. दरबारीं तिचें वजन मनस्वी झालें. तिनें आपल्या पालन कर्त्या पुरुषास दरबारीं दिवाणगिरीची जागा देवविली. आपल्या भावास सेनाधिपती केलें, व जहांगीरचे मागें आपल्या मुलासच दिल्लीचें तख्त मिळावें, असें तिचे प्रयत्न सुरू होते.

पण मनुष्याचा काळ सदासर्वदां सारखाच चालतो, असा कांहीं नियम नाहीं. ज्याच्या जिवावर ती इतक्या उड्या मारीत होती, तो बादषहा मरण पावला व हिचें तेज सर्व प्रकारेंच फिक्कें पडत चाललें. बादषहाचा मुलगा जो षहाजहां त्याचें व इचें जमेना. अखेर कंटाळून तिनें राज्यकारभारांतील मनच काढून घेतलें व आपलें उरलेलें आयुष्य एकांत वासांत घालवावयाचें असा निश्चय केला. षहाजहांनें तिला २९ लाख रुपये पेनशन करून दिलें व अशा रीतीनें सुखानें काळक्रमणा करून ती मरण पावली.

या स्त्रीच्याही चरित्रापासून कांहीं गोष्टी घेण्यासारख्या आहेत. स्त्रियांच्या मनाचें चांचल्य, पुरुषांची अलोट विषयेच्छा, अकबराची दूरदृष्टी, षेरखांचें शौर्य इत्यादी; व विद्या, वपु, वस्त्र, वक्तृत्व आणि वित्त या पांच गोष्टींपैकीं एखादी जवळ असल्याखेरीज मनुष्याला जगांत किमत नाहीं; या ह्मणण्याची सत्यता नूरजहांच्या वरील चरित्रावरून चांगली ध्यानांत येण्यासारखी आहे.

( एन्. एम्. दामले. कृत. )

## बालविवाहित स्त्रीविलाप.

पद. ( अजि अक्रुर हा नेतो श्रीकृ० या चा० )

मम जन्माची एक सकळग कहाणी । जरि इ च्छा तव मैत्रीणी ॥ धृ० ॥ सहावें वर्षीची लग्न सोहळा केला । सकलांस आनंदचि झाला । पुढें षण्मासें सासुरवास कपाळा । लागला संत त मेला । त्यांचा तरिबाई अभ्यासीं जिव रम ला । मग कोण पुसेलचि मजला ॥ चाल ॥ सर्वही घरची सत्ता । सासुबाईच्या हातां । लागली मला बहु चिंता ॥ चाल ॥ त्यजिलें अन्न पहा ह्मणतिल गे मज ह्मणुनि । अधाशी खादाडीणी ॥ १ ॥ यापरि लोटियले तीन मा स नच पुरते । तों अन्य दुःख मजवरतें । पड लें, भावोजी क्षयरोगी बहु होते । जाहले देवा धिन ते । नणदादिक ह्मणती पायगुण माझागे । सर्वही बघती रागें ॥ चाल ॥ अन्य तें जावा नणदा । लागल्या छळायास सदा । सुख शब्द येन तोहि कदा ॥ चाल ॥ धरिला रुद्राचा अ वताराचि सर्वांनीं । मज सहाय्य नसे गे कोणी ॥ ॥ २ ॥ यापरि घालविलीं दोन पहा मीं वर्षे । दुःखांत परी बहु हर्षे । कारण पतिराया वरि ठेवुनि विश्वासा । परि जहाली तीहि निराशा । पुढें लवकरची गेले ते दुरवरती । शिकाया वि- द्या पुरती ॥ चाल ॥ पुसतेसि काय मग बाई । छळुं लागे सासूबाई । सुख झोंप कशी मज

नाहीं ॥ चाल ॥ खाउनि घांसभरी राबावें रात्रदिनीं । नावडती मी गे ह्मणुनी ॥ ३ ॥ आणुनि एकटिनें घालावें जें पाणी । तें सकलांचीं तीं न्हाणीं । कामापुरती गे ह्मणती वरवर वहिनी । परि आंतुनि जशि वैरिणी । गुंफावी माझी मीच कशी तरि वेणी । घालिती न कारण कोणी ॥ चाल ॥ बोलुंनये कवणापाशीं । ह्मणतील मला बहु भाषी । यापीनें सखये तैशी ॥ चाल ॥ निःशक्ताई गे जडली मानसि झुरणी । वाहती अश्रु नयनीं ॥ ४ ॥ सर्वां मागोनी निजुनी आधिं उठावें । उन्ह पाणीं सकळां द्यावें । तेव्हां तोंडधुणीं सकलांचीं बघ होती।नातरी बहु चडपडती।ह्मणती दांडगिला काय उठाया झालें।लवकरी ये परी सगळे॥चाल॥ शेराचें अन्नहि पचतें । तिन तिनदां घेउनि खातें । मग काय धाड हिस होते ॥ चाल ॥ लवकर उठण्यातें कां भरते गे उसणी । मज नकळे सांगा कोणी ॥ ५ ॥ जरा गडबाडिनें गेलें तर मज ह्मणती । कैदाशिण कां गे ती । जरा मंदगतीनें सखये मीं गेलें । तर हातीं पायीं आलें । ऐसें चालाया काय इला गे ह्मणती । सर्वस्वी माझी फजिती ॥ चाल ॥ काढले तेहि मी दीन दश वर्षे जाहलीं पूर्ण । जाहला प्राप्त ऋतु जाण ॥ चाल ॥ आनंदाचि ऐशी वार्ता ऐकुनि स्वजनीं । लागली परी मज झुरणी ॥ ६ ॥ पुढतीं अष्टदिनें पतिराजा आणविलें । अभ्यासें

जे क्षिण झाले । तदुपरि शोधुनिया शुभ दिन मज घातियली । नाथाची भेटाचि पहिली । सहजचि जाच जरा पडला तो मग मागें । तव दुसरी चिंता लागे ॥ चाल ॥ षण्मास ये परी गेले । पतिसंगे सखये आपुले । तव गर्भिणत्व तें आलें ॥चाल॥ भाळीं, अलयवयीं हर्ष परीया स्वजनीं । होईल पौत्र गे ह्मणुनी ॥ ७ ॥ निजुनी ऐसें मी काढियले नवमास । जिव झाला कासावीस । गिळति न अन्नाचे पांच सुद्धां गे घांस । दाहले शुद्ध उपवास । दिसली नच माझी धडगत मातें खास । लागले होउं आयास॥ ॥ चाल ॥ लागले फुटाया पाय । खोंकला झिजाया काय । केले न कांहीं उपाय ॥ चाल ॥ हयगय जहाली गे ये परि बहु मैत्रीणी । शक्ति तरी राहिल कुठुनी ॥ ८ ॥ जहालें प्रसुत असे होउनि हाल जिवाचे । तों वाटे मूल न वांचे। हा ां पायांची काडि जणुं ना शक्ति । येइल त्या तरि कोठुनि ती । जरि उभयांची निशक्त चि प्रकृती । येइल त्या तरि कोठुनिती ॥चाल॥ दुग्धाचा थेंब न कसला । सुत-शोक त्यांतचि बसला । बाळंतरोग दृढ डसला ॥ चाल ॥ उठते मग कैंचीं त्यांतुनि मी परतोनी । लागली अंतिची झुरणी ॥ ९ ॥ ह्मणुनी शेवटची करिते विनती आजी । तुह्मि व्हाल ह्मणोनी राजी । व्यर्थचि जाचुं नका स्व-सुनां मुलि परि माना। तरि देतिल सकलहि माना । सोळाहुनि आ

धीं घालुं नका अबला ती। ऋतु प्राप्त तरी नर हातीं ॥ चाल ॥ ना तरी पहा हीच रिती। होईल ह्मणुनि कथितें ती। तुह्मांसि हिताची गोष्टी ॥ चाल ॥ आतां येतें मीं लोभ असोंदे स्वमनीं। कथिलें तें ठेवा ध्यानीं ॥ १० ॥

---

## खरी दया.

वेणू या नांवाची एक लहान मुलगी होती. ती एके दिवशीं बाहेरून धांवत धांवत आली, व आपल्या आईला ह्मणाली, 'आईग, तो दाराशीं एक भिकाऱ्याचा मुलगा उभा राहिला आहे, त्याला द्यायला एक चवली मला देतेस काय? त्याला फार भूक लागली आहेसें दिसतें; त्याच्या पोटाची अगदीं दामटी होऊन गेली आहे त्यावरून असें वाटलें कीं, त्या गरीब बिचाऱ्याला, आज सगळ्या दिवसांत कांहीं एक खायला मिळालें नाहीं. आईग, त्याला पाहून त्याची मला मोठी काकळूत येते.

हें ऐकून तिची आई ह्मणाली 'अग, तुला आणि काशीला आज सकाळीं मी एक एक चवली दिली आहे, नाहीं बरें? तर तुझी तूं त्या भिकाऱ्याच्या मुलाला नेऊन देईनास?' आईचें हें भाषण ऐकून वेणूला, मी कुठली त्या भिकारयाच्या पंचाइतींत पडलें असें वाटूं लागलें, व ती ह्मणाली 'होय मला चवली दिली आहेस खरी, पण मी त्या चवलीचें माझ्या बाहुलीला खोटें मोतीं घेणार आहें, व उरलेल्या पैशांची भातुकलीसाठीं डाळिंबें आणविणार आहें.

तिची आई ह्मणाली 'जर तुला भातुकली खेळायची असेल, तर डाळिंबेंच कशाला पाहिजेत? घरांतून कांहीं फराळाचें वगैरे घे ह्मणजे झालें; अशानें तुझ्या भातुकलीला पैसे लागणार नाहींत, व तुझ्या बाहुलीला दागिने घालूं नकोस ह्मणजे झालें. मग त्या भिकाऱ्याला ती चवली द्यायाला काय हरकत आहे?' वेणू ह्मणाली 'पण भातुकलीला डाळिंबें नसतील तर मला मुली नांवें ठेवतील, व माझी थट्टा करतील, त्याला मी काय करूं? तर आई, ती चवली मी देत नाहीं. हें ऐकून तिची आई ह्मणाली 'तर मग त्या गरीब मुलापेक्षां तुला तुझ्या भातुकलीची काळजी ज्यास्त आहे; तुला उपकार करावेसे वाटतात, पण आपली कोणत्याही प्रकारची गैर सोय न होतां जर दुसऱ्यावर उपकार करतां आले तर करावे, असा तुझा विचार दिसतो. असें करणें ह्मणजे 'खरी दया' नव्हे. पहिल्यानदां आपल्या पोळीवर तूप ओढून, मग दुसरा पोळी कोरडी कां खातो, हें विचारणें, व तुझें हें करणें सारखेंच आहे. तूं भातुकली जर आज नाहीं केलीस, तर अगदीं उपाशीं रहातेस अशी कांहीं गोष्ट नाहीं; पण त्या मुलाला मात्र, जर तूं कांहीं दिलें नाहींस, तर सर्व दिवसभर उपास पडेल, याचा विचार कर.

असें त्यांचें भाषण चाललें होतें त्यावेळेस वेणूची धाकटी बहीण काशी कशालाशी बाहेर गेली होती. तिनें तोच भिकारी दारांत उभा राहिलेला पाहिला. त्याला पाहून तिला वाईट वाटलें व ती ह्मणाली 'अहारे गरीब बापड्या; काय तुझी उपासमार ही? तुला नुसती जाडी भरडी भाकर

देखील मिळत नाहीं ना ? ' असें ह्मणून तिनें आपल्या जवळची चवली त्याला देऊन टाकली.

ती चवली हातांत पडतांच त्या भिकाऱ्याला किती आनंद झाला असेल, त्याची कल्पना आपणांस करतां देखील येणार नाहीं " ताईसाहेब, तुमचं देव बरं करो " असें ह्मणून तो एका दुकानांत गेला, व त्यानें तिचें खावयास घेतलें. काशी ही तशीच घरांत आली, व आईला ह्मणाली " आईग, तूं रागें नाहींना भरणार, मी आपली चवली बाहेर एक भिकारी आला होता, त्याला दिली. त्याला बघ भुकेनें चालतां सुद्धां येत नव्हतें. आईग, रागावूं नको. ऑं ? " हें ऐकून आई ह्मणाली- " बाळे, तूं फार चांगलें केलेंस, मीच त्याला आतां बाहेर जाऊन एक पावली देणार होतें. बरें आतां ही तुलाच घे. " मग वेणूला ह्मणाली " वेणे, पाहिलेंसना, तुला कांहीं तुझी चवली द्यायाला धीर होईना पण तुझ्या धाकट्या बहिणीनें मात्र त्याला आपली चवली दिलीन; तिलाच त्याची खरोखर दया आली, नाहीं तर तूं—

या वरून तुह्मींच पहा कीं, दयेच्या फुकटच्या गोष्टी सांगणें, हें फार सोपें आहे, पण तसें वागणें फारच कठीण आहे, ' गरीबावर दया करावी ' असें नुसतें बोलून आपल्या स्वतःची गैरसोय होईल ह्मणून आपल्या पदरच्या एका छदामासही धक्का न लागूं देणारे असे लोक पुष्कळ आहेत. असले लोक निर्दय असतात असें आमचें ह्मणणें नाहीं. पण त्यांच्या त्या फुकटच्या दयेपासून कांहीं उपयोग नाहीं, येवढेंच आमचें ह्मणणें आहे. या दोन मुलींपैकीं वेणू ही ह्मणजे निर्दय होती असें नाही, पण ती आपलपोटी, येवढेंच; तिच्या मनांत त्या भिकाऱ्याला चवली द्यावी असें होतें. पण

आपली चवली देऊन आपल्या सुखांत व आनंदांत अंतर पाडावें असें मात्र तिला वाटत नव्हतें, व ह्मणूनच तिच्या अंगीं खरी दया ह्मणून जी ह्मणतात ती नव्हती.

आपल्या सुखांतील थोडासा भाग कमी करून तो दुसऱ्याला देणें हीच खरी दया व हेच खरे उपकार आहेत.

---

## कूटप्रश्नांचीं उत्तरें.

### आठव्या अंकांतील प्रश्नाचें उत्तर.

सुमारें ४१,९४,३०४ रुपयांचे गहूं संग्रहास राहतील ! व सुमारें ४१,९४,२९९॥ रुपये दलाल मित्रास तोटा होईल. सोडतींत नांव आल्यामुळें **सर्वसंग्रह** हें पुस्तक **रा.रा. शंकर मार्तंड पंचधरी** मु. अंदरसूल (खानदेश.) यांस बक्षीस मिळालें.

### नवव्या अंकांतील प्रश्नाचें उत्तर. ‘ मनुष्य. ’

हा प्राणी सकाळीं ह्मणजे बाळपणीं दोन हात व दोन पाय अशा चोहोंवर चालतो ( रांगतो ); दुपारीं ह्मणजे तरुणपणीं दोन पायांवर चालतो; व संध्याकाळीं ह्मणजे ह्मातारपणीं तिसऱ्या काठीच्या सहाय्यानें चालतो !

सोडतींत नांव आल्यामुळें चार रुपये किमतीचें घड्याळ **रा. रा. गणपतराव वैद्य** मु. सांब्राणी ( कानडा ) यांस बक्षीस मिळालें.

या दोन प्रश्नांपैकीं पहिल्याचीं बरोबर उत्तरें ६८ जणांकडून व दुसऱ्याचीं १९७ जणां कडून आलीं. ज्यांस बक्षिसें मिळालीं त्यांचीं नांवें वर छापिलीं आहेत. स्थलसंकोचास्तव इतरांचीं नांवें छापतां आलीं नाहींत. याबद्दल त्यांनीं राग मानूं नये.

# अपशब्दनिषेध.

व्याख्या-" अपशब्दनिषेध " ह्मणजे काय हें आपण आधीं पाहूं. "अपशब्द" यांत 'अप' हा उपसर्ग आहे; याचा अर्थ, वाईट, दूर किंवा खालीं असा होतो. आणि " शब्द" ह्मणजे सार्थ वर्णोच्चार. आतां एकंदर " अपशब्द " याचा अर्थ, वाईट किंवा खालच्या प्रतीचे अर्थात् हलकटपणाचे सार्थ वर्णोच्चार असा झाला. आणि पुढें " निषेध " शब्द राहिला यांत " नि " हा उपसर्ग असून त्याचा अर्थ अत्यंत असा होता व शेवटीं जो " षेध " हा " षिध् " धातूपासून प्रत्ययघटित झालेला शब्द राहिला त्याचा अर्थ " जाणें " असा होतो. ह्मणजे " निषेध " याचा एकंदर अर्थ, अत्यंत जाणें असा झाला. आतां एकंदर "अपशब्द निषेध" ह्या सामासिक शब्दाचा अर्थ, वाईट सार्थ वर्णोच्चाराचें अत्यंत जाणें असा होतो. सारांश, या शब्दाचा अर्थ वाईट शब्दोच्चार न करणें ह्मणजे दुर्भाषण न बोलणें, अर्थात् शिवीगाळ न करणें असा झाला.

ह्या आपल्या सकल आर्यवर्तामध्यें अपशब्दरूपी यक्ष प्रबल होत्साता आर्यजनांच्या मुखीं तो वास्तव्य करून राहिला आहे. येणेंकरून आत्मोन्नतीच्या संबंधानें आपण केवढ्या नीचावस्थेप्रत येऊन पोहोंचलों आहोंत हें स्पष्टपणें दृष्टोत्पत्तीस येतें. शिवाय मंगलस्वरूप ब्रह्मांडनायकाच्या जयघोषामध्यें प्राचीन आर्य निपुण व

निमग्न असत अशा विषयीं त्यांची अप्रतिम कीर्ति जगप्रसिद्ध असून, ही गोष्ट निःशंक व निर्विवाद सर्व लोकांस ग्राह्य आहे. अतएव त्यांच्या वंशजांचीं मुखें अमंगळपणाची गुहा होऊन रहावी ही मोठी सखेदाश्चर्याची गोष्ट आहे, नव्हे काय? ही गोष्ट खचितच आपल्या नीतीस, आपल्या देशास आणि आपल्या धर्मास काळिमा आणणारी आहे ह्यांत किमपिही संदेह नाहीं. अशी ही दुष्ट संवय आह्मांमधून नष्ट होऊन आह्मां सकल बंधुजनांस "आर्य" हें श्रेष्ठ नांव शोभावें अशा इच्छेनें प्रियजनांस दोन ममतेचे शब्द विदित करीत आहें त्यांचा सुज्ञजन विचार करून योग्य आचरण ठेवितील अशी पूर्ण आशा आहे.

पृथ्वीच्या पृष्ठभागावर जे सर्व प्राणी आह्मी पहातों त्यांत आपणा मानवी प्राण्यासच वाचा आहे. वाचेविना आपलें केवढें अडलें असतें! आपण आपल्या प्रियकरांजवळ कसें बोललों असतों? सुखदुःखाचे मनोभाव परस्परांस कळवून यथायोग्य रीतीनें दुःखाचें निवारण कसें करितां व करवितां येतें? अति मधुर जी गायनकला ती आह्मी कशी संपादिली असती? आपणास अतिसुखावह अशीं जीं नीतिशास्त्र, वैद्यशास्त्र, अर्थशास्त्र वगैरे अनेक शास्त्रें तीं कशीं पढलों असतों? कलाकौशल्यांत कसे प्रवीण झालों असतों? सारांश, हें सर्व असाध्य होऊन पशुसमान आपली स्थिति झाली असती; ह्मणून जी वाचा आमच्या ह्या एवढ्या सुखास कारणभूत झाली आहे तिजकरितां आह्मी आनंद मानून तिचा सदुपयोग केला पाहिजे. मुखांतून प्रीतीचीं भाषणें काढलीं, न्यायाचीं वचनें बोललों, दया प्रदर्शित केली, अर्थात् जें बरें तें उच्चारिलें असतां वाचेचा आह्मी योग्य उपयोग करितों असें होईल;

पण जर कारितां वाईट शब्द तोंडांत वापरले तर तीस भ्रष्ट केल्याचा दोष आह्मांकडे लागेल.

सांप्रतची स्थिति पाहूं गेलें असतां आपणांपैकीं बहुतेक ह्या बाबतींत दोषी आहेत असें दृष्टोत्पत्तीस येतें. जिकडे जावें तिकडे अपशब्द ऐकूं येतात. अशिक्षित व शिक्षित, रानटी व सुधारलेले मताचे, धनाढ्य व धनहीन, शहरवासी व गांवढेकरी, स्त्री पुरुष, अबालवृद्ध, कोणत्याही जातीचे, धर्माचे, वर्णाचे व देशाचे असोत, ज्यांच्या तोंडीं थोडे बहुत अपशब्द नाहींत अशीं मनुष्यें विरळा.

## अपशब्द बोलण्याचे अनेक प्रकार आहेत.

१ ला–आई बहीण इ० वरून शिव्या देणें.

२ रा–गुह्येंद्रियांचीं व तत्संबंधीं कांहीं अवयवांचीं नांवें घेणें.

३ रा– तूं बदकर्मापासून अथवा जनावरापासून उत्पन्न झाला आहेस अशा अर्थाचे शब्द उच्चारणें. उ० गाढवीचा, रांडेचा इ०.

४ था–कोणत्याही जनावराचें अगर हलक्या मानिलेल्या जातीच्या मनुष्याचें अथवा निर्जीव पदार्थाचें नांव घेऊन तो अमुक कोणी तूं आहेस असें ह्मणणें. उ० डुक्कर, गाढव, धेड, दगड, इ०.

५ वा–तूं गैर नीतीचा आहेस असे दर्शविणारे शब्द बोलणें. उ० लबाड, बेइमानी इ०.

६ वा–शाप देणें, उ०सत्यानाश होवो,आग लागो इ०.

७ वा–न्यूनतादर्शक शब्द काढणें. उ०मूर्खा, बहिऱ्या, दरिद्र्या, इ०.

८ वा–भीतिदायक व अपमानकारक शब्दांचा उपयोग करणें. उ० ठार मारीन, तंगडी मोडीन, लात मारून बाहेर काढीन, पायपोसानें तोंड फोडीन. इ०

९ वा–दिसण्यांत बरें पण उद्देश वाईट अशा दोन अर्थानें बोलणें. उ०तुझ्यासारखा मी शहाणा नाहीं. तूं केवढ्या मोठ्या कुळांतला! तुह्मीं मोठे बाजीराव आहांना ह्मणून हें असें. पोटभेद–नांवाला खुर्ची पुढें करून पण ज्या चिन्हांनीं वाईट अर्थ उत्पन्न होईल अशीं चिन्हें दाखवून "या बसा, ह्यावर बसा " असें ह्मणणें इ०.

१० वा–प्रतिज्ञेच्या रूपानें बोलणें. उ० जर तूं खऱ्या बीजाचा असशील तरच हें करशील इ०.

११ वा–मळमूत्राचीं नावें घेऊन अमकें खा किंवा पी ह्मणणें.

१२ वा–ह्मणीच्या रूपानें ह्मणणें. उ०" खाणें थोडें पण मिचमिच फार" असा अभिप्राय दर्शक, मांजरांच्या मैथुन संबंधीं त्यांच्या ओरडण्याचे संबंधानें एक ह्मण आहे ती. अशा अभद्र व कंटाळवाण्या ह्मणी अनंत आहेत व त्यांचा उपयोग संभावित, कुलीन व विद्वान ह्मणविणारे अनेक लोकही करितात.

१३ वा–सामासिक शब्दाच्या रूपानें. जसें–"रिकाम–ट, भिकार–ट, इ०"

१४ वा–अमका कोणी तुझा सोयरा संबंधी आहे असें लक्षून बोलणें. उ०"तुझा आजा बसला आहे तें आणायला."

१५ वा–कोणतेही चीड आणणारे, कोणाच्याही अब्रूस डाग लावणारे, त्याची नीति भ्रष्ट करणारे, त्याचा अपमान करणारे, त्याचें मन दुखविणारे, सारांश कोणत्याही अर्थानें वाईट असे शब्द उच्चारणें. उ० भटुरडा, मुसुरडा,

बाट्या, बायल्या, मतलबी, चाकूरडा, कळ लाव्या वगैरे शें कडो प्रकारचे शब्द आहेत.

**अपशब्दउच्चारणारांच्या प्रती आहेत.**—कोणी ते क-चित बोलतो. कोणाच्या वीस पंचवीस शब्दांआड तो येतो आणि कोणकोणाची तर भाषाच अपशब्दांनीं बनली असते. ह्या शेवटल्या प्रकारांत दोन तऱ्हा आढळतात.

**१ ली**—तो बोलत असतां एक दोन शब्दांआड निरनि-राळे अपशब्द येतात.

**२ री**—जेव्हां जेव्हां तो कांहीं बोलतो त्या त्या वेळेस नव्याण्णव हिश्शांनीं त्याच्या तोंडीं एक प्रकारचा अपशब्द असतो तोतोच येतो. वेळोवेळीं येणाऱ्या अशा शब्दाला इंग्र जींत "टचवर्ड" उर्दूत "तक्याकलाम" व मराठींत पालो पद ह्मणतात. ( हा वेळोवेळीं येणारा शब्द अपशब्दच अ-सतो असें नाहीं एखाद्या दुसऱ्या प्रकारचाही शब्द असतो. )

## अपशब्दांचे प्रयोग कोणकोणावर होतात.

ते फक्त मनुष्यांवरच होतात असें नाहीं. तर जनावरांवर व निर्जीव पदार्थांवरही होतात. मग ते पदार्थ दृष्टिगोचर असोत किंवा नसोत, त्यांचें ज्ञान घ्राणेंद्रियानें होवो, रसनें-द्रियानें होवो, स्पर्शेंद्रियानें किंवा कर्णेंद्रियानें होवो. एखा-द्यास कदाचित् असें वाटेल कीं, शत्रूवर व आपल्यास त्रास होणाऱ्या पदार्थांवर मात्र अपशब्दांची योजना होत असेल पण तसें नाहीं. आपल्या प्रियकरांवर व स्वतां आपणावरही मनुष्य त्यांचे प्रहार करण्यास चुकत नाहीं.

**कोणत्या प्रसंगीं मनुष्य अपशब्द उच्चारतो,**—हें पाहूं गेलें असतां ह्यास एक उत्तर मिळतच नाहीं. दुःख झालें तरी

शिवी, सुख झालें तरी शिवी; लाभ झाला तरी शिवी, हानि झाली तरी शिवी; कार्य सफल झालें तरी शिवी, निराशा झाली तरी शिवी; आश्चर्य कारक गोष्ट घडली तरी शिवी, धैर्य उत्पन्न होण्यासारखें कांहीं घडलें तरी शिवीच; मान मिळाला तरी शिवीच, अपमान झाला तरी शिवी; क्रोध आला तरी शिवी, दया उत्पन्न झाली तरी शिवीच; फार काय सांगावें तो पोथी वाचीत बसला असतां त्याचें अंग खाऊं लागलें किंवा ढेंकूण वगैरे कांहीं चावलें तर चटदिशीं ह्मणेल कीं "ईच्या आई-वें तें काय चावतें" सारांश ज्याच्या मुखीं अपशब्द ह्मणून आहे त्याच्या मुखांतून ज्या कोणत्या वेळीं अपशब्दरूपी दुर्गंध सुटणार नाहीं अशी वेळच नाहीं; एवढी ह्या दुष्ट संवयीनें मनुष्यावर आपली छाप बसविली आहे.

**कांहीं कांहीं अपशब्द स्त्री पुरुषांच्या तोंडीं विशेष असतात, आणि ते त्यांच्या वापरण्यांत येण्याची कारणें,**

पुरुषांच्या तोंडीं;-शिन-च्या, लवं-च्या; इ०.

स्त्रियांच्या मुखीं; मेला,सत्यनाश होवो, निःसंतान होवो, मढें जावो; इ०.

मला असें वाटतें कीं, कांहीं कांहीं अपशब्द ज्यांच्या त्यांच्या निरनिराळ्या वेळच्या स्थितिवरून ज्यांच्या त्यांच्या तोंडीं लागले असावेत. उदाहरणार्थ, आर्यलोक आपणास श्रेष्ठ व इतरांस हलके मानूं लागले असतील तेव्हांपासून सदहू लिहिल्याप्रमाणें अपशब्द ह्मणूं लागले असतील असें अनुमान होतें. "लवं-च्या" ह्या अपशब्दावरूनच पहा कीं,

आपण श्रेष्ठ व तूं अमका कोणी दासीपासून किंवा हलक्या बीजापासून झालेला अशा प्रकारचा रोंख दिसून येतो. सारांश, स्वतांच्या अंगीं श्रेष्ठत्व व दुसऱ्यांच्या अंगीं नीचत्व योजण्यासारखें एकंदर धोरण दिसतें.

आतां स्त्रियांच्या अपशब्दांच्या संबंधानें पाहूं गेलें असतां असें दिसून येतें कीं,त्या बिचाऱ्या अबला असल्या कारणानें, बहुतकरून त्यांचे अपशब्द शापरूपी असतात; आणि कांहीं काळापूर्वीं त्यांच्या शापानें प्राण्यांचा व पदार्थांचा नाश होत असे असे कांहीं ग्रंथांतरीं आढळतें. जसें दमयंतीनें एका दुष्टास शाप दिल्यानें तो जळून त्याची रक्षा झाली अशी कथा आहे. कलीसही तिनें शाप दिल्यानें त्याची तीच गत झाली असें आपण वाचतों. आणखी द्रौपदीनें दुर्योधनास शाप दिला होता कीं, "माझ्या नवऱ्याची गदा तुझ्या डाव्या मांडीवर बसेल व त्यानें तूं मरशील" आणि त्याप्रमाणें घडून आलें. तिनें दुःशासनास असा शाप दिला होता कीं, माझा नवरा ( भीम ) तुझें नरडें फोडून रक्त पिईल, आणि त्याप्रमाणें घडून आलें. अशा अनेक कथा आढळतात. ह्या कथा सत्य किंवा मिथ्या आहेत ह्या विषयीं आपणास कांहीं येथें कर्तव्य नाहीं. सध्या ह्यावरून एवढेंच पाहाणें आहे कीं, स्त्री अबला असल्या कारणानें तिचा बहुतकरून शापावर सपाटा असतो.

आतां दुसरे अनेक प्रकारचे अनेक शब्द अनेक कारणांवरून अनेक जनांच्या मुखांत आले असतील. कांहीं अपशब्द कामेच्छेनें, दुष्ट बुद्धीनें, तिटकाऱ्यानें, द्वेषानें, मत्सरानें, मदानें व क्रोधादिक मानसिक विकारांनीं प्रचारांत आले असावेत. असो;येथें सर्वच प्रकारचे अपशब्द कोणत्या प्रकारें

प्रचारांत आले, हा सांगण्याचा हेतु नाहीं. प्रसंगानुसार त्याविषयीं थोडेंसें सांगितलें आहे.

## अपशब्द बोलणारांचें आचरण.

अपशब्द बोलणारा तसे शब्द नित्य बुद्धिपुरःसर बोलतो किंवा त्याणें ह्मटल्याप्रमाणें करण्यास सर्व प्रसंगीं तो तयार असतो अथवा तसें त्यास वागतां येईल किंवा त्याप्रमाणें घडलें असतां त्यास आनंद होईल असें नाहीं. पण तो बोलण्याविषयीं निष्काळजी असल्यामुळें त्याच्या तोंडांत असे शब्द येतात. ह्यास उदाहरण पाहा; ज्यास गाय ही देवता असा कोणी मनुष्य, बैल गाडी हांकीत असतां बैलास आईबहिणी वरून लाखों शिव्या देतों; परंतु त्यासच जरी २९ रुपयांचें बक्षीस कबूल करून त्या शिव्यांप्रमाणें आचरण करण्यास सांगितलें तरी तो तसें करील काय? नाहीं करणार. ज्याच्या मुखीं अपशब्द आहेत असा मनुष्य, वाघ किंवा वादळ ह्याविषयीं हकीकत सांगत असतां, वाघ, वादळ यांस आईबहिणीवरून अपशब्द बोलतो तर त्यास कितीही बक्षीस कबूल केलें तरी त्याप्रमाणें त्याला वागतां येणें शक्य आहे काय? नाहीं. आई आपल्या लेंकरास ह्मणते कीं, "पिरपीर करशील तर आपटीन धरून दगडावर" आतां ही माउली आपल्या पोटच्या लेंकरास ह्मटल्याप्रमाणें आपटील काय? असें करावेंसें तिच्या मनांत तरी असेल काय? कोणी त्यास आपटलें असतां हीस आनंद होईल काय? असे असे प्रकार अपशब्द रूपानें ऐकण्यांत येतात. तर पाहा बक्षीस घेऊन सुद्धां जी गोष्ट करण्याचा आपण धिक्कार करूं, कोट्यावधि रुपये मिळत असले, किंबहुना महान् महान् राज्यें प्राप्त

होत असलीं तरी आचरण होणें अशक्य, इतकेंच नव्हे तर अपशब्दांत जे शब्द आपण वापरतों त्याप्रमाणें एखादें कृत्य दुसऱ्या कोणी केल्यास हायहाय करून शोकानें आपण आपले कान केंस तोडून मृत्तिका भक्षूं लागूं, तर तीच गोष्ट आपण करण्यास सिद्ध आहों, किंवा ती व्हावी अशी आपली इच्छा आहे आणि ती कोणीं केली असतां आपल्यास आनंद होईल अशा अभिप्रायाचें भाषण करून तोंडाची घाण करावी यांत काय अर्थ आहे बरें?

## अपशब्द उच्चारणें वाईट, हें ज्याचे त्यालाही वाटतें.

कारणः—

१ लें–गैर सावधगिरीनें कोणी अपशब्द उच्चारीत असतां त्यास दुसऱ्यानें थांबवून "हे पहा कसे वाईट शब्द तुह्मीं आपल्या भाषणांत आणतां" असें ह्मटल्यास त्यास विरघळल्यासारखें होतें.

२ रें–अपशब्द बोलणाऱ्यास तसा शब्द बोलल्यास तोही चिडतो.

३ रें–जो अपशब्द बोलतो त्यास वाटतें कीं, ज्यापण ज्यास ते बोलत आहों त्याची आपण बेअब्रू करितों आणि तेणेंकरून त्याचें मन दुखावलें जाऊन त्यास मोठी लाज वाटते.

४ थें–कोणी आपल्या कुटुंबांतील मनुष्यांवर मोठ्या जोरानें शिव्यांचा भडिमार करीत असतां जर शेजाऱ्यानें त्यास ह्मटलें कीं "वः, फार चांगलें चाललें आहे. शाबास, चालूंद्या" तर तो लाजून हळू बोलूं लागतो.

५ वें–शिव्या देणाऱ्यास जें विशेषण आहे तें जर त्यास लावलें (ह्मणजे त्यास शिवरा ह्मटलें) तर तो रागें भरतो.

६ वें–तो ज्यास शिव्या देतो त्याणें जवळ असणाऱ्यांस ह्मटलें कीं "ऐकाहो तुह्मीं साक्षी रहा; हा मजला शिव्या देतो" तर तो भितो. वगैरे बऱ्याच कारणांवरून अपशब्द बोलणें हें गैरशिस्त काम आहे. असें ज्याचें त्यालाच वाटतें हें सिद्ध होतें.

## अपशब्दांचे परिणाम.

अपशब्दामुळें परिणाम कसे वाईट होतात ते पाहा.-ज्या ठिकाणीं प्रीति वास करिते तेथें अपशब्दाचा संचार झाला ह्मणजे प्रीतींत विष मिसळलें जातें. मग अर्थात् बरेपणांत वाईटपण होतें. मित्र आहेत ते शत्रु होतात, सोयऱ्यांत हाडवैर पडतें, नवरा बायकोंतल्या रेशमाच्या गांठी सुटतात; बापलेक, सून सासू, बहीण भाऊ, हीं परस्परांस अंतरतात. ह्या प्रकारचीं अनेक दुःखकारक उदाहरणें दृष्टोत्पत्तीस येतात. तसाच कलह वाढतो; एक पहिल्यानें दुसऱ्यास कांहीं अपशब्द बोलतो, मग दुसरा त्यास प्रत्युत्तर करून दोन अपशब्द बोलतो; अशा प्रकारें अपशब्द श्रेढीनें वाढत जातात. कोणी कोणाच्या आई बहिणीवर पदर ठेवीत नाहीं, होतां-होतां लातां बुक्यांवर प्रकरण येतें, आणि ज्याप्रमाणें लहानशी ठिणगी गांव पेटवूं शकते, त्याप्रमाणें प्रथमतः क्षुल्लकशा वाटणाऱ्या अपशब्दांवरून खुनापर्यंत गोष्टी येऊन पोहोंचतात. आणि ज्यास अपशब्द बोलावे तो मनुष्य जर, सत्ताधारी व रागीट असला तर, त्याच्या हातून मोठा अन्याय व महाघातक परिणाम होण्याचा संभव आहे. पाहा, सुल्ला हा रोमन

सरदार फार कुरूप होता. त्यास एका आथेन्सकरानें माकडतोंड्या किंवा दुसरें तसेंच कांहीं ह्मटलें; त्यावरून त्याला इतका संताप आला कीं, त्याचा सूड उगविण्याकरितां त्यानें सगळ्या अथेन्स शहराचा नाश केला. पहा केवढा भयंकर व शोककारक परिणाम हा!! असे अनेक तऱ्हेचे वाईट परिणाम झाले आहेत, सांप्रत होत आहेत, व असे शब्द जोंपर्यंत वापरण्यांत राहतील तोंपर्यंत वाईट परिणाम होण्याचा संभव आहे ह्मणून कबीर किंवा तुळशीदासासारख्या अनुभविक कवीनें आपल्या दोन दोहोऱ्यांत अपशब्दापासून होणाऱ्या तोट्यांविषयीं चांगल्या रीतीनें दिग्दर्शन केलें आहे ते दोहोरे असे. दांत जिभेला ह्मणतात "हम बत्तीस तुम अकेली रहत हमारे माह्य, एकदीन चाप डारू तो फिर्याद काहां जाय." मग प्रत्युत्तर करून जीभ दातांस ह्मणते "तुम बत्तीस हम अकेली रहत तुमारे माह्य एकदीन तेढी बोलूं तो बत्तीसही गीर जाय." तर पाहा कोणास आपले दांत पाडून घेणें असतील, शत्रू करून घेणें असतील. वैमनस्य पाडून घेणें असेल किंवा कोणत्याही प्रकारें आपला नाश करून घेणें असेल तर मात्र अपशब्दाच्या योगानें कार्य त्वरित साधेल. पण चांगलें कृत्य साधूं गेलें असतां एकही अपशब्दानें साधणार नाहीं. आणि जरी एकादें काम साधतें असें क्षणभर कबूल केलें, तरी अशा वाईट प्रकारानें कामें सिद्धीस नेणें त्यापेक्षां तीं तशींच अपूर्ण राहिलीं तरी बेहत्तर आहे.

शिवाय अपशब्द उच्चारल्यानें मन बिघडतें, कामोत्पत्ति होऊन पापवासना मनांत घोळूं लागतात, मनुष्याचा कायदा मोडला जाऊन अपशब्द बोलणारा मनुष्य शिक्षेस पात्र हो-

तो. ज्यास शिवी दिली त्याची बेअब्रु केल्याचा त्यास आई इत्यादिवरून शिवी दिल्यास तिजबरोबर कुकर्म करण्याचा, विचार मनांत आणल्याचा व मुखानें वदल्याचा, दुर्जनास उत्तेजन दिल्याचा, सज्जनास लाजविल्याचा, दुसऱ्यास वाईट कित्ता घातल्याचा वगैरे अनेक गुन्ह्यांचा तो अपराधी ठरतो. व्याख्यानकार किंवा उपदेशक यांच्या भाषणांत अपशब्दांचें मिश्रण असलें तर त्यांचें बोलणें व्यर्थ जाऊन उलटे वाईट परिणाम होतात. सारांश, अपशब्दांपासून लाभ पाहू गेलें असतां किंचितही होत नाहीं; पण तोटे मात्र शतशः होतात. ह्मणून आपल्या स्वतांमधून, आपल्या कुटुंबामधून, आपली मंडळी व ज्ञाती ह्यांमधून व देशांमधून ह्या दुष्ट, घातकी व नाशकारक अशा अपशब्दरूपी पिशाचाचा समूळ नाश करून टाकण्याचें आपलें कर्तव्य आहे, असें समजून प्रत्येक मनुष्यानें सनिश्चय झटावें. अशी त्यास माझी फार आग्रहपूर्वक विनंती आहे. पुढें अपशब्द नाहींसे करण्याविषयीं जे उपाय सांगण्यांत येतील त्यांजकडे लक्ष देऊन, तदनुसार वर्तन ठेविलें असतां अपशब्दांची कितीही जुनाट सवय असली तरी ती नाहींशी होईल अशी आशा आहे.

पुढें चालू.

**सद्गुणीसगुणा**— ( स्त्रियांस अत्यंत उपयोगी ) ही एक फारच चटकदार व मनोरंजक गोष्ट आहे. कागद व छपाई सुरेख असून डेमी द्वादशपत्री सांच्याचीं पृष्ठें ६०. किं. ४ आ.

**बापूगोखले यांचें चरित्र**— ह्या इतिहासप्रसिद्ध शूर पुरुषाचें चरित्र फारच मनोवेधक व रसाळ आहे. कागद व छपाई सुरेख असून डेमी द्वादशपत्री सांच्याचीं पृष्ठें २०० आहेत. किंमत १२ आणे.

**सुंदरी आणि वसंतसेन**—( भाग १।२।३ ) हें पुस्तक मूळ हिंदीभाषेंत रचिलेल्या एका अत्युत्तम प्राचीन ग्रंथाच्या आधारें तयार केलें आहे. यांत स्त्रिया आपलें पातिव्रत्य दृढ निश्चयानें कोणत्या प्रकारें रक्षण करितात, याचें उत्तम प्रकारें वर्णन केलें आहे. भाग पहिला किंमत ४ आणे. भाग २ रा, किंमत ६ आणे; भाग ३ रा, किंमत १० आणे.

**सुंदराबाई**— ही एक चटकदार व स्त्रियांस उपदेश होण्यासारखी लहानच गोष्ट आहे. किंमत १ आणा.

**चातुर्यरत्नावलि**— ( भाग १।२।३।४ ) या पुस्तकाचे लहान लहान पण सुंदर असे चार भाग असून त्यांत मौजेच्या व बोधपर अशा ८० गोष्टी आहेत. प्रत्येक भागाची किंमत अर्धा आणा.

| | | |
|---|---|---|
| अपशब्दनिषेध—(नीतिमार्ग दाखविणारें पुस्तक) | | किं. ८२. |
| पूर्ण शृंगारोत्सव..... | .... | ....किं. ८६. |
| विनोदमहदाख्यायिका. | .... | ....किं. ८४. |
| ज्योतिषरत्न ( मोठें ). | .... | ....किं. १८८. |

पत्ता—प्रकाशक ' खानदेशमित्र '

पोष्ट—खानापूर ( बेळगांव. )

## आश्रयदात्यांस सविनय सूचना.

मित्राचा ९ वा अंक जुलै महिन्याचा निघाला. पुढें आगष्ट मध्यें १० वा अंक निघावयाचा परंतु वर्षारंभ जानेवारी पासून असावा ह्मणून आगष्ट व सप्तंबर हे दोन महिने मुद्दाम गाळून अक्टोबरचा हा १० वा अंक काढला आहे. आतां नवंबरचा ११ वा आणि डिसेंबरचा १२ वा अंक काढून ज्यानेवारी १८९४ पासून दुसऱ्या वर्षास आरंभ करणार आहों. ११ वा अंक नवंबर महिन्याचे १५ वे तारखेस व १२ वा डिसेंबरच्या १० वे तारखेस पोष्टांत पडेल. पुढें जानेवारी पासून ५ तारखेच्या सुमारास अंक रवाना होईल.

प्रकाशक.

---


## बापट यांचीं जगप्रसिद्ध औषधें.

क्षयरोग, रक्तपित्त, भगेंद्र, गर्मी, परमा, चट्टे, व्रण, धातुविकार, प्रदर विकार, इंद्रिय शिथिलता, पंडुरोग, हवा, दमा, आंकडी, आम्लपित्त, पोटशूळ, सर्व प्रकारचे ताप, पटकी, गुल्म, हगवण, लघवींतून धातु जाणें, मस्तक भ्रमण, पक्षघात, इ० रोगांवरील जगांत नावाजलेलीं खात्रीचीं औषधें व वनौषधी प्रकाश भाग १।२, गुरांचा वैद्य, बाल वैद्य, सुपग चिकित्सा, अश्विनीकुमार, गर्मीचे पुस्तक इ० पुस्तकें सहींतील पत्त्यावर व्हा० पेबलनें मागविल्यास मिळतील. पत्रव्यवहार मराठी लिपींत. पत्रें पेड. उत्तरास तिकीट असावें.

वासुदेव चिंतामण बापट वकील,
मौजे नारिंग्रे ता० देवगड जि० रत्नागिरी.


---

# खानदेशमित्र.

॥ श्लोक ॥ ( वसंततिलका )

कस्यापि कोऽप्यतिशयोऽस्ति स तेन लोके ।
ख्यातिं प्रयाति नहि सर्व विदस्तु सर्वे ॥
किं केतकी फलति किं पनसः सपुष्पः ।
किं नागवल्ल्यपिच पुष्पफलैरुपेता ॥ १ ॥

पुस्तक १ लें. नवंबर १८९३. अंक ११.

अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ट. |
| --- | --- |
| १ नामदेव चरित्र. .... .... .... | २४१ |
| २ सार्थ सुभाषितें. .... .... .... | २९१ |
| ३ अपशब्दनिषेध. ( भाग २ रा. ) .... | २९३ |


बेळगांव येथें 'बेळगांवसमाचार' छा० छापिलें.

वर्गणीचे दर.

| | |
| --- | --- |
| वर्षाचे अगाऊ ट. ह. सह.... .... | १८३ |
| फुटकळ अंकास किंमत.... .... .... | ८२ |

प्रकाशक- ह० स० खानोलकर आणि मंडळी.

-पोष्ट-खानापूर.

( जि. बेळगांव. )

# विक्रीस तयार.

**करुणराघव**— हें प्रसिद्ध कवि **भवभूति** याचें सर्वोत्तम नाटक **उत्तररामचरित** याच्या आधारानें लिहिलेलें असून यांत करुणरस इतका ओतप्रोत भरला आहे कीं, तो पाषाणाला देखील द्रव आणील. कागद, छपाई व बांधणावळ सुरेख असून याचीं डेमी १२ पेजी सांच्याचीं २६० पृष्ठें आहेत. याची किंमत १ रुपया आहे.

**चारुदत्त आणि वसंतसेना**— हें प्रसिद्ध महाकवि **श्रीशूद्रक** राजा याच्या **मृच्छकटिक** प्रकरणाच्या आधारें तयार केलें आहे. यांत पौराणकाळाच्या नंतरची या देशाची स्थिति व्यक्त केली आहे. कागद व छपाई वगैरे सुरेख असून याचीं डेमी द्वादशपत्री पृष्ठें सुमारें ३०० आहेत. किंमत १ रुपया.

**प्रणयिमाधव**— हें प्रसिद्ध महाकवि **श्रीभवभूति** याच्या **मालतीमाधव** नामक प्रकरणाच्या आधारानें तयार केलें आहे. यांत कुलीन कन्यकेचें वर्तन उत्तम प्रकारें दाखविलें आहे. यांत अनेक प्रकारच्या मसलती आहेत. कागद व छपाई उत्तम असून डेमी द्वादशपत्री सांच्याचीं पृष्ठें सुमारें ३०० झालीं आहेत. किंमत १ रुपया.

**शिवदिग्विजय**— यांत छत्रपति **शिवाजी** महाराज यांच्या तरुणपणच्या ह्मणजे त्यांनीं **तोरणाकिल्ला** घेतल्यापासून तों त्यांना राज्याभिषेक होईपर्यंतच्या कृतीचें फारच सुरस रीतीनें वर्णन केलें आहे. कागद व छपाई सुरेख असून डेमी द्वादशपत्री सांच्याचीं ३०० पृष्ठें आहेत. किं. १ रु.

**पत्ता**— प्रकाशक ‘ खानदेशमित्र ’

पोष्ट— **खानापूर** ( बेळगांव. )

# स्वस्ताईची कमाल!!!

## रासेलसचें मराठी भाषांतर.

या जगमान्य ग्रंथाचें कै. कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनीं मराठींत सुरस भाषांतर केलें आहे. तें लोकोपयोगार्थ आह्मीं छापवीत आहों. मनरंजन होऊन विचारशक्ति वादविण्यास यासारखा दुसरा ग्रंथच नाहीं ह्मटलें असतां चालेल. हा ग्रंथ सर्व जाति-धर्माच्या वाचकांस सारखाच प्रिय होऊन ज्ञान प्राप्ती करून देणारा आहे. मराठी ज्यास लिहितां वाचतां येतें त्यानें या पुस्तकाची एक प्रत अवश्य आपल्या संग्रहीं ठेवावी. असलें उपयुक्त पुस्तक इतकें स्वस्त मिळण्याची अशी संधी पुनः येणार नाहीं. कागद चांगला; छपाई सुंदर. रायल सोळा पेजी साच्याचीं सुमारें ४०० पृष्ठें होतील.

पुस्तक येत्या मार्च महिन्याच्या अखेरीस तयार होईल. तत्पूर्वी अगाऊ वर्गणी पाठविणारांस टपाल खर्चासह अवघे १० आणे. मुदतीनंतर भर किंमत १॥ रुपया पडून शिवाय टपाल खर्च निराळा पडेल. वर्गणी पाठविण्याचा पत्ताः—

पत्ताः—प्रकाशक 'खानदेशमित्र'

पोष्ट—खानापूर ( जि. बेळगांव. )

| पुस्तकाचें नांव. | किंमत आणे. |
|---|---|
| २२ आरती संग्रह. .... .... .... | २ |
| २३ पदसंग्रह. .... .... .... | -॥- |
| २४ वैष्णवमहिमा. <br> ,, रामजन्म प्रसंग वर्णन. <br> ,, कैकेयीस भरताचें उत्तर. <br> ,, मृत्यूची व्यापकता. .... .... | -॥- |
| २५ रामनीती. .... .... .... | -।- |
| २६ दामाजी पंताचें चरित्र. .... .... | १ |
| २७ सुदामचरित्र. .... .... .... | १ |
| २८ सखूचें चरित्र. .... .... .... | -॥- |
| २९ बोधराजांचे अभंग. .... .... | -॥- |
| ३० नौकाक्रीडन. .... .... .... | -॥- |
| ३१ स्थालीपाकाचे अभंग. .... .... | -॥- |
| ३२ तुळशी आख्यान. .... .... | -।॥- |
| ३३ सावित्री आख्यान. .... .... | -॥- |
| ३४ तुकारामकृत नित्यपाठ. .... .... | -।- |
| ३५ तुकारामकृत स्वर्गारोहण. .... .... | -॥- |
| ३६ सोळा सोमवार. .... .... | १ |
| ३७ अंगद शिष्टाई. .... .... | -।॥- |
| ३८ आर्या संग्रह. .... .... | -।- |
| ३९ वृद्ध-चाणाक्य. ( वेंचे ) .... .... | -॥- |

हीं १॥ रुपयाचीं ३९ पुस्तकें एकत्र बांधलेलीं घेऊं इच्छिणाऱ्यांस अवघ्या ८१२ आण्यांस देऊं. प्यांकिंग व टपाल खर्च ८१॥ आणा निराळा. व्ही. पी. नें मागविल्यास ८।५ पडतील. खालच्या पत्त्यावर मागवा.

हरी सखाराम खानोलकर आणि मंडळी.
पोष्ट-खानापूर. ( जि. बेळगांव. )

मासिक पुस्तक.

# खानदेशमित्र.

## नामदेव.

श्रीक्षेत्र पंढरपूर येथें दामशेटी नांवाचा शिंपी रहात असे. एके दिवशीं तो सहज चंद्रभागेवर गेला असतां तींतून वहात आलेलें एक मूल त्याचे दृष्टी पडलें तोच हा नामदेव.

याचें जन्म कबिराप्रमाणेंच शिंपल्यांतून झाल्याचें लोक सांगतता. याचें जन्म शालीवाहन शके १२०० मध्यें झालें. याचा बाप दामशेटी, व आई गोणाई हीं उभयतां विठोबाचीं परम भक्त असत. त्याच वळणाप्रमाणें हाही मोठा भक्त निपजला.

दामशेटीचा नित्यनेम असा होता कीं, देवळांत जाऊन देवाची पूजा करावी. आणि देवास नैवेद्य समर्पण करून, तो घरीं आणून भोजन करावें. एकदां दामशेटी कांहीं कामासाठीं परगांवास जाण्यास निघाला त्या वेळीं त्यानें नामदेवास सांगितलें कीं ‘ नाम्या, रोज देवळांत जाऊन देवाची पूजा करून नैवेद्य समर्पण झाल्यावर मग घरीं येऊन भोजन करीत जा बरें ’ इतकें सांगून तो गेला. त्याच दिवशीं नामदेव नैवेद्य घेऊन देवाच्या पूजे करितां गेला. आणि पूजा झाल्यावर त्यानें नैवेद्य देवापुढें ठेविला; परंतु तो नैवेद्य देव खात नाहीं, असें पाहून यानें हात जोडून देवास विनंती केली कीं, ‘ माझ्या बापानें अर्पण केलेला नैवेद्य आपण नित्य खातां असें असून आज मी आणलेल्या नैवेद्याचा अंगीकार

होत नाहीं, याचें कारण काय? तर असें न कारितां नैवेद्य स्वीकारावा. मीं लेंकरानें आणिला ह्मणून अनादर करूं नयें.' अशी प्रार्थना केली तरी देव नैवेद्य ग्रहण करीत नाहीं व कांहीं बोलतही नाहीं असें पाहून, नामदेवास फारच वाईट वाटलें. मग तो देवास ह्मणाला, 'पांडूरंगा, जर तूं नैवेद्य खाणार नाहींस तर मी येथेंच प्राणत्याग करीन.' असें ह्मणून देवापुढें मस्तक आपटणार तों विठ्ठलमूर्ति जेऊं लागली! हें पाहून नामदेवास आनंद झाला. नंतर हा रिकामें ताट घेऊन घरीं आला.

हा घरीं येतांच आईनें पुसलें. 'अरे नाम्या, ताट रिकामें कां? नैवेद्य काय झाला? नामदेव ह्मणाला 'नैवेद्य देवानें खाल्ला' हें ऐकून ती रागानें ह्मणाली, 'मेल्या देव कसचा नैवेद्य खातो? तूंच खाऊन देवाचें नांव लटकें सांगतोस; आज इतकीं वर्षें झालीं घरधनी नैवेद्य नेतात. पण देवानें तो एक दिवस देखील खाल्ला नाहीं' यावर तो ह्मणाला 'आई तूं उगीच रागावूं नको तुला खोटें वाटत असेल तर जाऊन देवास विचार' हें नाम्याचें भाषण ऐकून, तो अज्ञान आहे, त्याच्या बोलण्यांत कांहीं अर्थ नाहीं, असें समजून त्यास जेवूं घालून ती आपणही जेवली.

असा क्रम आठ दहा दिवस चालला. रोज नैवेद्याचें ताट रिकामें येत असे. दहावे दिवशीं दामशेटी घरीं आला. येतांच त्यानें बायकोस पुसलें 'नाम्या देवाच्या पूजेस नित्य जात होताना!' ती ह्मणाली 'जात होता; पण मेला नैवेद्य काय करीत होता कोण जाणें, मी विचारलें असतां देवानें खाल्ला असें सांगतो. त्याचें बोलणें मला खरें वाटत नाहीं.'

बायकोनें सांगितलेली गोष्ट ऐकून दामाशेटीस प्रथम आश्चर्य वाटलें; परंतु नाम्या लबाड बोलावयाचा नाहीं, ही त्याची पक्की खात्री होती. ह्मणून दुसऱ्या दिवशीं त्यानें नैवेद्य घेऊन जाण्यास नामदेवासच सांगितलें व आपण याच्या मागून गेला. कारण देव नैवेद्य कसा खातो, हें त्याच्या मनांत पहावयाचें होतें. पूजा झाल्यावर नामदेव देवास 'नैवेद्य ग्रहण करा' असें ह्मणूं लागला परंतु त्या दिवशीं देव नैवेद्य ग्रहण करीना. तेव्हां नामदेव ह्मणाला, 'कां नैवेद्य खाणार कीं नाहीं? का पहिल्या दिवसा सारखें करूं.' हें ऐकून देवानें नैवेद्य भक्षण केला व तो स्वतः दामाशेटीनें पाहिला. त्यावरून, नामदेव हा कोणी सामान्य पुरूष नव्हें, असें त्या दिवसा पासून दामाशेटी समजूं लागला. त्यास व त्याच्या बायकोस कांहीं दिवसांनीं देवाची प्रचीती आली.

एकदां नामदेव चंद्रभागेवर स्नानास गेला असतां त्याच्या मनांत कविता करावी असें येऊन त्यानें एकदम शतकोटी काव्याच्या संकल्पाचें उदक सोडिलें. तेव्हां देव यास ह्मणाला 'तूं हा अघटित संकल्प कोणत्या रीतीनें सिद्धीस नेणार? नामदेव ह्मणाला 'संकल्प करून तर चुकलों आहें, आतां तो तडीस नेणें तुजकडे आहे.'

कांहीं दिवसांनीं नामदेवाचें लग्न झालें. व त्यास एका पाठी मागें एक, नारायण, महादेव, गोविंदा आणि विठोबा असे चार पुत्र झाले. पुढें त्यांचींही लग्नें झालीं. त्याच लाडाई, गोडाई, येसाई आणि साकराई अशा याच्या चौघी सुना, नाऊबाई बहीण व निंबाई त्याची मुलगी या प्रमाणें

याचे कुटुंबांत एकंदर चवदा मनुष्यें होतीं. शिवाय पंधरावी त्याची कुणबीण जनी. या प्रकारची स्थिती पाहून देव नामदेवास ह्मणाले, ' तुह्मीं सर्वांनीं मिळून शतकोटी काव्यास आरंभ करावा. सर्वांस स्फूर्ति देणें व अभंग लिहिणें तें मज-कडे लागलें. ' या प्रमाणें अज्ञा होतांच सर्वांनीं रचनेस आरंभ केला.

नामदेवाच्या घरच्या मनुष्यानीं जी कविता केली तिचें नांव अभंग असें पडलें. याच्या पूर्वी अभंग हें पद्य मुळींच कोणास ठाऊक नव्हतें. ह्मणून अभंग पद्याचा मूळ जनक नामदेवच ह्मटला पाहिजे. नामदेवानें काढिलेल्या अभंगाच्या प्रकारांचें प्रतीक घेऊन त्याच्या कुटुंबांतील चौदा माणसांनीं व त्यानें मिळून एकंदर पंचाण्णव कोटि अभंग लिहिले. व बाकीचे पुढें तुकारामानें पुरे केले. अशी लोकांत प्रख्याती आहे.

नामदेवाच्या अभंगाचे प्रकार दोन आहेत. ह्मणजे त्याचे कित्येक अभंग ' गुरूपसत्ती ' पूर्वीचे आहेत व कित्येक ' गुरूपसत्ती ' नंतरचे आहेत. त्यांचीं उदाहरणें क्रमानेंच खालीं दिलीं आहेत.

( गुरु-उपदेश मिळण्या पूर्वीचे अभंग )

सर्व सुख आहे, भींवरेचे तीरीं ॥
आमुची पंढरी, कामधेनु ॥ १ ॥
प्रेमामृत दुभे, सदां संत जना ॥
ओसंडत पान्हा, नित्य नवा ॥ २ ॥
धर्म अर्थ काम, मोक्ष चारी स्तन ॥
दोहोणार धन्य, पुंडलीक ॥ ३ ॥

भक्तीचें मेळवण, भावाचेनी बळें ॥
देखोनीया बाळे, अधिकाधिक ॥ ४ ॥
जियेचें दुभतें, नित्य नवें वाढे ॥
पंढरी पहुडे, पूर्व पुण्यें ॥ ५ ॥
भाग्यवंत नामा, तें क्षीर लाधला ॥
प्रेमें ओसंडला, गर्जे नामें ॥ ६ ॥

येथें गुरूपसत्ती नंतरचे अभंग सांगण्या पूर्वी आधीं यास गुरूस शरण जाण्यास निमित्त काय झालें, तें सांगणें अवश्यक आहे. यास्तव अगोदर तें सांगतों.

एकदां असें झालें कीं, कार्तिकी करितां सर्व संत मंडळी पंढरीस एकत्र जमली. तींत निवृत्ती नाथानीं असें पाहिलें कीं, आपल्या मंडळींत गुरूस शरण गेला नाहीं असा एक नामदेव मात्र आहे. तर ही गोष्ट आज यास कळवावी, अशा हेतूनें त्यानें गोऱ्या कुंभाराकडे पाहून ह्मटलें 'काका, आपल्यास कच्चा व पक्क्या मडक्याची परीक्षा असेलच; कारण आपला तो धंदाच पडला.' गोरोबानें त्यांचा तेव्हांच हेतु ओळखून ह्मटलें, 'होय, होय; तें माझें नित्याचेंच काम आहे.' त्यावर निवृत्तीनाथ ह्मणाले, 'बरें तर मग परीक्षेस आरंभ करा.'

हें बोलणें सर्वांस समजलें परंतु नामदेवास मात्र यांतील रहस्य कांहींच कळलें नाहीं; ह्मणून तो वेड्या सारखा पहात आहे तों, मडकीं घडायाचें थापटणें हातांत घेऊन गोऱ्या कुंभारानें एक दोन असामींच्या डोईवर मारलेंसें करून चट्कन् येऊन नामदेवाच्या डोक्यावर मारलें. त्या बरोबर नामदेव ओरडून 'काका हें काय शहाणपण?'

असें ह्मणाला. त्या बरोबर 'हें येवढें मडकें मात्र कच्चें हा कच्चें.' असें गोराकुंभार बोलतांच सर्व मंडळी खदखदां हसूं लागली. तेणें करून नामदेवास तो अपमान सहन न होऊन, तो लागलाच त्या मंडळींतून उठून गेला. हा तेथून निघाला तो नीट देवळांत आला. आणि मोठ्यानें गळा काढून देवा समोर रडत बसला. तेव्हां देव यास बोलला 'नाम्या अरे रडतोस कां? झालें तरी काय? मग नामा ह्मणाला, 'देवा! आजपर्यंत आपली सेवा केली, तिचें हें फळ मला मिळालें.' सर्व संत मंडळीनें मला 'कच्चा' ठरविला, त्या अर्थी आतां मी येतों. लोभ आहे तसाच मात्र असूं द्यावा. इतकें बोलून पुनः मोठ्यानें रडूं लागला. देवानें पुनः पुसलें, 'अरे तूं येतों ह्मणून निरोप मागतोस तर तूं जाणार तरी कोठें?' नामदेव ह्मणाला 'मी जीव देणार!' देव बोलला 'शाबास नाम्या, वाः!! अरे तूं इतका वेडा आहेस हें मला ठाऊक नव्हतें. अरे पहा, भाषण तर शहाण्या सारखें करतोस. आणि 'कच्चा' ह्मटलें त्याचा खेद मानून प्राण द्यावयास तयार होतोस. तेव्हां तुला काय ह्मणावें? मी तुला खरेंच सांगतों कीं, संत ह्मणाले तें खोटें नव्हे. तूं कच्चाच आहेस. यांत अगदीं संशय नाहीं. तुला वाटत असेल कीं, मी तुजबरोबर गोष्टी सांगतों, तसाच जेवतों. पण हें खरें नव्हे; कारण माझें खरें स्वरूप तें याहून अगदीं निराळें आहे. व तें श्रीगुरूस शरण गेल्या शिवाय कळावयाचेंही नाहीं.' या प्रमाणें देवाचें निर्भीड भाषण ऐकून नामदेव वचकला, आणि शुद्धीवर येऊन ह्मणाला 'महाराज, आपण ह्मणतां त्या अर्थी मी कच्चा असेन; परंतु आतां गुरू कोणता पाहूं? आपण त्रैलोक्याचे गुरु आहां तर आपणच मजवर कृपा

करून गुरुमंत्र द्यावा.' देवानें सांगितलें 'तसें होणें अशक्य आहे. यास्तव तूं बारशीस जा, आणि तेथें विसोबा खेचर आहे त्यास शरण जा. ह्मणजे तुझें कार्य सिद्ध होईल.

या प्रमाणें देवाची आज्ञा घेऊन, नामदेव त्याच पावलीं निघाला तो बारशीस आला. गांवांत गेल्यावर त्यानें कोणा एकास विसोबा खेचर कोठें रहातात ह्मणून विचारिलें. त्यानें 'त्या महादेवाच्या देवळांत जा' ह्मणून सांगतांच हा तेथें गेला. व पाहूं लागला तों विसोबा अगदीं ह्मातारा असून लोळत पडला आहे. शिवाय त्याचे पाय महादेवाच्या पिंडीवर पडले आहेत! हें पाहून नामदेवाच्या मनांत आलें कीं, माझ्या सारख्यास हा असला गुरू! अस्तु; दैव आपलें. देवानेंच पाठविलें, त्याअर्थीं आंत गेलें पाहिजे. नंतर आंत जाऊन ह्मणाला, 'अहो महाराज, उठून नीट बसा. पिंडीवर आपले पाय. पडले आहेत' ते आटपून घ्या. विसोबा ह्मणाला, 'बाबारे, मी ह्मातारा असल्या मुळें मला शक्ति नाहीं; यास्तव तूंच ते उचलून एकीकडे ठेव. नामदेवानें तसें करतांच त्याच्या पायांखालीं दुसरें शिवलिंग आहे! मग पुनः नामदेवानें पाय उचलून पलीकडे ठेविले. तरी पुनः पायांखालीं तिसरें शिवलिंग आहेच!! हें पाहून नामदेव विस्मित झाला; व देवानें ज्याकडे मला पाठविलें तोच हा योग्य पुरूष होय. असें पूर्णपणें समजून विसोबाच्या चरणावर त्यानें मस्तक ठेविलें.

विसोबा खेंचर डोळे उघडून, यास नमस्कार करीत आहे असें पाहून, ह्मणाला 'अरे, तूं कोण आहेस? व मला नमस्कार करितोस याचें कारण काय?' नामदेव हात जोडून ह्मणाला 'महाराज, मला नामा ह्मणतात व मी

पंढरपूरचा रहाणारा असून देवानें मला आपणाकडे पाठविलें आहे. विसोबा ह्मणाला 'बरें तर सेवा करीत येथें रहा. ह्मणजे ज्या हेतूनें तुला देवानें मजकडे पाठविलें आहे तो तुझा हेतू सिद्धीस जाईल. त्या वरून नामदेव हर्ष पावून कित्येक महिनें त्याचेपाशीं सेवा करीत राहिला असतां श्रवण, मनन व निदिध्यास यांच्या योगानें पूर्ण ब्रह्मविद्या पावला.

याच प्रमाणें आणखी कांहीं महिने यानें तेथें राहून सेवा केल्यावर, विसोबा खेचरानें यास पूर्ण आशीर्वाद देऊन पंढरीस जाण्याची आज्ञा दिली. तेव्हां हा तेथून निघाला. निघतांना यानें बहुत प्रकारें गुरूचें स्तवन केलें आणि नंतर पंढरीचा मार्ग धरिला. पहिल्या मुक्कामास येऊन एका धर्मशाळेंत उतरल्यावर, याच्या ओळखीच्या एका मनुष्याची तेथें गांठ पडली. त्यानें यास ओळखून विचारिलें, 'कां नामशेट, इकडे कोणीकडे गेलां होतां?' त्यानें उत्तर केलें बारसीस गुरुदर्शनार्थ गेलों होतों. तेव्हां तो ह्मणाला 'अहो, देव तुमच्याशीं बोलतो, तुमच्या आग्रहास्तव जेवतो व तुमच्यावर त्याची पूर्ण कृपा. त्याच प्रमाणें तुमचाही त्याच्या चरणीं दृढभाव, असें असतां गुरुदर्शनास गेलों होतों ह्मणतां, तेव्हां त्या त्रैलोक्य गुरूहून थोर असा तुह्मास आणखीही कोणी गुरु आहे काय? मला वाटतें तुमची पहिली निष्ठा आतां अगदी बदलली व आलीकडे तुह्मांस कांहींतरी भ्रम झाला आहे. त्यावर नामदेव ह्मणाला आहो ऐकाः—

———

**अभंग.** ( गुरूपसत्ती नंतरचा )

पाषाणाचा देव बोलेचिना कधीं ॥
' हरी भव व्याधी ' केवी घडे ॥ १ ॥
दगडाची मूर्ति मानिला ईश्वर ॥
परी तो साचार देव भिन्न ॥ २ ॥
दगडाचा देव इच्छा पुरवीत ॥
तरि कां भंगत आघातानें ॥ ३ ॥
पाषाण-देवाची करिती जे भक्ती ॥
सर्वस्वा मूकती मूढपणें ॥ ४ ॥
प्रस्तराचा देव बोलत भक्तातें ॥
सांगते ऐकते मूर्ख दोघे ॥ ५ ॥
ऐशाचें महात्म्य जे का वर्णिताती ॥
आणि ह्मणवीती तेणें भक्त ॥ ६ ॥
परंतु ते जन पामर जाणावे ॥
त्यांचे नायकावे बोल कांहीं ॥ ७ ॥
धोंडा घडोनीयां देव त्याचा केला ॥
आदरें पूजिला वर्षें बहू ॥ ८ ॥
तरी तो उतराई होय केव्हां काई ॥
बरवें हृदयीं विचारा हें ॥ ९ ॥
धोंडा पाण्यावीन नाहीं देव कोठें ॥
होतां स्नान मोठें तीर्थ क्षेत्र ॥ १० ॥
द्वादशीचे गांवीं जाहला उपदेश ॥
देवावीन ओस स्थळ नाहीं ॥ ११ ॥
तो देव नामया हृदयीं दाविला ॥
खेचरानें केला उपकारू हा ॥ १२ ॥

या प्रमाणे नामदेवाचे भाषण ऐकून त्या ओळखीच्या मनुष्यास विलक्षण चमत्कार वाटला. आणि तो पुनः यास ह्मणाला. 'अहो, पण देवानें तुमच्या हातचा नैवेद्य खाल्ला वगैरे ज्या गोष्टी आह्मीं ऐकिल्या व तुमचाही त्या योगानें लौकिक वाढला त्या सर्व खोट्याच कीं काय? नामदेव ह्मणाला, 'बाबारे, त्या सर्व खोट्या नाहींत व खऱ्याही नाहींत. तो कांहीं एक भावनेचा विलक्षण प्रकार आहे.' ऐकणारा ह्मणाला हें तुमचें बोलणें मला समजलें नाहीं; यास्तव खऱ्या कशा नाहींत व खोट्याही कशा नाहींत, याचें माझ्या मनांत बिंबेल असें स्पष्टीकरण करून सांगा. नामदेव बोलला 'ऐका. कानांत कधीं कधीं घांट वाजते हें कधीं तुमच्या अनुभवास आलें आहे काय?' ऐकणारा ह्मणाला 'होय.' 'बरें तर तो घंटा नाद खरा कीं खोटा? खरा ह्मणाल तर प्रत्यक्ष घाट वाजतां दिसत नाहीं. खोटा ह्मणाल तर नाद ऐकूं येतो, ह्मणून त्याच्या अनुभवाची प्रतीति संशय रहित आहे. जसें हें तसेंच देवाचें मज बरोबर बोलणें. इतकें ऐकून तो मनुष्य निरुत्तर होऊन दुसरे दिवशीं आपल्या मार्गास लागला. इकडे नामदेव निघाला तो पंढरीस येऊन पोहोंचला.

नंतर नामदेवानें देवा पुढें कीर्तन केलें त्यांत आरंभीं अभंग ह्मटला तो येणें प्रमाणें:—

नाचूं कीर्तनाचे रंगीं । ज्ञानदीप लावूं जगीं ॥ १ ॥
सर्व सांडुनी माझाई । वाचे विठ्ठल रखुमाई ॥ २ ॥
परेहून परतें घर । तेथें राहूं निरंतर ॥ ३ ॥
सर्वांचें जें अधिष्ठान । तेंचि माझें रूप पूर्ण ॥ ४ ॥

अवघी सत्ता आली हाता। नामयाचा खेचरीदाता।५।

पुढें नामदेवानें कीर्तन केलें त्यांत इतका रंग भरला कीं, असा पूर्वी त्याच्या कीर्तनांत कधींच भरला नव्हता. सारांश, याचें हें कीर्तन ऐकून, संतमंडळीस पराकाष्ठेचा आनंद झाला. व सर्वांनीं याची वाहवा केली. भक्त विजयाच्या चवथ्या अध्यायांत याच्या चमत्काराच्या वगैरे अनेक गोष्टी आहेत. ज्यांस त्या पाहण्याची इच्छा असेल त्यांनी तो अध्याय पाहावा.

नामदेवाचे अभंग अगदीं साधे व प्रेमळ आहेत. याचीं समाधी पंढरपर येथें देवाच्या महाद्वाराजवळ शके १२६८ मधें झाली. व त्या स्थळीं जी हल्लीं चढतानां पहिली पायरी लागते ती 'नामदेवाची पायरी' या नांवानें प्रसिद्ध आहे. वारकरी लोक देवाची पायरी 'नाम' होय, असा अर्थ करून तो भक्तिपुरस्सर सांगत असतात.

---

## सार्थ सुभाषितें.

दीपो भक्षयते ध्वांतं कज्जलंच प्रसूयते ॥
यदन्नं भक्षयेन्नित्यं जायते तादृशी प्रजा ॥ १ ॥

अर्थ– 'दीप हा अंधकाराचें भक्षण करतो आणि काजळास प्रसवतो. ठीकच आहे, जसें नित्य अन्न खावें त्या सारखी प्रजा होते!'

उद्योगादनिवृत्तस्य ससहायस्य धीमतः ॥
छायेवानुगता तस्य नित्यं श्रीः सहचारिणी॥२॥

अर्थ– 'निरंतर नेटानें उद्योग करणारा, बुद्धिमान् आणि

ज्यास मित्रांची अत्यंत अनुकूलता आहे, अशा पुरुषाच्या मागोमाग संपत्ति ही छाये प्रमाणें सदोदित चालत असते!'

का विद्या कवितांविनाऽर्थिनि जने त्यागंविना श्रीश्च का।
कः सूनुर्विनयं विना कुलवधूः का स्वामिभक्तिं विना ॥
को धर्मः स दयां विना नरपतिः को नामनीतिं विना।
भोगाः के रमणींविना क्षितितले किं जन्म कीर्तिंविना ३

अर्थ– 'कविते शिवाय विद्येची काय शोभा? याचकांस दान न केल्यास ती संपत्ती काय उपयोगाची? विनय हीन पुत्र काय कामाचा? नवऱ्यावर जिची भक्ति नाहीं अशा कुलवधूस काय करावें? दया नाहीं तर धार्मिकता कसली? नीति ज्यास अवगत नाहीं त्यास राजा काय ह्मणावें? रमणीय स्त्रीच्या व्यतिरिक्त भोगांत काय मजा? कीर्तियुक्त नाहीं तर तें जिणें कसचें?'

भवारण्यं भीमं तनुगृहमिदं छिद्रबहुलं।
बली कालश्चोरो नियत मसिता मोह रजनी ॥
गृहीत्वा ज्ञानासिं विरति फलकं शील कवचं।
समाधानं कृत्वा स्थिरतर दृशो जागृत जनाः ॥

अर्थ– 'हे जनहो! हें संसाररूप अरण्य भयंकर आहे, शरीररूप गृह सुरक्षित असेल ह्मणावें तर हें मुळींच बहुछिद्र आहे, मृत्युरूप चोर हा बलाढ्य आहे, मूढत्वरूप रात्रिही केवळ अंधकार व्याप्त आहे; तर ज्ञान हाच खड्ग, शांति हीच ढाल, शील हेंच कवच अशीं तीन हत्यारें घेऊन मोठ्या खबरदारीनें जागत बसा!'

# भाग २ रा.

## स्वतःमधून व कुटुंब, जाति, मंडळया, गांव, देश यांमधून अपशब्द घालविण्याचे उपाय.

१ ला–आपल्या मुखांतून अपशब्द घालवून टाकण्याविषयीं दृढ निश्चय करावा.

२ रा– मुखांतून असे शब्द न उच्चारण्याविषयीं आपण निश्चय केला आहे आणि ते बोलण्याची खोड मोडून टाकण्याविषयीं आपण प्रयत्न चालवीत आहों हें नित्य लक्षांत बाळगावें आणि जर ह्याची आपणास विस्मृति पडत असेल तर आपल्या बसण्या उठण्याच्या ठिकाणीं "सावध ऐस, अपशब्द बोलूं नको." अशा मोठ्या अक्षरांनीं लिहिलेला कागद मारावा.

३ रा– सदर्हू सांगितल्याप्रमाणें स्मरण ठेवून जपून, धिमेपणानें व स्पष्ट बोलावें, निष्काळजीनें व घाईनें बोललें असतां अपशब्दांची खोड जाणार नाहीं.

४ था– आपली शब्दांची खोड साफ नाहींशी होई तों पर्यंत अपशब्द बोलणारांच्या संगतीस राहूं नये. ह्मटलें आहे "संगतिःसंगदोषेण."

५ वा– फार थट्टा व अपशब्द ज्यांत येणार अशी थट्टा मस्करी मुळींच वर्जावी.

६ वा– क्रोध आल्यास त्याच्या तडाक्यांत बोलूं नये. पन्नास अंक धीमे मनांत मोजावे. तितक्यांत राग न गेला तर पुनः पुनः मोजावे.

७ वा–कोणत्याही प्रसंगीं क्रोध प्रदर्शित करणें झाल्यास,

आपल्या आंगीं स्थिरता ठेवून फार शांत रीतीनें व आपल्या प्रदर्शित करण्यानें सुधारणा होऊन चांगला परिणाम होईल अशा रीतीनें करावा. ह्मटलें आहे कीं, "तूं रागें भर पण पाप करूं नको" ह्मणजे योग्य कारणानें जरी क्रोध आला तरी मुखांतून अपशब्द उच्चारूं नको, किंवा कोणत्याही प्रकारची वाईट गोष्ट करूं नको.

८ वा– जगांत बहुतकरून निराशा, अपमान, जाच, दुःख, त्रास इत्यादि प्राप्त होतात ह्मणून असें झालें ह्मणजे चिवचिवूं व जळफळूं नये; अशानें मनुष्य स्वतः आपणासच अपशब्द बोलून घेतो. अशा स्वभावाच्या लोकांच्या हातून आत्महत्त्या घडण्याचा संभव असतो.

९ वा– आपणास कोणी अपशब्द बोलत असतां त्याचा सूड उगविण्याकरितां आपण अपशब्द बोलूं नये. त्यास उपदेश किंवा दुसऱ्या योग्य तजविजी कराव्या. दुसरा कोणी आपणास अपशब्द बोलल्यास त्याजला तसें उलट बोलण्याचा अधिकार आपणास नाहीं. पुन्हा सूड उगविल्यानें दुप्पट वाईट होतें.

१० वा– अपशब्द टाकून देण्याचा मीं निश्चय केला आहे तर माझ्या मुखांतून तसा शब्द आल्यास मजला सुचवावें असें आपल्या विश्वासु मित्रांस सांगावें. ह्या उपायांत ही लक्ष्यांत ठेवण्याजोगी गोष्ट आहे कीं, आपण अपशब्द बोलत असतों, पण आपण ते बोललों कीं नाहीं असें आपलें आपल्यालाच स्मरण नसतें असें बहुत वेळां घडतें ह्मणून आपल्या मित्रानें सदरहू सांगितल्याप्रमाणें सुचविल्यास, छीः मीं ह्मणालों नाहीं असें ह्मणून त्याला खोट्यांत पाडूं नये. अशानें वैमनस्य पडण्याचा संभव आहे. आणखी आपल्या

मित्रानेंच नाहीं, पण कोणीही आपल्या मुखांतून निघालेल्या अपशब्दांविषयीं सुचविल्यास त्याचे आभार मानून ती सूचना आपण घ्यावी. विषाद मानूं नये.

११ वा- ठेंच लागली, कांहीं चावलें, लेखणी करतांना किंवा कांहीं कापतांना बोट वगैरे कांहीं कापलें किंवा दुसरे कांहीं असे प्रकार घडले तर लागलेच वाईट शब्द येतात. ह्मणून अशा प्रसंगाचें स्मरण ठेवून त्यावेळीं फार सावधगिरी ठेवावी. गडबड्या स्वभावाच्या मनुष्यावर बहुधा असे प्रसंग येतात.

१२ वा-अमक्या कोणत्यावेळीं अपशब्द बोलले असतां हरकत नाहीं अशा प्रकारचे समज सोडावे; जसें-शिमग्याचे सणांत, थट्टा मस्करींत, फारजण लागून एखादा जड पदार्थ ओढण्याच्या वेळीं, जसें खलाशी लोक शीड ओढतांना, हमाल लोक रस्त्यावरून कांहीं ओढीत नेतांना वगैरे; अशा अनेक प्रसंगीं ते लोक, बीभत्स गाणीं बोलण्याचा हा वेळ किंवा ह्यावेळीं अवश्य बोललींच पाहिजेत, असें समजून तशीं ह्मणत असतात तीं ह्मणूं नयेत, सद्गुणाचीं गाणीं ह्मणावीं.

१३ वा- कलावंतीण, वेश्या, नाचे पोरे, मुरळ्या वगैऱ्यांचे नाच, तमाशे, व बीभत्स नाटकें पाहूं नयेत, आणि त्यांचीं गाणीं ऐकूं नयेत. त्यांत अपशब्द येतात एवढेंच नाहीं तर ते मनावर ठसविणाऱ्या प्रकारानें ह्मणजे हावभावानिशीं येतात. तसेंच वाईट अर्थाच्या लावण्या, तऱ्हेतऱ्हेच्या फांका, घाणेरडे दोहरे वगैरे ज्यामध्यें सवाल जबाब असतात ते फार कुबुद्धि उत्पन्न करणारे असतात, ह्मणून ते बोलूं नयेत व ऐकूं नयेत. ज्यांत सत्यता, पवित्रता व नीति आहे अशीं कथा कीर्तनें, उपदेश व्याख्यानें श्रवण करावीं.

१४ वा–अभद्र भाषेंत असणारीं पुस्तकें वाचूं नयेत.

१५ वा–दारू पिऊं नये, व कोणताही कैफ करूं नये, दारू पिण्याची संवयी ठेऊन अपशब्दांची संवय सोडणें ह्मटलें ह्मणजे साधारणतः तें अशक्य आहे. ह्मटलें आहे "मद्य प्रवेशे अंतरीं, बुद्धि पळती बाहेरी." एकवेळ बुद्धि गेली मग वाईट शब्द मनुष्य बोलेल यांत नवल तें कोणतें?

१६वा–'अपशब्दनिषेध' ह्या विषयावर लिहिलेलीं पुस्तकें वेळोवेळीं विचारपूर्वक वाचावीं.

१७वा–ज्याच्या मुखीं वाईट शब्द नसून जो सद्गुणी आहे अशा मनुष्याचा सहवास करावा.

१८ वा–आपल्या मुखांतून अपशब्द बऱ्याच अंशीं गेले कीं, लागलेच लोकांस ते टाकून देण्याविषयीं आस्थेनें सांगावें; ह्मणजे आपल्या अंतःकरणांत ह्या बाबतींत किंचित्शी, सत्याभिमान व मंगलाभिमान ह्यांची, ज्वाला उत्पन्न होऊन दिवसानुदिवस ती अधिक प्रज्वलित होत्साती आपले अवशिष्ट दोष स्पष्ट रीतीनें नजरेस आणिते, मग त्याविषयीं आपलें मन ओशाळलें जाऊन आपली स्वतःची वर्तणूक शुद्ध व स्थीर ठेवण्याविषयीं साहजिकरीत्या अधिकाधिक इर्ष्या आपणास उत्पन्न होते.

## कुटुंबांमधुन अपशब्द काढून टाकण्याचे उपाय.

१ ला–स्वतःमधून अपशब्द काढून टाकण्याविषयीं जे मागें उपाय सांगितले आहेत त्या उपायांप्रमाणें कुटुंबांतील मनुष्यांस वागावयास सांगावें.

२ रा–अपशब्द बोलणाराचा, कुटुंबांत पायरव नसावा.

३ रा—जननेंद्रियाच्या आकाराचे डागिने लेंकरांस करण्याची व मानलेल्या देवाच्या तसल्या इंद्रियाची पूजा करण्याची चाल कांहीं लोकांत आहे, ती नाहींशी करावी. कारण यामुळें तीं इंद्रियें दृष्टीस पडतात व अनेक प्रसंगीं त्यांचीं नांवें घेणें लहान थोरांस, स्त्रीपुरुषांस भाग पडतें. लेंकरें त्या दागिन्यांचीं नांवें स्वभावतः वडिलांस विचारतात. तीं मग त्यांस सांगावीं लागतात. नंतर मुलें तशींच नांवें घेतात. हा प्रकार फारच वाईट होय. ज्याप्रमाणें कित्येक लोक आपल्या लेंकरांस " मूळाक्षरें " ओळखतां व उच्चारतां यावीं ह्मणून त्याप्रमाणें चित्रें वगैरे काढून शिकवितात तशीं हीं आईबापें खर्चानें त्या आकारांचे दागिने करून आपल्या मुलांस त्या इंद्रियांचीं नांवें घेण्यास शिकवितात, असें होतें.

४ था—त्याप्रमाणेंच प्राण्यांच्या इंद्रियांचीं नांवें कांहीं निर्जीव पदार्थांसही लावितात, जसें-चौरंगाचा पाय वगैरे, तसेंच गुदद्वाराचें साधारण प्रचारांतील नांवही कांहीं निर्जीव पदार्थांस लावण्याचा प्रघात आहे. उदाहरण—चिलमींत काडी घालून तिचें छिद्र साफ कर अशा अर्थाचें ह्मणायाचें झालें ह्मणजे " चिलमीच्या गां—त काडी घालून साफ कर." असें ह्मणण्याचा प्रचार आहे. हा शब्द अनेक पदार्थांस लावलेला आढळतो. जसें—लोट्याची—ड, व तसींच दुसरींही कांहीं असल्या इंद्रियांचीं नांवें निर्जीव पदार्थांच्या संबंधानें योजलेलीं आढळतात. तर हे असे शब्द टाकून द्यावेत.

५ वा— कित्येक जण आपलीं लेंकरें आठ दहा वर्षांचीं होत तों पर्यंत त्यांस बहुतकरून नग्नच ठेवितात. मग ते मुलगे असोत किंवा मुली असोत. हा प्रकार फार वाईट.

अशानें अपशब्दाचे विषय अगदीं नजरेसमोर असतात. अगदीं लहान मुलांसही असें ठेवूं नये.

६ वा–लेंकरास शौचास झालें ह्मणजे त्याचा मळ धुण्याविषयीं किंवा पुसण्याविषयीं ह्मणावयाचें असलें ह्मणजे मळद्वाराचें–ड असें स्पष्ट नांव घेऊन ह्मणायाची चाल अनेक कुटुंबांत आहे ती मोडून टाकावी, व त्याबद्दल "मळ धुऊन टाक" असें किंवा या सारखें कांहीं ह्मणावें.

७ वा– कित्येक आईबापें आपल्या मुलांस अपशब्द बोलण्यास शिकवितात आणि तीं तशीं बोलूं लागलीं ह्मणजे आनंद मानितात. कित्येक जण आपल्या लेंकरांस मुद्दाम तसे शब्द बोलण्यास शिकवीत नाहींत पण मुलांनीं वाईट शब्द उच्चारिले असतां त्याजविषयीं ते निष्काळजी राहतात. तसें उच्चारल्याबद्दल मुलांस ते शिक्षा किंवा उपदेश करीत नाहींत; आणि कित्येक ह्या सदरील दोन्ही प्रकारांचा बंदोबस्त ठेवितात, पण आपण स्वतः मात्र तसे शब्द उच्चारीत असतात. अशांचें फारच चमत्कारिक प्रकारचें आचरण दिसून येतें. तें असें कीं,आपला मुलगा दुसऱ्या कोणाच्या मुलास अपशब्द बोलला असतां त्यास शिक्षा करतात; पण ही शिक्षा चालली असतांच आपण त्यास शिव्या देऊन 'तूं कांरे त्याला शिवी दिली?' असें विचारतात. ह्यावरून त्यांचा समज असा कीं, आह्मीं वडील तेव्हां लेंकरास पाहिजे तसें बोलण्याची आह्मांस मुक्त्यारी आहे. ही त्यांची मोठी चुकी आहे. कारण ह्यावरून ह्या वडिलांचेही वडील असतात त्यांनीं ह्यांस शिव्या द्याव्या असें होतें. पुन्हा मुलेंही आपल्या कांहीं भावंडापेक्षां व जगांतील पुष्कळ मुलांपेक्षां व पशुइत्यादिकां पेक्षां वडील असतात तेव्हां त्या सर्वांस शिव्या देण्याचा त्यांसही,ह्या सदहू मताप्र-

माणें, अक्त्यार आहे असें सिद्ध होतें. पण हें ह्मणणें नीतीच्या अगदींविरुद्ध आहे. ह्मणून वाईट शब्द बोलण्याचा कोणासही अक्त्यार नाहीं. कारितां कुटुंबांतील वडिलांनीं हे तिन्ही प्रकार वर्ज करावे. स्वतःच्या मुखांतून अपशब्द येऊं नयेत ह्मणून फार सावधगिरी वाळगावी. मानव स्वभाव कित्ता घेणारा आहेच, आणि लेंकरांचा आपल्या वडिलावर पूर्ण श्रद्धा असते, तेव्हां त्यांच्याप्रमाणें तीं अनायासें करूं लागतात. सदरहू उपाय योजले असतां कुटुंबांतील अपशब्दांचा विटाळ टळेल अशी आशा आहे.

## मंडळ्या, ज्ञाति वगैरे मधून अपशब्द घालविण्याचे उपाय.

१ ला–वर दोन्ही ठिकाणांमधून अपशब्द घालविण्यास जे उपाय सांगितले त्यांजकडे प्रत्येक मंडळीच्या व जातीच्या मुख्यानें, पालकानें, आणि ज्या कोणाच्या मनांत त्यांत सुधारणा करायाची आहे त्याणें फार चांगलें लक्ष्य देऊन प्रत्येकास स्वतःमधून व आपल्या कुटुंबामधून अपशब्द घालवून द्यावयास लावलें पाहिजे.

२ रा–ज्या सणांत, समारंभांत व कार्यांत बीभत्सपणा व अपशब्द असतात तीं कृत्यें मुख्यांनीं काढून टाकण्यास झटावें. तसेंच ज्या कार्य वगैरेच्या जेवढ्या भागांत बीभत्सपणा असेल त्या कार्यवगैऱ्यांतून तेवढा बीभत्सपणाचा अंश अगर तो भाग गाळून टाकावा. जसें कोणाकोणाच्या लग्नकार्यांत त्यांच्या चालींमुळें बीभत्सप्रकार येतो, अशा चाली नाहींशा कराव्या.

३ रा–बहुतकरून सर्व ज्ञातींत ही चाल अढळते कीं,

त्यांच्यांतून कोणीं कांहीं खाल्लें, अमक्या देशीं गेला, अमक्या दिवशीं अमकें कृत्य केलें किंवा न केलें, धर्मासंबंधीं अमकें मत प्रदर्शित केलें कीं त्यास वाळींत टाकावें. ह्याबद्दल कोणी अपशब्द उच्चारतील किंवा कोणतेंहीं गैर नीतिचें कृत्य करतील, त्यांस बहिष्कृत करावें. आणि तसें नीच कर्म त्याणें सोडिलें कीं, त्यास पुनः मंडळींत घ्यावें.

४ था–मंडळींतील विद्वानांनीं ह्या विषयावर वेळोवेळीं व्याख्यानें देऊन लोकांस आग्रहानें हें सोडण्यास सांगावें.

५ वा–कोणी अपशब्द बोलला असतां बोलणाऱ्यानें कितीही गंमत उडविली असें जरी वाटलें तरी ऐकणारानें हसूं नये. कारण अशानें अपशब्द बोलणाऱ्यांस व ऐकणाऱ्यांस उत्तेजन येतें. आपल्या आंगीं सामर्थ्य असल्यास अपशब्द बोलणारांस तसें बोलूं देऊं नये.

## आपण ज्या गांवीं राहतों त्या गांवांतून व आपल्या देशांतून अपशब्द घालविण्याचे उपाय.

१ ला–शिक्षकांच्या हातीं. सर्व शिक्षक ह्या बाबतींत जर प्रथम स्वतःची वर्तणूक सुधारून आपल्या शाळेंतील मुलांस हा सद्गुण लावतील, तर, जशी सुधारणा होईल तशी दुसऱ्या फारच थोड्या उपायांनीं होईल. ह्मणून शिक्षकांनीं स्वतः अपशब्द उच्चारूं नये, आणि मुलें तसे शब्द बोललीं असतां त्यांजकडे दुर्लक्ष्य न करितां त्यांस सुधारावें आणि अठवड्यांतून एखादा दिवस नेमून त्या दिवशीं ह्या व दुसऱ्या सद्गुणांच्या विषयावर तास अर्धातास निदान पावतास तरी व्याख्यान देऊन उपदेश करावा.

२ रीं— पत्रकर्ते, ग्रंथकर्ते, व्याख्यानकार, उपदेश करणारे, सभेत भाषण करणारे वगैऱ्यांनीं अधिक सुज्ञपणानें वागावें. हल्लींची स्थिति दुःखकारक आहे. बहुतेक वर्तमानपत्रांत, मासिक पुस्तकांत व ग्रंथांत वेळोवेळीं स्वतःविषयीं बढाईचे, दुसऱ्यास तुच्छतेचे, निंदेचे,लोकांच्या नजरेंत त्यांस हलकेपणा आणणारे, चीड आणणारे, हृदयास लागणारे, हेव्यादाव्याचे, धिक्काराचे, शिवाय स्पष्ट रीतीनें वाईट असे लेख आढळतात. तसेंच व्याख्यानकार व सभेंत उठून भाषण करणाऱ्यांच्या मुखीं व निबंधांत मदर्हूप्रमाणें प्रकार आढळावेत ही काय लहानसान सखेदाश्चर्याची गोष्ट आहे !! परस्परांची चूकभूल दाखविणें असल्यास ती दाखविल्यानें त्या चुकीस अधिकाधिक घट्ट चिकटून राहण्याविषयीं मनाच्या ठायीं दुराग्रह उत्पन्न न होतां, सुधारणा होईल अशा रीतीनें लिहावें व बोलावें, ह्मणजे एखाद्याची चूक दाखवितेवेळीं त्यास अगदीं हलका, अज्ञान, वेडा, बेअकली, कुबुद्धि वगैरे जें कांहीं त्यास लज्जित करण्यास कारण होईल अशा प्रकारानें बोलूं व लिहूं नये. अशानें एखादी गोष्ट जरी वास्तविक चुकीची असली व ती तशी आहे असें त्यास जरी पटलें तरी ज्या अर्थीं ती आपणांस लज्जित करण्यास कारण झाली आहे,त्या अर्थीं ती चूक असें कबूल न करतां ती योग्य,स्तुत्य सत्य आहे असा दुराग्रह मानवस्वभावामध्यें उत्पन्न होतो. मग जी गोष्ट त्यास योग्य आहे असें मानण्याचा दुराग्रह उत्पन्न झाला आहे ती गोष्ट ज्याणें अयोग्य मानली तो मूर्ख,मंदमतीचा वगैरे हा उलट सिद्ध करितो. अर्थात् खोट्या गोष्टीचा दुरभिमान वाढून अपशब्द माजतात. तर असें न करितां कोणाची चूक भूल दाखविणें ती फार ममतेनें, गांभिर्यानें,

शुद्ध भावानें व प्रीतीनें दाखवावी. तसेंच धर्माच्या संबंधानें मत प्रदर्शित करणें तें फार ममतेनें प्रदर्शित करावें, दुरभिमानानें माझें तें खरें, इतरांचें खोटें, हें ह्मणणें जोखमीचें व जबाबदारीचें आहे.

हे आर्य बांधवहो, तुमच्या धर्म भोळेपणाप्रमाणें व निष्ठेप्रमाणें वागणारे फारच थोडे लोक जगांत अढळतील. कोणी तुह्मास हंसो, कोणी तुमची थट्टा मस्करी करो, कोणी उपहास करो, आपलें आहे तें खरें असें समजून आपल्या वडिलांच्या मार्गानें तुह्मी जाणारे आहां. तुमचें हें करणें मोक्ष मिळावा ह्या उद्देशानें आहे; तथापि तुमचें तोंड कितपत अपशब्दांनीं मळलें आहे हें तुमच्या ध्यानीं मनीं नसेल, तर मी तें थोडेसें आणण्याचा प्रयत्न करून पाहतों. तुह्मी अगदीं पहाटेस उठलां ह्मणजे कांहीं काम काज करतेवेळीं सुद्धां, तुमचें मुख "नारायण, नारायण, भगवान् भगवान्" अशा निदिध्यासांत गुंतलेलें असतें; पण महादुःखाची गोष्ट ही की, हें ध्यान चाललें आहे, हातानें काम करितच आहां, कदाचित् वत्स पाजीत आहां, किंवा पाय चालतातच आहेत, आणि प्रसंगानुसार ह्मणजे, कोणा चाकरास, इतर मनुष्यास, सदरहू गाईस अथवा दुसऱ्या जनावरास कांहीं बोलायाचें अगर रागें भरायाचें झालें तर चार आठ शिव्या आल्याच तोंडांतून! पुन्हां पूर्वीप्रमाणें नारायणाचें नांव!! पुन्हा प्रसंग आला कीं, लागल्याच शिव्या!!! असा क्रम चालतच असतो. तशाच स्त्रिया सोवळें लावून कामकाज करताहेत, किंवा पाणी भरताहेत, मुखांतून कोणा देवाच्या अगर देवीच्या सुमंगल नामावली ह्मणताहेत आणि त्यांत प्रसंगोपात्त अपशब्दांचा प्रयोग, नोकर वगैरे ह्यांवर, होतच आहे. तसेंच

यजमान संध्येला बसले तरी तीच अवस्था. संध्या चाल- ली आहे, आणि संध्येच्या खोलींतून अवारांत, माजघरांत, ओसरीवर अगर दुसऱ्या कोणत्या तरी ठिकाणीं मनुष्यें आहेत त्यांजकडे नजर जात आहे व कोणी कांहीं आपल्या मता- विरुद्ध केलें कीं, त्यास पुष्पांजलि देतातच आहेत ! पुन्हा संध्येचा घोष चाललाच आहे; हर हर ! ! काय स्थितिही !!! तर ही अमंगल स्थिति नष्ट होण्यास अपशब्दांचा सर्वस्वी त्याग करण्याविषयीं निश्चयपूर्वक झटणें हें अत्यंत अवश्य व उचित आहे.

हे ममप्राणप्रिय सकल बांधवहो, तुह्मीं कोणत्याही धर्मा- चे, देशाचे व वर्णाचे असा, पाहा कृपाकरून विचार करा, अमंगळपणापासून मुक्त व्हा. अपशब्द न उच्चारणें व मधुर भाषण करणें, ही सर्वस्वी आपल्या स्वाधीनची गोष्ट आहे, ह्मणून ह्या कामास मोठ्या दक्षतेनें लागून आपली अपकीर्ति करणाऱ्या व लघुत्व आणणाऱ्या दुष्टत्वास आपल्या व इत- रांच्या मुखांतून समूळ नाहींसें करण्यास यथाशक्ति प्रयत्न- करा. हयगय मुळींच कामाची नाहीं. शत्रु फारच माजला आहे. आतां जे कोणी कधींच अपशब्द उच्चारीत नसतील त्यांनीं ह्यांस कधींही थट्टेंत सुद्धां आपल्या पवित्र मुखीं आश्रय देऊं नये. एक वेळ आश्रय दिल्यास तें तेथें बिऱ्हाड करून राहील, व कांहीं काळानें वतनदार होऊन बसेल. आणि पाहा, अपशब्दांचा प्रकार अगदीं निरर्थक आहे एवढेंच नाहीं, तर तो मोठा अनर्थकारकही आहे. हृदयास अग्नीचे बाण भेदून तें विदारण्यासारखा तो आहे. ह्मणनच तुकारा- मासारख्या साधूनें ह्मटलें आहे कीं, " अपवित्र वाणी नको माझ्या मुखा, त्याजहुनी मुका बराच मी" वास्तविकच आहे.

आपणास वाचा असल्यानें जर तिच्यांतून अपवित्र शब्द येऊन जनांस उपद्रव होणार त्यापेक्षां वाचाच नाहीं तर बेहेत्तर आहे. आणि एवढें असूनही बोलणाऱ्यास तरी मोठेपणा मिळतो असेंही कांहीं नाहीं. मुक्तेश्वरकवीनीं ह्मटलें आहे कीं, "नीच बोले नीच वचनें, तेणेंच लघुत्व पाविजे तेणें" ह्मणून त्यांचा उपदेशही "न बोलावें नीच वचना" असा आहे. रामदास स्वामीचें "जनी वाउगें बोलतां सौख्य नाहीं" असें ह्मणणें असून "बोलणें नीच सोडीत जावें" असा ते मनास बोध करीत आहेत. असे असे महान् महान् साधुसंत अपशब्दाचा अव्हेर करीत आले आहेत. आणि हे शब्द खचीत वाईटच आहेत. ह्मणन हे ममप्राणप्रिय आर्य बांधवहो, मी तुह्मांस हात जोडून अति नम्रपणें विनंती करितों कीं, ही संवय टाका; टाकाचटाका. ती टाकण्याचा निश्चय करा; निश्चय या क्षणींच करा; आतांचें मगवर, आजचें उद्यांवर, टाकूं नका. अहो तुह्मी जाणते आहां, अजाणते नव्हां; तुह्मांस मी आपला अल्पज्ञ सेवक जें सांगूं शकेन त्यापेक्षां आपण गुणज्ञ अधिक समजूं शकतां. अपशब्द न उच्चारण्याविषयीं व सर्व प्रकारें आपली शुद्धता राखण्याविषयीं ह्या क्षणीं जर आपण दृढ निश्चय केला तर हें चिमकुलें पुस्तक लिहिल्याचें सार्थक झालें असें होईल. कारण "अहो निश्चयाचें बळ तुकाह्मणे हेंचि फळ."

समाप्त.

**सद्गुणीसगुणा**– ( स्त्रियांस अत्यंत उपयोगी ) ही एक फारच चटकदार व मनोरंजक गोष्ट आहे. कागद व छपाई सुरेख असून डेमी द्वादशपत्री सांच्याचीं पृष्ठें ६०. किं. ४ आ.

**बापूगोखले यांचें चरित्र**– ह्या इतिहासप्रसिद्ध शूर पुरुषाचें चरित्र फारच मनोवेधक व रसाळ आहे. कागद व छपाई सुरेख असून डेमी द्वादशपत्री सांच्याचीं पृष्ठें २०० आहेत. किंमत १२ आणे.

**सुंदरी आणि वसंतसेन**–( भाग १।२।३ ) हें पुस्तक मूळ हिंदीभाषेंत रचिलेल्या एका अत्युत्तम प्राचीन ग्रंथाच्या आधारें तयार केलें आहे. यांत स्त्रिया आपलें पातिव्रत्य दृढ निश्चयानें कोणत्या प्रकारें रक्षण कारितात, याचें उत्तम प्रकारें वर्णन केलें आहे. भाग पहिला किंमत ४ आणे. भाग २ रा, किंमत ६ आणे; भाग ३ रा, किंमत १० आणे.

**सुंदराबाई**– ही एक चटकदार व स्त्रियांस उपदेश होण्यासारखी लहानच गोष्ट आहे. किंमत १ आणा.

**चातुर्यरत्नावलि**– ( भाग १।२।३।४ ) या पुस्तकाचे लहान लहान पण सुंदर असे चार भाग असून त्यांत मौजेच्या व बोधपर अशा ८० गोष्टी आहेत. प्रत्येक भागाची किंमत अर्धा आणा.

**अपशब्दनिषेध**–(नीतिमार्ग दाखविणारें पुस्तक) किं. ८२.
**पर्ण शृंगारोत्सव** .... .... ....किं. ८६.
**विनोदमहदाख्याइका.** .... ....किं. ८४.
**ज्योतिषरत्न** ( मोठें ). .... ....किं. १८८.

पत्ता–प्रकाशक ' खानदेशामित्र '
पोष्ट– खानापूर ( बेळगांव. )

# दुसऱ्या वर्षी होणाऱ्या सुधारणा व फेरफार.

सन १८९४ च्या जानेवारीपासून मित्रास दुसरें वर्ष लागेल. पहिल्या वर्षी याची वर्षाची वर्गणी १/३ होती, ती बऱ्याच हितचिंतकांच्या सूचनेवरून कमी करून दुसऱ्या वर्षापासून अगाऊ वर्गणी /५ व टपालखर्च /३ मिळून अवघी /८ ठेविली आहे.

एका नांवावर खानदेशमित्राच्या दरमहा २ प्रती मागविणारांस वर्षाची वर्गणी टपाल खर्चासह अवघे ( /१२ ) बारा आणे पडतील! एका नांवावर तीन प्रती मागविणारांस टपालखर्चासह अवघे (/१५) पंधराच आणे पडतील!! तिहींपेक्षां जास्त प्रती मागविणारांस पुढें प्रत्येक प्रतीचे टपाल खर्चासह ( /५ ) पांच आणे पडतील ह्मणजे ८ प्रतींचे (२॥) अडीच रुपये व दहा प्रतींचे ३/= तीन रु० दोन आणे.

पहिल्या वर्षी दरमहा २ फार्मांचा अंक असून रंगीत कव्हर एकच होतें. दुसरे वर्षापासून अंक एका फार्माचा करून रंगीत कव्हरें वाढविलीं आहेत. ह्मणजे आजपर्यंत दरमहा एकंदर २८ पृष्ठें असत; तीं येत्या जानेवारीच्या अंकापासून एकंदर २४ पृष्ठें येत जातील.

गेल्या वर्षापेक्षां पुढचे वर्षी या पुस्तकांत अधिक चटकदार व विशेष मनोरंजक आणि उपयुक्त विषय येतील अशी तजवीज केली आहे.

प्रकाशक ' खानदेशमित्र '

दिजंबर.—१८९३. अंक १२

मासिक पुस्तक.

# खानदेशमित्र.

## हिंदुस्थानचें राज्य.

**शिष्य**—ह्या देशाचें नांव हिंदुस्थान ना?

**गुरु**—होय.

**शिष्य**—तर मग येथें हिंदूंचें राज्य असावें; तें कां नाहीं?

**गुरु**—ही गोष्ट फार लांब आहे. तर तूं एवढें लक्षांत ठेव कीं, येथें आरंभीं हिंदूंचें राज्य होतें; तें नाहींसें होऊन आतां इंग्लिशांचें राज्य झालें आहे. आणखी असें होण्यास कारण, दोन मांजरांनीं खंवा चोरून नेला होता, तो सगळा एका माकडानें खाल्ला, त्या गोष्टी सारखें आहे.

**शिष्य**—हें राज्य केवढेंसें आहे?

**गुरु**—फार मोठें आहे. त्याचें क्षेत्र-फळ चौदा लाख चौरस मैल आहे. त्यांत माणसें अठ्ठावीस कोटी आहेत; आणि त्याचें उत्पन्न सत्तर बाहात्तर कोटि रुपयांचें आहे!

**शिष्य**—अबब! मोठा लाटच आहे! इतक्या रुपयांचें करतात तरी काय?

**गुरु**—अरे लाट कसला? एवढें उत्पन्न आहे, तरी, तें खर्चाला देखील पुरत नाहीं. कर्ज करावें लागतें.

**शिष्य**–काय! खर्चाला पुरत नाहीं! आणखी कर्ज काढावें लागतें ह्मणतां!

**गुरु**–होय होय. आज हिंदुस्थानाला सुमारें एकशें बासष्ट कोटि रुपये कर्ज आहे. त्याच्या व्याजाबद्दल त्यास दरसाल चार कोटि रुपये द्यावे लागतात.

**शिष्य**–समळेंच विचित्र आहे! इतक्या पैशाला एवढा खर्च आहे तरी कसला?

**गुरु**–अरे बाबा, साहेब लोकांचे पगार, हें एक खर्चाचें तोंड आहे. एकट्या गव्हरनर जनरलाला दरमहां वीस हजार रुपये पगार आहे! आणखी दरसाल इंग्लंडास सतरा अठरा कोटि रुपये पाठवावे लागतात. त्याबद्दल हिंदुस्थानास मोबदला मुळींच मिळत नाहीं!

**शिष्य**–आणखीं दुसरा कसला खर्च?

**गुरु**–सैन्याचा. तो फार मोठा आहे. सतरा अठरा कोटि रुपये!

**शिष्य**–असें सैन्य आहे तरी किती?

**गुरु**–सुमारें दोन लाख सत्तेचाळीस हजार आहे.

**शिष्य**–त्यांत गोरें सैन्य किती आणि काळें किती?

**गुरु**–त्यांत त्रेसष्ट हजार गोरे लोक आहेत, आणि एक लाख सत्तावीस हजार काळे लोक आहेत.

**शिष्य**–एवढें मोठें सैन्य हिंदुस्थानाला हवें कशाला? त्यावर यायला कोण बसला आहे?

**गुरु**–अरे बाबा, हें राजकारण आहे. आधीं बाहेरच्या शत्रूची गोष्ट कशाला हवी? हिंदुस्थानच्या लोकांवर इंग्रजांचा विश्वास कोठें आहे? त्यांचीं सगळ्यांचीं हत्यारें त्या-

नीं छिनावून घेतलीं आहेत. शिवाय रशिया तिकडे डुरकतोच आहे.

**शिष्य**–पण, हिंदुस्थानांतल्या लोकांचें जें भय इंग्रजांस वाटतें, तें खरें आहे काय?

**गुरु**–वास्तवीक पाहिलें असतां खरें नाहीं. इ. स. १८५७ त बंड झालें होतें, तें हिंदुस्थानच्या लोकांनीं केलें नव्हतें, काळ्या पलटणी-शिपायांनीं केलें होतें. पण तेव्हांपासून इंग्रजानां सगळ्यांचेंच भय वाटूं लागलें आहे. त्यांत कांहीं अर्थ नाहीं. बाकी अठ्ठावीस कोटि माणसें ह्मणजे एक समुद्र आहे. पण एकी कोठें आहे? असो.

**शिष्य**–आमच्या इंग्रज सरकाराला भय वाटतें, एवढा तो रशिया आहे तरी केवढा?

**गुरु**–अरे बाबा, तें एक विलक्षण प्रस्थ आहे. त्याच्या राज्याचें क्षेत्रफळ शायशीं लक्ष चव्वेचाळीस हजार चौरस मैल आहे; आणि लढाईच्या वेळेस त्याजपाशीं सैन्य अठरा एकोणीस लाख तयार असतें. शिवाय चार लाख स्वार आहेत, आणि चार हजार तोफा आहेत.

**शिष्य**–पण ह्याशीं सामना करायाला इंग्लंडाचें सैन्य आहेना?

**गुरु**–आहे. पण, तें केवढेंसें आहे? ग्रेटब्रिटन, हिंदुस्थान, आणि अशीं दुसरीं राज्यें ह्यांत मिळून एकंदर इंग्लिश सैन्य साडेसहा पावणेसात लाख आहे. त्याचें एकुणीस लाखांपुढें काय चालावयाचें?

**शिष्य**–पण, रशिया आणि ग्रेट ब्रिटन ह्यांचा तह ठरलेला आहे ना?

**गुरु**—आहे. तह आहे. पण, संधि सांपडली कीं, तो काग-दांतला कागदांतच राहतो, आणि 'बळी तो कान पिळी' असें होतें. आणखी,आज कितीएक वर्षे-कितीएक युगें ह्मणा-ना—असेंच होत चाललें आहे.

**शिष्य**—तर, इंग्रजांना रशियाचें मोठें भय आहे!

**गुरु**—भय आहे तर. आणखी रशियाला हिंदुस्थानावर येण्यास अफगाणिस्थानांतून वाट आहे. ह्मणून, अफगाणि-स्थानाचा राजा अबदुल रहिमान ह्यास इंग्रजांनीं आपलेकडचें करून घेतलें आहे त्यासाठीं त्या राजाला ते दरमहां एक लाख रुपये खंडणी देत असतात. शिवाय, वेळोवेळीं त्याला नजर-नजराणे जातात ते वेगळेच.

**शिष्य**—एकूण तर मग, हिंदुस्थानांतलें इंग्लिश राज्य चालवायाचें काम कठिण आहे. ही आपली सुळावरची पोळी आहे!

**गुरु**—सध्यां कांहीं अंशीं तसें आहे खरें. पण, हिंदुस्थानां-तल्या सगळ्या प्रजा जनांस ह्मणजे अठ्ठावीस कोटि लोकांस जर इंग्रजांनीं संतुष्ट ठेऊन आपलेंसें करून घेतलें, तर र-शियाच्या एकुणीस लाख सैन्याची बिशाद काय आहे!

**शिष्य**—मग ते असें कां करीत नाहींत?

**गुरु**—ह्याचें उत्तर कांहीं सोपें नाहीं. पण एवढें खचीत कीं, इंग्लंडांतले उत्तम लोक जे आहेत, त्यांची इच्छा हिंदु-स्थानाच्या लोकांचें कल्याण करण्याची आहे. **लार्ड मेयो** तर एकदां ह्मणाले होते कीं, "हिंदुस्थानांत राहून हिंदुस्था-नच्या लोकांचें कल्याण जर आमचे हातून होत नाहीं, तर आह्मी हिंदुस्थानांत मुळींच राहूं नये हें बरें."

शिष्य–केवढें थोरपणाचें भाषण हें! पण आमचें चित्त आणि इंग्रज लोकांचें चित्त कधीं एक होणार नाहीं काय?

गुरु–होईल. आपण किती-एक गुणांनीं सध्यां कमी आहों! ते गुण विद्येच्या योगानें आमचे ठाईं आले, ह्मणजे इंग्रजांचें आणि आमचें मन आपोआप एक होईल. किती श्रम केले तरी तेलांत पाणी मिसळत नाहीं. पण पाण्यांत पाणी केव्हांच मिसळतें. त्याला प्रयास लागत नाहींत. आपण, इंग्रजांसारखे विद्वान्, युक्तिवान्, काल्पनिक, हुशार, चतुर आणि बलवान् झालों ह्मणजे हें सगळें सहज होणार आहे. आणखी हे सगळे गुण, ज्ञान संपादनानें यावयाचे आहेत. ह्मणून तुह्मी ज्ञान संपादा आणि इंग्रजांच्या बरोबरीचे व्हा.

## कालव्यय.

इहलोकीं सुखानें राहून मरणोत्तर स्वर्गास जावें अशी आपल्या अंगीं ज्यास योग्यता आणणें असेल, त्यानें व्यर्थ कालक्षेप न करण्याविषयीं फार जपलें पाहिजे. कालक्षेपासारखी दुसरी कोणतीच हानी नाहीं. काल हें सुख आणि परलोक मिळविण्याचें भांडवल होय. त्याचा जो दुर्व्यय करील, त्याचें दिवाळें वाजल्या शिवाय राहणार नाहीं. जन्मास येऊन मनुष्यास इहलोक आणि परलोक दोन्ही साधावयाचे आहेत; या करितां दोहोंच्याही प्राप्तीकडे कालाचा व्यय केला पाहिजे. सर्वकाळ संसाराच्या काळजींत घालवून परलोकास विसरतां कामानये. संसार सुख भोगून शेवटीं परलोक साधन करूं असें ह्मणून असंख्य लोक फसले आहेत.

सुखाच्या ऐन भरांत असतांच कित्येकांस मृत्यूनें गांठिलें. कित्येक ह्मातारे झाले; परंतु ह्मातारपणीं इंद्रियें विगलित होऊन सुखोपभोगासही असमर्थ झाले. अशांच्या हातून परलोक साधन कोठून होणार? बालपणीं क्रीडा, तारुण्यांत विषय-सुख, वार्धक्यांत अशक्तता, असें होऊन असंख्यात लोकांनीं मनुष्य जन्मासारखी देणगी व्यर्थ घालविली. ह्मातारपणीं कफ-वात-पित्तांनीं मस्तक फिरून अंगास कळा लागल्यावर ईश्वराकडे चित्त कोठून लागणार? व हातानें सत्कर्म कसें होणार? कोणतेंही सत्कृत्य करण्याचा प्रसंग आला असतां तो दवडूं नये. उद्यां, हें फार वाईट आहे. यानें पुष्कळांस बुडविलें आहे. आज एक कृत्य करावयाचें आहे तें उद्यांवर टाकिलें तर आजचें एक व उद्यांचें दुसरें अशीं दोन उद्यां कशीं होतील? जो योग्यकाळीं आपलें कर्तव्य करील तो या संसार सागरांतील तुफानांत कधीं सांपडणार नाहीं. कालव्यवस्था ही एक संसार महानदी तरून जाण्याची नौका आहे. ज्याची कालव्यवस्था नीट नाहीं, त्याची फुटकी नांव. तीवर केव्हां घाला येईल याचा नियम नाहीं.

मनुष्याच्या हातून व्यर्थ कालक्षेप होऊं नये ह्यासाठीं लहानपणापासून त्याच्या मनांत कालाची किंमत ठसविली पाहिजे. काल किती त्वरित जातो, हें त्यास समजलें पाहिजे. बहुतकरून पुष्कळ लोकांस काळाची योग्यता बरोबर समजत नाहीं. प्रत्येक मनुष्यास आपणास आयुष्य पुष्कळ असावेंसें वाटतें. असें असून तें आयुष्य मनुष्यें व्यर्थ घालवितात हें केवढें आश्चर्य आहे! आयुष्य क्षणभंगुर आहे, असें बहुतकरून सर्व लोक समजतात. असें असून

तेच त्याचा असद्व्यय करितात, हें केवढें नवल आहे ? सर्व क्षुद्र वस्तूंचा माणसांस लोभ असतो; परंतु ते काळासारख्या अमोलिक वस्तूचा हवा तसा उधळेपणानें खर्च करितात, हा मनुष्याच्या अंगीं मोठाच असंबद्धपणा आहे. तीन दिवसांचा उपाशी, पोट खपाटीस गेलेला, भिकारी दृष्टीस पडला तरी, रुपयाच्या खुर्द्यांतून एक पैसा त्यास देण्यास ज्यांच्या जिवावर येतें असे मनुष्य शुष्क गप्पा मारून रुपयांहून मौल्यवान अशीं वर्षांचीं वर्षें फुकट दवडितात. वेळ व्यर्थ जाऊं न देण्यास जो जपत नाहीं, त्याचा संसार व्यवस्थित राहणार नाहीं. आळसानें तो आपणास अनेक शत्रु उत्पन्न करितो. सध्यां हयगय करून तो पुढील पश्चात्तापाचें बीजारोपण करितो.

बाळपणीं आळस करून विद्याभ्यासादिक आवश्यक कर्तव्यें केलीं नाहींत ह्मणजे तारुण्यांत फटफजीती होऊन अनेक दुःखें प्राप्त होतात. ज्यानें तारुण्यांत नीतीनें वागून परोपकारादि सत्कर्मं केलीं नाहींत, त्यास ह्मातारपणा आल्यावर यमयातना मनांत येऊन त्याचें अंतःकरण फार अस्वस्थ होतें. अंतकाळ संनिध येऊन आपणाजवळ पुण्यसंचय मुळींच नाहीं, हें मनांत येऊन त्यास फार दुःख होतें. हे सर्व व्यर्थ कालक्षेपाचे परिणाम होत. एक काळाची व्यवस्था नसल्यामुळें सर्व गोष्टींची अव्यवस्था होते. योग्यकाळीं न केल्यामुळें कोणतीच गोष्ट धड होत नाहीं. जो व्यर्थ कालक्षेप करीत नाहीं, तो सर्व संकटांतून मुक्त होतो. कालरूप भांडवलाच्या व्यवस्थे पासून त्यास पुष्कळ नफा होतो. शिवाय आयुष्यांत तो पुष्कळ दिवस वांचण्याचा उपयोग करून घेतो. तो स्वतः इह परलोक साधून इतरांचेंही क-

ल्याण करितो भूतकाळ चांगला घालविल्यानें वर्तमानकाळीं आनंदित असून भविष्यत्कालाविषयीं निष्काळजी असतो. काळ इतका त्वरित आहे, तरी तो त्यास आपल्या स्वाधीन ठेवितो. कांहीं तरी स्मारक कृत्य केल्या शिवाय तो एका घडीसही जाऊं देणार नाहीं.

---

## सोन्याहून उत्तम.

### श्लोक. ( शा. वि. )

हे सारे जन बांधवांसम असें मानूनिया चालणें ।
शेजाऱ्यां विषयीं मनीं कळवळा तो सर्वदां ठेवणें ॥
साधें सौख्य, तशी निरोग तनुही, संतुष्ट ऐसें मन ।
मोठाल्या पदव्यांहुनीहि अथवा सोन्याहुनी उत्तम॥१॥
उद्योगी जन शांतता अनुभवी उद्योग केल्यावरी ।
आयासाविण नीज ये गरिबशा लोकांस बाजेवरी ॥
किंवा काव्यनिरीक्षणांत रमतें ऐसें विचारी मन ।
मोठाल्या पदव्यांहुनीहि अथवा सोन्याहुनी उत्तम ॥२॥
माता वा भगिनी, पिता,कुलवती भार्या जिथें नांदता।
येई ज्यास पवित्रता गृह असें, जेथें वसे शांतता ॥
तें कीं एक, तसें श्रमें करूनिया जें प्राप्त विद्याधन ।
मोठाल्या पदव्यांहुनीहि अथवा सोन्याहुनी उत्तम॥३॥
क्लेशाचे समयीं सदां करितसे जी सांत्वना प्रीत ती ।
कीं सौख्यास्तव सांगते करतलीं घ्याया शिरा जी मती॥
दंडायास समर्थ पातकि जनां जो त्या प्रभूला भिणें ।
तें सोन्याहुनिही उणें न सजना हें कासया सांगणें.

अनंत केशव चितळे.

---

# कालिदासाचें चातुर्य.

एके वेळीं भोजराजानें सर्व देशभर 'जो कोणी नवीन श्लोक करून आणील त्यास एक लक्ष मोहरा इनाम मिळतील' अशी दंवडी पिटविली; आणि इकडे आपल्या सभेंत एक-पाठी, दु-पाठी, ति-पाठी, चार-पाठी असे पंडित ठेवले. त्यामुळें कोणीही नवीन श्लोक करून आणला असतां राजानें त्यास ह्मणून दाखविण्यास सांगावें. त्याप्रमाणें त्यानें श्लोक ह्मटला कीं, तो ऐकून एक-पाठी यानें ह्मणावें कीं, हा श्लोक जुना आहे, मला येतो. असें ह्मणून बोलून दाखवावा. नंतर दु-पाठ्यानें दोन वेळ ऐकल्यामुळें 'मला येतो' असें ह्मणून लागलाच बोलून दाखवावा. या अनुक्रमानें सर्वांनीं तो श्लोक ह्मणून दाखवून जुना ठरवावा व श्लोक-कारास निरुत्तर करावें. अशा रीतीनें पुष्कळ महा विद्वान पंडित फसूं लागल्यामुळें एक लक्ष मोहरा कोणासही मिळाल्या नाहींत. या गोष्टीस बरेच दिवस लोटल्यावर एके दिवशीं कालिदासाची स्वारी देव-दर्शना करितां ईश-मंदिरांत गेली असतां त्या ठिकाणीं एक अति वृद्ध ब्राह्मण दीन मुद्रेनें सचिंत बसलेला त्याच्या नजरेस पडला. तेव्हां कालिदासास दया येऊन त्यानें विचारिलें:— महाराज! आपण कोठचे रहाणार वें असा विचार करीत कां बसलेत? त्यावर तो ब्राह्मण ह्मणालाः—मी मणिपूर शहरचा रहाणारा गरीब ब्राह्मण असून दरिद्रानें गांजल्यामुळें येथील भोजराजा, जो कोणी नवीन श्लोक करून आणील त्यास, एक लक्ष मोहोरा देतो अशी त्याची कीर्ती ऐकून मी येथें आलों. परंतु शोधाअंतीं आजपर्यंत जे जे महान विद्वान नवीन श्लोक घे-

ऊन आले त्या सर्वांचा श्लोक जुना ठरून अपमान होत गेल्यामुळें तें इनाम मिळण्यास कोणींच समर्थ झाला नाहीं. असें असल्यामुळें माझ्या सारख्या गरीब व साधारण मनुष्यास तें बक्षीस मिळण्याची आशाच करणें नको. ह्या करितां धारानगरीस येण्याचा व्यर्थ हेलपाटा पडल्यामुळें आतां कसें करावें ही विवंचना पडली आहे.

ब्राह्मणाचें हें भाषण ऐकतांच कालिदासास त्याची दया येऊन तो ह्मणालाः– भटजी, तुह्मी निराश होऊं नका. मी एक श्लोक तुह्मास सांगतों तो उदईक राजसभेंत जाऊन ह्मणा ह्मणजे एक लक्ष मोहरा मिळतील. असें ह्मणून कालिदासानें श्लोक सांगितला. तेव्हां ब्राह्मणानें कालिदासाचे अतिशय उपकार मानिले. नंतर दुसरे दिवशीं तो ब्राह्मण राजसभेंत गेला व भोजराजाची भेट घेऊन नवीन श्लोक करून आणला आहे असें सांगितलें. तें ऐकून तो श्लोक ह्मणून दाखविण्याची भोजराजानें आज्ञा केल्यावरून ब्राह्मण ह्मणालाः—

**स्वस्तिश्री भोजराजा त्रिभुवन विदिते**
**धार्मिकः सत्य वक्ता ।**
**पित्रा ते मगृहीता नवतिनवाधिका**
**रत्न कोट्यो मदीयाः ॥**
**तास्तं देहीति राजन् सकल बुधजनै**
**र्ज्ञायते सत्य मेतत् ।**
**नोवा जानंति यत्तत् ममकृति मथवा**
**देहि लक्षं ततो मे ॥ १ ॥**

अर्थ–'हे भोजराजा! तूं धार्मिक व सत्य भाषण करणा-

रा आहेस अशी त्रैलोक्यांत कीर्ति गाजलेली आहे, ह्मणून सांगतों कीं, तुझ्या पित्यानें माझ्यापासून नव्व्याण्णव कोट रत्नें उसनीं घेतलीं आहेत तीं तूं माझीं मला दे. ही गोष्ट सत्य असून तुझ्या सभेतील पंडितांसही ठाऊक आहे. परंतु जर ते जाणत नसतील तर हा नवीन श्लोक आहे असें समजून त्याजबद्दलचें एक लक्ष मोहोरा इनाम दे' हा श्लोक ऐकून सर्व एक-पाठी दु-पाठी यांचीं तोंडें बंद झालीं. कारण श्लोक जुना ठरला तर नव्व्याण्णव कोट रत्नें राजाच्या बापाकडे येणें आहेत असें होतें. हा सर्व प्रकार पाहून राजा विस्मित झाला व हें कालिदासाचेंच कर्तृत्व असावें असें समजून मुकाट्यानें त्या ब्राह्मणास एक लक्ष मोहोरा व वस्त्रालंकार देऊन संतुष्ट करिता झाला.

## श्रीकृष्णाची तसबीर!

कोणी एक चितारी तसबीर काढण्याचे कामांत अति कुशल होता. त्यानें त्या गुणावर प्रतिष्ठा आणि द्रव्य बहुत मिळविलें. तो फिरत फिरत द्वारकेस आला. त्यानें श्रीकृष्णाचे सभेस जाऊन आपले गुणाची प्रशंसा केली. तेव्हां कृष्णानें त्यास सांगितलें कीं, माझी तसबीर काढून आण, ह्मणजे तुला एक हजार रुपये देईन. तेव्हां त्यानें आठ दिवसांचा वायदा करून नववे दिवशीं तसबीर हुबेहूब सर्वोत्कृष्ट काढून सभेस आणिली. त्यासमयीं श्रीकृष्ण तें दुसरे तऱ्हेचें स्वरूप पालटून त्या चिताऱ्यासच ह्मणतात कीं, माझ्या स्वरूपा प्रमाणें तूं आणलेली तसबीर आहे किंवा कसें? हें तूंच सांग. ऐकून चिताऱ्यानें कृष्णाचें स्वरूप पाहिलें

होतें त्यापेक्षां शतगुणी रूप निराळें दिसूं लागलें. तेव्हां पुनः आठ दिवसांचा वायदा मागून त्या स्वरूपाची तसबीर आणिली. त्यासमयीं श्रीकृष्णानें तिसरे प्रकारचें स्वरूप धरिलें. या प्रमाणें त्यानीं त्या चिताऱ्यास दहा वेळ चकित केलें. त्या काळीं तो चितारी आश्चर्य पावून द्रव्य न मिळतां प्रतिष्ठेची हानी जाणून अत्यंत सखेद चिंतातुर असा मार्गानें जात असतां कोणी एका सत्पुरुषाची गांठ पडली. त्यानें त्यास चिंताग्रस्त पाहून विचारिलें कीं, तूं सखेदरूप दिसण्याचें कारण काय? तेव्हां त्यानें सर्व वृत्तांत सांगितला. तो ऐकून साधु ह्मणाले कीं, 'कृष्ण नाटकी आहे. तो क्षणांत अनंत रूपें दाखवील. आपल्या मुखानें स्वतःच्या गुणाची प्रशंसा केलेली त्यास आवडली नाहीं. असो; आतां सांगतों तसें कर. एक मोठा आरसा वस्त्रांत गुंडाळून नेऊन तसबीर आणली आहे असें कृष्णास सांग आणि आरसा पुढें कर. मग त्यानें कसेंही जरी रूप धरिलें तरी आरशांत तसेंच दिसेल.' या प्रमाणें सांगितल्यावरून चिताऱ्यानें तसाच आरसा नेऊन कृष्णास दाखविला. आणि ह्मणाला, महाराज, आपली तसबीर यांत पहावी. असें ऐकून श्रीकृष्ण ह्मणतात 'अरे तुला कोणी तरी गुरु भेटला त्यावांचून हें तुझें ज्ञान नव्हे; असें ह्मणून श्रीकृष्णानें एक हजार रुपये देऊन त्यास मार्गस्थ केलें. सारांश कोणतेंही कार्य गुरुवांचून होणें नाहीं.

# विरहिणीचें मदनास भाषण.

## अंजनीगीत.

जटा नव्हे ही वेणी आहे ॥
विष नच कंठीं कस्तुरिका हे ॥
शिरीं माझिया शशि नच राहे ॥
कुसुमें तीं खचिलीं ॥ १ ॥
मदना करि तूं विचार कांहीं ॥
भस्म नव्हे हें शरिरा पाहीं ॥
प्रियपति विरहें पांडुरता ही ॥
आलीसे तनुला ॥ २ ॥
चिन्हें तुजला कथिलीं सारीं ॥
पतिविरहित मी अबला नारी ॥
समजुनि मजला तूं त्रिपुरारी ॥
व्यर्थचि कां छळिशी ॥ ३ ॥

अ० के० चितळे.

---

# मीठ.

जेवतांना आपण भात, पोळी, भाकरी असे अनेक पदार्थ खातों. पण एक पदार्थ असा आहे कीं, तो नसेल तर जेवण लागलेंच अडून बसतें. जेवणारे लोक कितीही भिडस्त असोत. ते कदाचित् लाजेस्तव कांहीं मागणार नाहींत. पण जर कां त्यांच्या पानांवर मीठ वाढलें नसलें तर त्यांनीं गडबड करून सोडलीच. मिठाचा महिमा इतका मोठा आहे कीं, सर्व पदार्थ कितीही उत्तम झालेले असोत; पण जर

कां आमटींत अथवा भाजींत मीठ घालण्याचें चुकलें, तर तें, भोजनास बसलेल्या हजारों लोकांत, स्वयंपाक करणाऱ्याची अब्रू घेऊन सोडतें! या शरीराची रचना अशी आहे कीं, जीं द्रव्यें शरीर पोषणास अत्यावश्यक आहेत तीं, आपण मागून घेतों; व त्यांची आपणास नावड कधींही नसते. एकास कढी आवडत नाहीं, दुसऱ्यास पुरणाची पोळी नको असते, तिसऱ्यास लाडू आवडत नाहींत. पण मीठ सर्वांस पाहिजे.

प्राण्याच्या शरीरांतलें रक्त घेऊन जाळलें ह्मणजे खालीं जो तांबूस व पांढरा पदार्थ राहतो त्यांतला अर्धा भाग मिठाचा असतो. रक्त हें शरीरांतील एक प्रधान द्रव्य आहे; आणि यांत ज्या अर्थी मीठ असतें त्या अर्थी असें सिद्ध होतें कीं, तें प्राण्याच्या पोषणासाठीं अवश्यमेव पाहिजेच. कांहीं शाकभाजांत मीठ मूळचेंच असतें. पण तें आपणांस जितकें पाहिजे तितकें नसतें यामुळें तें पानावर निराळें घेऊन खाल्लया शिवाय आपलें चालत नाहीं.

मीठ जरी अवश्यक आहे, तरी तें शरीरास मानवेल तेवढेंच खाल्लें पाहिजे. तें पुष्कळ खाल्लें असतां अंगांत शक्ती येईल अशी जर कोणाची समजूत असेल तर ती चुकीची होय. रक्तांत असा विलक्षण गुण आहे कीं जेवढें मीठ अगत्य पाहिजे, तेवढेंच रक्त शोषून घेतें; जास्त घेत नाहीं. मीठ जर न खाल्लें, तर रक्तांत जें मीठ असतें तें शरीर पोषणाच्या कामीं खर्चीं पडून कांहीं दिवस निभावणी होते. पण पुढें शरीर कृश व निस्सत्व होण्यास लागतें. आपल्यांत कोणी स्त्री जर दुदवानें बालविधवा झाली, तर तिचा तारुण्यमद कमी होऊन ती अशक्त व रोडकी होण्याकरितां तिला तिचीं घर-

चीं मनुष्यें मीठ खाऊं देत नाहींत. एखाद्या मुलीचा नवरा अशक्त व क्षीण असला तर तिला, ती रोडकी व्हावी ह्मणून मीठ खाण्याची मनाई करितात. कित्येक लोकांत अशी चाल आहे कीं, शपथ किंवा आण वाहण्याच्या वेळेस मीठ हातांत धरावयाचें. इंग्रजी भाषेंत मिठाच्या संबंधानें दोन ह्मणी आहेत. त्यांजवरून एकाद्या मनुष्याची योग्यता समजली जाते. हालंड देशांत पूर्वीं असा एक कायदा होता कीं, कैद्यांस फार जबर शिक्षा द्यावयाची ह्मणजे त्यांचें मीठ अजीबाद बंद करून टाकावयाचें. सर्व लोक मीठ खातात. अमुक लोक तें खात नाहींत असें सहसा आढळून येत नाहीं. आफ्रिका खंडाच्या कांहीं आंतल्या प्रदेशांत मीठ फारच दुर्मिळ आहे. पसाभर मिठाकरितां तेथले लोक आपलीं बायका पोरें देखील विकण्यास तयार होतात. जो जेवतांना मीठ खातो तोच तेथें कायतो श्रीमंत. इकडे मुलें साखर किंवा गूळ मौजेनें खात बसतात; पण तिकडे फार उत्तम खाऊ ह्मटला ह्मणजे मिठाचे बारीक खडे.

मिठाचे उपयोग पुष्कळ आहेत. कुजूं न देण्याचा गुण मिठाच्याठायीं असल्यामुळें पदार्थ राखून ठेवण्याच्या कामीं त्याचा विशेष उपयोग होतो. कांहीं जमीनींत खताच्या कामीं मीठ घालतात. साबण तयार करतांना आणि तांबड्या मातीच्या भांड्यास लाखलोटर करतांना मिठाचें काम लागतें. मनुष्यां प्रमाणें गुरांसही मीठ खावयास पाहिजे. तें त्यांस न मिळालें तर, तीं अशक्त होतात. उत्तर अमेरिकेंत मिठाचे प्रदेश आहेत. तेथें फार लांबून जनानरें मीठ चाटण्या करितां येतात. इकडे मिठावर कर असल्यानें गुरांस हवें तितकें मीठ खावयाला घालण्याची लोकांस अडचण पडते

मनुष्यांच्या अगदीं उपयोगीं न पडतां फक्त गुरांच्याच उपयोगीं पडावें असें मीठ तयार करण्याची कृति जो कोणी शोधून काढील, त्याला हजार रुपये बक्षीस देण्याचें हिंदुस्थान सरकारानें मागें ठरविलें होतें.

पृथ्वीवर अनेक देशांत मिठाचे खडक आहेत. आस्ट्रिया देशांत ग्यालिशिआ प्रांतामध्यें मिठाचा जसा एक मोठा डोंगर आहे, तसा इतर ठिकाणीं क्वचित् असेल. तो २३० कोस लांब, १० कोस रुंद व १२०० फूट जाड आहे.

समुद्रा पासून अगणित मीठ तयार होतें. समुद्र जसा काय त्याचें केवळ आगरच आहे. अर्धा शेर समुद्राच्या पाण्यांत ११ तोळा मीठ असतें. असें गणित केलें आहे कीं, समुद्र सर्व आटला तर त्यानें व्यापलेल्या जाग्यावर ७०० फूट जाडीचा मिठाचा थर होईल!!

---

## प्रसंगावधान.

( वानर आणि मगर यांची कल्पित गोष्ट. )

**समुत्पन्नेषु कार्येषु बुद्धिर्यस्य न हीयते**
**स एव दुर्गं तरति जलस्थो वानरो यथा.**

समुद्रतीरीं जांभळीचा एक मोठा वृक्ष होता. त्यावर बारमहा जांभळें लागत त्या वृक्षावर रक्तमुख नांवाचा एक वानर रहात असे. एके दिवशीं करालमुख नांवाचा एक मोठा मगर पाण्यांतून निघून त्या झाडाखालीं वाळवंटावर बसला. तेव्हां रक्तमुख त्यास ह्मणाला, अहो, आज तुह्मी माझ्या घरीं पाहुणे आलां, या करितां मी अमृता सारखी

मधुर जांभळें देतों हीं खा. असें ह्मणून त्यानें त्यास पुष्कळ जांभळें दिलीं तीं खाऊन त्यास फार संतोष झाला. नंतर पुष्कळ वेळ आनंदानें वानराशीं गोष्टी सांगून मगर पाण्यांत गेला. जांभळांची गोडी लागल्यामुळें तो रोज येऊं लागला. आपण कांहीं जांभळें खाऊन कांहीं आपल्या बायकोस नेऊन देत असे. एके दिवशीं मगरी त्यास ह्मणाली, प्राणनाथ, असलीं अमृता प्रारखीं गोड फळें आपण कोठून आणितां ?

**मगर**–प्रिये, रक्तमुख नांवाचा वानर माझा मोठा मित्र आहे, तो नेहमीं हीं फळें मला देतो.

**मगरी**–असलीं अमृतासारखीं फळें तो नेहमीं खातो, त्यामुळें त्याचें काळीज अमृतरूपच झालें असेल. तुह्मांला माझी गरज असेल तर तें मला आणून द्या, ह्मणजे मी तें खाऊन अजरामर होईन, आणि तुह्मांस यथेच्छ उपभोग देऊन निरंतर सुखी करीन.

**मगर**–असला भलताच हट्ट करूं नको. एकतर तो माझ्या भावासारखा आहे, शिवाय त्याला मारितांही यावयाचें नाहीं.

**मगरी**–आजपर्यंत तुह्मी कधींही माझें ह्मणणें मोडलें नाहीं. आतांशीं दिवसभर तुह्मी तिकडेच असतां. यावरून ह्मास असें वाटतें कीं, तुमचें त्या वानरिणीशीं सख्य जमलें आहे. ह्मणूनच आतांशीं तुह्मीं मजबरोबर नीट बोलत नाहीं. कांहीं मागितलें तरी तें देत नाहीं. रात्रभर रागानें जळत असतां, दृढालिंगन करीत नाहीं, चुंबनही घेत नाहीं. अर्थात् तुमच्या मनांत कोणी दुसरी स्त्री आल्या शिवाय असें होणार नाहीं. तुह्मी मोठे कपटी आहां.

हें ऐकून तो तिला जवळ घेऊन तिची समजावणी करूं लागला. तेव्हां ती ह्मणाली, तुह्मी कांहीं केलें तरी ती सटवी तुमच्या मनांत आहे,यांत संशय नाहीं. पुरे आतां तोंडापुरती समजावणी करून काय होतें? तुमचें व तिचें सख्य नसतें व तो वानर असता तर मजकरितां तुह्मी त्याला मारिलें असतें. नाहीं तर वानराशीं येवढा स्नेह कशाला असणार? फार कशाला बोलूं? मला त्याचें काळीज मिळालें नाहीं तर अन्न वर्ज्य करून मी जीव देईन.

असा तिचा निश्चय पाहून तो मगर मोठ्या काळजींत पडला, बायकांनीं एकदां हट्ट घेतला ह्मणजे जीव गेला तरी तो जावयाचा नाहीं. आतां या संकटास काय करावें? त्याला मारावें तरी कसें? असा विचार करीत तो वानराजवळ गेला. मगर उशीरानें आलेला असून काळजींत पडलेला आहे असें पाहून वानर त्यास ह्मणाला, मित्रा, रोजच्यापेक्षां आज इतक्या उशीरानें कां आलास?

**मगर**– मित्रा, तुझी वहिनी मजवर फार रागें भरली. ती ह्मणाली, मला तुह्मी तोंड देखील दाखवूं नका. नेहमीं तुह्मी आपल्या सोबत्याच्या घरीं जाऊन यथेच्छ चमचमाट करतां, पण त्याला आपलें घर पहावयास एक दिवस देखील आणीत नाहीं. हा काय कृतघ्नपणा! आज भाऊजीला घेऊन या, नाहीं तर आतां तुमची माझी गांठ परलोकीं पडेल. असें ती ह्मणाली, ह्मणून येण्यास मला उशीर लागला. इतका वेळ तिजबरोबर भांडण्यांत गेला. या करितां आज आमच्या घरीं चल. तुझी भावजय वाट पहात बसली आहे.

**वानर**– मित्रा, तूं ह्मणतोस तें खरें, एकमेकांनीं एकमेकांकडे जावें यावें यांतच मजा आहे. पण आह्मी वनचर तुमच्या पाण्यांतील घरांत यावें कसें? याकरितां वहिनीलाच येथें घेऊन ये.

**मगर**– मित्रा पलीकडल्या किनाऱ्यावरच आमची रहाण्याची जागा आहे. खुशाल माझ्या पाठीवर बसून चल.

हें ऐकून वानर आनंदानें ह्मणाला, बरें आहे, असें असेल तर माझ्याकडून उशीर नाहीं. चल, हा मी तुझ्या पाठीवर बसतों. त्याप्रमाणें केल्यावर मगर त्यास पाण्यांत घेऊन चालला. तो अधिकाधिक खोल पाण्याकडे जाऊं लागला तेव्हां वानर त्यास ह्मणाला, दादा, हळूं हळूं चल. लाटांनीं मी सगळा भिजून गेलों आहें. हें ऐकून मगर मनांत ह्मणाला, हा खोल पाण्यांत आला. हा माझ्या तावडींत सांपडला. आतां याच्यानें कोठें जाववणार आहे? आतां याला आपला हेतू सांगवा, ह्मणजे हा देवाचें नांव तरी घेईल. असा विचार करून ह्मणाला, अरे, बायकोच्या हट्टाकरितां तुला मी येथें फसवून आणिलें. आतां घे एकदां देवाचें नांव!

हें ऐकून वानर ह्मणाला, अरे, तुह्मी मला मारण्याचा बेत केला, असें म्या तुझें किंवा तिचें काय वाईट केलें?

**मगर**— अरे, अमृता सारखीं फळें खाऊन तुझें गोड झालेलें काळीज खाण्याचे तिला डोहळे लागले आहेत, ह्मणून मीं असें केलें.

**वानर** — असें आहे तर मला तेथेंच कां सांगितलें नाहीं? मी आपलें काळीज नेहमीं जांभळीच्या झाडावर

ठेवीत असतों. तें वहिनीला आणून दिलें असतें. मला काळजाशिवाय रिकामें कशाला आणिलेंस?

हें ऐकून आनंदानें मगर ह्मणाला, असें आहे तर मला तेवढें काळीज दे, ह्मणजे ती द्वाड बायको हट्ट सोडून जीव देणार नाहीं. पुनः मी तुला त्या जांभळीच्या वृक्षाजवळ नेतों असें ह्मणून पुनः त्या वृक्षा जवळ आला. तेव्हां वानरही लवकर लवकर मोठमोठ्या उड्या मारून पट्दिशीं वृक्षाच्या शेंड्यावर जाऊन बसला, आणि मनांत ह्मणाला, आज मी काळाच्या जबड्यांतून कसा तरी सुटलों. लबाडावर कधींही विश्वास ठेवूं नये. विश्वास ठेवल्यानें मोठमोठे अनर्थ होतात. आज माझें पुनर्जन्म झालें. नंतर तो मगर त्यास ह्मणाला, मित्रा, तेवढें काळीज दे. तुझी वहिनी तें खाऊन संतुष्ट होईल.

वानर हंसून त्यास शिव्या देऊन ह्मणाला, विश्वासघातक्या, मूर्खा, कोणाला तरी काळीज वेगळें काढून ठेवितां येईल काय? निघून जा येथून. येथें पुनः येऊं नको.

हें ऐकून आश्चर्यानें मगर मनांत ह्मणाला, म्या मूर्खानें याला आपला मतलब सांगितला ह्मणून असें झालें. आतां पुनः फसून आला तर बरें होईल. असा विचार करून ह्मणाला, मित्रा, मी थट्टा केली. तिला तुझ्या काळजाचें काय करावयाचें? पाहुणचाराकरितां बोलाविलें, चल आतां, ती वाट पहात असेल.

**वानर**—दुष्टा, चालता हो, त्वां कांहीं केलें तरी मी पुनः येणार नाहीं.

**मगर**—मित्रा, असें करूं नको. घरीं येऊन मजवरचा कृतघ्नपणाचा दोष काढून टाक. नाहीं तर तुझ्या नांवानें येथें जीव देईन.

**वानर**—त्वां कपट केलें होतें, परंतु माझ्या खरेपणामुळें तें व्यर्थ झालें. तुजकडून आतां फसला जाईन इतका मी मूर्ख नाहीं. पुनः मला फसविण्याचा तूं उद्योग करितोस, यांत आश्चर्य नाहीं; हा दुष्टांचा स्वभावच आहे. साधूच्या संगानें; दुष्ट चांगले व्हावयाचे नाहींत. स्त्रीलंपटा मूर्खा, तुजसारखे जे मूर्ख, स्त्री-जित आहेत, ते असें करून आपला नाश करून घेतात.

असें त्यांचें भाषण चाललें असतां दुसऱ्या एका जलचरानें येऊन सांगितलें कीं, मगरा, तुझी बायको हट्टानें उपवास करीत बसली होती, तिनें तुला येण्यास उशीर लागल्यामुळें जीव दिला. हें ऐकून मगरास फार वाईट वाटून तो ह्मणाला, मी मोठा दुर्दैवी आहे. मला कांहीं नाहींसें झालें. बायको असली तर घरदार सर्व कांहीं आहे. ती नाहीं तर त्याचा काय उपयोग? मित्रा, आतां मला क्षमा कर. बायकोच्या विरहाचें दुःख सहन होत नसल्यामुळें मी जीव देण्यास जातों. हें ऐकून वानर हंसून ह्मणाला, मी आधींच सांगितलें कीं, तूं स्त्री-जित आहेस, त्याचा अनुभव आला. अरे, असली दुष्ट बायको मेली ह्मणून आनंद मानावयाचा, तें सोडून दुःख कां करितोस? असल्या बायकोचें तोंड देखील पाहूं नये.

**मगर**—दोन अनर्थ झाले. बायको मेली, आणि तुझ्यासारखा मित्रंही नाहींसा झाला.

ते असें बोलत आहेत तों दुसऱ्या एका जलचरानें येऊन सांगितलें कीं, अरे तुझें घर दुसऱ्या एका मोठ्या जबरदस्त मगरानें घेतलें. हें ऐकून तो त्यास घरांतून काढून टाकण्याचा उपाय योजूं लागला. तो मनांत ह्मणाला; मित्र शत्रु झाला, बायको मेली, घर दुसऱ्यानें घेतलें, आणखी काय काय व्हा-

वयाचें आहे तें कोणाला ठाऊक? संकटें येऊं लागलीं म्हणजे एका मागून एक येतात, असें म्हणतात तें खरें आहे. आतां त्याशीं युद्ध करावें किंवा गोडी गुलाबीनेंच त्यास बाहेर घालवावें, अथवा फसवून किंवा कांहीं देऊन बाहेर काढावें? या वानरास कसें करूं तें विचारितों. शहाण्याचा सल्ला घेऊन काम केलें असतां नाश होत नाहीं. असा विचार करून वानरास पुनः म्हणाला, मित्रा, पहा मी कसा दुर्दैवी आहें तो? माझें घर देखील दुसऱ्यानें घेतलें, आतां मी साम, दाम, दंड, भेद, यांपैकीं कोणता उपाय करूं तें सांग.

**वानर**—कृतघ्ना चालता हो, म्हणून एकवेळ सांगितलें, आतां पुनः कां बोलतोस? मी मूर्खाला उपदेश करीत नाहीं.

**मगर**— मित्रा, मी अपराधी आहें खरा, परंतु पूर्वीचा स्नेह मनांत आणन तरी सांग.

**वानर**—बायकोच्या सांगण्यावरून मला समुद्रांत टाकण्याकारितां त्वां नेलें; याकरितां मी सांगणार नाहीं. तूं मूर्ख आहेस, तुला कांहीं समजत नाहीं. बायकोचें ऐकिल्यामुळें तुला हा प्रसंग आला आहे.

**मगर**— मी दुष्ट खरा, पण मजवर कृपा करून मला माझें घर पुनः मिळेल असा काहीं उपाय सांग.

**वानर**— मी सांगितल्याप्रमाणें तूं करणार नाहींस.

**मगर**— सांगशील तसें करीन.

**वानर**— जा आणि त्याजबरोबर युद्ध कर. युद्धाशीवाय शत्रूचा नाश व्हावयाचा नाहीं.

हें ऐकून रणांत मरण आलें तरी बरेंच; असें म्हणून म-

गर घरीं गेला, आणि घरांत शिरलेल्या मगराबरोबर युद्ध करून त्यास मारून सुखानें घरांत राहूं लागला.

---

## तात्पर्य.

जगाची स्थिति फारच चमत्कारिक आहे. त्यांत दुष्ट, लोभी, विषयासक्त असे पुष्कळ लोक असल्यामुळें आपण कितीही चांगल्या रीतीनें वागत असलों तरी संकट येणार नाहीं असें समजूं नये. प्रसंगीं उपयोग व्हावा ह्मणून ज्यांवर आपण उपकार करून त्यांशीं प्रेमानें वागतों, तेच कधीं कधीं आपले शत्रु होतात. स्त्री-जित असतो तो काय करील याचा तर नेमच नाहीं. जन्मापासून स्वतः कष्ट सोसून ज्यांनीं आपलें संगोपन करून वाढविलें, त्या मातापितरांस देखील स्त्री-लंपट मनुष्य टाकितो,मग दुसऱ्याची काय कथा? एकवार मनुष्य व्यसनी झाला ह्मणजे त्यास योग्यायोग्य, खरें खोटें, चांगलें वाईट, हें कांहीं कळेनासें होतें. त्यामुळें तो लोकांस फसविण्याचा य[illegible] करूं लागला तरी त्याचा यत्न सहसा फुकट होत नाहीं, तथापि अशांपासून फसवून घेण्यापुरतें आंगीं शहाणपण असलें तरच निभावणी होते. ज्यांच्या अंगीं तें नसतें ते फसतात. मगर स्त्री-लंपट असल्यामुळें त्यानें वानराच्या ह्मणण्याचा विचार केला नाहीं. परंतु वानरास जीव जाण्याच्या वेळेस युक्ति सुचली [illegible] बरें झालें. नाहीं तर दुसरा तरणोपाय नव्ह[illegible] तसेंच ज्यानें एकदां विश्वासघात केला, त्यावर कधींही विश्वास ठेवूं नये. तो निर्लज्ज असल्यामुळें हातीं पायीं पडून रडूनकढून आर्जवें करूं लागतो, आणि फस[illegible]

१४८०५


आपला मतलब साधण्याकरितां कांहीं दिवस चांगला वा
तरी शेवटीं फसविल्या शिवाय रहात नाहीं. वानराच्या
टल्या आचरणावरून हें घ्यावयाचें कीं, खरे सज्जन
तात त्यांचा कोणी विश्वास घातानें नाश करूं लागला
ते त्याच्या नाशास प्रवृत्त न होतां आपला बचाव
त्यास आपणापासून दूर मात्र करितात.

---

## सुबोधवचनें.

१ रूपानें आणि तारुण्यानें संपन्न आणि श्रेष्ठकुल
असे पुरुष जर विद्याहीन आहेत, तर पुष्पादि संपत्ति
असून सुगंधरहित अशा पळसाच्या वृक्षासारिखे शोभत ना

२ कोकिलांचें रूप स्वर, त्या स्वरेंकरून सर्वांतें म
करतात. स्त्रियांचें रूप एक पातिव्रत्यच होय. कुरू
रुषांचें रूप एक विद्या. ते त्या विद्येनेंच शोभतात.
स्व्यांचें रूप क्षमा होय. कारण रिता शमेनेंच सर्व जिंकिता

३ जन्मजन्मांचे ठायीं धर्म, अर्थ, काम, मोक्ष
एकही पुरुषार्थ ज्यास घडला नाहीं त्याचें मनुष्यांमध्यें
तें मरणतुल्य जाणावें. जन्मास येऊन ज्यानें त्याचें
केलें त्याचें जन्म सफल होय.

४ कुग्रामीं राहणें, कुलहीनाची सेवा, कदन्न भक्षण,
काळ क्रोधयुक्त जिचें मुख, अशी स्त्री, पुत्र मूर्ख
कन्या गतभर्तृका, हीं सहा अग्नीवांचन देहातें जाळिता

---

हे

१८८०५
050